स्वरसंस्कृतीचा

दीपोत्सव

स्वरप्रतिभा

दिवाळी २००६

७० रूपये



रसिक मोहिनी विशेषांक





स्वरप्रतिभा

दीपावली २००६

वर्ष ३ : अंक ३

मूल्य रु. ७०/-

मराठी भाषा संवर्धन प्रतिष्ठान

(नोंदणी क्र. महाराष्ट्र ६६/२००१)

१७७, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी (०२०) २४४९३७८३, २४४९४९२३

संपादक

प्रवीण प्रभाकर वाळिंबे

सहसंपादक

सुलभा तेरणीकर

विशेष सहाय्य

राजेंद्र ठाकूरदेसाई

अद्वैत धर्माधिकारी

व्यवस्थापन

रोहित वाळिंबे

आशिष वाळिंबे

निर्मिती सहाय्य

वीणा पेशवे

कार्तिकी चरवड

अनुराधा काळे

मुद्रण

अलर्ट डी. टी. प्रिंटर्स

१०/३, ओंकार कंपाऊंड, लगड मळा,

वडगाव खुर्द, सिंहगड रोड,

पुणे ४११०४१

'स्वरप्रतिभा' २००६ दिवाळी अंक मालक, संपादक व प्रकाशक प्रवीण प्रभाकर वाळिंबे (अध्यक्ष, मराठी भाषा संवर्धन प्रतिष्ठान) यांनी अलर्ट डी.टी. प्रिंटर्स, सिंहगड रोड, पुणे येथे छापून तनया-ईशा प्रकाशन, १७७ शनिवार पेठ, पुणे ३० येथे प्रकाशित केला.

संपादकीय

'स्वरप्रतिभा' चा संगीताला वाहिलेला दिवाळी अंक २००६ हा 'रसिक मोहिनी विशेषांक' म्हणून रसिक वाचकांसमोर ठेवीत आहोत.

१४ मार्च १९३१ ह्या दिवशी पहिला भारतीय हिन्दी बोलपट 'आलमआरा' प्रदर्शित झाला. ६ फेब्रुवारी १९३२ ह्या दिवशी 'प्रभात' चा पहिला मराठी बोलपट 'अयोध्येचा राजा' प्रदर्शित झाला. ह्याचे औचित्य साधून संगीतात रमलेल्या स्त्री कलावतींसाठी 'रसिक मोहिनी' हा विशेषांक समर्पित आहे.

रेडिओदेखील पंच्याहत्तर वर्षांच्या अमृतमय कारकिर्दीचा उत्सव साजरा करीत आहे. विसाव्या शतकाच्या पहिल्या चरणात ध्वनिमुद्रण सुरू झालं, मराठी रंगभूमीवर सात दशकांपासून स्त्रियांची पावलं उमटू लागली. काळाच्या शतकभर पसरलेल्या विराट पटाचा वेध घेऊन कलावतींचा एक आलेख मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. अप्रसिद्ध, विस्मृत, उपेक्षेच्या, काळाच्या पडद्याआड गेलेल्या गोहरजान, जानकीबाई, जोहरा आग्रेवाली, मेहबूबजान, हिराबाई पेडणेकर, ताराबाई शिरोडकर, अंजनीबाई मालपेकर, बाई सुंदराबाई ह्या तेजस्विनींच्या कर्तृत्वाला उजाळा देणारे माहितीपूर्ण लेख डॉ. सुरेश चांदवणकर, ॲड. राजेंद्र ठाकूर देसाई, जयंत राळेरासकर यांनी दिलेले आहेत, ते अभ्यासकांना रसिकांना आवडतील. संगीतकार मीना मंगेशकरांनी 'स्वरप्रतिभा' साठी खास संवाद साधलेला आहे, अद्वैत धर्माधिकारी यांनी घेतलेली मुलाखत. शशिकांत किणीकरांनी लिहिलेले फोटोसह दिलेल्या लेखात शमशाद बेगम व संगीतकार सरस्वतीदेवी यांच्यावरील विशेष लेख, नंदा सुर्वे यांनी घडवलेली भावगीत गायिकांची हृद्य भेट, संगीत-गायन व संशोधन ह्या क्षेत्रात काम करणाऱ्या अंजली मालकर, शैला दातार व डॉ. सुहासिनी कोरटकर यांनी आमच्यासाठी लेख सादर करताना त्यांचं संगीतातलं स्त्री कर्तृत्व अधोरेखित करीत आहेत.

चित्रपटातल्या गीतलेखनात एकच नाव घ्यावं त्या शांता शेळके, यांच्याबद्दलच्या हृदयस्पर्शी आठवणी उपेन्द्र चिंचोरे यांनी सांगितलेल्या आहेत, तर अन्नपूर्णादेवींच्याबद्दल एका पुस्तकातून उलगडलेल्या काही घटनांचा, भावनांचा वेध घेतलेला आहे.

सितारादेवी, सरस्वतीबाई राणे, उषा खन्ना, जगजीत कौर, राजकुमारी, सुमन कल्याणपूर, सुधा मल्होत्रा यांच्या 'चंदेरी आठवणी'ही रसिकांना थेट भेटीचा आनंद देतील. 'रोशन सातारकर यांच्यावरील विशेष लेख, दुर्मिळ फोटो, काही गाणी, काही आठवणी, लता मंगेशकरांच्या गाण्यांचा जयंत कुलकर्णी यांनी घेतलेला वेध 'रसिक मोहिनी' त समाविष्ट आहे.

संगीताची वाट चालणं हे एखाद्या कठीण व्रतासारखं आहे. कुटुंब, मातृत्व, प्रपंच याची जबाबदारी सांभाळून ह्या कलावतींनी यश, संपत्ती, लोकप्रियता याचा आनंद अनुभवलेला आहे. विपन्नावस्था, उपेक्षा, एकाकीपण, गृहकलह यांनाही काहीजणी सामोऱ्या गेलेल्या आहेत. 'रसिकमोहिनी' विशेषांकातून ह्या कलावतींचं अस्सल माणूसपण बाईपण दिसलं, त्यांच्या कलाविश्वाचं आणि जीवनाचं ओझरतं दर्शन घडलं, तर आमच्या प्रयत्नांचं सार्थक झालं असं म्हणावं लागेल.

सर्वच कलावतींचा शोध घेणं शक्य झालेलं नाही याची आम्हाला जाणीव आहे. युवा कलावतींसाठीही पुरेशी जागा दिलेली नाही; पण भावी काळात त्याबद्दल काही करता येईल. जीवन सुरेल, सुंदर आणि संपन्न करणाऱ्यांसाठी 'रसिकमोहिनी'ची खास भेट आहे. आपण त्याचं स्वागत निश्चित कराल, अशी अपेक्षा आहे.

वाचक, रसिक, हितचिंतक, जाहिरातदार, स्नेही, साहित्यप्रेमी, मुद्रक, वितरक सर्वांना दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !

प्रवीण प्र. वाळिंबे

स्वरप्रतिभा

दीपावली २००६

अनुक्रमणिका

बाईजानची गाणी	डॉ. सुरेश चांदवणकर	[illegible]
सोलापूरची मेहबूबजान	जयंत राळेरासकर	१३
ताराबाई शिरोडकर	राजेंद्र ठाकूरदेसाई	२०
बाई सुंदराबाई	राजेंद्र ठाकूरदेसाई	२३
अंजनीबाई मालपेकर	राजेंद्र ठाकूरदेसाई	२६
हिराबाई पेडणेकर - एक कांचनमृग	राजेंद्र ठाकूरदेसाई	२९
प्रभात संगीताच्या सुकन्या	सौ. अरुणा दामले	३३
संगीत दिग्दर्शिका सरस्वतीदेवी	शशिकांत किणीकर	३८
शब्दसुरांच्या चांदणसड्यात	नंदा सुर्वे	४१
मीना मंगेशकर : एक सुरेल संवाद	अद्वैत धर्माधिकारी	५१
सूर सनईत नादावला :	अद्वैत धर्माधिकारी	५५
तू नसता...	उपेंद्र चिंचोरे	५७
लता-गीतांचा हिंदीमहासागर	जयंत कुलकर्णी	६१
बूझ मेरा क्या नाम रे	शशिकांत किणीकर	६४
अन्नपूर्णादेवी : एकांतगीत	सुलभा तेरणीकर	६७
जीवन : एक मधुर मैफल	टी. वसंताकुमारी	७०
रंगभूमीची कुलवधू	परिचित	७२
ये है आशा	श्रीगौरी कोगेकर	७४
आवाज दे कहाँ है -	अद्वैत धर्माधिकारी	७७
आम्ही कलावती	अनुराधा मराठे	७९
आम्ही कलावती	मंजिरी आलेगावकर	८०
निर्गुणाचा संग धरिला जो आवडी	डॉ. सुहासिनी कोरटकर	८१
देवगंधर्वाचं देणं	शैला दातार	८७
देवगिरीचं गीत	अंजली मालकर	९३
रोशन सातारकर	ॲड. दिनेश ननवरे	९६
चंदेरी आठवणी	सुलभा तेरणीकर	१११
सूरयात्रेतील दशकन्या	शशिकांत किणीकर	११२
पसायदान		११६

'बाई-जान'ची गाणी

डॉ. सुरेश चांदवणकर

डॉ. सुरेश चांदवणकर हे पदार्थ विज्ञान शाखेची डॉक्टरेट मिळवलेले व मुंबईच्या टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेन्टल रिसर्च ह्या विश्वविख्यात संशोधन संस्थेत शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत.
जुन्या दुर्मिळ ध्वनिमुद्रिकांचा संग्रह, संवर्धन करणे व रसिकांना, अभ्यासूंना ऐकवणे व वृत्तपत्र, नियतकालिकांतून लेखन करणे हा त्यांचा छंद आहे. १९९० साली स्थापन केलेल्या सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टर्स च्या विविध कार्यक्रमांतून दुर्मिळ संगीत ऐकवणे, त्याबद्दल सोदाहरण माहिती देणे याची विशेष आवड आहे.

भारतीय संगीत वैदिक काळापासूनचं आहे. सामवेद तर गायन-वादन कलेवरचा आहे. याचे पुरावे शोधू जाता 'संगीत रत्नाकर' सारखे अनेक ग्रंथ लिखित/छापील स्वरूपात आढळतात. पण ह्या संगीताचा काही नमुना ऐकायचा म्हटलं तर गायक-वादकांच्या उपलब्ध ध्वनिमुद्रिका/ध्वनिमुद्रणांशिवाय आणखी कोणताच पर्याय नाही. काळाच्या विशाल पटावरती ही संगीतपरंपरा गुरू-शिष्य परंपरेतून मौखिक पद्धतीनं अगदी आजपर्यंत अबाधित राहिली आहे. आधुनिक उपकरणांच्या मदतीने आता हे सगळं सांगीतिक धन पुढच्या पिढ्यांकरिता मुद्रित करून ठेवायची सोय झालेली आहे.

आवाज कोरून ठेवायची कला आता एकशेतीस वर्षे वयाची होत आहे. १८७७ मध्ये अमेरिकेत थॉमस अल्वा एडिसननं सिलिंडरवरती मेणाच्या लेपनावर खाचा पाडून ''मेरी हॅड अ लिटिल् लॅम्ब'' ही बालकविता स्वत:च्या आवाजात कोरून ठेवली. १८८८ मध्ये एमिली बर्लिनर या जर्मन तंत्रज्ञानं सपाट तबकडी (फ्लॅट डिस्क) वरती ध्वनिमुद्रण करायचं तंत्र विकसित केलं. १८९७-९८ मध्ये लंडनमध्ये ग्रामोफोन कंपनीची स्थापना झाली. आपला भाऊ जोसेफ बर्लिनर याच्याबरोबर एमिलिनं जर्मनीत हॅनोव्हर येथे रेकॉर्ड्स छापायचा कारखाना ह्याच सुमारास उभारला व आपला सहायक गैसबर्ग याला ध्वनिमुद्रणाच्या तंत्रामध्ये वाकबगार केलं. १८९९ ते १९०४ या काळात गैसबर्ग व त्यांचे सहकारी ध्वनिमुद्रण मोहिमांवर युरोपातून निघाले. आशिया खंडातील अनेक देशांमध्ये ध्वनिमुद्रणं घेत ते नोव्हेंबर १९०२ मध्ये कलकत्ता येथे पोहोचले. तिथे एका हॉटेलात तात्पुरता रेकॉर्डिंग स्टुडिओ मांडला होता. भारतीय संगीताच्या ध्वनिमुद्रणपर्वाची तिथं सुरुवात झाली. पुढे १९०८ साली सिआल्दा येथे, तर १९१८ साली डमडम विमानतळापाशी ध्वनिमुद्रिका बनवण्याचे मोठे कारखाने उभारण्यात आले. गेल्या शंभराहून अधिक वर्षांत पाचेक लाख गाणी तरी ध्वनिमुद्रित झाली.

यापैकी अगदी सुरुवातीच्या काळात उत्तर हिंदुस्थानातल्या शेकडो गायिकांची गाणी ध्वनिमुद्रित झाली. ह्या बहुतेक स्त्रिया 'कोठेवाल्या' गणिका होत्या. एखाद्या श्रीमंत सरदार, जहागिरदार किंवा शेठच्या आश्रयानं राहणाऱ्या किंवा बदनाम वस्त्यांमध्ये राहून गायन-नर्तन कलेवर मुजरानृत्य करून उपजीविका करणाऱ्या या कलावंत स्त्रिया ! या गायिका बहुतेक उत्तरेकडील पट्ट्यामधल्या आहेत. लखनौ, बनारस, अवध, पानिपत, जालंधर, कलकत्ता, पाटणा, गया, जावरा, आगरा, अलाहाबाद अशा ठिकाणच्या आहेत. हिंदू गायिकांच्या नावापुढे दासी, बाला किंवा बाई हे उपपद आहे, तर मुसलमान स्त्री गायिकांच्या नावापुढे 'जान' असं उपपद आहे. या 'बाई' व 'जान' गायिकांनी सुमारे दोन हजारांहून अधिक गाणी मुद्रित करून ठेवली आहेत. यातल्या बऱ्याचशा स्त्रियांनी त्या काळातल्या उस्ताद गवयांकडून रीतसर तालीम घेतली आहे, एका नव्हे तर अनेकांकडून; त्यामुळे त्यांच्या गायनातून दीड-दोनशे वर्षांपूर्वीची परंपरा तरी जपून ठेवली गेली आहे. उपलब्ध ध्वनिमुद्रिकांमधून ती ऐकायलापण मिळते. त्यादृष्टीने या गायिका व 'बाई-जान' ची गाणी फार महत्त्वाची आहेत. यातल्या ग्रामोफोन सेलिब्रिटीज किंवा स्टार गायिका फार थोड्या असल्या तरी एखादी तरी ध्वनिमुद्रिका दिलेल्या कलावंत स्त्रियांची यादी मोठी आहे. कधी स्वत:च्या पैशाने किंवा एखादा 'आशक' प्रायोजक गाठून या ध्वनिमुद्रिका बनवल्या गेल्या आहेत.

अगदी सुरुवातीला कलकत्ता येथील क्लासिक; स्टार मिनर्व्हा, एमराल्ड, कॉरिंथियन इ. थिएटरमधील गायिकांनी बंगाली, हिंदी नाटकांतली प्रसिद्ध पदं मुद्रित केली आहेत. त्यात सोशीमुखी (पूर्णा बाला), मिस सुशीला, मिस अचछेरिया, मिस बिनोदिनी, मिस् किटन अशी नावं जुन्या कॅटलॉग्जमध्ये आढळतात.

याशिवाय शुद्ध शास्त्रीय संगीत व सुगम संगीताचे प्रकार गाऊन व नाचून चरितार्थ चालविणाऱ्या अनेकजणी होत्या. अल्ला रखवी अल्लाबंदी, अमीरजान, समीर निशान, अशगरी जान, मिस अजीजन जान, अच्छनबाई, बन्नीजान, बेदाना दासी, भवानी, भुवनेश्वरी, बुरीबाई, बिंदूबाला, चुन्नीबाई, दोऊन्नीजान, दीनबाई, गिरिंद्रकुमारी दासी, गुलजार बेगम, मिस गोदावरी, मिस गफूरजान, गिरिबाला

दासी, हैदरीजान, हरी मोतीदासी, हिंगनबाई, हुस्ना जान, इमामबंदी, मिस इलाही जान, जरावजान, जरुपिया जान, राज दुलारी, मिस् जवाहिरबाई, जोरबानू, मिस जुम्मा, जादूमणी दासी, मिस् झेलम झंजी, कालीजान, मिस् किटीजान, मिस कल्लो, कुमुदिनी, कुसुमकुमारी, मिस् लावण्यबाई, मोहंमद बंदी ऑफ पाटणा, मिस काशी कस्तुरी फातरफेकरीण, कृष्णा झुल्यावादी, मिस् माहताब, माहमुदा जान, मुमताज जान, मिस मुन्नीजान, मिस् मुंगाबाई, नवाबजान, नजीरजान, मिस् भागाबाई नाडकैकरीण, नीराबाई बांदोडकरीण, मिस् पन्ना, पियरीजान प्रतिभादासी, पूर्णकुमारी दासी, मिस् पापाजान, राधाबाई, मिस् सैलाबाई, मिस सुशीला, सरदार बेगम, सुंदरजान, सूरजबोली, मिस् झेबन जान, वहिदजान, नजीरजान इ. दक्षिण हिंदुस्थानातल्या पुढील गायिकांच्या रेकॉर्डस

१९०८ पर्यंतच्या ध्वनिमुद्रिकांच्या सूचीमध्ये आढळतात. मिस वैकम्मा, नागम्मा, लोकम्मा, वरलक्ष्मी, मिस् नागरत्नम, धनकोटिसिस्टर्स इत्यादी या गायिकांनी शुद्ध शास्त्रीय संगीताच्या खूप कमी; पण सुगम संगीताच्या पुष्कळ ध्वनिमुद्रिका दिल्या आहेत. त्यात ठुमरी, दादरा, चैती, गजल, होरी, भजन, कव्वाली, नात, गीत रास, सोरठ्, मजाकिया, गाली असे लोकप्रिय संगीताचे नाना प्रकार ऐकावयास मिळतात. पुढे हिंदी/प्रादेशिक चित्रपटसंगीतामध्ये संगीतकारांनी या रेकॉर्डसमधील संगीतावरती मनसोक्त डल्ला मारून घेतलेला आहे. १९३५ च्या सुमारास कलकत्ता येथील श्री. एस्. पी. जैन या संगीतप्रेमी रसिकाने दोन हजार रेकॉर्डस ऐकून त्यावरून ऐकलेले शब्द उतरवून घेतले. त्यावरचं एक पुस्तक 'हिंदी ग्रामोफोन रेकॉर्ड संगीत' दोन भागांमध्ये प्रकाशित केलं. त्यातल्या पी. ३६८२ क्रमांकाच्या ध्वनिमुद्रिकेवर मिस् अख्तरी जाननं गायिलेला दादरा ह्या सर्व गायिकांची प्रातिनिधिक व्यथा मांडतो. इन्ही लोगोंने ले लिना दुपट्टा मेरा..

ना जानो बरजवासे पूछो, जिसने अशर्फी गज दीना दुपट्टा मेरा

ना जानो रंगरजैबासे पूछो, जिसने गुलाबी रंग दीना दुपट्टा मेरा

ना जानो तो मोरे सैयासे पूछो, जिसने उठाके मजालीना दुपट्टा मेरा

इन्हीं लोगोंने ले लिना दुपटटा मेरा....'

ह्या अप्रसिद्ध गायिकांची आज कुणाला माहितीपण नाही. चरित्र, छायाचित्र काहीही नाही. काही अपवादात्मक गाणी सोडली तर इतर मौल्यवान रचना काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. ग्रामोफोन कंपनीला अमाप पैसा, प्रतिष्ठा व् प्रसिद्धी मिळवून देणाऱ्या काही गायिकांचा परिचय करून घेणं अभ्यासक व रसिकांच्या उपयोगी पडावं.

गौहरजान ऑफ कलकत्ता (१८७०-१९३०)- गोहरजानचं मूळ युरोपात ! नाव ॲंजेलिना यूवार्ड, वडील आर्मेनियन, आई व्हिक्टोरिया हेम्मींग्ज - जन्मानं ज्यू ! आईचं लक्ष गाण्याबजावण्याकडे व नाचण्याकडे अधिक ! नवऱ्याला सोडून आझमगढहून आपल्या मुसलमान तबलियाबरोबर छोट्या मुलीला घेऊन ती प्रथम बनारसला आली. धर्मांतर केलं. स्वत:साठी बडी मलकाजान (चुलबुलैवाली) व लेकीसाठी गौहरजान अशी नावं मायलेकींनी स्वीकारली. छोट्या गौहरकडे आईकडून कलेचा वारसा आला होताच. ती पहिली गुरू ! पुढे बनारसचे राय छग्गनजी यांच्या आश्रयाला दोघी काही वर्षे राहिल्या. तिथे बिच्छू महाराजांकडून गाणं व अलीबक्ष यांच्याकडून कथ्थकची तालीम घेतली. तिची भाषा शिकण्यातली प्रगती पाहून आईनं वेगवेगळे शिक्षक नेमून वीसेक भाषा शिकवल्या. राय छग्गनजी यांचा तिला फार लळा होता. त्यांच्या आठवणी/स्मृतीसाठी पुढं तिनं 'छगनपिया' नावानं काही रचना केल्या.

१८८८ मध्ये बनारसहून आईबरोबर तिने कलकत्ता येथे मुक्काम हलवला. कलकत्ता शहरातील बौबाजारात तिनं आपला जम बसवला व काही वर्षांतच चाळीस हजार रुपयांची तीन मजली इमारत खरेदी केली. इथं शेठ लालाचंद दुलीचंद व श्यामलाल खत्री हे प्रमुख आश्रयदाते ! पतियाळा घराण्याचे कालेखाँ व किराणा घराण्याचे मौला बदन यांच्याकडे गाणं शिकली. त्यामुळे तिच्या गाण्यामध्ये वेगवेगळ्या घराण्यांचं अजब मिश्रण ऐकायला मिळतं. अलीबक्ष व ब्रिंदादिन महाराज यांच्याकडे ती कथ्थक शिकली. श्रीजनबाईनी तिची ध्रुपद व धमारची तयारी करून घेतली, तर चरनदास यांनी बंगाली कीर्तन शिकवले. मौजुदिन खान, प्यारासाहेब व भैय्या गणपतराव या समकालीनांकडूनही ती ठुमरी-गजल शिकली. टागोरांची गाणी व रवींद्र संगीतपण ती गात असे. 'हमदम' या

टोपणनावाने तिने रचना केल्या व पुढे ग्रामोफोन रेकॉर्डवरती त्या ध्वनिमुद्रितपण केल्या. ती बंगाली, हिंदुस्थानी, गुजराथी, तमीळ, मराठी, अरेबिक, पर्शियन, पुश्तो, फ्रेंच पेशावरी व इंग्रजी भाषा शिकली होती व आताच्या बऱ्याच भाषांमधल्या रचना तिने मुद्रित केल्या.

इतकी भरभक्कम तयारी झाल्यावर तिचा बोलबाला सर्वत्र झाला व नावलौकिक वाढू लागला. वयाच्या पंधराव्या वर्षी १८८६ मध्येच छोट्या गौहरचा दरभंगा रियासतीत जलसा झाला. १८९६ पासून ऐन पंचविशीमध्ये कलकत्त्यात तिचे जलशे धनिकांच्या घरी विशेष प्रसंगाने होऊ लागले. तिची बिदागी तीन ते पाच हजार रुपये असायची. शहरात ती खास बग्गीमधून फिरत असे. १९०७ साली मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये (एशियाटिक लायब्ररी) तिचं गाणं झालं व तसा उल्लेखही तेव्हा घेतलेल्या ध्वनिमुद्रिकेच्या लेबलवरती आढळतो. १९१६ मध्ये ती पुण्यामध्ये होती व उस्ताद अब्दुल करीम खान यांच्या विद्यालयात गायिलीसुद्धा ! १९११ मध्ये दिल्ली दरबारात पंचम जॉर्ज बादशहांचा राज्यारोहण समारंभ झाला. अलाहाबादच्या जलशात तिने जानकीबाई (अलाहाबादची) बरोबर 'मुबारक हो मुबारक हो' हे गीत युगुलगीताच्या स्वरूपात गायिलं व दोघींनी बादशहाकडून प्रत्येकी शंभर मिन्यांचा नजराणा मिळवला.

तिची गाणी सर्वसामान्यांना ऐकायला मिळत नसत. एखाद्या धनिकांकडे तिचा जलसा असला की आजूबाजूच्या गल्ल्यांमध्ये रस्त्यावर उभे राहून लोक गाणी ऐकायला गर्दी करत असत. नोव्हेंबर १९०२ मध्ये ग्रामोफोन कंपनीची मंडळी कलकत्ता येथे आली. गौहरजानची गाणी त्यांनी ऐकली. तिच्या रेकॉर्डसचा खप प्रचंड होणार याची गैसबर्गला खात्री पटली व त्यानं तिला ध्वनिमुद्रणासाठी निमंत्रण दिलं. तीन/साडेतीन मिनिटात गाणं मांडायचं कसब तिनं आत्मसात केलं. सुरुवातीच्या काळात मेणाच्या तबकडीवर मुद्रणं घेतली जात. त्यावरून रेकॉर्डस बनवण्याचं काम जर्मनीमध्ये चालत असे. तिथल्या ध्वनिमुद्रण तंत्रज्ञांना नीट समजावं म्हणून गाण्याच्या शेवटी गायक/गायिका आपलं नाव इंग्रजीत सांगत असे, ते रेकॉर्डचे लेबल बनवायला फार उपयोगी पडत असे. त्यामुळे सुरुवातीच्या काही गाण्यांच्या शेवटी 'माय नेम इज गौहरजान' असं ती ओरडून सांगते. पुढे१९०८ साली कलकत्ता शहरामध्येच रेकॉर्डस छापायचा कारखाना उभारल्यानंतर ही घोषणा देणं बंद झालं.

ग्रामोफोन कंपनीशी तिचा वेळोवेळी करार होऊन १९०२ ते १९२० पर्यंत तिने तीनशेच्यावर गाणी मुद्रित केली. यात उर्दू, मद्रासी, तेलुगु, इंग्रजी, पेशावरी, अरेबिक संस्कृत, कच्छी, तुर्की, बंगाली, परतू व हिंदुस्थानी भाषांतली गाणी आहेत. अभिजात रागदारीतल्या बंदिशींबरोबरच सुगम संगीतामधली चैती, कजरी, होरी, टप्पा, तराणा, गजल, ठुमरी इतके प्रकार तिने गाऊन ठेवले आहेत. ग्रामोफोन कंपनीकरिता तिने सर्वात जास्त रेकॉर्डस दिल्या असल्या तरी सन्, पॅथे, निकोल, रॉयल व सिंगर या स्पर्धक कंपन्यांकरितापण तिने रेकॉर्डस दिल्या आहेत.

तारुण्यामध्येच गरगरीत व थोराड बांधा असूनही गोरी गौहरजान सुंदर नव्हे पण मोहक होती. शुद्ध मुद्रा, शुद्ध वाणी, योग्य अशी संयमित हावभावांची अदाकारी, आवाज अतिशय सुरेल, मधुर, पातळ, प्रवाही, धारदार आणि त्यातून भरदार, मोकळा मोठा. तीन-चार सुरांमध्येसुद्धा अपूर्व अशी अखंड तरी दाणेदार करामत. श्रोत्यांना आधी छापील सचित्र कार्यक्रमपत्रिका ('गौहरके गाने' या नावाने) देऊन, थिएटरात तिकीट लावून कार्यक्रम करीत असे. त्यात उभे राहून गात, अदाकारीचं नृत्य करीत असे. श्रोत्यांच्या फरमाईशीचापण मान ठेवत असे. पूर्वी स्त्रियांनी उभं राहून नाचून अदाकारीचं गाणं करायचीच पद्धत होती. साथीदारसुद्धा गळ्यामध्ये अवजड वाद्यं वाजवून साथ करीत व नाचत मागे-पुढे हालचाली करीत असत. पण बैठकीत, खासगी जलशामध्ये बसूनच, दोन सारंग्या व एक तबला यांच्या साथीनं गात. त्या स्त्रियांना तंबोऱ्याची गरजच फारशी नसे. गौहरजानचे रेकॉर्डिंग करतानाचे एक छायाचित्र उपलब्ध आहे. त्यात पेटी, तबलावाला दिसतो व मागे भिंतीमध्ये रेकॉर्डिंग हॉर्न (कर्णा) दिसतो. त्यात ओरडून गावं लागे. (कार्बन मायक्रोफोन १९२५ नंतर आले) त्यामुळे लांब पल्ला असलेल्या व उंच आवाजाच्या गायिकांची गाणी सुरेख उतरली. 'राधेकृष्ण बोल मुखसे' व 'कृष्ण मुरारी बिनती करत' ही पदे गौहरजानमुळेच अबालवृद्धांच्या तोंडी आली. तिचं व्यक्तिगत/वैयक्तिक/खासगी जीवन मात्र दु:खाचं होतं. सय्यद गुलाम अब्बास हा तिचा सेक्रेटरी. पेशावरचा. तिच्याहून दहा वर्षांनी लहान. त्याच्याशी तिनं मुसलमान धर्माच्या मान्यतेनुसार 'मुता' निकाह केला; पण तो टिकला मात्र नाही. त्याचं कारण त्याचा बाहेरख्यालीपणा. सैरभैर होऊन ती कलकत्ता सोडून गेली. लखनौ, ग्वालियर, बनारस भटकत शेवटी रामपूर संस्थानांमध्ये नोकरी केली. तेथील सरदारपुत्रांच्या वागणुकीला विटून रातोरात पळून मुंबईस आली. इथं काही वर्षे राहिली. गुजराथी नाटक कंपनीचे सुस्वरूप संगीत नट मास्टर अमृत वगळ नायक हे स्वत:च नाटकातली पदे चालींसकट तयार करीत. त्यांनी रचलेला 'आनबान जियामें लागी' हा दादरा अमृतने नाटकासाठी स्वत:च रचला आहे हे कळताच त्याच्या पाया पडून तो संपूर्ण मिळवला (पुढे तो रेकॉर्डवरपण उतरवून ठेवला). दोघं एकमेकांच्या प्रेमात पडली; तीनचार वर्षे एकत्र राहिली. अमृत नायक बरोबर नाटकात कामंही केली. पुढे अमृत अचानक मरण पावल्यामुळे ती जवळजवळ पागल झाली. नंतर काही काळ दरभंगा

रियासतीत व शेवटी म्हैसूरच्या दरबारात रुजू झाली. इथे गोविंदराव टेंबे यांच्याशी परिचय व मैत्री झाली. त्यापूर्वीच १९१० मध्ये केवळ तिच्या रेकॉर्डस ऐकून गोविंदरावांनी तिच्या गाण्याचा बाज मराठी रंगभूमीवर आणला होता. रेसचा अतोनात नाद असल्याने मोसमात ती मुंबई-पुण्याकडे असे. उरलेल्या वेळात जलसे! बालगंधर्वांच्या मराठी नाटकांना हजेरी लावत असे व विंगेत जाऊन 'तुम्ही तर माझ्याच रेकॉर्डस गाता 'असं ती बाल गंधर्वांना सुनवायला कमी करत नसे; अब्दुल करीम खान यांच्यावर भक्ती होती पण शागिर्दी लाभली नाही. हिराबाईंवर (बडोदेकर) अतिशय खुष, तिला दत्तक घ्यायला निघाल्या होत्या. कैक चिजा हिराबाईंना दिल्या. त्यातील 'राधेकृष्ण बोल मुखसे' हिराबाईंनी अधिक नटवून मराठी माणसाच्या मनात व गळ्यात बसवून ठेवलं.

गौहरजाननं अफाट पैसा कमावला व तितक्याच दिलदारपणे दानधर्म केला. अतिउदारपणामुळे जवळच्या मंडळींचे पैसा व इस्टेटकरिता झगडे पाहणे व कोर्टकचेऱ्या करणे आयुष्याच्या संध्याकाळी तिच्या नशिबी आले. ''हिंदुस्थानची बुलबुल (नाईटिंगेल) असं तिचं वर्णन गोविंदराव टेंबे यांनी केलंय. एकाकी अवस्थेत साठाव्या वर्षी म्हैसूर दरबारच्या चाकरीत असतानाच ती मरण पावली. अलीकडेच म्हैसूर दरबारच्या दफ्तरखान्यातून झालेल्या पत्रव्यवहारांचा समावेश असलेलं पुस्तक प्रकाशित झालंय. त्याप्रमाणे शुक्रवार १७ जानेवारी १९३० रोजी कृष्णराजेंद्र हॉस्पिटलात ती मरण पावली. ऑगस्ट १९२८ पासून ती दरमहा पाचशे रुपये पगारावर 'पॅलेस म्युजिशियन' म्हणून रुजू झाली होती. महाराजांकडील दसरा व इतर उत्सवात तिनं भाग घेणं अपेक्षित होतं. गौहरजानच्या अठरा गाण्यांची एक कॅसेट १९९४ साली ग्रामोफोन कंपनीतर्फे 'चेअरमन्स चॉईस' मालिकेत बाजारात आली. ती आता सीडीच्या रूपातही उपलब्ध आहे. त्यात तिनं गायिलेल्या जोगिया, जौनपुरी, मल्हार, सूर मल्हार, हिंडोल, देस, भैरवी, होरी, ठुमरी व कजरीच्या रेकॉर्डस आहेत. त्यात तिचा अत्यंत गाजलेला दादरा 'आनबान जियामें लागी' व भैरवी 'नाहक लाये गवनवा' ऐकायला मिळते. अमृत नायकनं रचलेल्या त्या दादऱ्याचे शब्द आहेत-

आनबान जियामें लागी, प्यारी चितचोर।
जियामें बसी, कैसी फँसी ॥

पडन लागे चुपके पईयाँ, मेहरबान सईयाँ।

तुमबिन मोहे कलन पडे, तुमरे कारन जागी।

आनबान जियामें लागी----'

पहिल्या दशकातल्या स्त्री गायिकांपैकी फक्त गौहरजानचीच खूप माहिती उपलब्ध आहे. प्रस्तुत लेखकाने तिच्या चरित्रावर सायबरविश्वात (इंटरनेटवर) एक इंग्रजी लेख दुर्मिळ छायाचित्रांसह व नमुना ध्वनिमुद्रणासकट नोंदवून ठेवला आहे. त्यात ती आर्मोनियन ज्यू असल्याचा उल्लेख वाचून आर्मोनिया व इस्त्रायल या दोन्ही देशांतल्या 'नेटिझनां' कडून विचारणा झाली. ज्यू धर्माच्या मान्यतेनुसार बाप कोण याला फारसे महत्त्व नाही. आई ज्यू असेल तर मुलगीपण ज्यू ! भले धर्मांतर करून अगदी मुसलमान झाल्या असल्या तरी ! त्यामुळे तिची ध्वनिमुद्रणं तिकडे मागवून घेण्यात आली. काही वर्षांपूर्वी ज्यू समाजातील मान्यवर स्त्रियांच्या गौरवार्थ आयोजित एका कार्यक्रमात जेरूसलेम येथे तिचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला व काही ध्वनिमुद्रिका ऐकवण्यात आल्या. गाण्याच्या शेवटी तिने घोषणा केली -माय नेम इज गौहरजान !

छप्पन्न छुरीवाली जानकीबाई ऑफ अलाहाबाद-ही गौहरजानची समकालीन व ग्रामोफोन सेलेब्रिटी ! तिचा जन्म बनारस येथे १८८० च्या सुमारास झाला. वडील शिवबालक व आई माणकी अहिर जमातीतले. काही वर्षांनी बापाने मायलेकींना टाकून

दिल्यावर घर विकून पार्वती नावाच्या एका बाईबरोबर अलाहाबादला आल्या. त्या बाईनं या दोघींना चक्क एका वेश्येला विकून टाकलं. लवकरच ती कोठेवाली मरण पावली व तिच्या कारभाराची सूत्रं माणकीकडे आली. तरुण जानकी ही काळीसावळी, थोराड व रूपानं बेतासबात होती. तरीही तिच्यावर रघुनंदन नावाच्या प्रियकर पोलिसाकडून छप्पन्न वेळा सुरीहल्ले झाले, त्यामुळे तिचं नाव 'छप्पन्न छुरीवाली' असं पडलं. तिचा आवाज मात्र फार गोड होता व गळ्यातला हा गुण हेरून आईनं लखनौ येथील उस्ताद हस्सूखान यांची तालीम भरभक्कम बिदागी देऊन चालू केली. पाहता पाहता ती एक उत्तम अदाकारा बनली व आपल्या रूपातली कसर तिने गाण्यातून भरून काढली. तिची कीर्ती ऐकून रेवा संस्थानातून तिला मुजऱ्यासाठी निमंत्रण आलं. उत्तरोत्तर तिची कीर्ती वाढतच गेली. गौहरजानची ती समकालीन व मैत्रीण ! दिल्ली दरबारचा सोहोळा आटोपून पंचम जॉर्ज अलाहाबादला आले असता ह्या दोघींनी संयुक्तपणे त्यांच्या अभिनंदनाचं गाणं (मुबारक हो) म्हटलं व बक्षिसी मिळविली. गौहरप्रमाणे ती स्वत: रचनाकार होती व स्वत:च्या गाण्यांची रचना स्वत:च करत असे. 'दिवान-ए-जानकी' नावाचं तिच्या काव्यरचनांचं पुस्तकपण अलाहाबादमधून प्रसिद्ध झालं होतं.

गौहरप्रमाणे जानकीबाईच्या गाण्यांचे जलसे मंडळींकडे होत असत व तिला हजारो रुपयांची बिदागी मिळे. जलशांच्या निमित्ताने

ती उत्तर हिंदुस्थानात सर्वत्र संचार करत असे. १९९५ मध्ये प्रस्तुत लेखकाने कलकत्ता येथे एका जुन्या संग्राहकाच्या वाड्यात जानकीबाईच्या रेकॉर्डस ऐकवण्याचा कार्यक्रम केला. त्यावेळी तिथल्या एका बुजुर्गानं याच वाड्याच्या चौकामध्ये १९१५ च्या आसपास जानकीबाईचं गाणं झाल्याची आठवण सांगितली. शेख अब्दुल हक नावाच्या वकिलाबरोबर तिनं लग्न लावलं; पण हा मोठा लुच्चा व लबाड निघाला. लवकरच त्यांचा काडीमोड झाला. पुढे १९१६-१७ च्या सुमारास तिनं एक मुलगा दत्तक घेतला. तिच्या जलशांचे कार्यक्रम व इस्टेटीची देखभाल जल्लू मियाँ नावाचा इसम करत असे. तिनं अलाहाबादेत अनेक इमारती बांधल्या, धर्मशाळा उघडल्या. त्यांना 'जानकीबाईकी सराई' असं आजही ओळखलं जातं. गोरगरिबांना तिथं अन्नदान केलं जातं. बनारसपाशी गंगेकाठी रसूलाबाद येथे ती उन्हाळ्यामध्ये स्वत:च्या घरी विश्रांतीला जात असे. तिच्याकडे नोकरचाकर, हत्यारी, रखवालदार असा मोठा लवाजमा असे व उंची बग्गी-गाडीतून ती फिरत असे. १८ मे १९३४ रोजी गौहरजानच्या नंतर चार वर्षांनी ती मरण पावली. तिच्या दफनभूमीवर संगमरवरी बांधकाम झालं, ते आजही अलाहाबादेत आहे. काही वर्षांपूर्वी श्री. मधुव्रत राय यांनी जानकीबाईवर दूरदर्शनकरिता एक डॉक्युमेंटरी बनवली. तिच्यात अलाहाबादची ही कबर व जानकीबाईशी संबंधित आणखी ठिकाणं पहावयास मिळतात. ही ध्वनिचित्रफीत सरकारच्या लाल फितीत अडकून पडली आहे. तिच्या गाण्याची अफाट लोकप्रियता ऐकून ग्रामोफोन कंपनीने १९०७ मध्ये तिला ध्वनिमुद्रिका बनवण्याकरिता पाचारण केलं. १९३०-३१ पर्यंत तिने सुमारे अडीचशे गाणी रेकॉर्डवर दिली. त्यात रागरागिण्या, भजने, होशीने चैती, कजरी तिने गायिली आहे. सुरुवातीला अकौसिक पद्धतीचं म्हणजे कर्ण्यामध्ये तोंड घालून गाव लागे. १९२५ नंतर तिचं इलेक्ट्रिकल पद्धतीचे म्हणजे कार्बन मायक्रोफोन वापरून मुद्रण झालं. अगदी सुरुवातीला वीस गाण्यांची बिदागी २५० रुपये देण्यात आली, तर शेवटी वीसेक गाण्यांचे तिला पाच हजार रुपये मिळाले. इतकी तिच्या रेकॉर्डसची लोकप्रियता सर्वत्र पसरली व खप प्रचंड झाला. तिची नवी रेकॉर्ड बाजारात आली की खरेदीसाठी अलाहाबादेत रांगा लागत असत. दुकानदार चौकाचौकात कर्ण्याच्या ग्रामोफोनवरती तिच्या रेकॉर्डस वाजवत व ते ऐकण्याकरिता लोक रस्ता अडवून गर्दी करत. १९१०-११ पर्यंत तिच्या रेकॉर्डसचा खप २५,००० प्रतींपर्यंत जाऊन पोचला होता. त्याकाळच्या कंपनीच्या कॅटलॉगमध्ये तिचं छायाचित्र छापून आलेलं आहे. त्यात मागे दोन सारंगिये दिसतात, तर उजव्या हाताला तबलिया आहे. त्याच्या व सारंगी वादकाच्या मध्ये पत्र्याचा नळकांड्याचा कर्णा दिसतो. त्यात तिला गावं लागे. तिचे सारंगीवादक मकदूम बक्ष व घसिटे या नावांचे होते, तर तबलिये होते रहिमुद्दीन मियाजान व रामलाल भट ! एचएमव्हीच्या मार्च १९३१ मधल्या कॅटलॉगमध्ये तिचा उतारवयातला पोर्ट्रेट फोटो छापला असून त्यात ती दागदागिन्यांनी मढलेली दिसते. तिच्या ध्वनिमुद्रिकांमध्ये शेवटी तीपण स्वत:चे नाव हिंदीमध्ये 'मेरा नाम जानकीबाई, इलाहाबाद' असे सांगते व तेपण रूक्षपणे नव्हे तर अगदी तालासुरात! ज्या रागाच्या सुरांमध्ये ती गाणं संपवते, त्याच सुरावटीत ती तिचं नाव गाते. तिची काही प्रसिद्ध भजनं 'गुलनारों में राधा प्यारी बसे' व 'भज मन रामचंद्र विरपाल' शिवाय 'पडा मोरी चुंनरीमें दाग' व 'जमुनातट शाम खेले होरी' ही तिची गाणी अफाट गाजली.

१९९४ मध्ये 'चेअरमन चॉईस' मालिकेत तिच्या काही रेकॉर्डस ऑडिओ टेपमध्ये वितरित करण्यात आल्या. त्यामुळे आपण तिचा आवाज ऐकू शकतो. त्यात देस, मल्हार, काफी, होरी, चैनी व कजरीचा समावेश आहे. ध्वनिमुद्रिका संग्राहकांच्याकडे तिच्या पुष्कळशा रेकॉर्डस जपून ठेवल्या असून त्या रसिकांना व अभ्यास करू इच्छिणाऱ्यांना ऐकावयास उपलब्ध आहेत. ही सर्वच गाणी अतिशय गोड आहेत. तीन-साडेतीन मिनिटांमध्ये एखाद्या रागाचं वा रचनेचं सारं सर्वस्व कसं मांडावं याचे आदर्श वस्तुपाठच त्या काळातल्या गायक-गायिकांनी पुढच्या पिढ्यांकरिता घालून दिलेले आहेत. तिची ध्वनिमुद्रणं दिल्ली, अलाहाबाद, लखनौ व कलकत्ता येथे घेण्यात आली. १९१०-११ च्या सुमारास मुद्रित झालेल्या एका ध्वनिमुद्रिकेवरच्या (क्र. पी. ११४९) गीताचे बोल असे आहेत.

'सैंया निकल गये मैं ना लडी थी' ।
इस नगरीके दस दरवाजा,
ना जानू कौनसी खिडकी खुली थी ॥
सात सखी मेरे आगे खडी थी,
उनसे पूछे मैंने कुछ न कही थी । सुनियोरी मोरी संगकी सहेली,
तान चुंदरिया अकेली पडी थी
'कहत कमाल कबीरका बालक,
इन ब्याहीसे कुँवारी भली थी ।
सैंया निकल गये मैं ना लडी थी।'

आग्रेवाली मलकाजान - हिच्या जन्म-मृत्यूच्या वर्षाविषयी कुठलीही नोंद आढळत नाही. या नावाच्या अनेक गायिका होऊन गेल्या. मलकाजान ऑफ चुलबुली, बडी मलकाजान, मलकाजान ऑफ गया वगैरे. आगरा शहराशी तिचा काहीएक संबंध नाही, इथपासून ते ती आगऱ्यातच राहिली, आगरा घराण्याचं गाणं शिकली होती, इथपर्यंत वेगवेगळे प्रवाह आहेत.

उत्तर प्रदेशातल्या आझमगढ येथे तिचा जन्म झाला व गाण्याचं प्राथमिक शिक्षण घरामध्येच मिळालं. कलकत्ता हे त्याकाळी ठुमरी गायक-गायिकांचं मोठं आश्रयस्थान होतं. त्याचं कारण जवळच मटियाबुर्ज येथे नवाब वाजिद अली शाहचं वास्तव्य होतं. पार १८५७ पासूनचं ! त्यामुळे कलासक्त

वातावरण त्या परिसरामध्ये होतंच. इंडियन मिरर स्ट्रीटमध्ये एक घर घेऊन मलकाजान राहू लागली. शामलाल खत्री, सेठ दुलीचंद यांच्यासारखे बडच्या वर्तुळातले श्रीमंत जमीनदार लोक तिच्या गायनाचे मोठे चाहते होते. सभाचातुर्य, अदब व तहजीब (उत्तम रीतिरिवाज) तिच्यापाशी उपजतच होते. तिच्या समकालीन गायिकांमध्ये बाई बडी मोतीबाई व विद्याधरीबाई (ऑफ बनारस) या होत्या. त्या म्हणत, आग्रेवाली मलका हसीन व खुबसूरत होती. गात असेपण फारच छान ! यामुळेच तिच्याहून वयाने कितीतरी लहान असलेले व 'आफताब-ई-मौसिकी' ऊर्फ संगीतसूर्य म्हणून पुढे नावारूपाला आलेले उस्ताद फैय्याज खानसाहेब तिच्यावर लट्टू झालेले होते; व तीपण त्यांच्यात चांगलीच गुंतलेली होती. त्या काळातला विख्यात ठुमरी गायक उस्ताद मौजुद्दीन खान हापण तिच्या मागे लागला होता; पण तिने त्याला वाटेला लावलं.

गौहरजानप्रमाणेच मलकाजानचा आवाजपण अत्यंत धारदार, उंच स्वरातला, जणू स्वरांची मुलायम सुरीच ! तीन-साडेतीन मिनिटांमध्ये रंजकता निर्माण करून रंग भरण्यातलं दोघींचंही कसब आश्चर्य वाटायला लावणारं ! त्याकाळात मायक्रोफोन्स, ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक नसल्यामुळे मुळातच गायक-गायिकांना खूपच मोठ्यानं गावं लागत असे.

ग्रामोफोन कंपनीच्या पहिल्या १९०२ च्या ध्वनिमुद्रण मोहिमेत मलकाजानची गाणीपण मुद्रित करण्यात आली, ती १९१५-१६ पर्यंत ! तिने गायिलेल्या सर्व गाण्यांची सूची अजून संकलित-प्रकाशित व्हायची आहे; पण तिनेसुद्धा शंभराच्यावर गाणी मुद्रित केली आहेत. ग्रामोफोन कंपनीप्रमाणेच, सन, सिंगर पॅचे व अजानो डबलफेस रेकार्ड लेबलवर तिची गाणी आढळतात. त्याकाळच्या रिवाजाप्रमाणे गाण्याच्या शेवटी ती 'माय नेम इज् मलकाजान' किंवा 'मलकाजान ऑफ सामरा' असं सांगते व एक-दोन गाण्यांमध्ये आपला पूर्ण पत्ता 'मॉस्क लेन, कलकत्ता' असंपण सांगते अगदी साथीदारांच्या नावासकट !

१९९४ च्या 'चेअरमन चॉईस' मालिकेतल्या ध्वनिफितीवर (व पुढे सीडीवर) तिची अठरा गाणी पुन्हा एकवार वितरित करण्यात आली. पिलू भजन, कव्वाली, गांधारी, गारा, दादरा, शहाणा, झिंजाही, सावन, मांड, काफी व भैरवी ऐकायला मिळते. ग्राहकांनी पाठ फिरवल्यानं व कंपनीने पुरेशी जाहिरात न केल्यामुळे या 'उत्पादनाला' अपयशाचं धनी व्हावं लागलं. तिची एक गाजलेली ध्वनिमुद्रिका आहे - पी. ३३५३ क्रमांकाची. तिच्यावर दोन बाजूंवर गाणी मुद्रित केली आहेत. ती गाणी-

राग देस-बीती जात बरखा रूत सजन नाही आए. एरी.....

नयन मोर पपीहरा बोलत पीऊ पीऊ करे पुकार

उनके जोबन बिरहा सतावे ऐसी पिया दुख देरी....

बीती जाय बरखा रूत सजन नाही आए

सावन - पपीहरा पीऊ पीऊ करे, बोली पपीहरा न बोल

पीया देस विदेस, डरे मोरा जिहू-पपीहरा..

कारी बदरिया, पिया मोरा परदेस, बरसन लागा मेंह----

पास नहीं मेरा पीहू

पपीहरा पीऊ पीऊ करे ----

मलकाजानच्या ग्रामोफोन रेकॉर्डस अफाट खपल्या. विक्री व प्रसिद्धीकरिता ग्रामोफोन कंपनीने कर्णावाल्या मशीनपुढे तिचा फोटो घेऊन तो कॅटलॉगमध्ये छापला होता.

जोहराबाई आग्रेवाली - (१८६८-१९१३)- हिचं एकमेव चित्र उपलब्ध आहे. तानपुरा छेडून गातानाचं ! मांडीवर छोटा मुलगा बसलेला दिसतो. पण ह्या छायाचित्राच्या खरेपणाविषयी पुरेसा पुरावा नाही. तरीपण जोहराबाईचं हेच चित्र गेली ८०-९० वर्षे प्रसारात आहे. दंतकथा व ऐकीव गोष्टींच्याशिवाय तिच्याविषयी फारशी माहिती मिळत नाही. गोविंदराव टेंबे व रामकृष्णबुवा वझे यांनी तिचं गाणं प्रत्यक्ष ऐकलं व त्यांच्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत. पुढे 'आवाजाची दुनिया' या आपल्या पुस्तकात विख्यात संगीतकार श्री. केशवराव भोळे यांनी तिच्या ध्वनिमुद्रित गायकीचा आस्वादक उल्लेख अनेक लेखांमध्ये केला.

आगरा घराण्याची गायकी ही जोरकस, लयप्रधान व पुरुषी गायकांचंच अधिराज्य असलेली. त्यात जोहराबाई ही पहिली स्त्री

गायिका ! तिचं ध्वनिमुद्रित संगीत ऐकून बडे गुलाम अलीखान व फैय्याजखानसुद्धा अचंबित होत. जोहराबाईचं संगीतशिक्षण अहमदखान या पित्यासमान सारंगीवादकाकडे झालं. ते उत्तम गवईपण होते. अत्रौलीचे मेहबूबखान व मथुरेचे कालेखान यांच्याकडेपण ती शिकली. नृत्यही करत असे. राजेमहाराजे, नवाब, श्रीमंतांकडे तिचे 'जलसे' होत असत. स्थायी व अंतरा गायनातील तिचा 'मुखविलास' अतुलनीय असे. त्याचबरोबर 'दाणेदार' तानबाजीमध्ये ती प्रवीण होती.

आयुष्याच्या अखेरीस चाळीशीत

असताना तिचा संबंध ग्रामोफोन कंपनीशी आला. तिची अफाट लोकप्रियता व हमखास खपाची हमी यामुळे १९०८ साली तिचा कंपनीशी प्रतिवर्षी अडीच हजार रुपयांवर करार झाला. त्याप्रमाणे दरवर्षी एवढ्या रकमेत तिने पंचवीस गाणी रेकॉर्ड करायची व दुसऱ्या कोणत्याही कंपनीसाठी गायचं नाही असं ठरलं. त्यावेळी ती पाटणा शहरात रहात होती. ध्वनिमुद्रणांकरिता अन्य शहरांत जावं लागलं तर तिचा व साथीदारांचा सगळा खर्च कंपनीने करायचा, असंही करारात नोंदवलं होतं.

१९०८ ते १९११ या तीन वर्षांत कलकत्ता, लखनौ व दिल्लीतल्या रेकॉर्डिंग स्टुडिओमधून तिची साठच्यावर गाणी मुद्रित करण्यात आली. त्यांचा उल्लेख १९३१ पर्यंतच्या कॅटलॉग्जमध्ये आढळतो. 'आलत, मुरकी, खटका, लयकारीच्या व जलद ताना बोलताना, सरगम असं बरंच काही तीन-साडेतीन मिनिटांत रंजकपणे मांडायचं तंत्र तिने विकसित केलं व अतिशय प्रभावीपणे मांडलं. हे मॉडेल- तंत्र पुढे अनेक नामवंतांना उपयोगी पडलं. त्याचा पडताळा नारायणराव व्यास, मा. कृष्णराव, हिराबाई बडोदेकर यांच्या ध्वनिमुद्रिका ऐकताना येतो.

१९९४ च्या 'चेअरमन्स चॉईस' मालिकेतील ध्वनिफिती/सीडीवर जोहराबाईची अठरा गाणी पुन्हा एकदा वितरित झाली. त्यात जोगिया, जौनपुरी, तोडी, सारंग, पिलू बरवा, पूरिया, धनाश्री, बसंत, सोहनी, काफी, भैरवी, कजरी व चैती ऐकायला मिळते. अल्ला जाने अल्ला जाने (मियाँकी तोडी), मटकी रे मोरी गोरस (जौनपुरी), पियाके मिलनकी आस (जोगिया) या रागदारीच्या, तर सैंय्या भयला जोगी (चैती), तेरी कटीली निगाहोंने मारा (सारंग ठुमरी) या चीजा-रचना मुद्रित झालेल्या आहेत. ह्या ध्वनिमुद्रिका अनेक वर्ष विक्रमी खपाच्या ठरल्या. गोविंदराव टेंबे यांनी तिच्या चिजांवर मराठी नाट्यपदांना चाली दिल्या. यमन कल्याणमधील तिची 'फीहरवा तिहारी एक नजराने' ही अपूर्व ध्वनिमुद्रिका आहे. तिच्यावर 'हा टकमक पाही सूर्य रजनीमुख' हे पद मानापमान नाटकामध्ये घेतलं. या सर्वच स्त्री गायिकांच्या ध्वनिमुद्रिका (प्लेटी) किर्लोस्कर/गंधर्व नाटक मंडळीत सतत ऐकल्या-ऐकवल्या जात असत. ह्या ग्रामोफोन गुरूंपासून अनेकांनी विद्या मिळवली आहे. पुढे १९६० च्या सुमारास काही फ्रेंच अभ्यासकांनी 'ऑफ इंडियन म्युजिक' नावाची दीर्घकाळ वाजणारी (लाँग फ्लोईंग) ध्वनिमुद्रिका बनवली. त्यात जोहराबाईचा भूपाळीतला तराणा घेण्यात आला. जोहराबाई आग्रेवालीच्या अप्रतिम आग्रा गायकीची झलक त्यात ऐकायला मिळते.

तिची एक गाजलेली ध्वनिमुद्रिका -

कोयलिया कूक सुना दे, सखी री मोहे बिरहा सतावे ।

सजन बिन अंधियारी कारी रात
बिजुरी चमके जिया मोरा डर पावे ॥१॥
इतनी बिनती मोरी उनसे कहियो जाय
तुमबिन जिया मोरा निकसो जाय
छलके जोबन मोरा, पिया मोरा घर न आ वेरी ॥२॥
कोयलिया कूक सुना दे ..... ॥

१९०२ ते १९३०-४० पर्यंत शंभराहून अधिक स्त्री गायिकांनी ग्रामोफोन रेकॉर्डसमधून हजारेक गाणी कोरून ठेवली. यातल्या बऱ्याचशा 'कोठेवाल्या' होत्या. त्यांच्या जीवनावरती हिंदी साहित्यिक अमृतलाल नागर यांनी 'ये कोठेवालियाँ' नावाचं अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिलंय. त्यातल्या ज्या सर्वाधिक लोकप्रिय होत्या, त्यांच्या शेकडो ध्वनिमुद्रिका ग्रामोफोन कंपनीने बनवून विकल्या. 'पाकिजा' मधली मीनाकुमारीची 'साहिबजान' व रेखाची 'उमरावजान' मधली अदाकारी या स्त्रियांच्या जीवनाची काही कल्पना देते. पैशांसाठी का होईना, पण अभावितपणे शुद्ध व सुगम संगीताची आपली परंपरा मुद्रित करून ठेवायचं मोठंच काम या स्त्रियांनी करून ठेवलंय. विशेष म्हणजे एक अब्दुल करीम खान सोडले तर आमच्या थोर पुरुष गायकांनी ह्या माध्यमाकडे गंभीरपणे बघितलंच नव्हतं, असं खेदाने म्हणावं लागतं. ह्या 'बाई' व 'जान' यांची उरलीसुरली व अजूनही अडगळीत पडून असलेली गाणी शोधून भावी विद्यार्थी, अभ्यासक व रसिकांसाठी सीडी/एमपी३ वर उतरवून ठेवणं अतिशय आवश्यक आहे.

❋ मानाचा मुजरा ❋

वाद्यसंगीत आणि स्त्री कलावंत हे नातं क्वचितच जुळून आलेलं दिसतं. तबलावादन करणाऱ्या आबान मिस्त्री, अनुराधा पाल, सरोद वाजवणाऱ्या शरणराणी माथूर व झरीन दारूवाला- शर्मा, व्हायोलिन वादन करणाऱ्या एन. राजम, सतारवादन करणाऱ्या जया बोस अशी काही मोजकी उदाहरणं दिसतात.

ह्या सरस्वती वीणावादिनींना 'स्वरप्रतिभा' रसिक मोहिनी विशेषांक २००६ तर्फे मानाचा मुजरा.

सोलापूरची 'मेहबूबजान' - एक पुनर्भेट

ध्वनिमुद्रिकांवर अंकित झालेल्या संगीतानं संगीतरसिकांना काळाचा पडदा हलकेच उघडूनही गतवैभवाच्या संगीताचा आस्वाद घेता येतो. व्यक्तिगत आयुष्याच्या कोणत्याही खुणा मागे न ठेवता चाळीस वर्षांपूर्वीच जग सोडून गेलेल्या सोलापूरच्या मेहबूबजाननं आपल्या आवाजाचा ठेवा रसिकांपाशी दिलेला आहे. सोलापूरच्या संगीतप्रेमी रसिक, अभ्यासक जयंत राळेरासकरांनी मेहबूबजानच्या जीवनाचा, गाण्यांचा शोध घ्यायचा ठरवलां; हा रसिकमोहिनीच्या विशेषांकासाठी लिहिलेला खास लेख व गाण्यांची सूची वाचकांना आवडेल.

जयंत राळेरासकर

'मेहबूबजान ऑफ सोलापूर' असा उल्लेख असलेल्या ध्वनिमुद्रिकांच्या संदर्भात प्रथम माहिती दिली ती ज्येष्ठ ध्वनिमुद्रिका संग्राहक श्री. प्रभाकर दातार आणि श्री. सुरेश चांदवणकर यांनी. तुमच्याच गावची गायिका आहे काढा माहिती, असा त्यांचा आग्रह. पाठोपाठ एक-दोन ध्वनिमुद्रिका जुन्या बाजारात अचानक मिळाल्या आणि मग मात्र तिची माहिती मिळते की नाही, याचा शोध सुरू झाला. श्री. चांदवणकर यांनी मुंबईहून सगळे उपलब्ध ध्वनिमुद्रणही पाठवले. आवाजाची जातकुळी आणि गायकीचा अंदाज आला; पण इतर माहितीसाठी काही मार्ग सापडेना. एक सोपा मार्ग होता, बुजुर्ग रसिकांच्या गाठी-भेटी. त्याआधारे प्राथमिक माहितीवजा लेख प्रसिद्ध झाल्यावर काही पत्रे आली. वाटलं, अजूनही खूप भर टाकता येईल. प्रत्यक्षात पुराव्यानिशी काही हातात लागेल, ही आशा मात्र राहिली नाही. पण तरीही 'मेहबूबजान ऑफ सोलापूर' अशा ध्वनिमुद्रिका आहेत. हे शोधकार्य संपणारे नाही. प्रस्तुत लेखदेखील एक टप्पाच आहे.

प्रत्यक्ष सोलापुरातून मिळालेली माहिती ही महत्त्वाची आहेच, मात्र प्रत्यक्षात मेहबूबजानच्या जीवनाविषयी जुजबी माहितीही मिळू नये याचे आश्चर्य वाटते. त्याला काही कारणे असूही शकतील; पण हे सत्य आहे हे नक्की. मेहबूबजान तिच्या उत्तर आयुष्यात पुण्यास होती, हे खरे असले तरी इतक्या मोठ्या कलावंताची साधी माहितीदेखील मिळू नये हे आश्चर्य आहेच; आणि त्याहीपेक्षा गमतीचा भाग म्हणजे ही मेहबूबजान नेमकी कशी होती, हा पुराव्याचा फोटोदेखील ऑस्ट्रेलियावरून ध्वनिमुद्रिका अभ्यासक श्री. मायकेल किनियर यांनी पाठवला. 'दि रेकॉर्ड न्यूज'या नियतकालिकात हे छायाचित्र प्रथम प्रसिद्ध झाले.



मेहबूबजानसंबंधीचा हा शोध अधिक शिस्तबद्ध केला, हे श्री. मायकेल किनियरचे ऋण मला मान्य केलेच पाहिजे. ध्वनिमुद्रिकांच्या वेष्टणावरील छायाचित्र आणि मेहबूबजानच्या बद्दलचा ध्वनिमुद्रिकेवरील मजकूर आणि मुख्य म्हणजे तिच्या ध्वनिमुद्रिकांची सूची (Discography) त्यांनीच पाठवली, त्यामुळे माझ्या माहितीस एक शास्त्रशुद्ध शिस्त मिळाली. मेहबूबजानची पुनर्भेट आज या लेखामुळे शक्य होत आहे. अनेकांचे कुतूहल जागृत झाले आहे, ही स्वागतार्ह घटना आहे. विस्मृतीच्या पडद्याआड गेलेल्या मेहबूबजानची गायकी - ---- त्यावेळचा माहोल....

खरे तर मेहबूबजानच्या निमित्ताने तिच्यासारख्या अनेक गायिका असण्याची शक्यताही लक्षात आली. यातील सगळ्याच गायिका फार श्रेष्ठ होत्या असे नाही. परंतु तरीही तीदेखील एक परंपरा होती. आणि गाण्याचा माहोल जनसामान्यात कायम ठेवला होता. घराणेशाही (?) च्या परंपरेत मेहबूबजान नेमकी कुठे होती ? जाणकारांनी त्यावर भाष्य जरूर करावे, पण हे नक्की आहे की, मेहबूबजानने सर्व प्रकारची गाणी गायलेली दिसतात.

मेहबूबजानचा उमेदीचा काळ १९२५ ते १९४० चा असावा असे तिच्या ध्वनिमुद्रिकांवरून वाटते. १९३२ सालच्या फेब्रुवारी महिन्यात तिची पहिली ध्वनिमुद्रिका आली. 'श्री गिरिजाजाने श्रीराम' हे शिवस्तुतीपर पद खंबावती रागात आहे, तर त्याच्या दुसऱ्या बाजूस 'दत्तगुरु दत्तगुरु' सोहनी रागात गायिले आहे. 'एच एम व्ही' तर्फे या ध्वनिमुद्रिकेच्या वेष्टणावर ही पदे पूर्ण दिलेली असून मेहबूबजान या गायिकेचे स्वागत रसिकजन करतील असा विश्वासही प्रगट केला आहे.

मेहबूबजानचे गाणे ऐकल्यावर लक्षात येते की तिने हिंदी, उर्दू, मराठी आणि कन्नड अशा चार भाषांमधून गाणी म्हटलेली आहेत. रागदारी, भजने, पदे, गझल, गीते आणि

चित्रपट गीते इत्यादी सर्व प्रकारची गायकी आपल्याला तिच्या ध्वनिमुद्रिकांमध्ये दिसते. श्री समर्थमेळा- पुणे आणि मधुकर मेळा-पुणे यांच्या निर्देशासह काही ध्वनिमुद्रिका सापडतात. त्या रचना श्री. पी. आर. भोपे यांच्या आहेत. हे विशेषत्वाने सांगण्याचे कारण म्हणजे त्याकाळी असणारे मेळ्यांचे अस्तित्व. हल्लीच्या ऑर्केस्ट्रा ग्रुपसारखेच त्याकाळी हे मेळ्यांचे जग होते. आज हे मेळे पूर्णपणे अस्तंगत झाले आहेत (ऑर्केस्ट्राचे स्वरूप बदलले आहे म्हणून त्यांना 'आजचे मेळे' म्हणायचे की नाही याबद्दल मात्र मी साशंक आहे). १९६० पर्यंत काही चुकार मेळे शिल्लक होते. हे थोडे विषयांतर झाले परंतु ते आठवायचे कारण असे आहे की मेहबूबजानदेखील सुरुवातीच्या काळात (१९२५ च्या आधी ?) मेळ्यात गात होती असे काही बुजुर्गांनी सांगितले. अर्थात, हा तिचाही उमेदवारीचा काळ असणार असे वाटते. मेहबूबजानच्या आवाजाबद्दल मी काही जणांशी बोललो, त्यावरून ती एक चांगली गायिका होती असे अनुमान काढता येईल, हे नक्की. एक-दोघांनी ती एक सुमार गायिका कार्यक्रमाची निमंत्रणे तिला येत असत. शिवाय ग्रामोफोन कंपनीला देखील मेहबूबजानच्या आवाजास बंदिस्त करावे असे वाटले होते हेही महत्त्वाचे. कार्यक्रमाच्या निमित्ताने तिने नागपूरपर्यंत मजल मारलेली दिसते. मुंबईस तर ती गेलेली होतीच. मात्र उत्तर हिंदुस्थानात ती कुठे गेल्याचा पुसट उल्लेखही कुणाकडून ऐकायला मिळाला नाही.

नागपूरहून मेहबूबजानची आठवण सांगणारे एक पत्र आले होते, प्राचार्य पां. ना. गटलेवार यांचे. ते लिहितात, 'बागेश्री रागातील एक रचना मेहबूबजान गात होती. तो तिचा रियाज असावा. मला ती आठवते त्याप्रमाणे ठेंगणी; दुसकी आणि किंचित स्थूल अशी पस्तिशीची बाई होती ती...' नागपूर मधील सीताबर्डी भागातील श्री. दाजीसाहेब बुटी यांच्या इमारतीत मेहबूबजानचा मुक्काम होता. असा नेमका तपशीलही श्री. गटलेवार यांनी दिला आहे.

मेहबूबजानच्या संदर्भात जी पत्रे आली आणि अर्थातच अधिक माहिती मिळाली त्यात नाशिकहून आलेले श्री. मनोहर पुरंदरे यांचे एक आणि सोलापूरचेच असलेले श्री. एच. आर. कानकुर्ती यांचे एक, अशी दोन पत्रेदेखील महत्त्वपूर्ण ठरावीत. पैकी श्री. कानकुर्ती प्रत्यक्ष मेहबूबजानच्या पुण्यातील घरी गेलेलेही होते. मेहबूबजान यांच्या अखेरच्या दिवसांतील ही प्रत्यक्ष माहिती परिपूर्ण नसली तरी एक किमान प्रतिमा आपण तयार करू शकतो. अर्थात् पुढे आपण त्यावर विचार करणार आहोतच.

मेहबूबजानचा आवाज सुस्पष्ट आणि मोकळा आहे. आवाजात गोडवाही आहे. उच्चारही स्वच्छ आहेत. समीक्षकी परिभाषेत तिचा आवाज आणि गायकी कशा प्रकारची होती. हे मी सांगू शकणार नाही. ध्वनिमुद्रिकांवरून असे वाटते की, ती एका संथ लयीत गाते. साधी, सुलभ लयकारी, ज्यात कसलीही चमत्कृती नाही किंवा आक्रमक तानबाजीही नाही. साथीला हार्मोनियम आणि तबला अशीच, इतकीच वाद्ये आहेत. मैफिलीत किंवा जाहीर कॉन्सर्टसमध्ये (जलसे) ती कशी गात असे हे समजायला मार्ग नाही; परंतु ध्वनिमुद्रिकेसाठी काय आणि कसे सादर करता येईल, याचे भान मात्र तिला नक्की होते. नारायणराव व्यास अशा हुकमी ध्वनिमुद्रिकेसाठी फार नेमकेपणाने राग सादर करीत, अशी त्यांची ख्याती होती. ध्वनिमुद्रिकांवरील मेहबूबजानचे गाणेदेखील असे नेटके वाटते. तीन-साडेतीन मिनिटांच्या काळात काय गायचे, गाण्याचा भाव आणि त्या रागाचे वैशिष्ट्य उतरवताना तिची तयारी जाणवते. भक्तिगीते, सुगम-संगीत, रागदारी, गझला इत्यादी सर्व प्रकारच्या ध्वनिमुद्रिका तिने दिलेल्या आहेत. 'तोम तनन वाजवी वेणू' ही अष्टपदी 'दुर्गा' मधील, आणि 'दत्तगुरु दत्तगुरु' ही 'सोहनी' मधील या भजनरचना खूप लोकप्रिय झाल्या होत्या. 'माझा राजा बन्सीराणा' देखील खूप गाजले होते. बागेश्री, मालकंस, यमन, ललत, खंबावती, जीवनपुरी, भैरवी अशी विविधता मेहबूबजानच्या ध्वनिमुद्रिकांमधून दिसते. 'जलरही हस्तो हकीकत', 'तरस रही अखियाँ' 'आप को चाहते' इत्यादी उर्दू गजलांमधूनही तिचा संचार दिसतो. सोलापूरचेच एक कवी संजीव ऊर्फ के. जी. दीक्षित यांचीही काही गाणी मेहबूबजानने म्हटलेली आहेत. 'नभी हासला तो चाँद' (भीमपलास), 'हरिणीसम गरीब अबला' (अडाणा), हास हास हास बाळे' (काफी जिला) अशा काही संजीवांच्या रचना आहेत. 'हास हास हास बाळे' हे भावगीताशी जवळीक सांगणारे गाणे खरोखर मुळातून ऐकण्यासारखे आहे.

सोलापुरातील ज्या मान्यवर रसिकांशी यानिमित्ताने बोलण्याचा योग आला, त्यात सुप्रसिद्ध तबलावादक श्री. (कै.) भीमराव कनकघर हे संगीताच्या दुनियेतले. त्यांनी मेहबूबजान संदर्भात बऱ्याच गोष्टी सांगितल्या. मेहबूबजानच्या एकंदर वैयक्तिक आयुष्यासंबंधीची त्यांची माहिती स्वीकारार्ह वाटते. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे श्री. हि. रा. कानकुर्ती यांच्या माहितीशी देखील ती सुसंगत आहे. उत्तर आयुष्यात अगदी मृत्यूपूर्वी मेहबूबजान पुण्यात स्टेशन समोरील विल्सन गार्डन परिसरात एका बंगल्यात राहत असे आणि मानसिकदृष्ट्या ती खूपच दुर्बल झालेली होती. श्री. कानकुर्ती (हे निवृत्त शासकीय अधिकारी आजही सोलापुरात आहेत.) यांनी १९६४-६५ च्या सुमारास मेहबूबजानची भेट घेतलेली होती. मेहबूबजानची एकमेव कन्या आणि तिचे जावई यांचेही संदर्भ श्री. कानकुर्ती देतात. जावई श्री. एच. एन्. शेख हे शासकीय सेवेत त्यांचे सहकारी होते. मात्र त्यांच्याकडून काही प्रतिसाद नाही.

कै. शांताराम देव या आणखी एका रसिकांनी मेहबूबजानची आठवण सांगितली. सोलापुरातील सरस्वती चौकातील महिंद्रकर यांच्या इमारतीत ही मैफल झालेली होती. मात्र ही मैफल आठवणीत ठेवण्यासारखी नव्हती आणि गाणे पूर्ण विस्कटल्याची त्यांची आठवण आहे; तर कै. माणिकराव साठेंच्या मते मेहबूबजान एक चांगली गायिका होती. ती 'म्हाबडी' या नावाने त्या काळात ओळखली जायची, असेही त्यांनी सांगितले. मेहबूबजान सुंदर नसली तरी कुरूपही नव्हती, असे ते म्हणतात.

'मेहबूबजान ऑफ सोलापूर' च्या ज्या ध्वनिमुद्रिका निघाल्या, त्यानुसार एक सूची या लेखासोबत आहे. त्यातील अधिकृत नोंदीनुसार ध्वनिमुद्रिकांचा हा काळ १९३२ ते १९३६ असा आहे. एच.एम.व्ही आणि ट्विन या दोन प्रकारच्या लेबलसवर ध्वनिमुद्रिका आहेत. या दरम्यान मेहबूबजान मुंबईस जात-येत असावी, असा अंदाज बांधता येतो. मात्र मुंबईच्या या वास्तव्यासंबंधी (किंवा भेटींविषयी) इतर काही तपशील मिळत नाही. १९३६ साली शालिनी सिनेटोन निर्मित 'सावकारी पाश' या चित्रपटासाठी मेहबूबजानने दोन गाणी गायिलेली आहेत. त्याहीपेक्षा विशेष महत्त्वाचे म्हणजे 'सावकारी पाश'मध्ये मेहबूबजानची भूमिकाही होती. 'सावकारी पाश' च्या श्रेयनामावलीत तिचा स्पष्ट उल्लेख आहे 'येरी सखी सावन आयो' आणि 'प्रीतीची वाट काटेरी' अशी ती दोन गाणी होती आणि 'सावकारी पाश' चे संगीतदिग्दर्शक होते गोविंदराव टेंबे. मेहबूबजानची भूमिका कुठल्या स्वरूपाची होती, हे कळण्यास काही मार्ग नाही; पण मेहबूबजानने ही गाणी, १९३६ साल विचारात घेता, स्वत:साठीच म्हटली असावीत, असा तर्क करता येतो. मेहबूबजानच्या एकंदर ३४ ध्वनिमुद्रिकांवरील ६८ गाण्यांपैकी ३९ गाणी ऐकण्यास उपलब्ध होऊ शकली. हा सगळा डोलारा याच ३९ गाण्यांवर आधारित आहे, हे उघड आहे. ध्वनिमुद्रिकांचा खप फारसा झाला नाही त्यामुळे प्रती कमी निघाल्या आणि अर्थातच् त्यामुळे त्यांची उपलब्धता कमी आहे असे दिसते. आहेत त्या प्रती नेमक्या कुठे पडून आहेत देव जाणे. मात्र आज ना उद्या त्या मिळतील, ही आशा ठेवायला हरकत नाही.

पुण्याच्या मुक्कामातील सुरुवातीचे तिचे दिवस आणि गीत विरहित अखेरचे दिवस यात महदंतर आहे. गाणे बहरात असण्याचा मेहबूबजानचा सुरुवातीचा काळ आर्थिकदृष्ट्या अनिश्चिततेचा होता. या निष्कर्षाला पुष्टी मिळते, ती तिच्या संदर्भातील कृ. द. दीक्षितांनी केलेल्या उल्लेखामुळे. आकाशवाणी मुंबईशी संबंधित असणाऱ्या श्री. कृ. द. दीक्षित यांच्या 'अत्तर सुगंध' (प्रकाशक: मौज प्रकाशन) या पुस्तकात पृ. क्र. ३९ वर मेहबूबाजान संबंधीचा हा उल्लेख आलेला आहे. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरसला गाण्याची एक मैफल करण्याच्या उद्देशाने श्री. कृ. द. दीक्षित मेहबूबजानला पुण्यात भेटले होते. मेहबूबजानचे ते चाहते होते आणि तिच्या ध्वनिमुद्रिका त्यांच्या संग्रही होत्या. मेहबूबजान त्यावेळी दगडू हलवायाच्या दत्तापाशी असलेल्या एका चौकात राहत होत्या. त्या राहत होत्या दांडेकर बिल्डिंगमधील एका जागेत. याच कुप्रसिद्ध मोहल्ल्यातच वझीरबाई राहत असत. त्यांच्याभोवती असलेल्या वलयापुढे मेहबूबजानचे अस्तित्व जाणवलेही नाही. 'असल्या कुर्रेबाज कुरंगनयनांच्या पुढे बिचाऱ्या मेहबूबजानचा काय पाड !' अशा शब्दांत हा मेहबूबजानचा उल्लेख 'अत्तर सुगंध' मध्ये आलेला आहे. ज्या मोहल्ल्यात मेहबूबजान राहत होत्या, तिथे उत्तम संगीताची बूज असणे शक्यच नाही. मात्र मेहबूबजानच्या गाण्याबद्दल मात्र ते उत्तम अभिप्राय देतात. 'उंच गळी आवाज' असे वर्णन करताना मालती पांडेंसारखा, असेही श्री. कृ. द. दीक्षित म्हणतात. 'तोम तनन् वाजवी वेणू', 'हांस हांस हांस बाळे' इत्यादी गाण्यांमधून हे नक्कीच जाणवते.

मेहबूबजानच्या संदर्भात बऱ्यापैकी ध्वनिमुद्रण उपलब्ध झाले असले तरी, मेहबूबजानच्या गाण्यांबद्दल एक चित्र उभे राहते इतकेच ! तिच्याबद्दल जी माहिती मिळते, त्याबद्दल अनेकजणांनी दिलेल्या माहितींचे तुकडे फक्त एकत्र करता येतात. तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल, सहकाऱ्यांबद्दल किंवा असल्यास गुरूबद्दल काहीच तपशील मिळत नाही. श्री. भीमराव कनकघर यांनी फक्त तुपेलखान सतारिये यांचे नाव घेतले होते. मात्र त्यांचेही नाव-गाव फारसे कुणी घेतल्याचे स्मरत नाही. एक मात्र निश्चित की, मेहबूबजानच्या गायकीत शास्त्रीय संगीताचा स्पष्ट अभ्यास दिसतो आणि त्यानुसार कोणीतरी गुरू नक्कीच केला असणार, हे नक्की !

विस्मृतीत गेलेल्या मेहबूबजानचा शोध हा तिच्या ध्वनिमुद्रिकांमुळे लागला हे तर नक्कीच. हे श्रेय त्या सर्व ध्वनिमुद्रिका संग्राहकांचेच आहे. मात्र अजूनही तिच्या आवाजाबद्दल, गायकीबद्दल जाणकारांनी लिहायला हवे आहे. मात्र त्याची सुरुवात झाली आहे. सौ. सुलभा पिशवीकर आणि श्री. अच्युत गोडबोले यांच्या 'नादवेध' या पुस्तकातही आता मेहबूबजानचा उल्लेख आलेला आहे. आकाशवाणी सोलापूरवरही त्यांनी मेहबूबजानची नोंद घेतलेली आहे. मेहबूबजानच्या कालखंडात अशा अनेक गायिका होत्या. बाई सुंदराबाई सारख्या दिग्गज गायिकादेखील फक्त ध्वनिमुद्रिकेवरच होत्या. नुकतीच त्यांची एक सीडी वितरित झालेली आहे, ही एक स्वागतार्ह घटना आहे.

मेहबूबजानची शेवटची ज्ञात ध्वनिमुद्रिका १९४० च्या आसपासची आहे. शांताराम देव यांनी मेहबूबजानच्या ज्या मैफिलीचा उल्लेख

केला. ती मैफल त्यानंतरच्या काळातील असणार. मूळचे सोलापूरचे असणारे शासकीय अधिकारी श्री. एच्. आर. कानकुर्ती हे स्वत: मेहबूबजानच्या उत्तर-आयुष्यात त्यांना भेटलेली अखेरची व्यक्ती. मेहबूबजानचे नात-जावई (मुलीच्या मुलीचे पती) श्री एच्. एन. शेख हे कानकुर्तीचे' सहकारी होते. ही भेट १९६५ च्या आसपासची आहे असे त्यांचे म्हणणे-मेहबूबजानचे निधन त्यानंतर 'कधीतरी' झाले असावे. ज्या पुण्यात विल्सन गार्डन परिसरात मेहबूबजानचे घर होते, तिथे आज सरदार लॉज आहे. तिची मुलगी, इतर सगेसोयरे कदाचित् पुण्यातही असतील; पण आपल्यासाठी फक्त तिचा ध्वनिमुद्रिकेवरचा उंच गळी आवाज, शांत लयीतले-स्पष्ट उचाराचे गाणे... 'निराशा सुखाचि आता...' हेही मेहबूबजानचे गाणे आहे....

❀❀❀

मेहबूबजानच्या ३४ ध्वनिमुद्रिकांपैकी सर्व ध्वनिमुद्रिका १० इंची-एचएमव्हीच्या आहेत, तर एक ध्वनिमुद्रिका १२'' आहे (पाच मिनिटे वाजणारी). ९ ध्वनिमुद्रिका ट्वीन लेबलवर आहेत. १९३६ साली प्रदर्शित झालेल्या 'सावकारी पाश' मधील दोन गाण्यांचे बोल मिळतात, परंतु ध्वनिमुद्रिकांचा तपशील मिळत नाही. श्री.मायकेल किनियरच्या नुसार सदर ध्वनिमुद्रिका ओडियान (एसबी २००० सिरीज) कंपनीतर्फे काढण्यात आल्या असाव्यात. 'मेहबूबजान ऑफ सोलापूर' प्रमाणे 'मेहबूबजान ऑफ जुनागढ ' अशाही काही ध्वनिमुद्रिका आहेत, अर्थात. ही संपूर्णपणे वेगळीच मेहबूबजान आहे. इंटरनेटच्या एका संकेतस्थळावर मेहबूबजान ऑफ जुनागढचा आवाज आहे. मेहबूबजान ऑफ सोलापूरचे उपलब्ध ध्वनिमुद्रण आणि माहिती अ.भा. गंधर्व महाविद्यालय, मिरज यांच्या संग्रहालयात अभ्यासकांसाठी किंवा जिज्ञासूंसाठी ठेवली आहे.

Miss Mehbub Jan of Sholapur Discography
By - Mr. Michael S. Kinnear

10 inch - His Master's voice N- Plum label - Dum Dum pressings
His Master's voice N- Green label - Dum Dum pressings
Twin - FT - Yellow label - Dum Dum pressings

12 inch - His Master's voice HT - Plum label - Dum Dum pressings

Recordings taken at Bombay by George Corran -1931
0C2002 - 80-5200 -Mehbub Jan
Sri Girija Jane Shriram-Khambavati - (Hindustani) Feb c/w 90-9201 HMV N 4126. 1932

0C2003 - 80-5232 - Mehbub Jan - Aaj Anand Mudhachandra- Khambavati - (Hindustani) c/w 80-5233 HMV N 4142 Mar. 1932

0C2004 - 80-5852 - Mehboob Jan
Tum Jhute Des - Tilang- Thumri- (Hindustani) Aug. 1932 c/w 80-5853 HMV N 5614

0C2005 - 80-5420 Mehbub Jan
Mohe Lina Nek - Tilang -
c/w 80-5421 HMV N 5603 - (Hindustani) Jun 1932

0C2006 80-5308 MEHBUB JAN
Bet Jatambar - DES - c/w 80-5309 - HMV N 4180 - (Hindustani) May 1932

0C2007 80-5201 Mehbub Jan-
Dattaguru Dattaguru-Sohani Bhajan- c/w 80-5200 HMV N 4126 (Hindustani) Feb. 1932

0C2008 - 80-5421 Mehbub Jan
Aajbai Baje Sainya - Bhairvi
c/w 80-5420 HMV N 5603 (Hindustani) Jun 1932

Recordings taken at Bombay by George Corran - 1931

OC2020 to 0C2023 Not Traced -

0C2024 80-5309 Mehbub Jan
Pari Ye Baki Pay Na - Jivanpuri
c/w 80-5308 HMV N 4180 (Hindustani) May 1932

0C2025 ----1 Mehbub Jan
(Take 1 rejected)
0C2025---2 80-5233 Mehbub Jan
Hum Jo Ruksare - Gazal
c/w 80-5232 HMV N 4142 (Hindustani) Mar. 1932

0C2026 -80-5853 - Mehbub Jan
Dinke Dayal - Bhajan
c/w 80-5852 HMV N 5614 (Hindustani) Aug. 1932

0C2027-80-5270-Mehbub Jan
Painya Maika Men Aav - Gazal
c/w 80-5271 HMV N 4161 (Hindustani) Apr. 1932

0C2028 - 80-5271 - Mehbub Jan
Hasharmen Laye Gaye - Gazal
c/w 80-5270 - HMV N 4161 (Hindustani) Apr.1932

0C2029 - 80-5862 - Mehbub Jan
Nirasha Sukhachi Aata
c/w 80-5863 HMV N 5013 (Marathi) Sep. 1932

oC2030 80-5863 - Mehbub Jan
Bhaut Ha Tuj Prarthise
(song from - Samarth Samrat Mela of Poona) c/w 80-5862 HMV N 5013 (Marathi) Sep. 1932

Recordings taken at Bombay by James Edward George 1932
OE1665---1- 80-6715 Mehbub Jan - Ya Chamko - Sur Malhar - (Hindustani)c/w 80-6714 (a) HMV N 5635 a Feb. 1933

OE1666 - 80-6506 Mehbub Jan
Lalat Nahirona - Rajni -
c/w 80-6507 HMV N 5621 Hindustani Nov 1932

OE1667 - 80-6507 - Mehbub Jan
Aaye Badra Kare - Malhar Jalad - c/w 80-6506 HMV N 5621 (Hindustani)- Nov. 1932

oE1668 - 80-7130 - Mehbub Jan
Mounda Yaradar - Lalat c/w 80-7131 HMV N 5646 (Hindustani) May. 1933

0E1669 80-6714 - Mehbub Jan
Jaoji Jaoji Sainyaa - Thumri (Hindustani), c/w 80-6715 (b) HMV N 5635 b Feb. 1933

0E1670 ---2 Mehbub Jan
Take 1 rejected

0E1670--2 80-6610 - Mehbub Jan
Aapkun Chahate - Gazal (Hindustani) c/w 80-6611 HMV N 5626 Dec.1932

0E1671 ----1 80-7245 - Mehbub Jan
Jae Vahe Hasno Hadueekat - Gazal c/w 80-7246 (a) HMV N 5650 a (Hindustani) Jun 1933

0E1672 ---1 80-6611 - Mehbub Jan
Yeh Aankh Wo Hai Jo-Gazal
c/w 80-6610 - HMV N 5626; (HIndustani) Dec. 1932

0E1673 ---1 80-7131 - Mehbub Jan
Tan Na Dir Dir - Tarana Basant
c/w 80-7130 HMV N 5646 (Hindustani) May 1933

OE1674 - 80-6500-Mehbub Jan
Toam Tana Nana, Vajavi Venu - Ashtapadi Durga
c/w 80-6501 HMV N 5021 (Marathi) Nov.1932

OE1675 ----1 Mehbub Jan
Take 1 rejected
0E1675 ---2 80-6501 - Mehbub Jan
Majha Raja Bansirana - Kafi Zilla
c/w 80-6500 HMV N 5021 (Marathi) Nov. 1932

OE1676 - 80-7244 - Mehbub Jan
Taras Rahi Aankhiya - Bhairavi
c/w 80-7245 (b) HMV N 5650 b (Hindustani) Jun. 1933

0E1677- 80-7582 - Mehbub Jan
Ab Na Sahun Tori Baat - Thumri
c/w 80-7583 HMV N 5657 (Hindustani) Jul. 1933

OE1678-80-7583-Mehbub Jan
Tum Jo Chaho To More - Gazal Durga
c/w 80-7582 HMV N 5657 Jul. 1933

Recordings taken at Bombay
by George Corran 1933

OC6017-80-10176-Mehbub Jan
Haans Haans Bale
(Composed by K.G. Dixit - alias Kavi Sanjeev) c/w 80-10177 HMv N 5088 (Marathi) Nov. (1934)

OC6018 - FT - 5148 - Mehbub Jan
c/w (oc-6036) Twin FT 5148 (Hindustani) Nov. 1934

OC6019 - 80-10177 - Mehbub Jan
Isha Todi Pasha
(Composed by P. R. Bhope, Madhukar Mela, Poona)
c/w 80-10176 HMV N 5088 (Marathi) Nov. 1934

0C6020 - 80-9623-Mehbub Jan
c/w 80-9622 (a) HMV N 5708 a (Hindustani) Jul. 1934

0C6021 -N-5731-Mehbub Jan
Unki Balako Kya Garaj Hai - Gazal
c/w (oc-6022-1) HMV N 5731 (Hindustani) Dec. 1934

0C6022-N-5731 Mehbub Jan
Shainkado Chakkar Diye Hain - Gazal
c/w (oc-6061) HMV N 5731 Dec. 1934

0C6023 - FT-5067 Mehbub Jan
Krishnani Begane Baro - Yaman
c/w (0C-6038) TWIN FT 5067 (Canarese) Dec. 1934

0C6036 - FT-5148-Mehbub Jan
c/w (oc-6018) Twin FT 5148 (Marathi) Nov. 1934

0C6037-N-5748-Mehbub Jan
c/w (oc-6058) HMV N 5748 (Hindustani) Apr.1935

0C6038-FT - 5067-Mehbub Jan
Dudhan Prem Kena - Bageshri
c/w (oc-6023) Twin FT 5067 (canarese) Dec. 1934

0C6055-80-9622-Mehbub Jan
c/w 80-9623 (b) HMV N 5708 b (Hindustani) Jul. 1934

0C6056-N-5740-Mehbub Jan
c/w (oc-6059) HMV N 5740 (Hindustani) Feb. 1935

oc6057 - Mehbub Jan
(Not traced as issued) (Hindustani)

0c6058-N-5748-Mehbub Jan
c/w (oc-6037) HMV N 5748 (Hindustani) Apr. 1935

0C6059 -N-5740 Mehbub Jan
c/w (oc-6056) HMV N 5740 (Hindustani) Feb. 1935

Recordings taken at Bombay
by George Corran March 1935
2MC483-Mehbub Jan
(Take 1 rejected)
2MC483 HT-47-Mehbub Jan.
Rava Mande Abagan - Multani Khyal
c/w (2MC-484) HMV HT 47 (12") (Hindustani) oct. 1935

2MC484-HT - 47-Mehbub Jan
chalo Vrindavan
c/w (2MC-483-2) HMV 47 (12") (Hindustani) Oct. 1935

0MC485-FT - 5344-Mehbub Jan
Na Mare Pichkare - Thumri
c/w (OMC-493) Twin FT 5344 (Hindustani) Jun 1936

0MC486-N-5767 Mehbub Jan
c/w (OMC-543) HMV N 5767
Hindustani Aug. 1935

0MC493-FT-5344-Mehbub Jan
Piya Palan Lage - Gaur Sarang
c/w (OMC-485) Twin FT 5344 (Hindustani) Jun. 1936

0MC494-FT-5269-Mehbub Jan
Dekho Sakhi Kanaiya Roke Tore - Bihag Thumri
c/w (OMC-540) Twin FT 5269 (Hindustani) Feb. 1936

OMC540-FT-5269 -Mehbub Jan
Dekho Dekho Aaj Syam -Tilak Kamod-
c/w (OMC-494) Twin FT 5269 (Hindustani) Feb. 1936

OMC541-FT-5240-Mehbub Jan
Thute Taba Kiya Dilekhana Kharabane-Gazal
c/w (OMC-542) Twin Ft 5240 (Hindustani) Dec. 1935

0MC542-FT-5240-Mehbub Jan
Aayake Dunmanse Utrfan Ho Jae - Gazal
c/w (OMC-541) Twin Ft 5240 (Hindustani) Dec. 1935

0MC543-N-5767 - Mehbub Jan
c/w (OMC-486) HMVN 5767 (Hindustani) Aug. 1935

0MC544-N-5129- Mehbub Jan

Murliwala Ha Alaa - Durga (Kavi Sanjeev)
c/w (OMC-545) HMV N 5129
(Marathi) Aug. 1935

OMC545-N-5129-Mehbub Jan
Rokhuni Ka Pahata Kavi Sanjeev
c/w (OMC-544) HMV N 5129
(Marathi) Aug. 1935

OMC546-FT-5301-Mehbub Jan
Tujvin Majha Kon 'Jivacha-Bhajan Pilu
c/w (OMC-547) Twin FT 5301
(Marathi) Apr. 1936

OMC547 FT-5301 Mehbub Jan
Madhura Sucha Agra Jiyola - Mishra Mand
c/w (OMC-546) Twin FT 5301
(Marathi) Apr. 1936

Recordings taken at Bombay by George corran 1935
OMC1910-N-5143-Mehbub Jan
Nabhi Hansea To chand - Bhimpalas
(Lyric composed by - Kumar Sanjeev)
c/w (OMC-1912)5HMV N (Marathi) Mar. 1936

OMC1911-FT-5362-Mehbub Jan
Tore Mana Van Aai - Bageshri
c/w (OMC-1914) Twin Ft 5362
(Hindustani) Jul. 1936

0MC1912-N-5143. Mehbub Jan
Harinisama-Garib Abla - Adana
(Lyric composed by-Kumar Sanjeev)
c/w (OMC-1910) HMV N 5143
(Marathi) Mar. 1936

0MC1914-FT-5362 Mehbub Jan
Piyasing Nisdin Jagi - Malkauns
c/w (OMC-1911) Twin FT 5362
(Hindustani) Jul. 1936

0MC1919-N-5787-Mehbub Jan
Kahan Jate Ho Yaar - Gazal Keherwa
c/w (OMC-1913) HMV N 5787
(Hindustani) Jan. 1936

OMC1920-N-5808-Mehbub Jan
Bechain Kar Diya Hai
c/w (OMC-1938) HMV N 5808
(Hindustani) May 1936

OMC1937-FT-5402-Mehbub Jan
Udle Chand Ha Pahe (S.A. Shula)
c/w (OMC-1940) Twin Ft 5402
(Marathi) Sep. 1936

OMC1938-N-5808-Mehbub Jan
Sargaste Misle Majnun
c/w (OMC-1920) HMV N 5808
(Hindustani) May. 1936

OMC1939-FT-5376 Mehbub Jan
Shabe Firake Ajab - Gazal
c/w (OMC-1941) Twin Ft 5376
(Hindustani) Aug. 1936

OMC1940-FT-5402-Mehbub Jan
Karunadhana Dyalla
c/w (OMC-1937) Twin Ft 5402
(Marathi) Sep. 1936

OMC1941-FT-5376 Mehbub Jan
Unpe Aapk Hoke Aapne - Gazal
c/w (OMC-1939) Twin FT 5376
(Hindustani) Aug. 1936

Mehbub Jan of Sholapur Discography

Film : Savkari Pash-Shalini Cinetone, Kolhapur-1936

Music : Govindrao Tembe
Songs : Sabse Ram Bhajan Kar Le - Vishnupant Jaog
Garagara Phiravi Netra -
Sonyachya Ga Kunchivari - Ameena
Sodi Padar Jaunde Murari -
Yeri Sakhi Aayo Sawan - Mehbub Jan
Preetichi Vat Kateri Bephat - Mehbub Jan
Kopali Bhawani Aai -

स्वर कुबेर अनुराधा

अद्वैत धर्माधिकारी

शास्त्रीय संगीत आणि सुगम संगीत हे गायनाचे प्रकार सहजपणे गाणाऱ्या अनुराधा कुबेर आजच्या तरुणपिढीच्या आघाडीच्या गायिका आहेत. गाण्याचा वारसा अनुराधाला आपल्या घरातूनच मिळालेला आहे. अनुराधाच्या आई ह्या वनस्पतिशास्त्रज्ञ आणि उत्तम गाणाऱ्या, तर वडिलांना ही संगीत ऐकण्याची आवड.

वयाच्या ८ व्या वर्षी अनुराधाचं संगीत शिक्षण सुरू झालं. त्यानंतर काही वर्षांनी भेंडीबझार घराण्याचे नामवंत गायक पं. त्रिंबकराव जानोरीकर ह्यांच्याकडे त्या भेंडीबझार घराण्याची गायकी शिकू लागल्या. ही तालीम १० वर्षे अखंड लाभली. त्यातील २ वर्षे शिक्षण त्यांना कलकत्त्याच्या संगीत रिसर्च अकादमीमध्ये त्यांच्या गुरुजींकडून मिळाले.

अनुराधाच्या गायनात बुद्धी आणि भावना या दोन्ही पैलूंचा उत्तम मिलाफ आढळतो. त्यांना निसर्गदत्त सुमधुर आवाजाची देणगी लाभलेली असून, त्यावर मेहनतीचे सुयोग्य संस्कार झालेले आहेत. १९९६ च्या सवाई गंधर्व महोत्सवा मध्ये अनुराधाला आपले गायन सादर करण्याची संधी मिळाली व त्यांच्या गायनाला रसिकांची व जाणकारांची प्रचंड दाद मिळाली. अनुराधाच्या गाण्यामध्ये आलापी व ताना दोन्हीचा सुंदर समतोल आहे. तसेच सरगम त्या उत्तम प्रकारे पेश करतात.

रागदारी संगीताबरोबर मराठी सुगम संगीतसुद्धा त्या उत्तमप्रकारे सादर करतात. 'अनन्वय' च्या अनेक कार्यक्रमातून त्यांनी दर्जेदार काव्य सुमधुर आवाजात सादर केलेलं आहे. भारतातील अनेक शहरांमध्ये त्यांच्या मैफिली गाजलेल्या आहेत.

एकोणिसाव्या शतकाच्या तिमिरपर्वात जन्मलेल्या ताराबाई शिरोडकर, अंजनीबाई मालपेकर आणि बाई सुंदराबाई, हिराबाई पेडणेकर यांच्या जीवनाचे, त्यांच्या कलेचे, संघर्षमय कालखंडाचे काही धागेदोरे ॲड. राजेंद्र ठाकूर देसाई यांनी जुळवलेले आहेत. दुर्मिळ फोटो, ध्वनिमुद्रिका, आठवणी यातून ह्या तेजस्वी तारका पाहता येतील, अशी शब्दचित्रं रेखाटलेली आहेत.

आजच्या वाहिन्यांच्या, नवीन माध्यमांच्या झगमगटात त्या हरवून गेलेल्या आहेत. पण त्यांची तेजस्वी, रूपसंपन्न, संगीतमय, कलासक्त व्यक्तिमत्त्वं आजही प्रकाशमान भासतात.

संपादक

संगीतविश्वातील गानशुक्रतारा

श्रीमती ताराबाई शिरोडकर

ॲड. राजेंद्र ठाकूर देसाई

गोमांतक ही कलावंतांची खाण आहे. गोमांतकातील फोंड्याजवळील शिरोडा हे डोंगराच्या कुशीतले छोटे निसर्गसंपन्न गाव. २०-२५ कौलारू घरे म्हणजे गावाची वस्ती. तसे हे गाव मंदिरांनीही गजबजलेले. कामाक्षी देवीचे मंदिर हे त्यातले प्रमुख. गावात वीज, रस्ते, नळ या कुठल्याही सोयी उपलब्ध नव्हत्या. जीवनावश्यक वस्तूंसाठीही ४-४ मैल दूर जावे लागे. अशा या गावात आणि वातावरणात १८८९ मध्ये ताराबाई शिरोडकरांचा जन्म झाला.

ताराबाईंना लहानपणापासूनच शास्त्रीय संगीताची आवड होती. त्यांच्यासमोर आदर्श होता तो काकोडकर भगिनींचा. त्यावेळी मोनाबाई, शामाबाई आणि उमाबाई या तीन काकोडकर भगिनी अत्यंत प्रसिद्ध होत्या. या तिघीही उत्तम गायिका होत्या व विशेष म्हणजे त्या एकत्र गाऊन मैफल रंगवत असत. त्या तिघींचाही आवाज अत्यंत मधुर व एकाच जातीचा होता. त्यांच्या चेहऱ्यामध्येही विलक्षण साम्य होते. त्या तिघींचेही गाण्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण मालवणचे विठोबा अण्णा हळप यांच्याकडे झाले होते. अविश्रांत मेहनत करून त्या तिघींनी गाण्यांची उत्तम तयारी केली होती व लौकिक संपादन केला होता. तिघींचाही दमसास भरपूर होता. एकीने सूर लावल्यानंतर श्वास सुटेपर्यंत दुसरी बहीण त्यात आपला स्वर मिळवी आणि आस चालू ठेवी. तिच्यानंतर तिसरी बहीणही तेच चालू ठेवी. त्यामुळे स्वरांचा लगाव विलंबितमध्ये दीर्घ काळ राहत असे. आस तुटली असे जाणवत नसे. त्यांचे चेहरे न पाहता गाणे ऐकले तर एकच व्यक्ती गात आहे असे वाटावे इतके नैपुण्य या काकोडकर बहिणींनी संपादन केले होते. त्यांच्या प्रभावामुळे आपणही शास्त्रीय संगीतात प्रगती करावी अशी महत्वाकांक्षा ताराबाईंमध्ये उत्पन्न झाली.

परंतु शिरोडा या गावामध्ये गाण्याच्या शिक्षणाची सोय कुठून होणार, त्यामुळे गाणे शिकायचे तर गाव सोडणे भाग होते. पंडित रामकृष्णबुवा वझे यांचा मुक्काम त्यावेळी पणजीत होता. त्यांच्याकडे गाणे शिकण्यासाठी ताराबाई पणजीजवळील कालापूर या गावी येऊन राहिल्या. त्यावेळी ताराबाई ८ वर्षांच्या होत्या. वझेबुवांकडे रीतसर शिक्षणाला सुरुवात झाली पण शास्त्रीय संगीताची तोंडओळख होते न होते तोपर्यंत एक वर्षाच्या आत वझेबुवा पणजीतून निघून गेले, त्यामुळे ताराबाईंचे शिक्षण अर्धवटच राहिले.

त्यानंतर पंडित भास्करबुवा बखले गोव्यात आले. त्यांची कीर्ती ऐकून त्यांच्याकडेच गाण्याचे शिक्षण घ्यायचे असा ध्यास ताराबाईंनी घेतला. योगायोगाने भास्करबुवांचा मुक्कामही गोव्यात एक वर्षभर होता व त्यावेळात त्यांनी ताराबाईंना शिकवण्याचे मान्य केले. त्यामुळे सुमारे एक वर्षभर ताराबाईंना भास्करबुवांची खास तालीम मिळाली. ताराबाईंची बुद्धिमत्ता, ग्रहणशक्ती व मेहनत हे विशेष गुण पाहून भास्करबुवांनीही त्यांना मनापासून तालीम दिली. हिला आपण तयार करावं असं भास्करबुवांना मनोमन वाटत होतं. पण अपरिहार्यतेमुळे भास्करबुवा एक वर्षाने पुण्याला निघून गेले. त्यांनतर त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे व तालमीप्रमाणे ताराबाई खूप मेहनत करून गाणं वाढविण्याचा प्रयत्न करू लागल्या. परंतु एक वर्षात मिळालेली विद्या अपुरी आहे व त्या तुटपुंज्या शिदोरीवर गाणं शिकता येणार नाही याची ताराबाईंना तीव्रतेने जाणीव झाली. त्या अस्वस्थ झाल्या. शेवटी त्यांनी ठाम निश्चय केला आणि १९१२ साली गोवा सोडून त्या पुण्याला आल्या.

अशा प्रकारे भास्करबुवांकडे गाणं शिकण्यासाठी ताराबाई पुण्यात येऊन स्वतंत्र बिऱ्हाड करून राहिल्या. त्यामुळे पुढे दीड ते दोन वर्ष सातत्याने आणि भरपूर अशी भास्करबुवांची तालीम ताराबाईंना लाभली. ताराबाईंनी या काळात मेहनतही खूप केली. पण पुन्हा एकदा दुर्दैव आड आलं. भास्करबुवा दीर्घ काळासाठी मुंबईला निघून गेले. त्यामुळे १९१६ साली ताराबाईही पुणे सोडून मुंबईत स्थायिक झाल्या. पुन्हा एकदा भास्करबुवांची तालीम सुरू झाली.

संगीत व्यवसायात यशस्वी होण्यासाठी व मैफल रंगवण्यासाठी ख्यालगायनाबरोबरच टप्पा, ठुमरी, भजन इ. सर्व प्रकार गायकानं आत्मसात केले पाहिजेत, याची भास्करबुवांना जाणीव होती. ते स्वत:ही या सर्व प्रकारांमध्ये पारंगत होते व मैफल रंगवण्यासाठी ते हे

सर्व प्रकार मैफलीत सादर करत असत. ताराबाईंना हे सर्व प्रकार शिकण्यासाठी भास्करबुवांनी प्रोत्साहन दिले, त्यामुळे ताराबाईंचे गाणे हे बहुरंगी व बहुढंगी झाले.

भास्करबुवांसारख्या गुरूच्या मार्गदर्शनामुळे व तालमीमुळे आणि ताराबाईंच्या मेहनतीमुळे ताराबाईंचं गाणं परिपक्व झालं होतं, ते सर्वांग परिपूर्ण बनलं होतं. त्यांचा गळा कमालीचा गोड होता. रूप, सौंदर्य, आरोग्य व आवाज याची नैसर्गिक देणगीही त्यांना भरपूर मिळाली होती. त्यामुळे भास्करबुवांच्या पट्टशिष्या म्हणून ताराबाईंचा लौकिक वाढला होता. एकापाठोपाठ एक त्यांच्या गायनांचे कार्यक्रम सुरू झाले. अल्पवधीतच मुंबईमध्ये त्या लोकप्रिय कलाकार म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या.

इंदूर संस्थानचे राजे श्रीमंत तुकोजीराव होळकर यांच्याकडे मुंबईत ताराबाईंचा कार्यक्रम झाला. राजेसाहेब स्वत: रसिक व संगीताचे जाणकार होते. या कार्यक्रमाला त्यांनी अनेक राजे-महाराजे व मुंबईतील प्रतिष्ठित संगीतरसिक आमंत्रित केले होते. सूरश्री केसरबाई केरकरही या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. ताराबाईंनी पूर्वाकल्याण रागाने मैफलीचा प्रारंभ केला. एकतालातील 'आज सोवना' हा ख्याल गाऊन नंतर 'मोरे घर आजा' हा त्रीतालातील द्रुत ख्याल दाणेदार तानांसह त्यांनी सादर केला. त्यानंतर 'गोरी तोरे नैन काजर बीन काले' ही रंगेल ठुमरी त्यांनी अत्यंत नखऱ्याने पेश केली. त्यापुढे 'तुम बीन मोरी कौन खबर ले'हे भजन अत्यंत भक्तिभवाने सादर करून त्यांनी मध्यंतर केले. मध्यंतरानंतर 'प्यारे पग होले' हा बिहागडा रागातील आडा चौतालातील ख्याल व एकतालातील द्रुत चीज गाऊन झाल्यावर राजेसाहेबांच्या फर्माईशीप्रमाणे बसंत रागातील 'पिया संग खेले होरी' व बनारसी अंगाची एक भैरवी ठुमरी गाऊन रात्री दोन वाजता ताराबाईंनी मैफल संपन्न केली. श्रोत्यांनी टाळ्यांच्या गजरात व वाहवाच्या बरसातीत ताराबाईंना पावती दिली. राजे साहेबांनी रुपयांनी भरलेले चांदीचे ताट बिदागी देऊन ताराबाईंचा सन्मान केला व ताराबाईंना इंदूर दरबारची गायिका म्हणून नेमल्याची घोषणा केली. अशा प्रकारे लोकमान्यतेबरोबरच ताराबाईंना राजमान्यताही मिळाली. भास्करबुवांना शिष्येच्या सन्मानामुळे अत्यानंद झाला. आता ताराबाईंचे नाव श्रेष्ठ कलाकारांच्या श्रेणीत घेतले जाऊ लागले, पण यानंतरही ताराबाईंनी भास्करबुवांची तालीम नियमितपणे चालू ठेवली.

पहिल्या महायुद्धाच्यावेळी संरक्षणनिधी जमा करण्यासाठी काही जलसे आयोजित केले गेले होते, त्यामध्ये ताराबाईंना प्रमुख स्थान मिळाले. त्या कार्यक्रमांच्या जाहिरातींमध्ये व निमंत्रणपत्रिकांमध्ये 'उत्कृष्ट मैफल कलाकार' असा ताराबाईंचा उल्लेख केला गेला होता. अनेक दिग्गज कलाकार असताना असा उल्लेख होणं हा ताराबाईंचा मोठा सन्मान होता.

भास्करबुवा बखलेंची सर्वांग परिपूर्ण गायकी फक्त ताराबाईच गाऊ शकत असत, असे भास्करबुवा व ताराबाई या दोघांचेही गाणे प्रत्यक्ष ऐकलेल्या लोकांचे मत होते. बुवांच्या सर्व शिष्यांमध्ये ताराबाईंना प्रथम श्रेणीची गायिका मानली जात असे. भास्करबुवांचे पहिले चरित्रकार नी.म. केळकर यांनी चेंबूर येथे श्रीराम संगीत विद्यालयाच्या भास्करबुवा बखले पुण्यतिथी संगीत समारोहात बोलताना ताराबाईंबद्दल पुढील उद्‌गार काढले होते, ''गानपंडिता ताराबाई शिरोडकर यांनी भास्करबुवांकडे ७-८ वर्षे अखंड शिक्षण घेतल्यामुळे व तळमळीने योग्य मेहनत घेतल्यामुळे बुवांच्या गाण्याची शोभा स्पष्ट दिसू लागली व प्रभावी गायकीमुळेच ताराबाई श्रेष्ठ गायिका ठरली व सर्वत्र यशस्वी झाली. चंदा कारवारकर, कुमठेकर, अंजनी कलगुटकर इ. बुवांच्या शिष्या उत्तम गात होत्या; पण बुवांची सर्वांग परिपूर्ण गायकी उचलण्याची कुवत एकट्या ताराबाईंमध्येच होती. बुद्धीला सरस्वतीची देन होती आणि गळ्यात बासरीची मंजूळ धून होती म्हणून पैशांचा, वेळेचा हिशेब न करता भास्करबुवांनी तिला विद्या देण्यासाठी अपार कष्ट घेतले होते. तिला महाराष्ट्रातच नव्हे तर हिंदुस्थानात पहिल्या प्रतीची गायिका करण्याचा बुवांचा निश्चय होता.'' या उद्‌गारांवरूनच ताराबाईंची योग्यता सिद्ध होते.

ताराबाईंना पहिल्या प्रतीची गायिका करण्याचा भास्करबुवांचा निश्चय होता. पण दैववशात काही वेगळेच लिहिले होते. काही कौटुंबिक आपत्तीने दु:खी होऊन ताराबाईंनी गाणंच सोडून दिलं. हे कळताच भास्करबुवांना कल्पनातीत दु:ख झालं. हा बाण त्यांच्या जिव्हारी लागला होता. रक्ताचं पाणी करून ज्या शिष्येला शिकवलं, तिने गानसंन्यास घेतल्याचे कळताच भास्करबुवा उद्विग्न झाले. पण काळ कुणासाठी थांबत नाही. भास्करबुवांनी त्यांचे अखंड विद्यादानाचे व्रत चालूच ठेवले. मास्टर कृष्णराव, बालगंधर्व, बापूराव केतकर, दिलीपचंद वेदी इ. अनेक शिष्य त्यांनी पुढे तयार केले. त्या शिष्यांनीही दिगंत कीर्ती मिळवली व आपल्या गुरूचे नाव उज्ज्वल केले. पण ताराबाई शिरोडकरांचे गाणे मात्र परत कधीही कोणालाही ऐकायला मिळाले नाही. ताराबाईंच्या ध्वनिमुद्रिकाही निघाल्या नाहीत. त्यामुळे जिवंत असूनही ताराबाई संगीतरसिकांच्या स्मरणात राहिल्या नाहीत. विस्मृतीत गेल्या आणि या विस्मृतीतच ६ जुलै १९४९ रोजी या गानशुक्रताऱ्याचा अस्त झाला.

''सन १८६६ पासूनच्या गोमंतकीय संगीतकारांच्या इतिहासात श्रीमती ताराबाई शिरोडकर या श्रेष्ठ गायिकेचं नाव अग्रभागी राहील असा हा संगीतविश्वातील गान शुक्रतारा होता'' हे सूरश्री केसरबाई केरकर यांनी ताराबाईंबद्दल काढलेले उद्‌गारच ताराबाईंच्या श्रेष्ठत्वाची पावती देतात.

बाई सुंदराबाई

> लावणीगायनावर असामान्य प्रतिभेची अम्लान मुद्रा सुंदराबाईंनी उमटवली. भाषेची जाणकारी आणि स्वरांवर हुकमत असलेल्या सुंदराबाईंनी ध्वनिमुद्रिकांतून गानवैभव मुक्तपणे उधळलेलं दिसतं. काळाच्या ओघात ऐश्वर्य हिरावून गेलं पण.... सुंदराबाईंची ही आठवण रसिकांसाठी..
>
> संपादक

✯ ॲड. राजेंद्र ठाकूर देसाई

प्रभातचा 'माणूस' सिनेमा मी लहानपणी पाहिला, त्याची आठवण ताजी आहे. शांता हुबळीकर व शाहू मोडक यांचा अभिनय आणि सुरुवातीची नामावलीची अभिनव पद्धत चांगलीच लक्षात राहिली. तसेच लक्षात राहिले ते 'मन पापी भुला' हे गाणे. त्या गाण्याची गायिका कोण व पडद्यावर ते गाणं सादर करणारी अभिनेत्री कोण हे कळण्याचं माझं त्यावेळी वयही नव्हतं. पण गाण्याचा तो प्रसंग व ते गाणं मात्र मनात घर करून राहिलं होतं. नंतर जेव्हा ध्वनिमुद्रिका व ध्वनिमुद्रणे यांचा संग्रह करायचा छंद लागला तेव्हा कळलं की, ते गाणे म्हणणाऱ्या व पडद्यावर सादर करणाऱ्या होत्या बाई सुंदराबाई.

सुंदराबाई जाधव या मूळच्या पुण्याच्याच. त्यांचा जन्म १८९० मध्ये एका सामान्य कुटुंबात झाला. सुंदराबाईंची कौटुंबिक माहिती वा बालपणाची हकिकत फारशी उपलब्ध नाही. लौकिकार्थाने त्यांचं शिक्षण जवळजवळ झालंच नव्हतं. रागदारी गाण्याचं शिक्षण पुण्यात ठाकूरदासबुवा नावाच्या कनौजी ब्राह्मण गवयाकडे सुरुवातीला झालं. नंतर उस्ताद गुलाम रसूल खाँ आणि गम्मनखाँ यांच्याकडेही सुंदराबाई काही काळ शिकल्या. लावणीगायनाचं खास शिक्षण साताऱ्याकडील एका तयार ढंगदार गायकाकडे - दाभाडे गोंधळ्याकडे - पुण्यातच झालं. त्यानं बाईंकडून उत्तम तयारी करून घेतल्यामुळे या गायनप्रकारात सुंदराबाई चांगल्याच तयार झाल्या. उस्ताद गुलाम रसूलखाँ यांचे एक बिनकर बंधू होते. त्यांच्याकडे सुंदराबाईंनी शिक्षण घेऊन ठुमरी, होरी, गझल, कव्वाली हे सर्व गायनप्रकारही आत्मसात केले. पण सुंदराबाईंच्या आवाजाला शोभेल, जुळेल अशी ढंगदार गायकी त्यांच्या गळ्यावर चढवण्याचं काम मात्र ठाकूरदासबुवांनीच केलं आणि सुंदराबाईंच्या उज्ज्वल भविष्याचा पाया भक्कम करून घेतला.

सुंदराबाईंचं रूप तसं बेताचंच होतं. वर्ण सावळा, काहीसे स्थूल शरीर व वरचे समोरचे दोन दात किंचित पुढे आलेले. पण बाईंची धारणाशक्ती प्रखर होती आणि बुद्धी विलक्षण व मर्मग्राही होती. त्यांचा आवाज आणि त्या आवाजाला शोभणारी त्यांची गायकी, हे सुंदराबाईंचे वैशिष्ट्य होतं.

सुंदराबाईंचा आवाज भरदार होता, पण गंभीर नव्हता. तो निर्मळ होता, पण जवारीदार नव्हता. त्यांचा आवाज फार उंच जात नसे, पण सहजपणे वळत - फिरत असे. तो चंचल किंवा चपळ नव्हता; पण एक नक्की, त्यांचा आवाज अति सुरेल होता आणि तो खास सुंदराबाईंचा होता. त्यांच्या आवाजात एक हळुवार कंप होता. कानांना सहजासहजी न कळणारा पण बारकाईने ऐकल्यास जाणवणारा अतिसूक्ष्म कंप. शास्त्रीय परिभाषेत त्याला 'ड्रायफ्राम विब्रातो' म्हणतात. म्हणजे छातीखालच्या पडद्याचा हळूवार कंप. असा कंप फारफार क्वचित आढळतो आणि तो ऐकणाऱ्याचे चित्त वेधून घेतो. तो अभ्यासाने साधणे दुष्कर. अभ्यासाने कंप गळ्यात येऊ शकतो, पण छातीत नाही. तो नैसर्गिकच असतो. तसा तो सुंदराबाईंचा होता. या कंपाचे व आवाजाच्या खुबीचे योग्य असे प्रकटीकरण करणारे गाण्याचे शिक्षण सुंदराबाईंना मिळाले होते. त्याशिवाय त्यांना लयांगांचे सूक्ष्म ज्ञान होते. त्यांची वाणी शुद्ध होती, 'श' आणि 'ष'मधला फरक स्पष्टपणे दाखविण्याइतकी. गाणे ठसकेदार पण स्वरांचा, उच्चारवर्णांचा आघात व केवळ ठोसपणा यांतील भेद स्पष्ट करणारे. मराठी भाषेतील सर्व बोलीभाषांची व त्यातील उच्चारवळणांची त्यांची समज पक्की होती. उर्दूभाषा त्या नुसत्या शिकल्या नव्हत्या, तर ती त्यांनी पचवली होती. त्यावर त्यांचे प्रभुत्व होते. याशिवाय त्यांचे आणखी एक विशेष म्हणजे गाताना तानांमध्ये, आलापांमध्ये विराम घेण्याचे कसब. यामुळे योग्यप्रकारे, योग्यठिकाणी थांबून जो भावपरिणाम होतो

त्याचे तारतम्ययुक्त ज्ञान त्यांना होते. त्याबद्दलचे त्यांचे आडाखे विलक्षण होते आणि ते परिणामकारक होते. सुंदराबाई काही कोणी शास्त्रीपंडित नव्हत्या. त्यांचे ज्ञान उपजत होते, तसेच ते अनुभवातूनही आले होते. या सर्वांतून त्यांचे सर्वांग परिपूर्ण असे रसिले गाणे तयार झाले होते.

१९१७ ते १९३५ या कालखंडात होरी, कजरी, भजन, गझल, कव्वाली, गीते इ. सर्व प्रकारचे गाणे ढंगदारपणे व समर्थपणे गाऊन सुंदराबाईंनी स्वत:चे असे खास स्थान निर्माण केले; पण सुंदराबाईंची खासियत होती ती म्हणजे लावणीगायन. लावणी हा महाराष्ट्राचा वैशिष्ट्यपूर्ण गीतप्रकार. तयार गळ्यानं व भावनेनं अतिशय उत्कृष्टपणे लावणी गाणारी एकच गायिका होऊन गेली, ती म्हणजे बाई सुंदराबाई. लावणीगायन हा सुंदराबाईंचा खास प्रांत होता. प्रत्यक्ष बालगंधर्वांनी सुंदराबाईंच्या लावणी गायनाचे वर्णन करताना पुढील उद्‌गार काढले होते - 'शृंगारिक लावणी गाताना मुरकी, खटका यांचा उपयोग त्या समजून करीत. तालाला, लयीला अनुसरून त्या शब्दच्छेद करीत. शब्दांची ठसकेदार फेक करून, त्यांना मुरड घालून गिरकी तानांचा उपयोग शृंगाररसाचा परिपोष करण्यासाठी त्या कुशल कारागिराप्रमाणे करीत असत.' या उद्‌गारांची प्रचिती त्यांच्या लावण्यांच्या ध्वनिमुद्रिकांमधून येते. 'सखे नयन कुरंग', 'ऐकून दर्द आले डोळ्यांना पाणी', 'तुझं मुरकत चालणं' या लावण्या सुंदराबाईंच्या समर्थ गायकीचे दर्शन घडवत. खासगी जलशांमधून सुंदराबाई या लावण्या सादर करताना शृंगार रसाला पोषक अशी अदा करत असत. त्याचे बहारदार वर्णन श्री. विनायक नातू यांनी त्यांच्या 'तसं पुणे गुलजार' या पुस्तकात केले आहे. ते खरोखरच वाचण्यासारखे आहे. भास्करबुवा बखलेसुद्धा सुंदराबाईंच्या लावणीगायनाचे चाहते होते. स्वत: भास्करबुवा आपल्या मैफलींमधून क्वचित लावणी गात असत. त्यांची 'पंचकल्याणी अबलख घोडा' ही लावणी तर प्रसिद्ध आहे. एकदा सुंदराबाईंनी भास्करबुवांजवळ शास्त्रीय संगीत शिकण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु त्यांचा आवाज व गाण्याची जातकुळी लक्षात घेऊन भास्करबुवांनी त्यांना उत्तर दिले, ''बाई तुम्ही शास्त्रीय संगीत शिकलात तर आम्ही लावणी कुणाची ऐकायची ?''सुंदराबाईंच्या लावणी गायनाला भास्करबुवांनी दिलेली ही दादच होती. धम्मनखाँ हे प्रसिद्ध तबलजी सुंदराबाईंची साथ करत. हे धम्मनखाँ पंजाबी अंगाची ठुमरी स्वत: उत्तम प्रकारे गात असत. हा पंजाबी बाजही सुंदराबाईंच्या गळ्यावर चढला होता. धम्मनखाँच्या साथीतील सुंदराबाईंचे गाणे ऐकलेली मंडळी नशीबवानच. सुंदराबाईंच्या 'खूण बाळपणात' या अप्रतिम लावणीच्या ध्वनिमुद्रिकेत हा धम्मनखाँ स्वत:ची आठवण मागे सोडून गेला आहे.

मोजके परंतु शंभर नंबरी गाण्याचे भांडवल असलेल्या सुंदराबाईंनी अमाप लोकप्रियता व संपत्ती मिळवली. जलसे व कार्यक्रमांच्या बरोबरच सुंदराबाईंना अफाट कीर्ती मिळाली, ती त्यांच्या ध्वनिमुद्रिकांनी. शंभरच्या आसपास आकडा भरेल इतक्या सुंदराबाईंच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या. त्यामध्ये गीतं, भजनं, गझल, कव्वाली, शास्त्रीय संगीत, ठुमरी, होरी, भावगीतं, लावणी इ. सर्व प्रकार आढळतात. हीज मास्टरर्स व्हॉइस कंपनीने 'आजपर्यंत सर्वात अधिक रेकॉर्डस् यांच्या खपल्या' म्हणून काढलेले सुवर्णपदकही अनेक नामवंत गायकांच्या बरोबरीने सुंदराबाईंना प्रदान केले. ध्वनिमुद्रिकांचे महत्त्व ओळखून सुंदराबाईंनी अनेक गायक - गायिकांना ध्वनिमुद्रिका देण्यास प्रवृत्त केले. अब्दुल करीमखाँ साहेबांनी उतारवयात ध्वनिमुद्रिका दिल्या, त्या सुंदराबाईंच्या आग्रहाखातरच. सुंदराबाईंच्या या दूरदृष्टीमुळे अनेक कलाकारांचे गाणे आज आपल्यापर्यंत पोहचले आहे. सुंदराबाईंचे हे उपकार न फिटणारे आहेत.

सुंदराबाईंच्या भावपूर्ण गाण्याचे सामर्थ्य ओळखून भास्करबुवांनी गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' नाटकाच्या चाली देण्यासाठी सुंदराबाईंना बोलवण्याची सूचना बालगंधर्वांना केली. सुंदराबाईंनी या संधीचं सोनं केलं. 'दिले बेकरार तूने', ' कत्ल मुझे कर डाला', 'पिया मनसे' अशा अनेक ठेवणीतल्या चिजांचा वापर करून सुंदराबाईंनी 'कशी या त्यजू पदाला', 'सत्यवदे वचनाला', 'प्रभू मजवरी कोपला' अशी अनेक आजरामर नाट्यगीते दिली. या नाट्यगीतांमुळे सुंदराबाईंचे नाव घरोघरी अगदी माजघरापर्यंत पोहचले. ''सुंद्रीच्या लावण्यांच्या प्लेटींना सोवळ्या घरी मज्जाव असला तरी सुंद्रीच्याच हातगुणाच्या नाट्यसंगीतला तेथे बहुमान होता.'' ही विश्रब्ध शारदामधील टीप बरंच काही सांगून जाते.

सुंदराबाई या स्वतंत्र रचनाकार नव्हत्या, त्यामुळे त्यांनी स्वतंत्रपणे चाली निर्माण केल्या नाहीत. पण कोणत्या प्रसंगाला व शब्दरचनेला व कोणती चाल असावी याबद्दलचे त्यांचे कसब वाखाणण्यासारखे आहे. जुन्याच चालीत शब्दानुसार आवश्यक ते फेरफार करून ती चाल चपखलपणे राबवणं हे त्यांनी सहजपणे केलं. गुर्जरांनी आधीच केलेल्या पदांमधील संस्कृतप्रचुर शब्दांनाही सहजपणे जुळतील अशा जुन्या चाली हेरून त्यांचा त्यांनी उपयोग केला. या नाटकामुळेच बालगंधर्व आणि सुंदराबाई या कलाकारांमध्ये जवळीक निर्माण झाली व बालगंधर्व त्यांना 'ताई' म्हणू लागले. बालगंधर्वांना नारायणराव, नाना, गंधर्व अशा अनेक नावांनी वेगवेगळ्या व्यक्ती बोलवत असत. परंतु त्यांना 'दादागंधर्व'म्हणण्याचा मान मात्र फक्त सुंदराबाईंचाच होता. भास्करबुवा त्यांना धाकटी बहीण मानत, तर मास्टर कृष्णराव त्यांच्यावर लोभ करत. असं असामान्य भाग्य सुंदराबाईंच्या वाट्याला आलं होतं.

नाटककार माधवराव जोश्यांचं 'म्युनिसिपालिटी' हे गाजलेलं नाटक प्रथम

रंगभूमीवर आलं ते पुण्यात. त्यातील पहिल्याच प्रवेशात 'चंद्री दंताडी' असा एका गायिकेचा उल्लेख होताच थिएटरभर एकच टाळी उठली. ती दाद होती माधवरावांच्या विनोदाला आणि सुंदराबाईबद्दलच्या आपलेपणाला. माधवरावांचा हा विनोद निर्मळ मनाचा होता. सुंदराबाई त्यांना म्हणाल्या, "आता लोक मला विसरले तरी चालतील. तुमच्या नाटकामुळे 'चंद्री दंताडी' हे नाव तरी लोकांच्या स्मरणात राहील.'' माधवराव यावरून म्हणाले,'माझं नाटक पडलं तर मी दुसरं लिहीन; पण सुंदराबाई गेली तर दुसरी सुंदराबाई होणार नाही.''

सुंदराबाईचा स्वभाव हा असा मोकळाढाकळा, अघळपघळ, पण माणुसकीने ओथंबलेला होता. 'आला हजरत निजामशहा उस्मनअली - ए- रियासत हैद्राबाद' यांनी सुंदराबाईच्या उर्दू उच्चारांवर फिदा होऊन स्वत: रचलेली कवने म्हणण्याची परवानगी देऊन सुंदराबाईना 'बाई' हा किताब दिला. 'सुंदराबाई पुणेकरीण' ही 'बाई सुंदराबाई' झाली. सुंदराबाईना अफाट धनदौलत मिळाली. बोरीबंदर समोरच्या एम्पायर हॉटेलच्या वरचा बहुतेक सारा मजला वर्षानुवर्ष त्यांच्याकडे भाडेकरू म्हणून होता. दाराशी दोन-दोन गाड्या उभ्या होत्या. परंतु या भाग्याने व ऐश्वर्याने त्या फुगून गेल्या नाहीत. त्यांचा मूळचा स्वभाव बदलला नाही. त्यांनी स्वत:च्या स्वभावाने अनेक मैत्र जोडले, माणसं जवळ केली. त्या माणसांना आणि मित्रांना वेळप्रसंगी अपार साहाय्य केले. त्यांच्या स्वभावातील वात्सल्य व कारुण्य या वैभवाबरोबर कमी होण्याऐवजी वाढले.

रेडिओच्या सुरुवातीपासूनच्या म्हणजे खासगी 'बॉंबे प्रेसिडेन्सी रेडिओ ट्रान्समिटिंग स्टेशन टूएफव्ही' पासूनच्या त्या कलाकार. त्यावेळी दीड - दोन तास गाऊनही फारसे पैसे मिळत नसत, पण रेडिओचं महत्त्व त्या खासगी केंद्राच्या मालकांना जेवढं कळलं होतं तेवढंच अडाणी सुंदराबाईनाही कळलं होतं. स्वत:ची मोटार घेऊन मुंबईतल्या आपल्या गाणाऱ्या मैत्रिणींकडे त्या जात असत, त्यांची विनवणी करत आणि त्यांना समजावत की, 'बायांनो आज तुम्हाला काही कळणार नाही; यंत्रासमोर गावं लागेल, पण तुमचं गाणं, तुमचं नाव हजारो लोकांपर्यंत पोचेल. हा रेडिओ वाढणार, पसरणार आहे.' सुंदराबाईंचं हे भाकीत पुढे खरं ठरलं. मुंबई आकाशवाणीच्या त्या अनेक वर्ष कलाकार होत्या. बुखारींसारखा केंद्रसंचालक बाईंचा चाहता होता. १९४५ ते १९५३ या काळात सुंदराबाई व बालगंधर्व यांना मुंबई आकाशवाणीवर 'सन्माननीय मार्गदर्शक कलाकार' म्हणून नेमण्यात आलं होतं.

पण सुंदराबाईचं पूर्वीचं वैभव सरलं होतं. वय वाढलं होतं. आवाजावर वयाने ठसा उमटवला होता. गात्रंही थकली होती. कमावलेला पैसा अनेक वाटांनी गेला होता. व्यसनात किंवा उधळपट्टीत नव्हे, तर अफाट दातृत्वाने व मैत्र भावनेने अनेकांना साहाय्य करण्यात तो गेला होता. परंतु साहाय्य घेऊन गेलेले ते मित्र सुंदराबाईना मदत करण्यासाठी मात्र परत आले नाहीत. 'असतील शितं तर जमतील भूतं' याचा प्रत्यय सुंदराबाईना येत होता. मोटारी, हॉटेलचा मजला केव्हाच इतिहासजमा झाले होते. रेकॉर्ड कंपनीही सिनेमासंगीताच्या युगात सुंदराबाईना विसरली होती. त्यातच एकुलती एक मुलगी असाध्य रोगाने आजारी पडली. दीर्घ काळाच्या या आजारपणाने तीही गेली. थोडेफार साठवलेले धन त्या आजारपणात खर्ची पडले. सुंदराबाईनाही वयानुसार आजार भेडसावू लागले. हिराबाई बडोदेकरांसारख्या काही सच्च्या मैत्रिणींनी जमेल तशी मदत केली, पण ती किती दिवस पुरणार? गाण्याच्या शिकवण्या करणं सुंदराबाईच्या स्वाभिमानी मनाला जमणारं नव्हतं. त्यातून सुंदराबाईवर 'लावणी गायिका' असा शिक्का बसलेला. प्रभातच्या 'माणूस' सिनेमात काम मिळालं. दोन गाणीही मिळाली. चार पैसे मिळाले. एरवी रेडिओवरची नोकरी हेच चरितार्थाचे साधन राहिले होते. पण ही मामुली नोकरीही त्यांनी मन लावून केली. रेडिओ केंद्रातल्या त्यांच्या व बालगंधर्वांच्या भावस्पर्शी आठवणी कृ. द. दीक्षित व ए.पी. नारायणगावकर या अधिकाऱ्यांनी लिहून ठेवल्या आहेत. त्यातून दारिद्र्यात जगणाऱ्या बालगंधर्वांच्या व सुंदराबाईंच्या थोर मनाचे मनोज्ञ दर्शन होते.

रेडिओवरील बाळगोपाळांच्या 'गंमत - जंमत' सारख्या कार्यक्रमात त्या आनंदाने भाग घेत. कार्यक्रमासाठी जमलेल्या मुलांना पदरच्या खर्चाने पेपरमिंट, चॉकलेट असा खाऊ देत. काही नाही तर निदान चंचीतली सुपारी तरी देत. मुलं त्यांना फार आवडत. माणसांसाठीही त्या हपापलेल्या होत्या. पैसा गेला याचं त्यांना दु:ख नव्हतं. पैसा त्यांनी खूप कमावला होता, पाहिला होता आणि खर्चही केला होता, पण त्या पैशाबरोबर जोडलेली माणसंही दूर गेली, याचं त्यांना जास्त दु:ख होतं. रेकॉर्ड कंपनी त्यांना विसरली. आकाशवाणी विसरली. त्यांची सगळीच माणसं त्यांनी विसरली. १९६७ मध्ये त्या गेल्या तेव्हा त्यांच्या अंत्ययात्रेला हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढेच लोक हजर होते.

उशिरा का होईना, आजच्या सीडीच्या जमान्यात हिज मास्टरर्स व्हॉईस कंपनीला सुंदराबाईची आठवण झाली. नुकतीच सुंदराबाईच्या काही ध्वनिमुद्रिकांची एक सीडी कंपनीने बाजारात विक्रीसाठी आणली आहे. शेकडो ध्वनिमुद्रिका देणाऱ्या व रेकॉर्ड कंपनीला अमाप पैसा मिळवून देणाऱ्या सुंदराबाईना उशिरा का होईना रेकॉर्ड कंपनीने आदरांजली वाहिली आहे.

स्वरूपसुंदर गानदेवता
अंजनीबाई मालपेकर

ॲड. राजेंद्र ठाकूर देसाई

दर्पणात स्वत:चं रूप पाहू नये, अशी तिला गुरूंची आज्ञा होती असं म्हणतात.. स्वत:च्या रुपाच्या प्रेमात पडून तिनं हरवून जाऊ नये म्हणून... बहुश्रुत, संस्कृतज्ञ, वैष्णव संप्रदायाची मधुर पण विरागी गायकी कंठात व असामान्य रूप लाभलेल्या अंजनीबाई मालपेकरांनी ऐश्वर्याच्या शिखरावर असताना तानपुरा खाली ठेवला आणि अध्यात्माची वाट धरली...

संपादक

मित्रवर्य श्री. अद्वैत धर्माधिकारी यांचा एक दिवस सकाळीच दूरध्वनी आला व त्यांनी रात्री त्यांच्याकडे येण्याचे आमत्रंण देऊन दूरध्वनी बंद केला. हा निरोप ऐकून माझी बेचैनी वाढली. वरवर साधे वाटणारे निमंत्रण आम्हा ध्वनिमुद्रिका संग्राहकांच्या सांकेतिक भाषेत मात्र उत्कंठा वाढविणारे होते. नक्कीच काहीतरी दुर्मिळ हाती लागले असणार, याचा अंदाज बांधत रात्री त्यांच्या घरी पोचलो आणि त्यांनी जी बातमी दिली व जे ऐकवले ते निश्चितच कान तृप्त करणारे होते. त्यांनी साक्षात अंजनीबाई मालपेकरांची ध्वनिफीत ऐकवून मला थक्कच केले. बरेच दिवस ज्याचा आम्ही धांडोळा घेत होते, ते अखेर गवसले होते.

अंजनीबाई मालपेकरांबद्दल बरेच ऐकले होते, बरेच वाचले होते; परंतु त्यांचे गाणे कधीच ऐकायला मिळाले नव्हते. तसेच त्यांच्या ध्वनिमुद्रिका किंवा ध्वनिफितीही मिळत नव्हत्या. त्यामुळे अंजनीबाई म्हटल्या की डोळ्यांसमोर उभे रहायचे ते छायाचित्रात पाहिलेले त्यांचे रूपसंपन्न खानदानी देखणेपण व त्यांच्या गायनाबद्दल दिग्गज लोकांनी काढलेले उद्गार.

गोव्यातील पेडणे तालुक्यातील मालपे हे गाव म्हणजे अंजनीबाईंचे आजोळ. इथेच अंजनीबाईंचा जन्म २२ एप्रिल १८८३ रोजी झाला. त्यांचे घराणे हे गायक-वादकांचे. पाच पिढ्यांचे कलावंत घराणे. गुजाबाई (पणजी), मोगाबाई(आजी) व नबूबाई (आई) या सर्वच गाणाऱ्या. गुजाबाईंनी तर संगीतावर त्या काळात एक ग्रंथ लिहिला होता. अंजनीबाईंचे आजोबाही एक पखवाजवादक होते.

गोवा त्यावेळी पोर्तुगीजांच्या वर्चस्वाखाली होता. त्यामुळे तेथील अनेक कुटुंबे शिक्षणासाठी व उदरनिर्वाहासाठी मुंबईला येत. तसेच अंजनीबाईंचे कुटुंबही मुंबईला आले व गिरगावात नवी वाडी इथे त्यांनी वास्तव्य केले. कलावंत घरच्या मुलींना थोडी समज आली की गाणं शिकवलं जात असे. पण अंजनीबाई मात्र भाग्यवान होत्या. नबूबाईंनी तंबोऱ्याआधी त्यांच्या हाती पाटी दिली. ठाकूरद्वारातील नव्या वाडीतील मिशनरी शाळेत त्यांचे शिक्षण सुरू झाले. शाळेतील त्यांची बालमैत्रीण म्हणजे प्रसिद्ध गायिका, कवयित्री व नाटककार हिराबाई पेडणेकर. मराठी - इंग्रजीचे पाठ शाळेत चालू होते. शिवाय गुर्जरशास्त्र्यांकडे संस्कृतचे अध्ययनही झाले. नंतर अंजनीबाई एका मुन्शीजवळ उर्दू व फार्सीही उत्तम शिकल्या. त्याचवेळी १८९१ मध्ये वयाच्या आठव्या वर्षी त्या भेंडीबाजार घराण्याचे श्रेष्ठ गायक नझीरखाँ यांच्या गंडाबंध शागीर्द झाल्या व त्यांच्या रीतसर गायन शिक्षणास सुरुवात झाली.

नझीरखाँ, छज्जूखाँ व खादिम हुसेनखाँ हे तीन बंधू म्हणजे त्यावेळच्या मुंबईच्या संगीतक्षेत्रातील बडी प्रस्थे होती. मुंबईतील बहुतेक गाणाऱ्या कलावंतीणींना या तीन बंधूंपैकी कोणाची तरी तालीम असे. यापैकी छज्जूखाँ हे ध्रुपदिये, नझीरखाँ उत्तम सारंगिये व स्वरांचा सूक्ष्मपणा पाहणारे व खादिम हुसेनखाँ हे तयार म्हणून प्रसिद्ध होते. नझीरखाँसाहेबांचे सारंगीवादन ऐकून साक्षात गोविंदराव टेंब्यांनी , '' नझीरखाँइतका सुरेल व निर्मळ हात माझ्या ऐकण्यात नाही,' असे आपल्या आठवणींमध्ये नमूद केले आहे. हे तीनही बंधू मुंबईच्या भेंडीबाजार भागात रहात असत म्हणून त्यांच्या घराण्याला 'भेंडीबाजार घराणे' या नावाने ओळखण्यास सुरुवात झाली.

नझीरखाँसाहेबांकडे अंजनीबाई २९ वर्षे तालीम घेत होत्या. तसेच १९२०-२३ अशी तीन वर्षे खादिम हुसेनखाँ यांच्याजवळही त्यांचे शिक्षण झाले. तसेच छज्जूखाँ ह्यांजकडून कित्येक ध्रुपदे, होऱ्या व टप्पेही अंजनीबाईंना मिळाले. त्याचप्रमाणे बंदेअलींच्या शैलीचा प्रभावही अंजनीबाईंवर पडला.

अंजनीबाईंचा आवाज स्निग्धमधुर तरी बांगडीसारखा खणखणीत व अतिशय सुरीला होता. त्यांचा स्थिर व स्वच्छ स्वर नझीरखाँनी अचूक हेरला व त्यावर त्यांनी संस्कार करण्यास सुरुवात केली. सतत दहा वर्षे पहाटे चारपासून रियाज सुरू व्हायचा. पहिली तीन वर्षे फक्त यमन व भैरवी याच रागांची तालीम झाली. त्यामुळे बाराही स्वर पूर्णपणे तयार झाले. त्यानंतर मींड,सूत,मुर्की,घसीट यांचा अभ्यास झाला.

त्यासाठी शेकडो चिजा, विराण्या अंजनीबाईंना शिकवण्यात आल्या. तसेच वैष्णवी संप्रदायाची विरागी मधुर गायकीही त्यांना अवगत करून देण्यात आली. त्यानंतर कुलदेवतेच्या दर्शनासाठी अंजनीबाई गोव्यात गेल्या. रिवाजाप्रमाणे गावच्या वतनदाराच्या घरी त्यांच्या गाण्याची बैठक आयोजित केली गेली. अंजनीबाईंच्या सौंदर्याची ख्याती पोर्तुगीज गर्व्हनरच्या मुलाच्या कानावर गेली होती. ऐन मध्यरात्री सोल्जर्सनी वाड्याला वेढा घातला. ती सारी रात्र अंजनीबाईंनी गोठ्यातल्या गवताचा आडोसा करून काढली व स्वत:चा बचाव केला. त्यानंतर मात्र पाखले(पोर्तुगीज) असेपर्यंत गोव्यात पाय न ठेवण्याचा त्यांनी निश्चय केला. परंतु आपल्या जन्मगावाशी त्यांची नाळ मात्र कधीच तुटली नाही. मालप्याशी मात्र त्यांनी नेहमीच संपर्क ठेवला. गोव्याला जाणारे कोणी ओळखीचे भेटले तर मालप्याच्या घरी पूजेची चांदीची उपकरणी, पूजा - अभिषेकासाठी पैसे त्या पाठवीत असत.

१८९९ मध्ये ग्रँट रोड पुलाजवळच्या

मुझफराबाद हॉलमध्ये अंजनीबाईंचा पहिला जलसा झाला. परंतु त्यापूर्वी त्यांनी एक क्रांतिकारी निर्णय ठामपणे घेतला होता. हा निर्णय म्हणजे त्याकाळच्या समाज - व्यवस्थेविरुद्ध त्यांनी केलेले बंडच होते. त्याकाळी कलावंत स्त्रीला, तिची कला कितीही श्रेष्ठ असली तरी दुय्यम दर्जाचे स्थान होते. त्यामुळे स्त्री कलावंतांनी उभे राहूनच कला पेश करण्याची रीत होती. याउलट श्रोते मात्र बसून व लोडाला टेकून त्या कलेचा आस्वाद घेत. नबूबाईंना अशातऱ्हेने रात्र रात्रभर उभे राहून गाताना अंजनीबाईंनी बालवयापासून पाहिले होते. त्यामुळे, ''मला आसन ग्रहण करण्याचा मान मिळेल तेव्हाच मी बैठक करीन'' हा निर्णय अंजनीबाईंनी जाहीर केला. त्यांच्या या निर्णयापुढे त्यावेळचे समाजधुरीण वाकले व अंजनीबाईंनी आसनावर बसून बैठका करायला सुरुवात केली.

पहिल्या जाहीर जलशापासूनच अंजनीबाईंची प्रसिद्धी झाली होती. त्यानंतर संस्थानिक, धनाढ्य लोकांकडे जलाशांची रांगच लागली. शेकडो मैफिली झाल्या, लाखो रुपये मिळाले. अंजनीबाई अतिशय सुंदर, त्यातून तेजस्वी, सुसंस्कृत, अभिजात वृत्तीच्या. दहा वर्षांच्या मेहनतीमधून नैसर्गिक आवाजाला पैलू पडलेले, उच्चार स्पष्ट पण कठोर नव्हते - व चिजेचा अर्थ व भाव व्यक्त करणारे. अलोट संग्रह जवळ असूनही रागविस्तार एका मर्यादेबाहेर करीत बसायचे नाही हा दंडक. नझीरखाँसाहेबांसारखा कडक शिस्तीचा गुरू पाठीशी, त्यामुळे यश व संपत्ती पायांशी लोळण घेऊ लागली.

तुझ्या प्रीतीचे दु:ख मला दावु नको रे

वधुनी जाई प्राण घेई ठेवू नको रे ॥
याचे ममतेचा लोभ मला कळला आता
कोण्या ठिकाणी आहे जाऊन लावा पता
तेथे चालत जाईन आप अंगे स्वत:
जाऊन सांगा कि रानभरी होऊ नको रे ..... ॥१॥
जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी
झड घालून देतो प्राण दीपकांचे वरी
हे मी सांगत असताना का गे पडले भरी
रत्न टाकुनी पदरात गार घेऊ नको रे
वधुनी जाई प्राण घेई ठेवू नको रे ॥२॥

गायिका - लता मंगेशकर ❋कवी - होनाजी बाळा
संगीतकार - वसंत देसाई ❋ चित्रपट - अमर भूपाळी

१९५१ सालच्या 'अमर भूपाळी' ह्या चित्रपटातलं हे गीत, अर्धशतकाचा काळ उलटून गेला तरी नवीन भासतं. होनाजी बाळाचं कवन तर तीन शतकांहून जुनं आहे. पण त्याची झळाळी उणावलेली नाही. त्यातलं शब्द, स्वर, स्वररचना यांचं सौंदर्य आजही अनुभवता येत आहे.

हिराबाई पेडणेकर एक कांचनमृग

> एकोणिसाव्या शतकातील अखेरची दोन दशकं. मुलींना शाळेत पाठवावं का, अशा संभ्रमातल्या समाजातून कलावंतीणीच्या घरातून आलेल्या हिराबाईंनी तानपुराही हाती धरला आणि लेखणीही... रूप, बुद्धिमत्ता, संगीत, साहित्याची रुची असलेली कलावती अखेर वंचना, वैफल्यानं घेरली गेली.. कांचनमृगाच्या मागे धावलेल्या हिराबाईंच्या जीवनाची ही झलक
>
> संपादक

अॅड. राजेंद्र ठाकूर देसाई

ज्या काळात गोमंतक गुलामगिरीच्या जोखडाखाली पिचत होता, त्या काळात एका गोमंतक कन्येने महाराष्ट्राच्या संगीत व साहित्यविश्वात स्वत:चे एक स्वतंत्र स्थान निर्माण केले होते. १९ व्या शतकाच्या सरत्या दिवसांत गोमंतकाच्या अंत्रूज महालाने ज्या अनेक श्रेष्ठ गायिका / कलावती संगीतविश्वाला दिल्या, त्यांपैकीच एक म्हणजे हिराबाई पेडणेकर.

कोकणातल्या सावंतवाडी या लहानशा संस्थानात कलावंताच्या घराण्यात दि. २२-११-१८८५ रोजी हिराबाईंचा जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव शेवंताबाई पेडणेकर. त्या मूळच्या गोव्यातील पेडणे या गावच्या. हिराबाईंचे वडील म्हणजे नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल यांचे थोरले बंधू रामचंद्र ब. देवल. अल्पवयातच आई व वडील यांचा मृत्यू झाल्यामुळे हिंराबाई मुंबईतील मावशीच्या आश्रयाला आल्या.

हिराबाईंची मावशी (भीमाबाई) वेश्याव्यवसाय करणारी. पण त्या काळातील मुंबईतील समाजसुधारकांच्या प्रभावामुळे मावशीने लहानग्या हिराबाईंच्या हाती तंबाऱ्योआधी पाटी दिली. त्यामुळे हिराबाईंचे इंग्रजी - मराठी शिक्षण नवीवाडीतील मिशनरी स्कूलमध्ये सुरू झाले. शाळेतील हिराबाईंच्या बालमैत्रिणी म्हणजे अंजनीबाई मालपेकर व सुरंगा मुळगावकर. या तिघीही रूपसंपन्न होत्या. तिघीही गिरगावातच लहानाच्या मोठ्या झाल्या. तिघीही बुद्धिमान होत्या आणि त्यांची मैत्री अखेरपर्यंत कायम राहिली. तिघींनीही एकमेकींना सुखदु:खात साथ दिली. या मैत्रीची सुरुवात त्या मिशनरी शाळेच्या बाकापासून झाली होती.

हिराबाईंनी शाळेत इंग्रजी - मराठी बरोबरच इतर विषयांतही नैपुण्य संपादन केले होते. शालेय शिक्षण चालू असतानाच त्यांना घराण्याच्या रिवाजाप्रमाणे संगीताचे उत्तम शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली. पं. भास्करबुवा बखले, परशुरामपंत धुळेकर, फैयाज खाँ अशा दिग्गज गुरूंच्या मार्गदर्शनाखाली हिराबाईंचे गाण्याचे शिक्षण झाले. त्याशिवाय अंजनीबाई मालपेकरांचे गुरू नझीरखाँ व खादिम हुसेनखाँ यांच्याकडेही हिराबाईंनी काही काळ तालीम घेतली. अंजनीबाईबरोबरच त्या गुर्जरशास्त्र्यांकडे संस्कृतही शिकल्या होत्या. त्यामुळे संस्कृत नाट्य व वाङ्मयाचीही त्यांना जाण झाली होती.

गोविंद बल्लाळ देवल यांचं हिराबाईंच्या घरी जाणं येणं होतंच. ते 'देवल मामा' या नावानेच ओळखले जात. गोविंद बल्लाळ देवलांचे सर्वात थोरले बंधू रा.ब. कृष्णाजी बल्लाळ देवल हे थोर संगीतज्ञ. त्यांच्या २४ श्रुतींच्या सिद्धांताचे देवलमत हे भारतात भौतिक विज्ञानपद्धतीप्रमाणे झालेले पहिले वहिले संगीतविषयक शास्त्रीय संशोधन. त्या रा.ब. देवलांचेही आपल्या या पुतणीकडे लक्ष होते. त्यांनी करवंटीपासून बनवलेल्या भोपळ्याच्या तंबोऱ्यांपैकी एक गो.ब. देवलांच्यामार्फत मोठ्या कौतुकाने हिराबाईंकडे पाठविला होता. तो नंतर हिराबाईंनी अंजनीबाईंना प्रेमाने भेट दिला व अंजनीबाईंनीही तो आस्थेने जतन केला होता. या पार्श्वभूमीवर नाट्याचार्य देवलांच्या नाट्यव्यासंगाचा व लेखनाचा हिराबाईंवर प्रभाव पडला नसता तरच नवल. हिराबाईंना नाट्याचार्यांच्या सहवासामुळे जणू नाट्य व काव्यांचे बाळकडूच मिळाले. त्यामुळे त्या कविता लिहू लागल्या आणि मनोरंजन मासिकातून त्या प्रसिद्धही झाल्या.

हिराबाईंचे पहिले यजमान म्हणजे त्याकाळच्या 'इंदू प्रकाश' या प्रसिद्ध नियतकालिकाचे संपादक रा.ब. गणेश माध्ये. हिराबाईंना हा संबंध मावशीच्या आग्रहावरून जोडावा लागला. त्यांच्यानंतर हिराबाईंच्या आयुष्यात अनेक पुरुष आले, पण हिराबाईंचे खरे प्रेमसंबंध जुळले ते नानासाहेब जोगळेकरांशी. नानासाहेब जोगळेकर म्हणजे उंचेपुरे, रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचे. वकिलीचे शिक्षण अर्धवट सोडून लो. टिळकांच्या सांगण्यावरून नाट्यव्यवसायात व किर्लोस्कर नाटकमंडळीत आलेले. भाऊराव कोल्हटकरांनी आपले वारसदार म्हणून निवडलेले. ग्वाल्हेर गायकीचे शिक्षण घेतलेले व अत्यंत सुरेल आवाजाचे गायक. भाऊरावांनंतरचे किर्लोस्कर नाटकमंडळीचे मालक व ख्यातनाम नट. जोगळेकरांना साहित्य व संगीत या दोन्हीची आवड होती. हिराबाईंचे रूप, बुद्धिमत्ता, संगीताचे ज्ञान,

साहित्याची आवड व काव्यरचना यामुळे अनेक कवी, नाटककार, विचारवंत, कलावंत इ. चा राबता त्यांच्या घरी सुरू झाला. त्यातच जोगळेकर हिराबाईंच्या दरबारात दाखल झाले आणि हिराबाईंचे मन त्यांच्यावर अनुरक्त झाले. हिराबाईंनी जोगळेकरांवर मनापासून प्रेम केले. पण १९११ साली मानापमान नाटकातील धैर्यधराच्या भूमिकेने कीर्तिशिखरावर पोहचलेले जोगळेकर अचानक मृत्यू पावले आणि या अचानक मृत्यूमुळे हिराबाई खचून गेल्या. त्या मद्यप्राशन करू लागल्या. अशा काळात त्यांना धीर द्यायला पुढे सरसावले नाटककार श्री.कृ. ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर.

तात्यासाहेब पेशाने वकील. पण साहित्य, संगीत, नाटक, काव्य इ. क्षेत्रांत नावलौकिक मिळवलेले. तात्यासाहेब यापूर्वीच हिराबाईंकडे आकृष्ट झाले होते. तात्यासाहेब किर्लोस्कर नाटक मंडळीसाठी नाट्यलेखन करीत असता चिंतोबा गुरवांबरोबर पहिल्यांदा हिराबाईंच्या बिऱ्हाडी गेले. हिराबाईंनी दोन - तीन चिजा त्यांना गाऊन दाखविल्या. पण त्याने तृप्ती न झाल्याने तात्यासाहेब वारंवार हिराबाईंकडे जाऊ लागले. हिराबाईंचे रूप, बुद्धिमत्ता, साहित्य-नाट्य-काव्याचा आस्वाद घेण्याचा गुण व गाणे यामुळे तात्यासाहेब हिराबाईंवर अनुरक्त झाले. पण हिराबाई यावेळी जोगळेकरांच्या प्रेमात आकंठ बुडाल्या होत्या. त्यामुळे त्यांचे तात्यासाहेबांकडे लक्षच नव्हते. तात्यासाहेब मात्र हिराबाईंसाठी वेडे झाले होते. त्यांच्या सहवासासाठी ते आसुसलेले असायचे. याची जाणीव राम गणेश गडकऱ्यांनाही होती. गडकरी तर हिराबाईंना 'हिराभगिनी' असेच म्हणत असत. जोगळेकरांच्या लक्षात तात्यासाहेबांची परिस्थिती आली होती. पण जोगळेकरांना हिराबाईंच्या प्रेमाबद्दल, निष्ठेबद्दल खात्री होती. त्यामुळे कोल्हटकर हिराबाईंचा उल्लेख पत्रातून 'एच' किंवा 'बाबूराव' असा सांकेतिक भाषेत करीत. तात्यासाहेबांना जोगळेकरांबद्दल असूया वाटायची. त्यामुळे 'प्रेमशोधन' या नाटकातील जोगळेकर करीत असलेल्या भूमिकेचे व्यक्तिचित्र तात्यासाहेबांनी सदोष असे रंगविल्याची टीका तात्यासाहेबांवर टीकाकारांनी केली आहे.

पण या सर्व गोष्टींमुळे जोगळेकर किंवा हिराबाईंनी मनात किल्मिष आणले नाही. जोगळेकरांनी तात्यासाहेबांचा कायम आदरच केल्याची ग्वाही पु.रा. लेले व गणपतराव बोडस देतात. हिराबाईंनीही काहीही वावगे न मानता तात्यासाहेबांना त्यांच्या नाट्य व पद्यलेखनात मदत केली. तात्यासाहेबांच्या या मानसिक अस्वस्थतेचे प्रतिबिंब 'प्रेमशोधन' या नाटकात आढळते. तात्यासाहेबांनी मराठी संगीत रंगभूमीवर आणलेल्या पारशी, गुजराथी नाटकांमधील उडत्या व तिरप्या लयीच्या चाली टिकल्या नाहीत. तेव्हा हिराबाईच तात्यासाहेबांच्या मदतीला आल्या. 'मतिविकार' व 'प्रेमशोधन' या तात्यासाहेबांच्या नाटकांतील कित्येक गाजलेल्या चाली या हिराबाईंनी दिल्या होत्या. एवढेच नव्हे तर, नायिकांचे व्यक्तिचित्र रेखाटतानाही तात्यासाहेबांसमोर हिराबाईच होत्या. याबद्दल तात्यासाहेबांचीच कुबली अशी की, ''सौंदर्याची विभ्रमाची उज्वल कल्पना समोर असल्याशिवाय वाङ्मयाच्या निर्मितीस आवश्यक अशी स्फूर्ती उत्पन्न होत नाही.'' याही पुढे जाऊन ते हिराबाईंकडे आपण आकर्षिले गेलो असल्याची स्पष्टपणे कबुली देऊन म्हणतात, ''हिराबाईंशी परिचय झाल्यापासून एका बुद्धिमान स्त्रीच्या सौंदर्याचा व विभ्रमाचा एक बराच चांगला आदर्श मिळाल्यासारखे होऊन माझ्या सौंदर्याभिरुचीचे पोषण होऊ लागले व त्याचा परिणाम माझ्या पुढील कृतीवर दिसू लागला.''

याच काळात गडकरी, तात्यासाहेब केळकर असे कोल्हटकरांचे इतर सुहृदही हिराबाईंकडे येत असत. त्यांच्या घरी होणाऱ्या काव्य- शास्त्र- विनोदाच्या मैफिलीत सहभागी होत असत. गडकऱ्यांच्या 'पुण्यप्रभाव' नाटकातील ४१ पदांपैकी अनेक चाली या हिराबाईंनी गडकऱ्यांना दिल्या. 'नाचत ना गगनात नाथा' ही त्यापैकीच एक चाल. तात्यासाहेब केळकरही हिराबाईंच्या गुणांनी प्रभावीत झाले व त्यांनी हिराबाईंवर एक कविता रचून ती त्यांना अर्पण केली होती. तात्यासाहेब केळकरांच्या 'वीरविडंबन' या गाजलेल्या नाटकाचे हिराबाईंच्या पहिल्या सं. 'जयद्रथविडंबन' या नाटकाशी असलेले नामसादृश्य मुद्दाम लक्षात घेण्यासारखे आहे. तसेच ही दोनही नाटके महाभारताच्या कथाभागावर आधारित आहेत, हा केवळ योगायोग म्हणता यावयाचा नाही.

जोगळेकरांच्या मृत्यूनंतर सैरभैर झालेल्या व मद्याच्या आहारी गेलेल्या हिराबाईंना तात्यासाहेब कोल्हटकर काही दिवस खामगावलाही घेऊन गेले व स्वतःच्या घराजवळ त्यांना बिऱ्हाड करून दिले. या काळात हिराबाई व तात्यासाहेब खूपच जवळ आले होते. या प्रेमसंबंधाची जाहीर कबुली नंतर तात्यासाहेबांनी आपल्या आत्मवृत्तात दिली आहे.

वयाच्या १८ व्या वर्षीच हिराबाईंनी 'सं. जयद्रथविडंबन' हे नाटक लिहिले होते. त्यातील पदांची विपुल संख्या पाहता त्यावर देवलांची छाया पडलेली जाणवते. हे नाटक रंगभूमीवर आले का नाही याबद्दल तपशील आढळत नाही. त्यानंतर हिराबाईंनी 'सं. दामिनी' हे नाटक १९१२ साली लिहिले. ते नाटक त्यांना तात्यासाहेबांना अर्पण करावयाचे होते. पण तात्यासाहेबांनी तर आपले व हिराबाईंचे संबंध गुरु-शिष्येचे असल्याचे वारंवार सांगितले होते. त्यामुळे नाट्यलेखनात हिराबाईंना मदत करूनही तात्यासाहेबांनी हिराबाईंची विनंती अव्हेरली. आपली दुष्कीर्ती होईल व टीकाकारांना टीका करण्याची एक संधी मिळेल, या भीतीने तात्यासाहेब घाबरले. हा घाव मात्र हिराबाईंच्या जिव्हारी बसला. त्यांच्या मनात

तात्यासाहेबांबद्दल अविश्वास व दुरावा निर्माण झाला.

नंतर हे ' सं. दामिनी' नाटक किर्लोस्कर नाटक मंडळीच्या रंगभूमीवर आणण्याचे ठरत होते. परंतु 'नायकिणीचे नाटक' म्हणून अनेकांनी त्या कल्पनेला विरोध केला. शेवटी केशवराव भोसल्यांनी हे नाटक आपल्या ललितकलादर्श या नाटक मंडळीच्या रंगभूमीवर १९१४ साली आणले. या नाटकात ६२ पदे आहेत व त्यांना हिराबाईंनी उत्कृष्ट चाली दिल्या.

कोल्हटकर व हिराबाईमधील बेबनाव 'सहचारिणी' नाटकाच्या लेखनाच्या वेळी अधिकच वाढला. तात्यासाहेबांनी हे नाटक हिराबाईंना वाचायलाही दिले नाही. जीवनातील या निराश घटनांनी हिराबाई उदास झाल्या. हिराबाईंनी अनेक नाटककारांना, कलावंतांना, कवींना त्यांच्या कार्यात मदत केली. पण हिराबाईना कोणीच मानाचे स्थान दिले नाही. जोगळेकर-कोल्हटकरांबरोबर त्यांचे प्रेमसंबंध जुळले; पण त्या दोघांनीही त्यांना पत्नीपदाचा मान दिला नाही. 'कलावंतीण' या शिक्क्याने हा हिरा मातीमोल झाला. पुरुषांएवढीच बुद्धिमत्ता व गुण असूनही केवळ कलावंतीणीच्या जन्माला आल्यामुळे हिराबाईचे चीज झाले नाही. अशा या निराशापर्वात त्यांना खरी साथ दिली त्या दोन बालमैत्रिणींनी अंजनीबाई मालपेकर व सुरंगा मुळगावरकर यांनी.

याचवेळी हिराबाईंच्या सहवासात आले पालशेतचे रसिक व साहित्यप्रेमी गृहस्थ कृष्णाजी नारायण नेने. काही काळाने नेन्यांनी हिराबाईंजवळ आपला स्नेहभाव व्यक्त केला. दोन्ही बालमैत्रिणींनी हिराबाईंना धीर दिला व योग्य सल्ला दिला. त्याआधारे निर्णय घेऊन हिराबाई नेन्यांबरोबर पालशेतला गेल्या. नेन्यांनी त्यांना उघडपणे सहचरी म्हणून नेले. हिराबाईंचा अखेरचा काळ पालशेतला गेला. पण त्या साहित्य-संगीत यापासून पूर्णपणे अलिप्त झाल्या. नेन्यांच्या पत्नी राधाबाई यांना त्यांनी बहीण मानले. त्या सवतीची मुले स्वतःची मानली. साहित्य-नाट्य-संगीताची दुनिया त्या पूर्णपणे विसरल्या. दुनिया तर त्यांना केव्हाच विसरली होती. पालशेतलाच त्यांनी १९५१ मध्ये अंतिम श्वास घेतला. त्यांच्या मृत्यूची बातमीसुद्धा कोणत्याही वृत्तपत्रात आली नाही.

पालशेतमधल्या नेन्यांच्या घरातील ओसरीवर मात्र कृष्णजी नेने व हिराबाईंची दोन पोट्रेटस् आजही त्यांची स्मृती जागवत आहेत. नाही म्हणायला हिराबाईंच्या मृत्यूनंतर सुमारे तीन दशकांनंतर सुप्रसिद्ध नाटककार वसंत कानेटकर यांनी हिराबाईंच्या जीवनावर आधारित 'कांचनमृग' या नाटकाची रचना केली. नाट्यक्षेत्राने हिराबाईंच्या गुणांना व कर्तृत्वाला दिलेली ही एकमेव पावती, वाहिलेली ही एकमेव आदरांजली.

रानी लिंबास आला बहार गं ...

हिरव्या साडीस पिवळी किनार गं
रानी लिंबास आला बहार गं
बाळवयातल्या गौळणी यमुनेच्या जणू अंगणी
बाळकृष्णाशी करिती विहार गं ॥१॥
वाळवंटी घुमे पांवरी रानवारा तसा सूर धरी
डुलल्या गौळणी हलले शिवार गं ॥२॥
नाच झाला गं सुरू किती आनंद डोळा भरू
बळीराजाचं देणं उदार गं, रानी लिंबास आला बहार गं ॥३॥

आशा भोसले, ✻ ग. दि. माडगूळकर,
'जशास तसे' ✻ सं. सुधीर फडके

पंचावन्न वर्षांपूर्वीचं, आशाबाईंच्या विशीतलं आणि म्हणूनच चिरतरुण वाटणारं गीत खास ग्रामीण पार्श्वभूमीचं, कृषिकन्येचं. पण सुंदर, निर्मळ, सुरेल शब्द-स्वरांचं आहे. उत्कट निसर्गचित्र यात उमटलेलं आहे. हिरव्या धरतीची, पिवळ्या धान्याची रंगसंगती साडी लेवून आलेली आहे.

प्रभात चित्रांच्या सुकन्या

१९३२ सालच्या 'अयोध्येचा राजा' ह्या प्रभातच्या पहिल्या मराठी बोलपटातलं 'राधे इतुके कशाला' हे नायिका दुर्गा खोटे यांनी गायलेलं गीत, शांता हुबळीकर यांनी 'माणूस' मध्ये गायलेलं 'आता कशाला उद्याची बात' हे गीत, 'भारती सृष्टीचे सौंदर्य खेळे' हे वासंतीचं गीत, शांता आपटे यांची 'अमृतमंथन' मधली 'अमृत प्रकट झाले' ही भैरवी, जयश्रीनं गायलेलं 'शेजारी'तलं 'लखलखचंदेरी'... ह्यांच्या आठवणी धूसर झाल्या आहेत तरी हरवून गेलेल्या नाहीत...

प्रभातकारांच्या घराण्यातल्या अरुणाताईंनी लिहिलेल्या ह्या अभ्यासपूर्ण लेखात प्रभातच्या सुकन्यांच्या आठवणी जाग्या होतील..

सौ. अरुणा दामले

अर्देसर इराणी दिग्दर्शित इंपिरिअल कंपनीच्या 'आलमआरा' या बोलपटाने भारतात १९३१ साली बोलपटयुगारंभ झाला. १ जून १९२९ साली कोल्हापूरमध्ये प्रभात फिल्म कंपनीची मुहूर्तमेढ उभारली. आद्य संस्थापक विष्णुपंत दामले यांच्या पत्नी पार्वतीबाई दामले यांनी मंगलकलश ठेवला. तोच शुभदिन सर्वार्थाने प्रभात फिल्म कंपनीचा नियतीने ठरला ! विष्णुपंत दामले यांचे सहकारी एस्. फत्तेलाल, केशवराव धायबर व्ही. शांताराम हे एकत्र आले. दामले यांचे स्नेही सीतारामबापू कुलकर्णी हे एक रसिक गुणग्राहक होते. त्यांचा दामल्यांच्यावर विश्वास होता. त्यांनी त्यांच्या चित्रपटनिर्मितीसाठी एकरकमी भांडवल दिले. त्यामुळे त्या पाचजणांच्या मतैक्य व सहकार्यातून त्यांच्या स्वत:च्या मालकीची चित्रपटनिर्मिती संस्था उभी राहिली. हीच जागतिक पातळीवर नाव व यशकीर्तिशाली प्रभात फिल्म कंपनी होय. मूकपटकाळात प्रभातने अवघ्या तीन वर्षांत सहा मूकपट रजतपटावर आणले. गोपालकृष्ण-(पौराणिक), खुनी खंजीर, राणीसाहब-बजरबट्टू (काल्पनिक), चंद्रसेना (पौराणिक), उदयकाल (ऐतिहासिक) व जुलूम (काल्पनिक) असे हे वैविध्यपूर्ण चित्रपट होते. त्यांतील चमत्कृती, भव्यदिव्य राजप्रासाद व चंद्रसेनामधील पाताळनगरीतील कल्पक अलंकारादी नेपथ्यामुळे हे लोकप्रिय झाले. त्या मूकपटांतूनही प्रेक्षकांशी प्रभातचित्रांनी संवाद साधला. १९३१ पासून तर ध्वनीची जोड चित्रपटांना लाभली आणि प्रभातच्या 'बोल'पटाची नांदी, प्रभातच्या बोलत्या गात्या चित्रपटाच्या बोधचिन्हातील तुतारीने झाली. चित्रपटगृहातील प्रारंभीच्या तुतारीपासून प्रेक्षागारातील तयार होणाऱ्या माहोलामुळे तेव्हाच्याप्रमाणे आजचा प्रेक्षकवर्गही तितकाच भारून जातो ! प्रभातच्या पहिल्या बोलपटातील 'अयोध्येचा राजा'तील पडद्यावरील राजा हरिश्चंद्र-गोविंदराव टेंबे व राणी तारामती - दुर्गाबाई खोटे ही पात्रे गातांना ऐकून लोक निहायत खूष झाले व होतात. दुर्गाबाईंनी म्हटलेले 'बाळा का झोप येईना' हे गीत लोकप्रिय झाले. त्या चित्रपटात राणीच्या आवाजातील सर्वच चित्रगीते 'आनंद देई आले सुमनलीला', 'बाळा का झोप येईना,' धन्य धरती वितरे' ही गोड चालीतली आहेत. 'बाळा का झोप येईना' या अंगाईगीताने रूपेरी पडद्यावरील लोरी रूढ झाले. १९५१ मधील 'अलबेला' या भगवानदादांच्या हिंदी चित्रपटातील लोरी-'धीरेसे आजारे अखियनमें निंदीया' ची प्रसिद्धी 'बाळा का झोप येईना'ला त्या काळात लाभली होती. पहिल्या दशकातील चित्रगीतांचे संगीत प्रामुख्याने हिंदुस्थानी रागसंगीतावर आधारित होते. दोन ओळींची अस्थाई व अंतरा म्हणून बोलताना व एक-दोन ताना घेऊन दोन-अडीच मिनिटात गीताचा समारोप करीत असत. मराठी संगीत रंगभूमीवरील गायक-वादक, संगीत व गीतकार बोलपटसृष्टीत आले. त्यामुळे चित्रगीतगान हे नाट्यपदाच्या शैलीतच ऐकू येते. फक्त आता पुरुषांच्या ऐवजी स्त्रियांच्या आवाजातील चित्रगीते नाट्यपदाप्रमाणे आळवून घोळवून न म्हणता दोन अडीच मिनिटांत गाणे गाण्याची पद्धत आली. हे दोन ठळक भेद झाले. एकेका चित्रपटात दहा-बारा गाण्यांहून जास्त पदे असत. कोल्हापूरमध्ये झालेल्या प्रभातनिर्मित चित्रपटांतील पाचही बोलपटांचे संगीत गोविंदराव टेंबे यांचे आहे. पटकथा-संवाद-गीतकार-(अयोध्येचा राजा व माया मच्छिंद्र) या बोलपटाचे नायक-गायक अभिनेते टेंबे यांचे आतापर्यंत मराठी संगीत रंगभूमीवर नाव होते. प्रभातपासून त्यांची चित्रपट कारकीर्द सुरू झाली 'अग्निकंकण'च्या नायिका मिस् लीला चंद्रगिरी होत्या. त्यांनी प्राथमिक शास्त्रीय संगीताचे धडे गिरवले होते. त्यामुळे त्यांची गायकी बाळबोध वाटली तरी त्यांच्या आवाजाची तयारी दिसते. त्या काळात संगीतकाराला गाण्याचा पूर्वानुभव असलेल्या कलावती निवडून चित्रगीतगान बसवून घ्यावे लागायचे. मराठीबरोबर प्रभातने हिंदी भाषिक चित्रपट चित्रित केले. हिंदी गीतगानशैली हिंदीतील चित्रगीतांतून व शेरोशायरीतून दिसते. तसेच नाटकाच्या तालमीप्रमाणे चित्रगीतगान साभिनय सादर करण्यासाठी तालमी रोजच्यारोज घेण्याची पद्धत होती.

गीतमुद्रण व चित्रण निर्दोष करण्यासाठी सज्जड तालमी होत असत. त्यामुळे चित्रीकरण कमी वेळात व फिल्मचा अपव्यय न होता

होत असे.- 'सिंहगड' हा चित्रपट मराठीत केला होता. अपवाद म्हणजे 'सैरंध्री' या पौराणिक बोलपटाची गाणी व संवाद भालजी पेंढारकरांनी लिहिली आहेत. 'सैरंध्री' हा प्रभातचा पहिला रंगीत बोलपट तसाच भारतीय पहिला रंगीत बोलपट आहे. त्यातील चित्रपटातील रंगसंगती म्हणावी तशी जमली नाही. पण चित्रगीतांची रंगत मस्तच जमली आहे. लीलाबाईंच्या आवाजातील 'अग्निकंकण'मधील 'राधे इतुका कशाला' व सैरंध्रातील 'अहा धावला हे समारोपाचे चित्रगीत अतिशय छान झाले आहे. 'मायामच्छिंद्र'तील दुर्गाबाईंची चित्रगीते प्रेक्षणीय आहेत. विशेषत: त्या 'चंद्रिका भुवनेश्वरी जगती पुरुष' हे गीत रंगभूमीवरील त्वेषाने गाणाऱ्या पात्राप्रमाणे गाताना दिसतात आणि त्यांच्या मागे सुंद्री नावाची चित्तीण येरझारा घालताना दिसते. ते पडद्यावर पाहताना रोमांचकारी वाटते. या चित्रगीतांच्या योजना संगीत नाटकात नाट्यपदाच्या जागा प्रसंगनिष्ठ करीत, त्याचप्रमाणे चित्रपटातील पटकथेत प्रसंगोचित पद्यरचना केलेल्या आहेत. तत्कालीन पद्धतीप्रमाणे काहीशी संस्कृतप्रचुर शब्दरचना आहे. चालीत गोडवा मात्र आहे, आणि रागाधिष्ठित स्वरांकन असलेली ही चित्रगीते संगीतप्रेमींच्या ओठांवर घोळणारी. हे चित्र पालटले १९३४ नंतर. त्यापूर्वी प्रभात निर्मित हिंदी-मराठी चित्रपटांतील संगीत गोविंदराव टेंबे यांचे होते. १९३४ साली प्रभातचित्रसंस्थेचे पुण्यात स्थलांतर झाले. कोल्हापूरमधील राजर्षी शाहूमहाराजांच्या छत्रछायेतून व्यावसायिक विकासाच्या दृष्टीने प्रभातकारांनी हे पाऊल उचलले. पुण्यात आल्यापासून प्रभातने वाढत्या उत्साहात प्रगतिपथावर वाटचाल केली. कधीच मागे पाहिले नाही. सातत्याने नवनवीन प्रयोगशीलतेतून व सर्जकशीलतेतून प्रभातने उत्तुंग यश मिळविले. प्रभातच्या पहिल्या बोलपटापासून संगीतकार गोविंदराव टेंबे होते. त्यांनी चित्रपटात सर्वप्रथम पार्श्वसंगीताचा प्रयोग केला. प्रभातच्या तुतारीला चलचित्रणाला ध्वनीची जोड मिळाली. भारतीय जनजीवनाशी संगीत हे प्राचीन काळापासून निगडित आहे, त्यामुळे चित्रपटात संगीताचा सहजच प्रवेश झाला. संगीत हे चित्रपटाचे अविभाज्य अंग बनले. महाराष्ट्रात प्रथम चित्रपट निर्मितीची पायाभरणी झाली आहे. प्रारंभापासून लोकांची या निर्मात्यांनी संगीताची अभिरुची विचारात घेतली आणि दर्जेदार संगीताची योजना चित्रपटात केली. हिंदुस्थानी रागसंगीताचे जाणकार व प्रयोगशील दिग्गजांनी बोलपट सृष्टी गाजवली.

मानसशास्त्रीय सिद्धातांनुसार दृक चित्रमालांना श्राव्याची जोड दिली तर कथेची परिणामकारकता वाढते, रंजकता येते आणि ते रंगमंचीय कलामाध्यम सर्वाधिक प्रभावी ठरते. 'पडद्यापुढील' नाट्यकला संगीतामुळे लोकप्रिय झाली. तोच प्रयोग 'पडद्यावरील' चित्रमालांच्या यशाचे गमक ठरला. गायक अभिनेते व अभिनेत्रींची प्रामुख्याने निवड होत असे. प्रभातचित्रसंस्थेने 'बोल'पटांचा इतिहास चिरंजीव केला. प्रभातचित्रसंस्थेने निर्माण केलेल्या बोलपटांनी सर्वांगपरिपूर्ण चित्रपटांचा मानदंड प्रस्थापित केला आहे. चित्रपटासाठी केलेल्या कथेच्या विषयाच्या निवडीपासून पडद्यावर झळकलेल्या बोलपटांचा हा आदर्श वस्तुपाठ ठरावा. समकालीन चित्रपट संस्थांच्या बोधचिन्हांच्या तुलनेत प्रभातच्या बोधचिन्हातील तुतारीधारी सौंदर्यवतीचा आकृतिबंध आकर्षक आहे. आणि ध्वनीची जोड मिळाल्यावर तर त्या प्रभातच्या तुतारीला अजरामर स्वर लाभला.

१९३१ साली अर्देसर इराणीकृत 'आलमआरा' या हिंदी चित्रपटाने भारतीय बोलपटसृष्टीचा प्रारंभ झाला. १९३२ पासून प्रभातचित्रसंस्थेने मराठी व हिंदी भाषिक चित्रपट निर्मितीचा पाया घातला. त्यांच्यावर संगीताच्या भरभक्कम सिमेंटच्या गिलाव्याने चिरेबंदी इमला उभारला !

चित्रपटाचा दिग्दर्शक, संगीतकार, गीतकार, पटकथा-संवाद लेखक व कलाकार यांच्या संघशक्तीच्या सामर्थ्यावर भारत व भारताबाहेर चौफेर यशाची ध्वजा मिरवणारा वारू ज्यांनी चौखूर मिरवला, त्यांच्या यशाची ही गाथा आजच्या उदयोन्मुख चित्रपटकर्त्यांना प्रेरक व उद्बोधक होईल हा मला विश्वास आहे. मेहनत, जिद्द व चिकाटी या कलाकारांच्या अंतर्यामी होती. गीतचित्रणापूर्वी गीतमुद्रण तंत्र आले नव्हते. तेव्हा दोन्ही भाषेतील साभिनय गीतगान करावे लागत असे. स्वरांची ओळख नसलेल्या कलाकारांकडून तालबद्ध गाण्याची तालीम संगीतकारांना करून नेटके गाऊन घ्यावे लागे आणि दिग्दर्शकांना या सर्वांची मने सांभाळून अपेक्षित प्रसंगाचे चित्रीकरण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील व प्रसन्नपणे सेटवर वावरावे लागे. त्यासाठी त्यांनी उत्साही रहाणे हा मूलमंत्र होता. म्हणूनच त्यांच्या पाठीशी सदासर्वकाळ ऋद्धीसिद्धी होत्या असे म्हणावेसे वाटते !

अमृतमहोत्सवी प्रभातच्या गायक अभिनेत्री: 'अयोध्येचा राजा' हा प्रभातचा पहिला बोलपट. राजा हरिश्चंद्राच्या भूमिकेतील गोविंदराव टेंबे यांनी दिलेल्या चालीवरील त्यांनीच शब्दबद्ध केलेली त्यांची सर्व गाणी उत्तम झाली आहेत. पण त्यांचे गाणे ऐकताना मराठी नाट्यपदांची आठवण होते. राणीच्या भूमिकेतील दुर्गा खोटे यांच्या आवाजातील गाणी अतिशय बाळबोध वळणाची आहेत. पण ज्या त्या प्रसंगाला उठाव देणारी आहेत. उदा. 'आनंद देई अलि सुमनलीला ' हे राणीची प्रसन्न मन:स्थिती दर्शवते, तर 'बाळा का झोप येईना।' हे राजपुत्राला ती झोपवताना म्हणते ती गीतयोजना परिणामकारक वाटते ती त्या प्रसंगात. 'अग्निकंकण' या काल्पनिक कथेची नायिका लीलाबाई चंद्रगिरी या आहेत. त्यांना लहानपणी रागसंगीताची तालीम मिळाली होती. 'राधे इतुका कशाला' हे चित्रगीत त्यांनी फारच गोड चालीवर म्हटले

आहे. त्यांची चित्रपटगीते 'सिंहगड' व 'सैरंध्री' मधील 'अहा धांवला' लोकप्रिय झाले होते.

'मायामच्छिंद्र'च्या नायक-नायिकेची जोडी - गोविंदराव टेंबे व दुर्गा खोटे ही गाजली. त्यात पुरुषप्रधान संस्कृतीचा द्वेष करणाऱ्या राणी किलोत्तमेच्या भूमिकेत दुर्गा खोटे यांनी गाण्यातूनही त्वेष व्यक्त केला आहे. 'चंडिका भुवनेश्वरी'। व 'जगती पुरुषासमान जाती'। या गीतांच्या प्रसंगी राणीच्या मागे सुंद्री नावाची चित्तीण येरझारा घालताना दिसते. राणी त्वेषाने ताना-पलाटे म्हणत असते आणि तिच्याजवळ पाळीव कुत्र्याप्रमाणे चित्तीण वावरताना दिसते. हे दृश्य पडद्यावर पाहताना फारच रोमांचकारी दिसते. त्या राणीचे सिंहमुखी सिंहासन ती जवळ येताच उघडते अशासारख्या चमत्कृती व नेत्रदीपक कलात्मक नेपथ्यावरील अलंकारवस्त्रभूषणांनी सजलेले राजा-राणीचे दर्शन फारच मनोहारी आहे. समूहस्वरातील वसंतोत्सवाचे नृत्यगीत-'टिपरी खेळूया' वर गोफ विणला जातो. स्त्री-पुरुषांच्या अभिनयाने या उत्साहाची रंगत वाढते. कोल्हापूरमध्ये झालेल्या पाचही चित्रपटांचे गीतकार-संगीतकार गोविंदराव टेंबे हे होते. फक्त सैरंध्री या चित्रपटाची पद्यं भालजी पेंढारकर लिखित होती. १९३३ साली प्रभातचे पुण्यात स्थलांतर झाले. 'अमृतमंथन' ह्या द्विभाषिक बोलपटाची नायिका शांता आपटे यांची चित्रपट कारकीर्द खऱ्या अर्थाने सुरू झाली. के. वा. भोळे यांचे संगीत व कवी शांताराम आठवले यांच्या शब्दांना स्वर शांता आपटे यांचा मिळाला व त्रिवेणीसंगम जुळला. दिवेलागणीच्या वेळी ही नायिका समईच्या वाती लावत जाते ती 'किती सुखदा येत निशा' हे गीत गुणगुणत. 'हाय दैवा काय' हे शोकगीत व 'अमृत प्रगट झाले' ही भैरवी विशेष गाजली. अमृतमंथनचे नायक मा. सुरेशबाबू यांची सर्वच गाणी अप्रतिम झाली. १९३५ साली व्हेनिसमधील जागतिक चित्रपट महोत्सवात प्रदर्शित झालेल्या 'अमृतमंथन'मुळे भारत हा चित्रपटनिर्मितीत स्पर्धक म्हणून ठरला. अमृतमंथनमधील पार्श्वसंगीताची योजना हे विशेष होते. उसना आवाज दिला. उंचपट्टीच्या क्लॅरिओनेटची स्वराकृती तुतारीतून वाजला. प्रभातकालीन देसकार रागातील ह्या स्वरयोजनेने प्रभातीवृत्तीची सदासतेजता सर्वकाल सर्वदूर पोहोचवली आहे. त्याला ७५ वर्षे होतील. पुण्याच्या अद्ययावत सोयींनी सुसज्ज झालेल्या प्रभातच्या एक नंबरच्या स्टुडिओत 'अमृतमंथन' हा पहिला द्विभाषिक (हिंदी-मराठी) बोलपट झाला. पुण्यात आल्यापासून प्रभातमध्ये संगीतकार के. वा. भोळे व गीतकार कवी शांताराम आठवले यांचा प्रवेश झाला. या अपूर्व जोडीला संगीतकलानिधी मा. कृष्णराव यांची अजोड साथ लाभली. चित्रपट व संगीत ही दोन स्वतंत्र कलामाध्यमे एका मंचावर आली. चित्रपटाचे संगीत हे अविभाज्य अंग झाले. चित्रपटाला संगीताचे कोंदण लाभले आणि चित्रपटांना रत्नाची झळाळी आली. के. वा. भोळे व मा. कृष्णराव मराठी संगीत रंगभूमीकडून चित्रपटसृष्टीत आले. रंगभूमीवर पार्श्वसंगीताचा सर्वप्रथम प्रयोग के. वा. भोळे यांनी नाट्यमन्वतरनिर्मित 'आंधळ्यांची शाळा' या नाटकात केला होता. त्यामुळे नाटकातील प्रसंगाची परिणामकारकता लक्षणीय झाली. प्रभातच्या व्ही. शांताराम या दिग्दर्शकांनी ती स्वत: पाहिली होती. पाश्चात्त्यांनी पार्श्वसंगीतासाठीच केवळ बोलपटात सांगीतिक प्रयोग केला. भारतीयांच्या जीवनात संगीताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाराष्ट्रात संगीत रंगभूमीने तर जनमनात संगीताची अभिरुची निर्माण केली होती. जनमानसातील संगीताचे प्रेम चित्रपटनिर्मात्यांनी विचारात घेतले होते म्हणूनच चित्रपटात चित्रगीतांची योजना केली गेली. पार्श्वसंगीताच्या निमित्ताने चित्रपटात जो संगीताचा प्रवेश झाला तो साधन म्हणून. याचे भान 'प्रभात'च्या चित्रपटदिग्दर्शक, संगीतकार व गीतकार यांनी ठेवूनच चित्रपटसंगीतात नवनवीन प्रयोग केले. त्यातून चित्रगीतांना सांस्कृतिक व सांगीतिक स्थान लाभले. चित्रपट संगीताची भरभक्कम पायांवर परंपरा प्रस्थापित झाली. नाट्यसंगीताहून वेगळी व स्वतंत्र चित्रपटसंगीताची गानशैली के. वा. भोळे यांनी निर्माण केली. रागसंगीतावर आधारित, ललित संगीताच्या सुमेळातून चित्रपटसंगीताचा स्वतंत्र प्रवाह रुढ झाला. 'अमृतमंथन'च्या नायिका शांता आपटे. त्यांचा सुरेल दाणेदार व शास्त्रीय संगीताच्या बाजातून आवाज तयार झालेला होता. त्यांना चित्रपटात गाण्याच्या दृष्टीने केशवरावांनी वळण लावले. 'किती सुखदा येत निशा' हे मराठी पद व 'रात आयी है रंग जमाने के लिये' हे हिंदी गीत गाऊन घेतले होते. हिंदी चित्रगीते 'वीर' महम्मद पुरी यांनी व मराठी पदे कवी शांताराम आठवले यांनी लिहिली आहेत. लोकांपर्यंत चित्रगीते पोहोचावीत म्हणून स्वरांकनासह छापण्याची पद्धत काही वेळा पहायला मिळते. 'रात आयी'। हे हिंदीतील गाणे प्रभातच्या त्रैमासिक पत्रिकेत छापले होते. 'अमृतमंथन' १९३५ साली व्हेनिस येथील जागतिक चित्रपट महोत्सवात प्रदर्शित झाला होता. तसेच त्यातील के. वा. भोळे यांच्या संगीताने चित्रपटातील प्रसंग व चित्रगीते संस्मरणीय ठरली होती. त्यासाठी गायक अभिनेत्री शांता आपटे यांनी मेहनत घेतली होती. ह्याची चित्रकथा काल्पनिक होती. राज्यातील कर्मठ राजगुरू यज्ञातील पशुबळी व मनुष्यबळीचा पुरस्कर्ता असतो. त्या दुष्ट रुढीविरुद्ध प्रजा उठाव करते, हा बुद्धधर्माच्या प्रभावामुळे बदल घडतो, अशी मध्यवर्ती कल्पना होती. ह्याच शांताबाईंच्या निकोप आवाजातील, भोळे यांच्या संगीताने नटलेली 'कुंकू', 'दुनिया न माने'तील चित्रगीते गाजली. हिंदी गाणी मुन्शी अजीज लिखित आहेत. 'रचिले प्रभूने', 'समझा क्या ये दुनियादाना' 'एक होता राजा', 'एक था

राजा'। ही शांता आपटे यांची गाणी लोकप्रिय झाली. त्या गाण्यांचे शब्द व चाली जमल्या तितकेच त्यांचे चित्रणही अप्रतिम झाले आहे. वासंतीची गाणी मधुमधुर वाटतात.

शांता आपटे यांची 'गोपालकृष्ण'मधील सर्व गाणी लोकांना अतिशय भावली. मा. कृष्णरावांनी दिलेल्या चाली व शांताराम आठवले यांची शब्दयोजना यामुळे हा संगीत ऑपेराप्रमाणे चित्रपट झाला आहे. पण कुठेही कंटाळवाणा झालेला नाही. 'भाग्यवती ही कपिला' या गाण्यातील शब्दस्वरनाद सुखवतात. 'अमरज्योती', व 'रजपुतरमणी' या हिंदी बोलपटांतील शांता आपटेंची चित्रगीते गाजली. 'अमरज्योती'मधील 'सुनो सुनो बनके प्राणी' या गीताच्या ४५ हजार ध्वनिमुद्रिकांच्या विक्रीने रेकॉर्डब्रेक केला आहे.

१९३८ मध्ये 'माझा मुलगा' व १९३९ सालातील 'माणूस'मधील नायिकेच्या भूमिकेत लोकप्रियता मिळवली ती शांता हुबळीकर यांनी. कविमनाची नायिका असते. तरुणीच्या प्रेमात पडलेल्या तरुण मनाची आंदोलने चारी भावगीतांतून प्रगट झाली आहेत. शांताराम आठवलेरचित या प्रेमगीतांत प्रेम हा शब्दच नाही. अशा या गीतांना भावमधुर चाली के. वा. भोळे यांनी दिल्या आहेत. त्यापैकी 'मज फिर फिरूनी छळिसी कां'। 'उसळत तेज भरे गगनात', 'गूज मन्मनीचे केले' व विरहगीत 'पाहू रे किती वाट' ही चित्रगीते आजही आठवतात. शांता हुबळीकरांनी त्या गीतांना भावपूर्ण आवाजात गाऊन न्याय दिला आहे.

'माणूस' या चित्रपटाची नायिका गायक कलावंतीण असते. ते काम करून चित्रपटसृष्टीत शांता हुबळीकर हे नाव रेखांकित झाले. 'कशाला उद्याची बात' 'दिवाळी दिवाळी आली' व 'जा मुशाफिर तू' या गाण्यांनी त्या चिरकाल आठवणीत राहिल्या आहेत. या चित्रपटातील गीतांकन अनंत काणेकर यांचे आहे. संगीत मा. कृष्णराव यांनी दिले आहे. संगीतकाराने ऐकवलेल्या चालीवर गीतांचे शब्दांकन करण्याची पद्धत प्रभातमध्ये होती. काणेकरांना ते काही केल्या जमत नव्हते. ह्याच काणेकरांनी पाच भाषांतील गीत करण्याची कल्पना सुचवली आणि पंचेंद्रियांनी सुखोपभोग भरभरून घ्यायचा तो आजच घ्या, या सूत्राभोवती हे गीत हिंदी, पंजाबी, गुजराथी, बंगाली व तमीळ भाषेत रचले. त्याला ज्या त्या भाषेच्या ढंगाने उच्चारण व चालीच्या वैशिष्ट्यासह स्वरबद्ध केले आणि कोठीवर गाणे ऐकायला येणाऱ्या अठरापगड जातीच्या शौकिनांना या कलावंतीणीच्या 'आता कशाला उद्याची बात' या पालुपदातील गाण्याने निहायत खूष केले.

शांता हुबळीकरांनी गायलेल्या या गाण्याचे वर्णन 'छप्पर उडवून देणारे गाणे झाले' अशा शब्दांत काणेकरांनी केले आहे. बुद्धिमत्ता, कल्पकता व प्रतिभा यातून घडणारा हा एक चमत्कार आहे, हे मानले पाहिजे. या गाण्याचे चित्रीकरण फक्त एका आठवड्यात झाले आहे, हे एकून तर विश्वासच बसत नाही !

१९४१ मध्ये 'संत सखू' झाला तेव्हा सखूसाठी हंसा वाडकर यांना विनोदिनी देसाई दीक्षित यांचा उसना आवाज दिला. आतापर्यंत प्रभातचित्रातील नायिकेला 'उसना आवाज' दिला गेला नव्हता.

गायक अभिनेत्री म्हणून तुळजी, मंजू व त्यापूर्वीची बालकलावती वासंती ह्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यापैकी उसना आवाज मंजू व तुळजीने दिला. वासंती यांची 'धर्मात्मा'मध्ये जाई, 'अमरज्योती' - 'रेखा', 'कुंकू' - 'आक्का' या मराठी व हिंदी बोलपटांतील चित्रगीते खूप लोकप्रिय आहेत.

'भारती सृष्टीचे' व 'भादव्यात येती गौरी गणपती' ही दोन्ही चित्रगीते पटकथेच्या ओघात आलेली व कथासूत्राचे वहन करणारी अशी आहेत. तसेच चार महिन्यांचा काळ उलटतो, त्यातून महाराष्ट्रातील चैत्र ते आश्विन महिन्यांच्या काळातील सांस्कृतिक दर्शन पडद्यावर घडते. या गीतात वासंतीचा पोशाख प्रत्येक अंतऱ्यात वेगळा दिसतो. गीतमुद्रण चित्रीकरणापूर्वी केल्याचा परिणाम चित्रगीताच्या चित्रीकरणातील वैविध्यातून पहायला मिळतो. शांता आपटे यांनी प्रारंभी म्हटलेल्या 'एक होता राजा' या गीतातील पडद्यावरील दर्शन 'दंग नर्तनी हर्षभरे' च्या तानेबरोबर होते. पहाणाऱ्यांच्या डोळ्यांचे व ऐकणाऱ्यांच्या कानांचे पारणे फिटते. 'शेजारी'ची नायिका जयश्री या प्रभातचित्रातील गायक अभिनेत्री म्हणून आवर्जून उल्लेखनीय आहेत. यापुढील काळात सर्रास सर्व नायिकांना उत्तमोत्तम आवाजातील 'उसना आवाज' दिला गेला. त्यादृष्टीने 'शेजारी'मधील जयश्री यांनी गायलेले 'राधिका चतुर बोले', 'हासत वसंत' युगलगीत व चंद्राला ओवाळतानाच्या ओव्या उत्तम काव्याचा व गायकीचा नमुना आहेत. संगीत मा. कृष्णराव व शब्दांकन कवी शांताराम आठवले यांचे आहे. या चित्रपटासाठी दिग्दर्शक व्ही. शांताराम यांनी आठवले ह्यांना 'चित्रमय'गीते लिहा असे सुचवले होते. त्या बर हुकूम ती गीते उतरली आहेत. जयश्री यांच्या गोड व आर्जवी गाण्याने तितकीच लडिवाळ भावात उतरली आहेत. नायिकेच्या मनोवस्थेप्रमाणे उद्यानात पाणथळ जागी बागडताना तिला निसर्गही साथसंगत करतो. अशाप्रकारे 'राधिका चतुर बोले' हे गीत म्हणून चित्रित केले आहे. हे पाहताना एक जाणवते, प्रभातचे संगीत हे कथेच्या वातावरणातून स्वाभाविकपणे आलेले आहे. तसेच संगीत विभागात भारतीय व पाश्चात्त्य वाद्ये होती, समृद्ध वाद्यवृंद होता. पण वेळ,

काळ व स्थळाचे अवधान ठेवूनच चित्रपटात गाणी घातली आहेत. नावीन्याच्या हव्यासापायी वाद्यवृंद योजला नाही. के वा. भोळे यांनी तर वाद्यांची निवड ज्या त्या वाद्याचे गुणधर्म जाणून संगीतात अंतर्भूत केली आहे. काही वेळा मुद्रित केलेल्या गीतांच्या ध्वनिमुद्रिका काढल्या आहेत. पण चित्रपटाचा ओघ गाण्याने खंडित होऊ नये म्हणून ती गाणी (चित्रित करूनही) चित्रपटात घातलेली नाहीत. 'कुंकू'तील 'प्रभो रायारे' हे शांता आपटे यांनी गायलेले गाणे आणि 'संत ज्ञानेश्वर'मधील छोटा ज्ञानेश्वर मा. यशवंत यांच्या आवाजातील 'जननी जन्मभूमी' हे, आळंदीकरांनी वाळीत टाकल्यानंतरच्या प्रसंगातील गाणे ही दोन्ही चित्रगीते का

काढली ते, चाली कशा सुचल्या व कोणत्या ध्वनिमुद्रित गाण्यावरून केल्या हे के. वा. भोळे यांनी लिहून ठेवले आहे. या सर्वाचा निष्कर्ष एकच आहे, प्रभात चित्रसंस्थेप्रमाणे प्रभातच्या चित्रपट संगीताचे घराणे कसे सिद्ध झाले हे अभ्यासकांपुढे उलगडते.

चित्रपटाच्या घट्ट, घोटीव, मुलायम वस्त्रातील उभ्या आडव्या धाग्यांनी विणलेल्या बोलपटाचे मऊशार मुलायम भरजरीसे पडद्यावरील दर्शन घडते. धावऱ्या लयीतील गाण्याने भावनिक खोली रहात नाही. तर त्या उलट संथ लयीतील गाण्याने कथासूत्राचे वहन न होता कंटाळवाणे होते. ही तारेवरची कसरत प्रभातच्या संगीतदिग्दर्शकांनी नेमकी साधली. म्हणूनच प्रभातच्या चित्रपटातील चित्रगीते ही चित्रपटातील कथेतील 'सिच्युएशन' होऊन गेली. हेच चित्रपट संगीताचे खरे यश आहे ! चित्रगीतांचे मर्म आहे.

पावनेर गं मायेला करू
वाट दंवानं भिजून गेली
उन्हं दारात सोन्याची झाली
माय भवानी पावनी आली
पावनेर गं मायेला करू
ओटी आईची मोत्यानं भरूं
माय अंबिका माय भवानी
रूप देखनी गुनाची खानी
संभू राजाची लाडकी रानी
माजी पायरी लागे उतरू
ओटी आईची मोत्यानं भरूं ।।धृ।।
सुखी नांदते संसारी बाई
न्हाई मागणं आणिक काई
काळी पोत ही जलमाची देई
तूंच सांबाळ आई लेकरूं
ओटी आईची मोत्यानं भरूं ।।१।।

गायिका : लता मंगेशकर ✻ गीत : शांता शेळके
संगीत : हृदयनाथ मंगेशकर ✻ चित्रपट : पवनाकाठचा धोंडी

गो. नी. दांडेकरांच्या लेखणीतून उतरलेल्या हृदयस्पर्शी कथेचं चित्ररूप, पं. हृदयनाथ मंगेशकर, लता मंगेशकर व शांता शेळके या त्रयींचं गीत संगीत असे सुरेल संदर्भ ह्या गीतात पाहता येतील.

गीताची भाषा मावळकन्येची आहे व त्यातली भावना मात्र कोणत्याही मराठमोळा स्त्रीची आहे.

हिंदी चित्रपटसृष्टीतल्या स्त्री संगीतदिग्दर्शिका

शशिकांत किणीकर

प्रत्येक कालखंडात स्त्रीचं पाऊल उमटलेलं दिसतं, तसंच चित्रपटसृष्टीतही घडलं. अभिनय, पार्श्वगायन, चित्रनिर्मिती, संकलन, कॅमेरा, दिग्दर्शन इत्यादी क्षेत्रांत स्त्रिया येत राहिल्या आहेत. पण गीतलेखन, संगीत दिग्दर्शन आणि वाद्यवृंदात वादन ह्या क्षेत्रात पुरुष कलावंतांचं वर्चस्व दिसतं. अपवादात्मक उदाहरणं आहेत; पण बोटांवर मोजता येतील इतकीच. संगीतकार महिला आघाडी ही जद्दनबाई, सरस्वतीदेवी, उषा खन्ना या व अशा काही नावांशिवाय सुनी सुनी आहे. लेखात ह्या कलावतींबद्दल वेध घेतलेला आहे.

चित्रपटांना आवाजाची जोड मिळाली, या घटनेला पाऊणशे वर्षे होऊन गेली. संगीताचे दालनही खऱ्या अर्थाने याचवेळी चित्रपटसृष्टीला प्राप्त झाले. गेल्या पाऊणशे वर्षांत रजतपटावर व रजतपटामागे असंख्य कलाकारांनी सहयोग दिला; पण पडद्यावर ज्या प्रमाणात स्त्री कलाकारांचे योगदान हिंदी चित्रपटसृष्टीला लाभले, त्याच्या तुलनेत पडद्यामागील विभागात स्त्री कलाकार खूपच कमी प्रमाणात दिसून आल्या. गेल्या पाऊणशे वर्षांच्या काळात हिंदी चित्रपटसृष्टीस तर अगदी हातावर मोजण्याएवढ्याच संगीत दिग्दर्शका लाभल्या.

भारतातील पहिली स्त्री संगीतदिग्दर्शिका जद्दनबाई, ती मुळातच होती कोठेवाली. गाणे आणि नृत्य करून ती प्रेक्षकांना रिझवत असे. १९३३ साली लाहोर येथे तयार झालेल्या 'राजा गोपीचंद' या चित्रपटात तिने सर्वप्रथम हिंदी चित्रपटामध्ये भूमिका केली व पाकिस्तानमधल्याच हैद्राबाद-सिंधमध्ये 'इन्सान या शैतान' या चित्रपटात काम केल्यावर ती मुंबईला सागर मूव्हीटोनच्या काही चित्रपटांत काम करण्यासाठी आली. मुंबईतल्या चित्रपटांत काम करत असताना तिला जे बरेवाईट अनुभव आले, त्यांच्या जोरावर तिने स्वतःच्या मालकीची चित्रसंस्था उभी करण्याचे ठरवले व संगीता फिल्म कंपनी सुरू करून १९३५ साली 'तलाश-ए-हक' हा चित्रपट सादर केला. निर्मिती, कथा, संवाद, गीते व प्रमुख भूमिका या प्रमुख विभागांबरोबरच जद्दनबाईने 'तलाश-ए-हक' या चित्रपटाला संगीतही दिले. आपल्या पहिल्याच चित्रपटाद्वारे जद्दनबाईने पहिली स्त्री निर्माती, कथा-संवाद-गीते यांची लेखिका व पहिली स्त्री संगीतदिग्दर्शिका हे सारे मान पटकावले.

'तलाश-ए-हक' हा चित्रपट चांगला चालला, त्यामुळे जद्दनने आणखी एक पाऊल

पुढे टाकले. पुढच्याच वर्षी तिने 'मादाम फॅशन' या चित्रपटाची निर्मिती करून 'तलाश-ए-हक' प्रमाणे इतर महत्त्वाचे विभाग सांभाळलेच; पण दिग्दर्शनाची सूत्रेही स्वतःकडे घेतली. त्यामुळे भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिली स्त्री दिग्दर्शिका होण्याचा मानही तिलाच मिळाला. संगीतदिग्दर्शकही तीच होती. अशीच गोष्ट १९३६ साली प्रकाशित झालेल्या 'हृदयमंथन' च्या बाबतीतही झाली. मग १९३७ साली तिने 'मोती का हार' हा चित्रपट सादर केला. पण त्यामध्ये स्वतः नायिकेची भूमिका न करता ती मेहताबला दिली. याचवर्षी 'जीवनस्वप्न' हा चित्रपट जद्दनबाईने सादर केला. त्याला 'जर्नीज् एण्ड' नावाचे इंग्लिश उपशीर्षक होते. फिल्म कंपनीचा हा शेवटचा चित्रपट.

जद्दनबाई ही स्वतः उत्तम गायिका होती. परंपरागत आलेल्या अनेक दुर्मिळ चिजा आणि रागरागिण्या तिच्या संग्रही होत्या. आपल्या घरी रोज रात्री अनेक लोकांना बोलावून ती संगीताच्या मैफिली करत असे. जद्दनने निर्माण केलेला चित्रसंसार आजमितीस काळाच्या ओघात नाहीसा झालाय, त्यामुळे तिने संगीत दिलेल्या चित्रपटांतले एकही गाणे आजमितीस उपलब्ध नसावे, निदान मलातरी खूप प्रयत्न करूनही ते ऐकायला मिळालेले नाही. जद्दन बाईने निर्माण केलेले पाचही चित्रपट आज उपलब्ध नाहीत. त्यामुळे हिंदी चित्रपटसृष्टीतल्या पहिल्या स्त्री संगीत दिग्दर्शिकेची कामगिरी कशी होती, ते जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे असले तरी दुरापास्त झालेले आहे.

हिंदी चित्रपटसृष्टीत आपले स्थान अढळ करून ठेवणारी दुसरी संगीत दिग्दर्शिका म्हणजे सरस्वती देवी. ती मूळ पारशी. खुर्शीद मिनोचर होमजी हे तिचे मूळ नाव. तीही जद्दनबाईप्रमाणेच १९३५ सालीच

चित्रपटसृष्टीत आली. पण जद्दनबाईचा पहिला चित्रपट 'तलाश-ए-हक' हा जुलै १९३५ मध्ये प्रकाशित झाला तेव्हा बॉंबे टॉकीजचे संस्थापक हिमांशू रॉय व त्यांचे साथीदार बॉंबे टॉकीजचे शेअर्स विक्रीला काढून भांडवल जमा करण्यामध्ये मग्न होते.

खुर्शीद मिनोचर होमजीला गाण्याचा वारसा तिच्या आईकडून आला होता. पुढे तिने पं. भातखंडे यांच्याकडे शास्त्रोक्त संगीताचे धडे गिरवले व लखनौ येथील मॅरीस कॉलेजमध्येही संगीताचे शिक्षण घेऊन ती गायनाचे जलसे करू लागली. योगायोगाने तिची व हिमांशू रॉय यांची गाठ पडली व त्यांनी तिला बॉंबे टॉकीजच्या चित्रपटांचे संगीतदिग्दर्शन करण्याची विनंती केली. तिने ती मान्यही केली.

मालाडमध्ये बॉंबे टॉकीजचा स्टुडिओ होता, तिथे खुर्शीद आपले काम करू लागली. एक पारशी मुलगी सिनेमा-व्यवसायात शिरू पाहते आहे, ही गोष्ट मुंबईतल्या पारशी लोकांना कळाली व त्यांनी भररस्त्यावर दंगल माजवून आकांततांडव करायला सुरुवात केली. ही गोष्ट हिमांशू रॉय यांना कळताच त्यांनी अगदी शांतपणे प्रक्षुब्ध जमावासमोर जाऊन त्यांना सांगितले की त्यांच्या कंपनीत पारशी मुलगी नाहीच. संगीताचे काम करणारी मुलगी चक्क हिंदू आहे. तिचे नाव सरस्वतीदेवी. पारशी मुलगी कंपनीत नाही, हे कळाल्यानंतर जमावाने काढता पाय घेतला; पण त्या दिवसापासून खुर्शीद मिनोचर होमजी हे नाव बाजूला पडले व सरस्वतीदेवी हेच नाव पुढे आले.

१९३५ च्या दिवाळीमध्ये बॉंबे टॉकीजचा पहिला चित्रपट पडद्यावर आला, त्याचे नाव होते 'जवानीकी हवा' सरस्वतीदेवीचा हा पहिला चित्रपट. त्या काळात पार्श्वगायनाचा शोध लागलेला नव्हता. त्यामुळे नजमल हुसेन, माणिकबेन, देविकाराणी वगैरे कलाकारांनीच या चित्रपटात गाणी स्वत:च्या आवाजात सादर केलेली होती.

आणि त्यानंतर सरस्वतीदेवीने आपल्या कौशल्याची कमाल करून दाखवायला सुरुवात केली. १९३५ ते १९४१ या सात वर्षांमध्ये तिने वीस चित्रपटांना संगीत दिले. आपल्या वाद्यवृंदात सतार, जलतरंग, सारंगी, क्लेरोनेट, वेगवेगळ्या आवाजातले ('पिच' मधले) तबले ही भारतीय वाद्ये तिने सर्वप्रथम आणली. त्या काळातले कलाकार देविका राणी, अशोक कुमार, लीला चिटणीस, स्नेहप्रभा प्रधान, मुमताज आणि सुरेश, अरुण कुमार, एस.एन. त्रिपाठी वगैरेंना तिने चित्रपटासाठी आवश्यक असे गाण्याचे शिक्षण दिले व त्यांच्या आवाजात अनेक गाणी ध्वनिमुद्रित केली. 'मैं बनका पंछी बनमें बनबन बोलू रे' (चित्रपट-अछूत कन्या/१९३६) हे अशोककुमार व देविकाराणी यांच्या आवाजातले द्वंद्वगीत खूपच गाजले. 'दुनिया कहती मुझको पागल' हे माणिकबेनच्या आवाजातले व 'सेवा के हम व्रतधारी' हे अशोककुमारच्या आवाजातले गीतही लोकप्रिय झाले. लीला चिटणीसच्या आवाजातले 'सूनी पडी रे सितार' (चित्रपट-कंगन/१९३९) या गाण्यालाही प्रेक्षकांची चांगलीच दाद मिळाली. १९४० साली आलेल्या 'बंधन' या चित्रपटातील 'चने जोर गरम बाबू मै लाया मजेदार,' हे अरुण कुमारचे, कवी प्रदीपने म्हटलेले 'पियू पियू बोल' आणि अरुणकुमारच्या आवाजातले 'रुक न सको तो जाओ' ही गाणी ही खूपच गाजली.

सरस्वतीदेवीच्या कारकिर्दीतील सर्वात गाजलेला चित्रपट म्हणजे 'झूला', तो १९४१ साली प्रकाशित झाला. त्यातली अनेक गाणी गाजली. 'ना जाने किधर आज मेरी नाँव चली रे' हे अशोककुमारने म्हटलेले व हा ''मैं तो दिल्लीसे दुल्हन लायारे' हे अरुणकुमार व रहमतबानो यांच्या आवाजातले द्वंद्वगीतही विशेष लक्षात राहिले.

सरस्वतीदेवीचे अभिजात शास्त्रोक्त गायन पद्धतीचे शिक्षण झालेले असल्याने तिची गाणी त्याच प्रकारची असायची, त्यामध्ये अनेक रागरागिण्यांचा उपयोग केला जात असे; पण दुर्दैवाने तिच्या संगीत रचना सादर करणारे कलाकार गायनाचे अंग नसल्याने फिके पडत व त्यामुळे सरस्वतीदेवीला अनेकवेळी तडजोड करणे भाग पडत असे.

बॉंबे टॉकीजमध्ये नंतरच्या काळात पन्नालाल घोष, रामचंद्र पाल, अनिल विश्वास यांच्यासारखे संगीत दिग्दर्शक येऊन दाखल झाले व सरस्वतीदेवीची पिछेहाट सुरू झाली. त्यामुळे १९४२ साली तिने बॉंबे टॉकीजमधील नोकरी सोडली व सोहराब मोदी यांच्या मिनर्व्हा मूव्हीटोनमध्ये 'भक्त रामदास', 'प्रार्थना', 'पृथ्वीवल्लभ' व 'डॉ. कुमार' या चार चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन केले. मिनर्व्हाचीच उपशाखा असलेल्या सेंट्रल स्टुडिओजच्या 'परख' (१९४४) याही चित्रपटाचे संगीत दिले. १९४५ ते १९५० या काळात 'आम्रपाली', 'खानदानी' 'उषाहरण' व 'कुंवारा पती' या चार चित्रपटांना संगीत दिले; पण या सर्व चित्रपटांमध्ये बॉंबे टॉकीजच्या संगीताचा प्रभाव नव्हता.

१९५० साली चित्रसंन्यास घेतल्यावर सरस्वतीदेवी खासगीरीत्या संगीताच्या शिकवण्या करू लागली. ती अविवाहित होती व आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताबेताची, त्यामुळे ती मुंबईत बसमधून प्रवास करत असे. वयाच्या अड्डसष्ठाव्यावर्षी बसमधून जात असताना ती पाय घसरून पडली आणि तिच्या कंबरेच्या हाडांचा चक्काचूर झाला. त्यानंतर काही दिवसांतच १० ऑगस्ट १९८० रोजी तिचा मृत्यू ओढवला आणि हिंदी चित्रपटसृष्टीतले एक पर्व काळाच्या पडद्याआड गेले.

अमीरबाई कर्नाटकीने आपल्या गोड आणि मादक आवाजात अनेक संगीत दिग्दर्शकांकडे गाणी म्हटली. पण अपवादात्मकरीत्या तिने 'शहनाज' या फक्त एकाच चित्रपटाला संगीत दिले, तो चित्रपट आला होता १९४८ साली.

त्यामध्ये तिने स्वत: काही गाणी म्हटलेली होती व पार्श्वगायक महंमद रफीच्या आवाजातही काही गाणी होती.

त्यानंतर नंबर लागला सूरसम्राज्ञी व भारतरत्न लता मंगेशकर यांचा. १९५० साली सिनेतारका मधुबालाने 'दिल्ली थिएटर्स' ही स्वत:ची चित्रसंस्था स्थापन केली व 'किसान की गायें' या पहिल्याच चित्रपटाची घोषणा केली. या चित्रपटाचे संगीत लता मंगेशकर यांच्याकडे असल्याच्या जाहिरातीही प्रसृत करण्यात आल्या; पण हा चित्रपट पुरा झालाच नाही. त्यानंतर १९५० च्या दशकात 'झुकी झुकी अखियाँ' या चित्रपटाची घोषणा झाली व त्याच्याही जाहिरातीत 'संगीतदिग्दर्शक लता मंगेशकर' असा उल्लेख होता; पण हाही चित्रपट झाला नाही. पण संगीतदिग्दर्शक लता मंगेशकर हे नाव पुढे आले ते १९५० साली प्रकाशित झालेल्या 'राम राम पाव्हणं' या मराठी चित्रपटाच्या वेळी. नंतरच्या काळात लता मंगेशकर यांनी 'आनंदघन' या टोपणनावाने मोजक्या मराठी चित्रपटांना संगीत दिले.

उदा. 'साधी माणसं,' 'मोहित्यांची मंजुळा', 'मराठा तेतुका मेळवावा' इ. पण हिंदी चित्रपटामध्ये त्यांचे नाव संगीत दिग्दर्शक या नात्याने कधीच झळकले नाही.

सुधा मल्होत्रा हे नाव स्त्री संगीत दिग्दर्शिकांच्या पंगतीत घ्यावे की नाही, हे ठरवणे कठीण आहे. तीही गायिका म्हणूनच प्रसिद्धीला आली. १९५९ साली प्रकाशित झालेल्या 'दीदी' या चित्रपटाचे संगीत एन. दत्ता करीत होते. पण आयत्यावेळी ते आजारी पडल्याने त्यांनी सुधा मल्होत्राला एका गाण्याची तर्ज बांधायला सांगितली. ते गाणे होते मुकेशबरोबर गायलेले युगलगीत 'तुम मुझे भूल भी जाओ' बस्स. एकच गाणं.

'दीदी'हा चित्रपट १९५९ साली पडद्यावर आला. पण याचवर्षी एका षोडशेने मात्र हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये खळबळ उडवून दिली. 'अ स्वीट गर्ल ऑफ सीक्सटीन' या शब्दांत तिची जाहिरात करण्यात आली होती. ती षोडशा म्हणजे उषा खन्ना. 'दिल देके देखो' या तिने संगीत दिलेल्या पहिल्याच चित्रपटापासून तिला यश मिळत गेले. त्याच्या पाठोपाठच 'हम हिंदुस्थानी', 'आओ प्यार करें', 'एक सपेरा एक लुटेरा', 'निशान' अशा अनेक चित्रपटांना ती एका पाठोपाठ एक संगीत देत गेली व यशस्वी स्त्री संगीत दिग्दर्शिका या नात्याने हिंदी चित्रपटसृष्टीत तिने एक स्वत:चे स्थान मिळवले. आपल्या कारकिर्दीत तिने जवळ जवळ सव्वाशे चित्रपटांना संगीत दिले.

उषा खन्नाने अनेक लोकप्रिय गाणी दिली. 'दिल देके देखो' (चित्रपट-दिल देके देखो), 'माँझी मेरे किस्मतके' (चित्रपट-हम हिंदुस्तानी), 'तेरी निगाहोंपे मर मर गये हम' (चित्रपट-शबनम), 'हम तुमसे जुदा होंगे' (चित्रपट-एक सपेरा एक लुटेरा), 'चाँद को क्या मालूम' (चित्रपट-लाल बंगला), 'हाये तबस्सुम मेरा' (चित्रपट-निशान), 'अपने लिये जिये तो क्या जिये' (चित्रपट-बादल), 'शायद मेरी शादीका खयाल' (चित्रपट-सौतन) अशी अनेक लोकप्रिय गाणी विविध गायकांकडून उषा खन्नाने गाऊन घेतली. २००३ साली प्रकाशित झालेल्या 'दिल परदेसी हो गया' या चित्रपटानंतर मात्र उषा खन्नाने चित्रसंन्यास घेतलेला दिसतो.

स्त्री संगीतदिग्दर्शिकांच्या मालिकेत बसणारे आणखी एक नाव म्हणजे मीना मंगेशकर, तिने 'कानून का शिकार' या एकमेव हिंदी चित्रपटाला संगीत देऊन हिंदी चित्रपट संगीत दिग्दर्शिकांच्या पंक्तीत स्थान मिळवले. पण ते फक्त नाव येण्यापुरतेच. तिच्या नावाचा फारसा गवगवा झाला नाही, की त्या चित्रपटातले एकही गाणे लक्षात राहण्याजोगे झाले नाही.

आजच्या काळात म्हणजे एकविसाव्या शतकात प्रत्येक बाबतीत स्त्रिया पुढाकार घेत असताना दिसतात. हिंदी चित्रपटसृष्टीतील स्त्री संगीतदिग्दर्शिकांची कामगिरी पाहिली तर नगण्यच म्हणावी लागेल. स्त्रियांनी या विभागात का पुढाकार घेऊ नये, ही एक विचार करण्याजोगी गोष्ट आहे.

त्या तिथे पलीकडे तिकडे

त्या तिथे पलीकडे तिकडे
माझिया प्रियेचे झोपडे
गवत उंच दाट दाट
वळत जाय पायवाट
वळणावर आंब्याचे
एक झाड वाकडे ॥१॥
कौलावर गारवेल
वाऱ्यावर हळू हलेल
गुलमोहर डोलता
स्वागत ते केवढे ॥२॥
तिथेच वृत्ती गुंगल्या
चांदराती रंगल्या
कल्पनेत स्वर्ग जो
तिथे मनास सापडे ॥३॥
संगीत - सुधीर फडके,
मालती पांडे
कवी - ग. दि. माडगूळकर
✻ चित्रपट - लाखाची गोष्ट

एखादी घटना गद्यात सांगावी तसे शब्द असले तरी एक सुंदर शब्दचित्र आजही उमटतं. चोपन्न वर्षांपूर्वीच्या तरुणांना लाखाच्या मोलाच्या ह्या गीतानं मंत्रमुग्ध केलेलं होतं. आजही हे गीत श्रवणीय वाटतं.

शब्द-सुरांच्या चांदणसड्यात

भावगीतानं मराठी मनाची तार झंकारते. भावगीतं आपल्याला प्रेम करायला शिकवतात. विरहात, दुःखातही भावगीतं सांत्वन घेऊन येतात. शब्दसुरांचं चांदणं ज्या भावगीतांनी शिंपलं, ती कधी काळाचा पडदा हलकेच दूर करतात. मग 'कुणीही पाय नका वाजवू', 'अंबरात नाजुकशी चंद्रकोर हासे', 'हसले मनी चांदणे', 'घनःशाम नयनी आला' किंवा 'चल चल चंद्रा पसर चांदणे...' ही गाणी फेर धरतात. मालती पांडे, मधुबाला चावला, कुमुदिनी पेडणेकर, माणिक वर्मा ह्या कलावतींना प्रत्यक्ष भेटलेल्या नंदा सुर्वे भावमधुर शैलीत स्मरणस्वर जागवतात.....

नंदा सुर्वे

'स्मरण-स्वर; स्मरणात गेलेल्या स्वरांना पुन्हा एकदा उजाळा द्यायला हवा म्हणून या विषयाला हात घालायचं ठरवलं होतं. हात म्हणजे चक्क लेखणीचा हात. ज्या स्वरांनी केलेली जादू रसिकांच्या मनात दीर्घ-प्रदीर्घकाळ रेंगाळत राहिली आहे, त्या स्वरवेलींना भेटून हा स्मरणरंजनाचा पट उघडावा, असं मनातून खोलपणे जाणवत होतं. कित्येक स्वरवेलींनी मागच्या काळात वसंत फुलवला होता, रसिकांवर अनभिषिक्त साम्राज्य केलं होतं. 'गाता गळा अन् शिंपता मळा' असं म्हणतात, त्याप्रमाणे स्वरांनी भारावून जाण्याचा तो काळ होता.

श्रुतिमधुर स्वरांचा पारिजात फुलतो आणि मनात सूरगंध दरवळायला लागतो. संगीत विश्वाचं ते बहारदार लेणंही असतं अन् देणंही असतं, वातावरणात आनंदरंग भरणारं. प्रसन्नतेचा ताटवा फुलवणारं. हा ताटवा फुलवणाऱ्या स्वरवेलींशी संवाद साधण्याची खूप उत्सुकता होती. हे काम करण्यात खूपच रस वाटत होता. याचं कारण म्हणजे माझ्यात लहानपणी निर्माण झालेली संगीताची आवड. लहानपणी आईबरोबर बाहेर गेलं की डेक्कन जिमखान्यावर गोखले चौकात 'महाराष्ट्र संगीत विद्यालयाच्या' जवळ मी हटून उभी रहायची. तिथे वाद्यवादनाचे वर्ग चालायचे. ते संगीत कानांवर पडले की मी मुग्ध व्हायची. पुढे जाऊन 'स्वरविहार' या रेकॉर्ड लायब्ररीजवळही मी हटून उभी रहायची. आत जाऊन गाणी ऐकायचा हट्ट करायची. आई मला ओढत न्यायची. मी खूप रडायची. तिने हे गाऱ्हाणं वडिलांच्या कानांवर घातलं. याचा परिणाम एवढाच झाला की, आमच्या घरी रेडिओ आला. त्या काळी घराघरात रेडिओ नसायचा. लेकीचा हट्ट पुरवल्याचं समाधान त्यांना मिळालं; पण आपल्या या संगीतप्रेमी मुलीला संगीत शिकवण्यासाठी क्लासमध्ये घालावं, हे काही त्यांना सुचलं नाही. त्यामुळे मी फक्त आस्वादक झाले. कलासंपन्न नाही होऊ शकले. मनाचा रिकामा राहिलेला कोपरा भरून काढण्यासाठी या स्वरवेलींना भेटायचं ठरवलं.

ज्यांनी आपलं आयुष्य संगीतमय केलं, त्या 'कलावेधीं'ना भेटण्यात, त्यांच्याशी वार्तालाप करण्यात, त्या काळातला मोहोर समजून घेण्यात खूप रस वाटत होता. सव्वीस गायिकांना मी भेटले. या सगळ्यांनीच मला खूप प्रेमाची, आस्थेची वागणूक दिली. त्यांच्यातली आतिथ्यशीलता मला भारावून टाकत असे. त्यांच्याजवळ जसा गाता गळा होता, तसं ओलंचिंब हृदयही होतं आणि जोडीला होते त्यांचे स्वागतभरले हात आणि डोळेही! त्यांच्या वर्तनात मला किंचितही दांभिकता, कृत्रिमता दिसली नाही. प्रसिद्धीचा किंवा प्रसिद्धीसाठीचा हव्यास, हपापलेपणा तर अणुमात्र नाही. केवळ माणुसकीचा अविरत खळाळता झरा त्यांच्या हृदयात असल्यानं त्यांनी माझं आगतम् स्वागतम् अगदी मनःपूर्वक केलं. कारण त्यांनी कलेची सेवा शुद्ध मनानं केली होती. म्हणजे ती खरंच सेवा होती. त्यामुळे 'धन' कमी पण 'मान' जास्त, या समीकरणावर त्या खुश असायच्या. 'मान' ही खूप आणि 'धन'ही खूप या आजच्या समीकरणाचा त्यांच्या वृत्तीला स्पर्शही झाला नव्हता, त्यामुळे त्यांनी फक्त कलेसाठी कला जोपासली. ती आपोआप फुलत गेली, जनमनात रुजत गेली.

आजही, 'या कातरवेळी पाहिजेस तू जवळी', 'जाणार आज मी माहेराला', 'शांत सागरी कशास उठविलीस वादळे', 'अंबरात नाजूकशी चंद्रकोर हासे', 'सायंकाळी निवांत वेळी रातराणी उमलली', 'सत्यात नाही आले; स्वप्नात येऊ का', 'निळा सावळा नाथ, तशी ही निळी सावळी रात', 'वाजती सखे पैंजण', 'आला घननीळ', 'आठवणी घटतात', 'घर दिव्यात मंद तरी बघ अजून जळते वात' अशी अनेक गाणी रसिकांना धुंद करतात. दीर्घ-प्रदीर्घ काळ रेंगाळत रहाण्याचं, पुनः पुन्हा त्यातलं श्रवणसुख घेण्याचं केवढं मोठं भाग्य घेऊन ही गाणी जन्माला आली.

आपल्याला काही वेळा एकांत क्षण हवे असतात आणि ते फक्त स्वतःचे आणि स्वतःसाठी हवे असतात. अशी स्वतःच्या क्षणांवरची मालकी जो तो आपापल्या मगदुराप्रमाणे गाजवत असतो; आणि हे मालकीचे क्षण जेव्हा संगीत श्रवणाचे कान घेऊन येतात, तेव्हा ते न विसरण्याचे क्षण असतात. असे आपले कित्येक क्षण या कलाकारांना आपण अर्पण केलेले असतात. कारण या गाण्यांनी आपल्याला मुग्ध केलेलं असतं, मंतरून टाकलेलं असतं. ही सारी भावकाव्यं आपल्या जगण्याचा एक कप्पा समृद्ध करून टाकतात, गंधाळून टाकतात.

स्वरगंगेचं वैभव लाभलेल्या ज्योत्स्ना भोळे या जशा गायिका म्हणून श्रेष्ठ, तशा माणूस

म्हणूनही श्रेष्ठ. आकाशातले तारे चेहेऱ्यावर उतरून आल्यासारखा चमचमता, प्रसन्न चेहेरा. चेहेऱ्यावर किंचित् किंचित् थकलेपणाच्या खुणा दिसायला लागलेल्या; पण त्याच चेहेऱ्यावर अभंग उत्साहाचा मोहोर फुललेला. तारुण्यातली प्रसन्नता जशीच्या तशी वाहत आल्यासारखा. 'आला खुशीत समींदर' असं म्हणताना स्वत:ही खुशीत येऊन श्रोत्यांसाठीही आनंदफुलांचा नजराणा घेऊन येणाऱ्या ज्योत्स्नाबाई कायमच रसिकांची कळी फुलवत गेल्या. त्यांनी स्वरांचा पारिजात फुलवला. स्वरांच्या पारिजाताला विशिष्ट हंगाम नसतो, त्यामुळे त्यात सदाफुलीसारखं सदाबहराचं चैतन्य सामावलेलं. वयाच्या पंचाहत्तरी नंतरसुद्धा मनात हिरवळ दाटलेली ही कलावेधी स्त्री.

आग्रा घराण्याच्या या गायिकेनं एकेकाळी रसिकांच्या खुशीच्या पावत्याच पावत्या मिळविल्या. भावगीत आणि नाट्यगीत या दोन्हीमध्ये त्यांनी अमाप लोकप्रियता मिळविली. संगीत नाटकांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी ही कलावती. आपल्या वयावर मिशकील भाष्य करत त्या एका संदर्भात म्हणाल्या होत्या, 'भोळे कसली, आता विसरभोळे झालीय.' सतत आपल्या चित्तवृत्ती फुलवत ठेवणाऱ्या ज्योत्स्नाबाई आपल्या जीवननिष्ठेबाबत सांगतात, ''आपण म्हातारे झालो म्हणून कोणी वाईट वाटून घेऊ नये. माझं आता सगळं संपलं, असं म्हणणं हा कमकुवतपणा आहे.'' माणुसप्रेमानं भारलेल्या ज्योत्स्नाबाई कायम स्वागतसिद्ध असायच्या. त्यांच्याकडे कधीही गेलं की स्वयंपाकघरात आवाज देऊन कॉफीची सूचना द्यायच्या आणि पोटभरून गप्पा मारायच्या. त्यांच्या घरी जाण्यात अवघडलेपण कधी यायचं नाही. या चिरप्रसन्न, स्वयंप्रकाशी, आनंदोत्सुक व्यक्तिमत्त्वाला भेटलं, की आपणही टवटवून जावं अशी जादू त्यांच्यात होती.

स्वरांच्या दुनियेत सतत भराऱ्या मारणाऱ्या या कलावतींना प्रसन्नतेचं, सात्त्विकतेचं वरदानच जणू लाभलं असावं.

संगीतसम्राट तानसेन एकदा म्हणाला होता, 'संगीत मेरी जागीर नही, लेकिन जिंदगी जरूर है!' धनसंपत्तीपेक्षा संगीताला अग्रस्थानी ठेवणाऱ्या तानसेनच्या संगीतातल्या ताकदी सर्वांनाच माहीत आहेत. 'बसंतबहार' गायला की समस्त प्राणिसृष्टीचं चैतन्यमय होणं, मोरानं पिसारा फुलवणं, 'मेघमल्हार'च्या तानांनी उत्कट होऊन बरसलेल्या त्या आकाशधाराही सर्वज्ञात आहेतच.

संगीताला जीवन मानणारे तानसेनचे वारसदार अनेक झाले, अनेक आहेत. माणिक वर्मासारखी स्वरनिष्ठ कलावंत अनेक रसिकांच्या मनात अढळपदी विराजमान झाली आहे. 'सावळाचि रंग तुझा पावसाळे नभापरी', 'घननीळा लडिवाळा झुलवू नको हिंदोळा', 'चांदण्या रात्रीतले ते स्वप्न तू विसरून जा' अशी कितीतरी विशिष्ट गाणी आहेत की जी फक्त माणिक वर्मांच्याच स्वरांतून ऐकावीत. त्या स्वरांचा गोडवा मनात दाटून राहिलेला आहे. मधुर आवाजाचं वरदान लाभलेल्या या कलावतीनं निर्माण केलेलं स्वरविश्व संपन्नतेचा आनंद देणारं आहे.

कोणत्याही गाण्यात प्रतिभा दिसली तर ते गाणं खूप खोलवर भावतं. म्हणजेच गाण्याची उपज जर सकस असेल, तर निपजही भव्यदिव्य होते. माणिकबाईंचं वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही भावगीतात त्या थोडी शास्त्रीय बैठक ठेवायच्या. त्यामुळे कोणत्याही बैठकीत त्यांना आपल्या गाण्याचा विस्तार सहजपणे करता यायचा. त्या म्हणाल्या होत्या, ''शास्त्रीय बैठकीवर आधारित चाल असेल तरच मी ते गाणं घ्यायची. नुसत्या चांगल्या चालीचा मला आनंद वाटायचा नाही. रागाचा आधार घेऊन गाण्यात आनंद वाटायचा.''

'सावळाचि रंग तुझा' या गाण्यातल्या शेवटच्या दोन कडव्यांच्या आधीची जी आरोही तान आहे, ती फारच रंगत आणणारी आहे, मुग्ध करणारी आहे. सुगम संगीतात शास्त्रीय आधार घेण्याची कला माणिकबाईंनी फार नाजूकपणे साधली, त्यामुळे त्यांच्या गायकीला वेगळीच धाटणी आली, स्वतंत्रपणा आला. असा कलाविष्कार द्विस्तरीय आनंद देणारा असतो, तो गायकालाही फुलवतो आणि रसिकांनाही खुलवतो.

माणिकबाई तशा प्रयोगशीलच म्हणायला हव्या. किराणा घराण्यातली स्वरप्रधानता, आग्रा घराण्यातली तालप्रधानता आणि जयपूर घराण्यातल्या लडिवाळ, गोड अशा ताना यांचा नाजूक मेळ घालून त्यांनी आपली गायकी श्रीमंत केली. यामुळे आपल्यातल्या सौंदर्यदृष्टीचा विकास झाला, असं त्यांना सूक्ष्मपणे जाणवलं. यासाठी स्वत:मधली प्रेरकशक्ती सतत जागी ठेवावी लागते, याचाही त्यांना शोध लागला.

'इथेच आणि या बांधावर अशीच श्यामल वेळ' मधला प्रीतिरस असू दे', अथवा 'आभाळीचा चांद माझ्या आज अंगणात बाई' मधला भक्तिरस असू दे, माणिकताईंच्या गळ्यातून तो अर्थभाव सहजपणे उतरतो. स्पष्ट शब्दोच्चार आणि ते मार्दवानं उचलणं ही नाजूक संगती त्यांच्या स्वरांतून प्रतीत होत असे. माणिकबाईंनी शब्दांच्या 'रंगरेखा' घेऊन अर्थाच्या 'भावरेखा' रसिकांपर्यंत पोहोचवल्या. त्यातून त्यांना उदंड लोकप्रियता लाभली.

या कलासाधकांनी आपली मधुर कला फक्त स्वान्तसुखाय न ठेवता ती बहुसुखाय केली म्हणून रसिकरंजनाचा मोठा काळ जागवला गेला. अनेक कान तर त्या श्रवणधारेनं तृप्त झालेच; पण कित्येकांची ही प्रेरणास्थानंही झाली. त्यामुळे कुणी कानानं आस्वाद घेतला, तर कुणी स्वत:च्या गळ्यानं.

ज्यांच्या नावात आणि गळ्यात सरस्वती आहे अशा सरस्वती राणे अतिशय शालीन, ऋजू व्यक्तिमत्त्वाच्या. त्यांच्याकडे बघून मनात शंकेचा ढग यावा की, या आपल्याशी बोलणार तरी आहेत की नाहीत ? इतकं

स्वत:चं व्यक्तिमत्त्व मिटवून घेणारी ही कलावती. आयुष्यभर त्या बोलल्या कमी; पण गायल्या खूप. त्यांच्या गात्या गळ्याची शिंपण रसिकांच्या हृदयात चिंब होत राहिली. किराणा घराण्याची गायकी आत्मसात केलेल्या या गानसरस्वती वयाच्या दहाव्या वर्षीपासून गायला लागल्या. त्यांची बहीण हिराबाई बडोदेकर आणि भाऊ सुरेशबाबू माने या संगीतक्षेत्रातल्या दिग्गजांबरोबर त्या वाढल्या, विकास करत गेल्या. शास्त्रीय गायन हा त्यांचा आत्मा, तर सुगम गायन हे त्यांचं हृदय.

'घन:श्याम नयनी आला, सखे मी काजळ घालू कशाला?' किंवा 'जा घेउनी संदेश पाखरा' मधली आर्तता मनाला भिडणारी. सरस्वती राणेंनी जवळजवळ चाळीस मराठी-हिंदी चित्रपटांना आवाज दिला. 'छेड सखी सरगम' हे 'सरगम' या चित्रपटातलं लताबाईंबरोबर त्यांनी गायलेलं शेवटचं गाणं. नंतर चित्रपटगीतांना त्यांनी रामरामच ठोकला. म्हणजे मुंबई सोडून चक्क पुण्यात स्थलांतर केलं. कारण मुंबईतलं या क्षेत्रातलं वातावरण बदलायला लागलं होतं. म्हणजे तिथे दलाल तयार व्हायला लागले. त्यांची टक्केवारीची भाषा सुरू झाली. अशा रीतीनं सुरू झालेल्या त्या स्पर्धेच्या जगात टिकाव धरून रहाण्याची सरस्वतीबाईंची मनोवृत्ती नव्हती. कारण ही खरीखुरी कलानिष्ठ माणसं. असा कलेचा बाजार त्यांच्या अंत:करणाला सोसणारच नाही.

गोड गळ्याचा वारसा त्यांची नात मीना (फातर्पेकर) कडे आलेला आहे. मीनाच्या गुरू आजीच. घरचा एवढा कलानिपुण गुरू असताना बाहेरचा गुरू शोधण्याची तिला गरजच पडली नाही.

जुन्या भावगीतांमध्ये आपण रमतो, तेव्हा त्यांच्यामध्ये असलेली मंत्रमुग्ध करण्याची ताकद नव्यानं उलगडत जाते. रसिकांना नादावून धरण्याचं त्यांचं सामर्थ्यही अजबच. अर्ध्या शतकाचा काळ लोटूनही 'त्या तिथे पलीकडे तिकडे', 'या कातरवेळी पाहिजेस तू जवळी', 'खेड्यामधले घर कौलारू', 'कुणीही पाय नका वाजवू' अशा गीतांची गोडी अवीट आहे. ही गाणी गाणाऱ्या मालती पांडे (बर्वे) यांच्या वागण्या-बोलण्यातही गोडवा होता. त्यांच्या गायकीबद्दलं सुधीर फडकेंनी लिहिलं आहे. 'या कलावतीचा विशेष म्हणजे मराठी उच्चार जसे असावेत, तसे त्यांच्या मुखातून येत. संगीत-दिग्दर्शकानं दिलेली चाल सर्व अंगानं चटकन् आत्मसात करणं, हाही त्यांचा महत्त्वाचा गुण.'

वयाच्या सतराव्या वर्षी मालतीबाई चित्रपट संगीताची पहिली पायरी चढल्या. मराठी भावगीतात स्वत:ची मोहोर उमटवणाऱ्या या कलावतीनं पहिलं गीत गायलं ते मात्र हिंदी भाषेतलं. 'सुनो सुनो हे नरनारी, ये कथा पुरानी है' हे मन्ना डे बरोबर गायलेलं गीत.

आपल्या कलायुष्यात अनेक चांगले, वाईट अनुभव त्यांना आले, कसोटीचे क्षण आले. आकाशवाणीवरचा एक कसोटी प्रसंग त्यांना नेहमीच संस्मरणीय वाटतो. गीतरामायण सुरू झालं होतं, तेव्हाचा हा प्रसंग. सकाळी पावणेनऊ वाजता हे गीत प्रसारित होत असे. त्यावेळी ध्वनिमुद्रित गीतप्रसारणाची पद्धत नव्हती. त्यादिवशी सगळे वादक कलाकार सज्ज; पण गीत हातात पडलं उशिरा म्हणजे सातच्या पुढे. त्याच्यापुढे सुधीर फडके एकीकडे चाल लावत होते, एकीकडे शिकवत होते, मधले संगीताचे तुकडे वादकांना सांगत होते. आता थेट प्रसारणाला फक्त पाच मिनिटं राहिली होती. रंगीत तालमीला तर मुळीच वेळ नव्हता. त्या जेमतेम तयारीवर मालतीबाई थेट गायल्या. झालं सगळं व्यवस्थित; पण घाईगर्दीत गीत बसवल्यानं एखादी चाल चुकली असती तर केवढी फजिती झाली असती, या विचारानं त्या नेहमीच धास्तावून जायच्या.

मालतीबाई मला कधीकधी फोन करून बोलवून घ्यायच्या, अगदी सहजच. त्यांना माणसांची ओढच होती. त्यांच्या भगिनी मंदाकिनी पांडे याही गायिकाच. त्या एकदा त्यांच्याकडे आल्या होत्या, तेव्हाही मालतीबाईंनी मला आवर्जून बोलावलं होतं. मंदाकिनी पांडे दिल्लीत राहणाऱ्या. स्वच्छ मनाच्या, खूप खळाळणाऱ्या बाई, 'सत्यात नाही आले, स्वप्नात येऊ का?', 'सोनियाचा पाळणा रेशमाचा दोर गं' अशी काही गाणी गायलेल्या. सुरुवातीला त्या नितांत प्रांजळपणे म्हणाल्या, ''गायिका म्हणून मी फार गाजले नाही हो. अगदी मोजकीच गाणी गायले. योगायोगानं ती गाजली; पण ते तेवढंच.''

पुढे दिल्लीला गेल्यावर त्यांच्यातली गायकी सुटलीच. पण दुसऱ्या कलांनी त्यांचा हात धरला. त्या आकाशवाणीवर उद्घोषिका म्हणून काम करत होत्या आणि जोडीला कथा-कवितांचे लेखनही चालू होते. आपल्याला जे जमतंय, करता येतंय, त्यात स्वत:ला रमवणारं हे व्यक्तिमत्त्व. गाता गळा असूनही भावफुलांचा मळा फुलवण्यासाठी त्या धावल्या नाहीत, वा ते स्वप्नही त्यांनी मनाशी बाळगलं नव्हतं. त्यामुळे आपल्या अल्पसंतुष्टपणाच्या भूमिकेत त्यांना काही वावगं वाटलं नाही.

अर्थात्, असं उदाहरण अपवादात्मक सापडायचं. एरव्ही आपण निवडलेल्या, आत्मसात केलेल्या कलेची पूजा बांधणारांची संख्या नेहमीच जास्त. त्या कलेला अनन्यभावे वाहून घेण्यातच त्यांनी आनंद शोधला, ते त्यांचं जीवनध्येय झालं.

भावगीताचं मधुर स्वरात गायन करता करता थोड्या लावणीगायनात डोकावल्या त्या कुमुदिनी पेडणेकर. आपल्याशी पूर्वापार ओळख असल्याचा स्नेहभाव त्यांच्या वृत्तीत व्यापून राहिलेला दिसतो. आता आपला बहराचा काळ संपला, हे दु:ख तेवढंसं दिसत नाही; पण उणावत गेलेली माणसांची कमतरता मात्र जाणवते. पूर्वी रेकॉर्डिंगच्या, कार्यक्रमांच्या निमित्तानं खूप माणसांच्या

भेटीगाठी असायच्या, वर्दळ असायची. गायिका म्हणून नाव जनमानसात रुजलेलं असतं; पण ते माणसांनी बहरलेलं वातावरण विरत गेलेलं असतं. त्यामुळे नव्यानं भेटलेल्या, आवडलेल्या माणसाला हे लोक जीव लावतात. कुमुदताईंनी मला असाच खूप जीव लावला. फोन करून बोलवून घ्यायच्या. 'जेवायलाच या नंदाताई', असा आग्रह त्यात असायचा. मलाही प्रभात रोडवरच्या त्यांच्या त्या प्रशस्त बंगल्यात प्रशस्त मनाच्या कुमुदताईंना भेटायला जायला छान वाटायचं. हिरवजल्या मनानं स्वागत करणाऱ्या कुमुदताई गप्पांच्या फार छंदी. मनानं आभाळासारख्या मोकळ्या आणि म्हणूनच पारदर्शी, थेट पलीकडेपर्यंत किंवा मनाच्या तळवटीत डोकावण्याची ताकद समोरच्याला देणाऱ्या, खूप साध्या, काहीशा भाबड्याच.

कुमुदताई गाणं शिकण्यापूर्वी कथ्थक नृत्यशैली शिकल्या होत्या. त्यात अभिरुची असूनही पुढे फारसा वाव नाही असं त्यांच्या लक्षात आलं. मग त्यांनी गाणं मन:पूर्वक आत्मसात केलं. पुढे त्यांनी गायलेल्या 'चला चल चंद्रा पसर चांदणे' या तसंच 'रुसलास का सख्या रे, का धरिलास अबोला' अशा काही गाण्यांमधून त्यांची स्वतंत्र ओळख व्हायला लागली. आवाजात मधुररस होता, तसा ठसका असल्याचंही लक्षात आलं. त्यांच्या लावणीगायनानं हे सिद्धच केलं. 'कळीदार कपूरी पान, केशरी चुना', 'सख्यासाठी झुरते गं बाई', 'मी लग्नाची बाईल याची', 'सुपभर पैका आला चालुनी' त्यांच्या या लावणीगायनात सभ्यता दिसते. मुख्य म्हणजे लावणी निवडतानाच त्या विचारपूर्वक निवडायच्या आणि ती पेश करण्याचा ढंगही साधा ठेवायच्या. त्यातला बीभत्सभाव त्या काढून टाकायच्या आणि त्या लावणीलासुद्धा भावगीतासारखा दर्जा द्यायच्या, घरंदाजपणा ठेवायच्या.

त्या काळात वसंत पवार, सुधीर फडके, राम कदम, यशवंत देव, श्रीनिवास खळे, गोळवलकर यासारख्या संगीतश्रेष्ठींनी लावलेल्या चालींवर कुमुदताई (तशा तर सगळ्याच गायिका) खुश असायच्या. त्या अप्रतिम चालींना अचूकतेनं न्याय देणं हे त्यांच्यापुढे आव्हान होतं. त्यामुळे फार मनापासून गायच्या. संगीतकारांनाही कुमुदताईंच्या आवाजातलं वेगळेपण जाणवायचं. 'त्यांच्या गायनात शब्दांचं जे भावदर्शन होतं, ते अभावानंच आढळतं. त्या भावार्थानं शब्द उचलणं फार महत्त्वाचं आहे', असा शेरा ते नेहेमी मारायचे.

गाणं हा या लोकांचा आत्मा असतो. तो आत्माच काही काळ हरवून टाकण्याची वेळ कुमुदताईंवर आली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात देहू रोडला वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी हट्टानं 'वंदेमातरम्' हे गीत म्हटलं. त्यानंतर इंग्रज सरकारनं त्यांना काही काळ गाणं म्हणण्यासाठी बंदी घातली होती. केवढी कोंडी झाली असेल त्यांची?

परंतु संगीत ही सदाबहार कला आहे. मनाच्या कोपऱ्यात ती सदैव फुललेली असते. त्या चैतन्यलहरी साऱ्या शरीरभर फिरत असतात. मधुर भावगीतं मनाचे मळे फुलवतात, म्हणून ती हवीहवीशी वाटतात. तसंच लावण्यांचा ठसकाही मनाला हलवून टाकतो. घुंगरांची तालबद्ध लय आपल्याला वेगळ्याच वातावरणात घेऊन जाते. काहीसा बेभान, धुंद रंग मनावर चढतो. उन्मादाची ही उत्कट अभिव्यक्ती असते. तनामनाची स्पंदनं वाढवण्याची ताकद त्यामध्ये असते. अशी मदभरी लावणी ऐकली, की ती फक्त कानांत साठत नाही, तर अवघ्या देहात भरून रहाते. लावणीगायनाचा असा मदभरा स्वर आहे, सुलोचना चव्हाणांचा. लावणीसम्राज्ञी म्हणूनच त्यांची ओळख आहे. 'मला गं म्हणतात लवंगी मिरची', 'सोळावं वरीस धोक्याचं', 'राया आता हिरीला इंजिन बसवा', 'आई मला नेसव शालू नवा', 'फड सांभाळ तुऱ्याला गं आला' अशा कितीतरी चित्त चाळवणाऱ्या ठसकेबाज लावण्या त्यांनी दिल्या.

सुलोचनाबाईंचे स्वतंत्र कार्यक्रम तर अगणित झाले आणि तेही भरभरून गर्दीचे, उसळत्या, ओसंडत्या प्रेक्षकांसमोर लावणी सादर करणं हे त्यांच्यापुढे आव्हान असायचं. शृंगारिक लावण्या ऐकल्या की, काही रंगेल लोक टोप्या उडवायचे, रुमाल उडवायचे, बीभत्स शिट्ट्या वाजवायचे; पण या घरंदाज बाईनं त्याची फिकीर केली नाही, डोक्यावरचा पदर कधी ढळू दिला नाही वा कधी नजरेतून, हास्यातून प्रतिसाद दिला नाही. आपला तोल किंचितही ढळू न देता त्या गात रहायच्या. एवढा संयम कसा ? तर त्या सांगायच्या की, मी गायला लागले की माझ्या डोळ्यांसमोर एक नर्तकी नाच करताना दिसते. तिच्या आविर्भावावर माझं लक्ष केंद्रित झालेलं असतं, त्यामुळे माझं अशा लोकांकडे लक्षच नसतं आणि ते उसळतात ते त्या लावणीतल्या शब्दांना, माझ्याशी काही व्यक्तिगत देणं-घेणं नसतं.

'फड सांभाळ तुऱ्याला गं आला, बाई, तुझ्या उसाला लागल कोल्हा' या त्यांच्या लावणीबद्दल त्यांना राज्यशासनाचा पुरस्कार मिळाला. त्यावर त्यांची थंड प्रतिक्रिया व्यक्त करताना त्या म्हणाल्या, 'हे असले कागदी मानसन्मान काय करायचेत? लोकांनी माझ्यावर खूप प्रेम केलं, ते केवढे पुरस्कार आहेत. तोच माझा खरा आनंद आहे. एका वेळी दहा दहा हजार प्रेक्षकांना खिळवून ठेवणं सोपं नाही.'

सुलोचनाबाईंनी गाण्याचं शिक्षण कुठेही घेतलं नाही. लहानपणी लय-तालावर त्या फक्त नृत्य करायच्या. ती जाण त्यांच्या नसानसात भिनत गेली. त्यावर त्यांना गाणं गाता येऊ लागलं. 'मल्हारी मार्तंड' या चित्रपटातली 'ग. दि. मां'ची बाराच्या बारा गाणी सुलोचनाबाईंनी गायली, ही एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणावी लागेल.

सुलोचनाबाईंनी असंख्य कार्यक्रम केले. त्यात मुबलक पैसाही मिळवला. अनेकदा

देणग्या देऊन टाकल्या. महाराष्ट्रात काही ठिकाणी शाळा काढल्यात. नांदेड आणि परिसरात केलेल्या कार्यक्रमांतून तीन लाख रु. मिळाले. त्यातून त्यांनी एक कुष्ठधाम काढलं. त्या म्हणाल्या, 'सगळे पैसे राखून ठेवले असते, तर चार गाड्या घेतल्या असत्या'. त्या रहातात अजूनही गिरगावातल्या फणसवाडीत. 'लोखंडवाला' मध्ये पण त्या जाऊ शकल्या असत्या; पण त्या समाजाभिमुख आहेत. तिथल्या प्रेम करणाऱ्या माणसांना सोडून जावंसं वाटत नाही त्यांना. लावणीची ढब, तिची फेक त्यांना यजमानांनीच शिकवली. त्यांना गाऊन दाखवता येत नाही. पण ती ढब ते बरोबर सांगायचे आणि या 'करेक्ट' उचलायच्या..... श्यामराव चव्हाण ढोलकी वाजवायचे. ही माणसं फार अगत्यशील. गेल्याबरोबर मला म्हणाले, 'आता जेवूनच जायचं बरं का ?'

'नाही हो जेवण कशाला ?' मी म्हटलं.

'नाही कसं रविवार आहे आज. झकास कोंबडीचा बेत केलाय.'

'नाही हो, मी ते खात नाही.'

'खात नाही ? सुर्वे ना तुम्ही?' ते आश्चर्यानं म्हणाले. 'ते नुसतं नावाला, खरं तर बर्वेच लावायला हवं.'

ते खूप हसले. मग आतून जाऊन मोठ्या उत्साहाने त्यांनी खाण्याचे दोन-तीन प्रकार आणून ठेवले. ही कलासिद्ध माणसं किती स्वागतसिद्ध असतात, याचा तो सुखानुभव होता.

ज्याच्याजवळ कलावृत्ती असते, तो आपोआप नावारूपाला येतो. त्या कलावैभवानं त्यांचं व्यक्तिमत्त्व झळाळून गेलेलं असतं. अशी झळाळी लाभलेलं व्यक्तिमत्त्व होतं संजीवनी मराठेंचं. अंतर्बाह्य लोभस, निर्मळ असलेलं हे गोड व्यक्तिमत्त्व. आपुलकी तर नसानसात भरलेली. आलेल्या माणसाला कुठे ठेवू आणि कुठे नको असं त्यांना होऊन जायचं. प्रेमाचे, आस्थेचे झरेच जणू त्यांच्या तनामनात वहात असावेत.

संजीवनीबाई स्वत: कवयित्री आणि गायिकाही. द्विस्तरीय आनंदाचं लेणं घेऊन आलेल्या. पण त्यांच्यातल्या कवयत्रीनंच इतका लौकिक मिळवला की त्यांच्यातली गायिका दुय्यम ठरली. 'बोल सख्या मधुबोल रे, धरू नकोसा अबोला' हे त्यांनी गायलेलं त्यांचं गीत मधुरपणे कानात गुंजार व करत रहातं. त्यांना खूप बोलायला, सांगायला आवडायचं आणि ते सारं काही अनुभवगर्भ असायचं; आणि त्यांच्याजवळ होती उत्कट, रसवाही अभिव्यक्ती त्यातून संजीवनीबाई अलगद, विनासायास उलगडत जायच्या. त्यांचा स्वरही एखाद्या छनछनत जाणाऱ्या नाण्यासारखा. एखादी सरगम छेडावी असा. ऐकत रहावासा वाटायचा आणि त्यांच्या लुकलुकणाऱ्या डोळ्यांत सतत आनंदाच्या छटा जमायच्या. अशी आनंदधर्मी माणसं फार अभावानं सापडतात.

'अंबरात नाजूकशी चंद्रकोर हासे', 'जिवाच्या जिवलगा नंदलाला रे', 'शांत सागरी कशास उठविलीस वादळे', 'सत्यात नाही आले स्वप्नात येऊ का' या त्यांच्या गीतलेखनातून त्यांचं तरल मनच उमटलेलं दिसतं. कवितेसारख्या ऋजू विषयात त्यांना खूपच रस होता. त्यांच्या वडिलांनी या संवेदनशील मुलीला मुद्दाम मुलींच्या कॉलेजात (एस.एन.डी.टी.) घातलं, ती प्रेमात पडू नये म्हणून; पण या भावसुंदर मुलीनं वडिलांचा हेतू धूडकावून लावला.

'हे मराठे कुठे भेटले तुम्हाला?' असं विचारलं, तर त्या विभोर नजर करत म्हणाल्या, 'आमच्या घरी यायचे ना रामकाका! ते आमच्या दूरच्या नात्यातलेच. वरचेवर भेटी व्हायच्या. त्यात मी अशी कविमनाची मग काय विचारता?'

'मग तुमच्या आमच्या जुळल्या तारा, असंच ना?' मी. संजीवनीबाईंनी दिलखुलासपणे टाळीसाठी हात पुढे केला. त्या म्हणाल्या, 'आपण भावजीवी लोक आहोत ना, म्हणून सुखात राहू शकतो. अशी ही उत्कट, निरामय, चैतन्यमय कलावती. मनात आणि डोळ्यांत भावगीत, भावसंगीताची खजिना असलेली. मला त्या प्रेमाच्या यात्रेकरूच वाटल्या. आपल्या गीतात त्या म्हणतात, 'हसता नभात तारा, हसता फुलात वारा, प्राणात हासते ते दावून जाऊ का?' असं त्यांचं सदाफुलीसारखं जगणं, हसणं फार अस्सल वाटतं. कृत्रिमतेचा जराही स्पर्श नसलेलं.

ज्यांच्या घरात- दारात, भिंतीत, छतात संगीत व्यापून राहिलंय, असं घर म्हणजे ललिता फडके, सुधीर फडके यांचं. 'चला सयांनो हलक्या हाती नखानखावर रंग भरा' हे 'मायाबाजार' चित्रपटातील गीत गाणाऱ्या ललिता देऊळकर या नव्यानं संवाद साधायला अनुत्सुक. अनेकदा नकारघंटा. 'माझ्यावर पुष्कळ लिहिलं गेलयं, आता नव्यानं काय सांगणार ? तेच तेच काय सांगायचं?' अशी नकारात्मक भूमिका घेतलेल्या या कलावतीला बोलतं करणं हे मोठं आव्हान होतं. स्वत:ची टिमकी न वाजवणारी ही माणसं स्वत:विषयी काही सांगणं म्हणजे स्वत:भोवती आरत्या ओवाळून घेतल्यासारखं वाटायचं त्यांना. त्यांना कलाकलानं बोलतं करत गेले. त्यांच्या जेव्हा हे लक्षात आलं, तेव्हा त्या थोड्या संकोचल्या. मग आणखी खुलवणाऱ्या शब्दांचं इंधन घातलं. हिंदी चित्रपटगीतांसाठी एवढं योगदान देऊनही त्या थंडच होत्या. हिंदी चित्रपटसृष्टीत वावरूनही कमालीचं आत्मभान ठेवणारी ही कलावती. त्या म्हणाल्या, 'मी प्रवेश केला तो बॉम्बे टॉकीजमध्ये. आवाज सोडला तर सिनेमाला योग्य अशी एकही गोष्ट माझ्याकडे नव्हती. ना रंग, ना रूप. त्यावेळी देविकाराणी बऱ्याच चित्रपटांमध्ये हिरॉइन असायच्या. त्यांची बहीण, मैत्रीण म्हणून थोडी थोडी कामं केली. पण मुख्य भर गाण्यावरच होता.'

ललिताबाईंना जाहिरातगीतंही गायला मिळायची. ती अनेक भाषांमध्ये तयार

व्हायची. शब्द वेगळे असायचे. तो अनुभव त्यांना बरंच काही शिकवून गेला.

सुधीर फडकेंबरोबर त्यांचा विवाह १९४९ साली पुण्याच्या साहित्य परिषदेत झाला होता. त्यातली वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट अशी की, हिंदीत मंगलाष्टका करून घेतल्या होत्या, त्या महंमद रफींनी म्हटल्या होत्या. ललिताबाईंनी लग्नापूर्वी सर्वाधिक द्वंद्वगीतं महंमद रफींबरोबर गायली होती.

माझ्या प्रश्नांना ललिताबाई स्पष्टपणे उत्तरं देत होत्या, रोखठोक वाटावीत अशी. गाण्याकडे काम म्हणून न बघता त्या कर्तव्यधर्मानं बघत होत्या. 'कलेचा आनंद स्वत:साठी घेतलात की रसिकांना दिला?' या प्रश्नावर त्या म्हणाल्या, 'मी कलेचा आनंद म्हणून कधी गायलेच नाही. त्यामुळे कुणासाठी, हा प्रश्नच नाही. मी गरज म्हणून गात होते, इतकंच सत्य.'

ललिताबाई फार प्रांजळपणे बोलत होत्या. त्यांची वृत्ती प्रपंचाभिमुख होती. गाण्याच्या क्षेत्रातल्या स्वत: घेतलेल्या निवृत्तीबाबत भाष्य करताना त्या म्हणाल्या, 'मी गात राहिले असते, तर आणखी नाव मिळालं असतं, आणखी पैसा मिळाला असता; पण संसाराकडे दुर्लक्ष झालं असतं. हे आणि श्रीधर एवढे मोठे झाले नसते.' असं म्हणताना त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचं चांदणं बरसत होतं.

ललिताबाई तशा मिस्कीलही. निरोप घेताना मला म्हणाल्या, 'आता पुन्हा येऊ नका... म्हणजे कागद, पेन घेऊन; नुसत्या या गप्पा मारायला.' मला छान हसू आलं. किती सरळ रेषेत चालणारी माणसं असतात ही. त्यामुळे काहीशी निर्लेपही वाटतात. अर्थात, आपला निर्लेपपणाही त्यांना खटकत नाही वा तो अवगुणही वाटत नाही.

स्थायीगुण, स्थायीभाव, स्थायीवृत्ती हे शब्द स्वत:शी जोडून घ्यायला काही लोकांना आवडतात. 'आपलं बुवा हे असं आहे.' हे वाक्य वेगवेगळ्या स्वरांतून उच्चारलं जातं. ते असो. गाणं गाण्याचा स्थायीगुण घेऊन येणाऱ्या व्यक्ती खरंच त्या वैभवात जगणाऱ्या. आपलं स्वरवैशिष्ट्य, आपला स्थायीगुण जपणारी गायिका जानकी अय्यर. भावगीत, भक्तिगीत या दोन्हींमध्ये स्वतंत्र ठसा उमटवणारी ही गायिका. अनेक गायिका नावारूपास येण्याचा तो काळ होता. तरीही सगळ्याजणी आपापल्या विशेष गुणासह टिकून राहिल्या होत्या.

'धरिला पंढरीचा चोर, प्रेमे बांधुनिया दोर', 'चंद्रभागेच्या तिराला, संतमेळा दंग झाला' ही गाणी जानकी अय्यरांशी स्वरबंध जोडूनच येतात. अलीकडे त्या बेळगावात मराठी-अमराठी अशा संमिश्र भाषाशहरात राहतात. त्या धारवाडच्या कॉलेजमध्ये गाणं शिकवतात. त्यांच्याकडे जाण्यापूर्वी त्यांनी मला त्यांच्या घराकडे जाण्याचा नकाशा पत्रातून काढून पाठवला होता. त्यांच्या योजनाबद्धतेचं आणि त्यामागच्या आग्रहीपणाचं मला कौतुक वाटलं. मी गेले तर सकाळी सकाळी झाडांना पाणी घालता घालता एकीकडे माझी वाट पहात होत्या, स्नेहोत्सुक असल्यासारख्या. माझ्या हातातली माझी बॅग उचलून घेताना त्यांच्यातलं गायिका म्हणून असलेलं श्रेष्ठत्व कुठे अवघडून गेलं नाही.

बेळगावात त्या जानकी अय्यर-वैद्य या नावानं ओळखल्या जातात. त्यांच्या घरात म्हणजे गाण्याच्या घरातच मी राहिले होते. कारण त्यांचं गाणं गुणगुणणं सदैव चालू असे. 'माझ्या मनात विणिते नाव गं, कसा सांगू अमोल त्याचा भाव गं' हे भावसुंदर गाणं तसंच 'उमटली रामाची पावलं' हे भक्तिमधुर गाणं अशी कित्येक गाणी त्यांच्या ओठांतून बाहेर पडली. उत्कटतेतून बरसणारी रसधाराच ती.

त्यांच्या वडिलांना गाण्याचा फार नाद होता. त्यांच्या आग्रहाखातर या गाणं शिकल्या. त्यांच्या मते दक्षिणेत गाण्याला फार महत्त्व. गाणं किंवा नृत्य प्रत्येकाला यायलाच हवं, अशी तिथली मानसिकता. गाण्यानं त्यांना नाव दिलं, आनंद दिला आणि या स्वरसमृद्ध बेटावर उतरण्याचा आनंद मलाही मिळाला. त्यांच्या मुलाखतीच्या कामाला एक दिवस पुरला; पण अगत्याला, प्रेमाला एक दिवस नाही पुरत. जानकीबाईंनी आपल्या अगत्याची ऊब पुढचे दोन दिवस दिली. जोडीला घरच्या रुचकर मेजवान्या होत्या. फार सुंदर होते ते तीन दिवस. हव्याहव्याशा वाटणाऱ्या वळवाच्या पावसासारखा तो अल्पकालीन धमाकाच.

बेळगावात त्यांनी ठुमरी गायिका म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण केली. किराणा घराण्याच्या या गायिकेनं शास्त्रीय गायनाची बैठक एकदम पक्की केली. त्या म्हणाल्या, 'माझ्या आवाजाचा धर्मच किराणा घराण्याचा आहे, त्यामुळे ठुमरी मला आत्मसात करता आली.' ठुमरी ही नृत्याचा अंशात्मक भाग असतो. ठुमकत ठुमकत येते ती ठुमरी. त्यात मुद्राभिनय, हातांच्या मोहक हालचाली आवश्यकच. त्याशिवाय ठुमरी रंगत नाही, असं त्या म्हणाल्या.

'गाण्यातले भाव शब्दांतून जेवढे उतरले पाहिजेत, तितकेच चेहऱ्यावर उमटले पाहिजेत, डोळ्यांत उतरले पाहिजेत. भाव आणि रस याचं सुंदर मिश्रण असेल, तर गाणं सुंदर होतं.' ही स्वरश्रद्धा त्या जपतात. पुणे विद्यापीठाचा संगीताचा डिप्लोमा केलेली ही गायिका गाण्यावर आणखी विवेचन करताना त्या म्हणाल्या, 'शब्दांचा स्वाद घेत गाणं म्हणायला पाहिजे. उत्तम गायला अंत:प्रेरणा हवी, म्हणजे ते खुलत जातं. गाणं ही नुसती शिकून येणारी गोष्ट नाही.' ही श्रद्धा जपत जपत त्या पुढे गेल्या, कीर्तिमान झाल्या. विशेष म्हणजे त्या कलेवरच फक्त प्रेम करतात असं नाही, माणसांवर तर खूप. शिवाय आंब्या-चिकूच्या झाडांवर येणाऱ्या कोकिळेचे स्वरही त्या तल्लीन होऊन ऐकतात. 'किती गोड स्वरांचं दान मिळालंय हिला. कोण गेलंय हिला शिकवायला' असे भावुक उद्गार त्या काढतात. गुलाबाच्या ताटव्यावरही त्यांचं मन जडलंय. फार

अभिरुचीसंपन्न गायिका ही ! फार !!

स्वरधारांची बरसात ऐकली की मनाला कसल्यातरी ताजेपणाची अनुभूती येत असते. मनाच्या गाभ्यात अनामिक शांती मिळत रहाते. या मुग्धावस्थेला आतून रसभरीत हुंकार मिळत असतो. गेली अनेक वर्षे आपल्या कंठऐश्वर्यानं रसिकांना मुग्ध करत आलेल्या गायिका म्हणजे मधुबाला जव्हेरी (चावला). त्या वृत्तीनं काहीशा संकोची; पण त्यांच्या गळ्यातून गाणं उतरत राहिलं ते मात्र नि:संकोचपणे. त्या गाण्यातून साद घालत गेल्या, 'जिवाच्या जिवलगा नंदलाला रे.' संजीवनी मराठेंची शब्दकला आणि यशवंत देवांचा स्वरसाज लाभलेल्या या गीताची मोहिनी कित्येक वर्ष टिकून राहिली. तीच गोड कथा 'अंबरात नाजूकशी चंद्रकोर हासे, मंदिरात का गं सखी सोडिसी उसासे' या गीताची. त्यातलं नादमाधुर्य, स्वरगंध मनाला भुरळ घालतो. मधुबाला जव्हेरींनी त्यातलं भावरूप, अर्थरूप यांना योग्य तो न्याय दिलेला असतो. मधुबालाबाईंना 'प्रतिलता' असं संबोधलं जायचं, इतके स्वरगुण होते. त्यांना गाण्याची केवळ आवड नाही तर वेडच होतं. 'फुले स्वरांची उधळित भवती गीत होई साकार, आज मी आळविते केदार' मनात गाण्याची ओढ असली की असं सुरेल गाणं गाऊन होतं. संगीत घेऊन एम.ए. झालेली ही गायिका भावगीतांचे मळे फुलवत चालली होती. गाण्यातला केदार राग आळवता आळवता 'आसावरी'ही छेडत गेल्या. (दूर आर्त सांग कुणी छेडिली आसावरी.)

तलत महमूद, महंमद रफी अशा मातब्बर गायकांबरोबर त्यांनी हिंदी चित्रपटगीतंही खूप गायली. बंगाली, डोग्री अगदी स्वाहिली भाषेतली गीतंही त्या गायल्या. त्यांची कन्या तेजश्री सांगत होती, 'मम्मी स्वत:विषयी जास्त सांगणार नाही. तिला कोणत्याही ओळी सांगा, चाल अशी अलगद बाहेर पडते ओठांतून. तिच्यात एक संगीतकार दडलेला आहे. चाल अगदी आतून येते, हे तिचं अंगचं आहे. वसंत पवार तर त्यांना थोडी झलक सांगायचे आणि म्हणायचे, तुम्हाला हवी ती चाल लावा. त्यावर तुमच्या आवडीचा मुलामा चढवा.'

रूपसम्राज्ञी मधुबालाचे वडील एकदा या स्वरसम्राज्ञीकडे आले. त्यांना एक चित्रपट काढायचा होता. त्यासाठी यांना गाता का विचारलं, अर्थात् नाही कोण म्हणणार ? रेकॉर्डिंग झाल्यावर त्या मधुबालानं येऊन या मधुबालाला मिठी मारली. 'बहोत अच्छा गाया. मैं आपपर बहोत खुश हूँ!' असं ती म्हणत राहिली.

अशी ही रूप-स्वरांची अलौकिक भेट. चिरस्मरणीय झालेली.

''सूर, ताल, शब्दोच्चार या तिन्ही गोष्टींबरोबर गायकाला भावनांचा परिपोष करायचा असतो. कानाला गोड लागणं, हीच खरी सुरांची कसोटी. संगीत जेव्हा निर्गुण, निराकार, नादब्रह्माचं रूप सोडून शब्दांच्या साहाय्यानं सगुण साकार वागीश्वरीचं रूप धारण करतं तेव्हा ते भावसंगीत होतं.' मधुबालाबाई संगीत विवेचन करत होत्या.

आई-बहिणीबरोबर, महंमद रफींबरोबर त्या काही परदेश दौरेही करून आल्या. यजमान मदनमोहन चावला रसिक वृत्तीचे होते. त्यांना लांब केसांची आणि गोड गळ्याची बायको हवी होती. ती सही सही मिळाली. त्यामुळे प्रपंच अगदी रुचकर झाला.

मधुबालाबाईंनी मला जेवल्याशिवाय सोडलं नाही. मधुरसातली ही अनमोल आठवण आहे. त्यांच्या गात्या गळ्यात जसा मधू, तसा वृत्तीतही. त्यांच्याकडचं ते स्वादिष्ट जेवण घेताना जाणवलं की, ही माणसं केवळ कलाकार म्हणून उंचीवर जात नाहीत, तर माणुसकीची अपरिमित उंची त्यांनी गाठलेली असते. यांच्याकडे कायम अगत्याचा वसंतोत्सव फुललेला असतो. शिशिरातली पानगळ इकडे स्पर्शही करत नाही.

भावरंग उजळून टाकण्याच्या काळात श्रवणरंजन करणारी आणखी एक गायिका कृष्णा कल्ले (राय). त्यांच्या आठवणींच्या तारा झंकारण्यासाठी हे गीत आळवून पहा-

'परिकथेतील राजकुमारा स्वप्नी माझ्या येशील का?' रामपूर घराण्याची गायकी असलेल्या या गायिकेनं संगीत विशारद ही पदवी घेतली होती. 'मन पिसाट माझे अडले रे', 'तू अबोल होऊनी जवळी मजला घ्यावे', 'कुणीतरी मजला जागे केले' अशा कितीतरी गाण्यांनी रसिकांना झपाटून टाकलं होतं. अतिशय शांतवृत्तीच्या, मृदुभाषिणी अशा या गायिकेनं अनेक चित्रपटगीतंही गायली.

त्या भावरसगीतांच्या सुवर्णकाळात गायलेल्या आणखी काही जणींचे उल्लेख आवर्जून करायला हवेत. त्यात डॉ. उषा वाघ (घर दिव्यात मंद तरी), पुष्पा पागधरे (आला पाऊस मातीच्या वासात गं), कालिंदी केसकर (घाल घाल पिंगा वाऱ्या), मोहनतारा अजिंक्य (खुदकन् गाली हसले), श्यामा चित्तार (दावा नयनी यशोदेचा सुकुमार), विनोदिनी दीक्षित (अंधारलं दारात, करू दे सांजवात), कुमुद भागवत (सायंकाळी निवांतवेळी रातराणी उमलली), नलिनी मुळगावकर (नसता माझ्या मनात काही), कुंदा बोकील (निळा सावळा नाथ), प्रमोदिनी देसाई (वाजती सखे पैंजण), सुमती टिकेकर (आठवणी दाटतात), शैला मोहिले (कानात सांग माझ्या मी आवडे तुला का?), डॉ. सुमन माटे (टिप फुले टिप), कुंदा ताटके (याचे हातीचा वेणू कुणी घ्या ना) या सगळ्यांना भेटले. सगळ्या भेटी परमसुखाच्या होत्या. संधी मिळाली, गायल्या, संधीचं सोनं केलं; पण संधीमागे धावल्या नाहीत. खूप मन:पूर्वक, जीव ओतून गायल्या. फळाची अपेक्षा न धरता गायल्या. त्यात आत्मरंजन तर होतंच. पण रसिकरंजन हे लक्ष्य असायचं. रसिक आपले मायबाप असल्याची शुद्ध जाणीव होती. नाव मोठं होण्यासाठी यांनी धडपड केली नाही, तर आपलं कलाकर्तृत्व सिद्ध होण्यासाठी धडपड केली. त्यामुळे त्यांची कलेची ओढही निष्कलंक राहिली.

संगीताचं जग निर्माण करणाऱ्या या साऱ्या आनंदयात्री स्वत:बरोबर इतरांचा आनंद द्विगुणित, शतगुणित करत गेल्या. यांनी दिलेल्या आनंदाच्या बागेत फिरायला मजा आली. परत परत फिरावंसं वाटत राहिलं. आवीट गोडी लागून राहिली. श्रुतिमधुर स्वरांचा पारिजात त्यांनी फुलवला आणि रसिकांच्या मनात सूरगंध दरवळत ठेवला. स्वत:ला घडवत आणि वाढवत ठेवताना रसिकांसाठी एकेक चैतन्याचा दिवा त्या लावत गेल्या. आजच्या गायकांसाठी उपलब्ध असलेला गाण्यांचा हा त्यांनीच ठेवलेला नजराणा. त्या नजराण्यातला एकेक मोती घेऊन आताचे गायक मैफल जमवतात. हे चकाकतं, हे रसदार पूर्वसंचित आहे म्हणून पुढच्या पिढ्यांना गोड गाणी ऐकायला मिळतात. तो कृतज्ञ भाव तुम्ही-आम्ही जपायला हवा आणि त्या स्वरऐश्वर्याच्या काळाला फिरून फिरून वंदन करायला हवं.

❀ ❀ ❀

भारतरत्न लता मंगेशकर कोण काय म्हणतात ?

✻ लता कधीच बेसूर होत नाही.
– उस्ताद बडे गुलाम अली खाँ

✻ लताचे आभार मानायला हवेत. तिच्यामुळे सामान्य माणूससुद्धा संगीताबद्दल आस्था ठेवतो.
– पं. भीमसेन जोशी

✻ विसाव्या शतकात एकच गोष्ट लक्षात राहील. – लताचा आवाज
– जगजीतसिंह

✻ तुम्हाला अस्सल गंधार ऐकायचा आहे, मग लताचा आवाज ऐका.
– पं. कुमार गंधर्व

✻ धडकता है दिल-ए-हिन्दोस्ताँ आवाज में तेरी – नौशाद

✻ बहुधा सरस्वती आणि लक्ष्मी एकत्र रहात नाही, परंतु तुम्ही लताकडे पहा ...
– पं. हरिप्रसाद चौरसिया

✻ आमच्या एक आणे कामाचं रूपांतर ती सोळा आण्यांमध्ये करते. – प्यारेलाल

✻ लताची बरोबरी कुणीच करू शकत नाही.– सी. रामचंद्र

✻ लताचा आवाज म्हणजे आपलं सांस्कृतिक वैभव आहे.
– गुलजार

✻ मी लताला जेव्हा रेकॉर्डिंगरूममध्ये माईकसमोर पाहतो, त्यावेळेस तिचं देवीमध्ये रूपांतर झालेलं दिसतं व मला वाटतं तिच्या पाया पडावं.
–सलील चौधरी

✻ तानपुऱ्याबरोबर आवाज मिळविणे कित्येक गायकांना जमत नाही, परंतु लताचा स्वर इतका परिपूर्ण असतो की, तुम्ही त्या स्वरावर तानपुरा जुळवू शकता ....
–श्रीनिवास खळे

✻ लता म्हणजे काय आहे ? पाच फुटांची पांढऱ्या साडीतली छोटीशी मूर्ती! पण तिचा आवाज म्हणजे एक सूर्यासारखाच तेजस्वी किरण आहे, जो सारे विश्व व्यापून राहिलेला आहे.
– दिलीपकुमार

✻ पृथ्वीवर एकच सूर्य आहे, एकच चंद्र आहे, एकच लता आहे.
– जावेद अख्तर

✻ तुम्ही खालून वर येणारा धबधबा पाहिला आहे ? मी पाहिला आहे. लताच्या स्वरातून ऐकला आहे. तिची तान जशी वरच्या स्वरातून खाली येते, तशीच खालून वरतीपण सहज जाते.
– आशा भोसले

✻ लतासारखी दुसरी गायिका नाही.
– ओ. पी. नय्यर

मीना मंगेशकर - एक सुरेल संवाद

❀ अद्वैत धर्माधिकारी

संगीतकार म्हणून बिरुद लावावं अशा गुणी कलावती मीना मंगेशकर म्हणजे मंगेशकरांच्या पात्र अमृतमय बोटातील अनामिका.

बहुश्रुत, गोडगळ्याच्या बुद्धिमान मीनाताईंनी ७ सप्टेंबर २००६ रोजी वयाची अमृत महोत्सवी वर्ष पूर्ण केली. 'स्वरप्रतिभा ' रसिकमोहिनी दिवाळी अंक २००६ साठी त्यांनी अद्वैत धर्माधिकारींशी सुरेल संवाद केला. मीनाताईंना 'स्वरप्रतिभा' च्या लाख शुभेच्छा !

संपादकीय

अद्वैत धर्माधिकारी: मीनाताई पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल आपल्याला शुभेच्छा .

मीनाताई : धन्यवाद

अद्वैत धर्माधिकारी : आता मागे वळून पहाताना आपल्याला काय वाटते ?

मीनाताई : मागे वळून बघितलं तर मागचा काळ फार चांगला होता हे प्रकर्षाने जाणवतं, खूप आनंदाचे दिवस होते मी गायले ते; पण माझ्या मर्जीने गायले मी, पैशांसाठी गायले नाही, जेव्हा आनंद वाटला तेव्हाच गायले. माझी हौस म्हणून मी गात राहिले, त्यामुळे मागचा काळ फार वेगळा होता, आताच्या वातावरणात पूर्वीसारखा आनंद वाटत नाही आणि संसार; शेवटी गाण्यापेक्षा मी माझ्या संसाराला अधिक महत्त्व दिले.

अद्वैत धर्माधिकारी : एक उल्लेख असा येतो की मास्टर दीनानाथांनी लताबाई आणि तुम्ही अशा दोघींसाठी दोन चिजांच्या वह्या केल्या होत्या, त्याबद्दल काही सांगू शकाल का?

मीनाताई : बाबा गेले त्या वेळेला मी दहा वर्षांची होते, म्हणजे त्यावेळी फार मोठी नव्हते. तसेच ते खेळण्याचे वय होते, त्यामुळे फार काही शिकायला मिळालं नाही. बाबांनी दोन वह्या केल्या होत्या. माझ्याबद्दल ते नेहमी म्हणायचे की माझी मीना शास्त्रीय संगीत उत्तम गाईल. ती स्टेजवर फक्त क्लासिकल गाईल. मी तिला क्लासिकल सिंगर करणार आहे. तिचा आवाज शास्त्रीय संगीताला योग्य आहे. पण ते सगळंच अर्धं राहिलं. सगळ्यात

वाईट गोष्ट ती आहे माझ्या आयुष्यातली की ते स्वप्न अपुरं राहिलं. बाबा मला शिकवायचे, दिदीला शिकवायचे आणि कुणी शिष्य त्यावेळी असतील तर त्यांनाही शिकवायचे पण त्यांचा माझ्यावर फार विश्वास होता. मी दहा वर्षांची होते तरी समजा मध्येच उठले तर मला म्हणायचे मिंणको (मला प्रेमाने ते मिंणको म्हणयाचे) जरा तू त्यांना ही चीज सांग आणि कोण जाणे त्यांची कृपा,ईश्वराची दया मी ती चीज व्यवस्थित सांगत असे. माझी स्मरणशक्ती फार चांगली आहे. अजून मला त्या चिजा आठवतात. मी त्यांच्याकडे फार शिकू शकले नाही; पण त्यांच्याकडे अविनाश मोहिते, प्रभाकर जठार यायचे तेव्हा मी लक्षपूर्वक ऐकत असे.

अद्वैत धर्माधिकारी : मग त्यानंतर तुमचा रियाज किवा संगीताचं शिक्षण पुढे कुणाकडे झालं ?

मीनाताई : शिकायचं म्हणजे काय की तेव्हाची परिस्थिती अशी होती की शिकणं शक्यच नव्हतं, तेव्हा आम्ही पुण्यात होतो. बाबा एप्रिल महिन्यात गेले जूनमध्ये 'पहिली मंगळागौर' पिक्चरमध्ये दीदीला काम मिळालं. नंतर आम्ही कोल्हापूरला आलो. तिथे आम्हाला शाळेत घातलं, आम्ही विद्यापीठ शाळेत जाऊ लागलो.

अद्वैत धर्माधिकारी : पुढे परिस्थिती पालटल्यावर गाण्याचं काय झालं ?

मीनाताई : मी तुम्हाला सांगते, पंचेचाळीसच्या सुमारास मास्टर विनायक मुंबईला आले, त्यावेळी दीदीबरोबर फक्त मी होते. आई,आशा,उषा, बाळ हे आमच्या आजोळी होते. ते एक तुम्हाला सगळ्यांना माहीत आहेच की दुसऱ्याच्या घरात आपण जेव्हा राहतो, तेव्हा आपल्याला एव्हढं मोकळं वाटत नाही, त्यातून आम्ही बाबांच्या नाटककंपनीमुळे भरभराटीचा काळ पाहिला होता. त्यामुळे विनायकरावांच्या घरी असताना माझं गाणं पुन्हा मागे पडलं विनायकरावांनी मला मग बालमोहन शाळेत घातलं तिथे मी त्यांच्या मुलांबरोबर नंदा - मीनाबरोबर शिकत होते. तेवढ्चात दुर्दैवाने ४७ साली विनायकराव वारले. त्यामुळे पु:न्हा सबंध परिस्थिती पुन्हा डबघाईला आली. मग हळूहळू दीदीला कामं मिळू लागली तेव्हा ती आम्हाला म्हणाली,मी आता काम करते, तुम्ही सारे चांगलं शिक्षण घ्या.'' तेव्हा आम्हांला बालमोहनमधून काढून सेवासदन

मध्ये घातलं व मग स्वातंत्र्य मिळालं, त्यामुळे छोट्या इयत्तांमधून इंग्लिश निघून गेलं. त्यामुळे स्वातंत्र्य मिळेपर्यंत गाणं शिकायची संधीच मिळाली नाही, आणि माई म्हणायची, की योग्य गुरू मिळाला नाही तर गळ्यातील गाणं बदलेल, त्यामुळे मग मी गाणं फार शिकले नाही. दीदीला मात्र पहिल्यांदा अमान अली खाँसाहेब भेंडीबजारवाले शिकवित. त्यानंतर अमानत अली खाँ साहेब शिकवत. नंतर तिचं कामही प्रचंड वाढलं, त्यामुळे परिस्थिती पालटली. पण गाण्याचं शिक्षण घेता आलं नाही, तरी माई आम्हाला पहाटे पाच वाजता रियाजाला बसवायची, बाबांनी जे शिकवलेलं होतं, त्याचा रियाज मात्र ती आमच्याकडून घोटून घेत असे.

अद्वैत धर्माधिकारी : दीदीचं पहिलं गाणं जसं 'पहिली मंगळागौरमध्ये', 'नटली चैत्राची नवलाई' आहे तसं तुमचं पहिलं गाणं कोणतं?

मीनाताई : मी पहिल्यांदा गायले कोरसमध्ये 'माझं बाळ' ह्या चित्रपटात. डावजेकरांचं त्याला संगीत होतं, 'चला चला नवबाला', दीदी, मी, आशा, उषा,बाळ आम्ही सारेच त्या गाण्यात होतो, त्यानंतर मधली काही वर्ष मी चित्रपटात अजिबात गायले नाही. पण उत्तमोत्तम गाणं ऐकणं मात्र सुरूचं होतं आणि सकाळी उठून फक्त तंबोऱ्यावर रियाज करीत असे. पण विनायकराव गेल्यावर प्रफुल्ल मधल्या लोकांनी एक नवीन सिनेमा कंपनी काढली,' उदय कला चित्र'. दिनकर पाटील, माधवराव शिंदे व इतर अनेक मंडळी. त्यांनी पिक्चर काढायचं ठरविलं त्यात लतादीदींवर संगीत दिग्दर्शकाची जबाबदारी टाकली.. गाणी लिहायला शांताबाई शेळके होत्या तेव्हा दीदी मला म्हणाली '' माझ्या संगीतात तुला गायलंच पाहिजे ''बघा त्यात 'च' गायलंच असा होता. मी तिला म्हटलं, मी गाणार नाही. पण ती मला म्हणाली, ''नाही, तुला माझ्या संगीतात दोन गाणी म्हणावीच लागतील आणि मग अशा प्रकारे मी 'राम राम पाव्हणं 'ह्या पिक्चरमधे दोन गाणी गायले. त्यातलं एक सोलो 'पदर पसरिते हात जोडिते आई अंबिके तुला', '' तर दुसरं एक द्वंद्वगीत 'माझ्या शेतात सोनंच पिकतंय, पानापानात लखलख करतयं ' जे मी अण्णा तथा सी. रामचंद्र ह्यांच्यांबरोबर गायले.

अद्वैत धर्माधिकारी : दीदी एक बहीण म्हणून आणि दीदी एक संगीतकार म्हणून त्यांची गाणी गाताना तुमच्यावर काही दडपण होतं का?

मीनाताई : तसा दीदीचा आम्हाला धाक कधी वाटलाच नाही. फार प्रेमाने वागते ती बाबा लवकर गेल्यामुळे तिला असं वाटतं की मुलांना (भावडांना) दु:खी करू नये. त्यामुळे ती आम्हाला फार सांभाळून घ्यायची; पण ह्यावेळी (गाण्याच्या वेळी) मात्र तिने मला सांगितले,` तुला गावंच लागेल. मी तिला म्हटलं,'' दीदी तुला माहिती आहे, मी तुझ्यासमोर गाऊ शकणार नाही, तू समोर असलीस तर मी गाऊ शकणार नाही. मग रेकॉर्डिंगला दत्ता डावजेकर होते, ती आत होती. अक्षरक्ष: नाईलाजाने मी दोन गाणी गायले, पण ती गाणी मात्र चांगली गाजली परत एका गाण्यात अण्णाबरोबर असल्यामुळे मला काही त्रास नाही वाटला, त्यांनी मला धीर दिला.

अद्वैत धर्माधिकारी : सी. रामचंद्र तुमचे कौटुंबिक स्नेही परंतु गायक व संगीतकार म्हणून त्यांचा त्यावेळी फार दरारा होता. त्याचा धाक त्या गाण्याच्या वेळी तुम्हाला जाणवला का ?

मीनाताई : हो जाणवला ना; पण त्यांनी सांभाळून घेतल हा, त्यानंतर मी एक गोष्ट केली, दीदींनी पुढे जेव्हा बाबांच्या चित्रपटांना संगीत दिले त्यावेळी मी तिला निक्षून सांगितलं , आता मात्र मी तुझ्याकडे गाणार नाही. त्यामुळे 'आनंदघन' च्या कोणत्याही चित्रपटात माझं गाणं नाही, पण तिच्यासमोर, तिच्याबरोबर एक ड्युएट गायचा प्रसंग मात्र माझ्यावर आला होता. वसंत प्रभूचं संगीत असलेल्या 'तारका' चित्रपटात आमचं दोघींचं एक ड्युएट आहे. त्यावेळी सर्व गायक एका माईकवर गायचे. तेव्हा दीदीला मी सांगितलं की तू तोंड फिरवून गा तर मी गाईन, नाहीतर माझ्यावर चिडली, म्हणाली ''काय करतेस तू '' तुला गायचंय नं तर व्यवस्थित गा. आणि मग त्या गाण्याचं रेकॉर्डिंग पार पडलं. ते गाणं फार छान होतं. मग वसंत प्रभूंकडे मी पुष्कळ गाणी गायले. त्याचे शब्द आहेत ''माझं नाव शोभलं मैना'', त्यानंतर 'मायेचा पाझर' चित्रपटात गायले, तसंच वसंतराव देसाईंकडे पण गायले, 'कांचन गंगा' मध्ये पण; हे सगळं जबरदस्ती म्हणजे गायलंच पाहिजे म्हणून, पण नंतर मी गायचं सोडून दिलं आणि म्यूझिक डायरेक्शनकडे वळले, आणि गाण्यापेक्षा ते मला बरं वाटलं,

अद्वैत धर्माधिकारी : 'माणसाला पंख असतात' ह्या चित्रपटाला तुम्ही संगीत दिलं, त्याविषयीच्या आठवणी काय आहेत ?

मीनाताई : माधवराव शिंद्यांनी ते पिक्चर केलं होतं. ते मला म्हणाले, दीदींनी चित्रपटाला संगीत दिलं आहे. बाळनी पण दिलं, आता तू माझ्या चित्रपटाला संगीत दे. पहिल्यांदा नेहमीप्रमाणे मी नकार दिला, पण बाळ मला म्हणाला की, मीनाताई ह्या चित्रपटाचे संगीत तू कर. तुझ्या आवडीचे लोक ह्यात आहेत. मी विचारलं कोण ? तर तो म्हणाला, वि. स. खांडेकर. भाऊंच्या कथेवर हा चित्रपट होता आणि ते माझं दैवत असल्यामुळे मी त्या चित्रपटाला संगीत दिलं. त्यात काही गाणी पण भाऊंनी लिहिली, त्या चित्रपटात मी दीदी, बाळला गायला लावलं, गाणी चांगली झाली.

अद्वैत धर्माधिकारी : 'माणसाला पंख असतात' मध्ये 'ये जवळी घे जवळी प्रिय सखया, भगवंता' हे लताबाईंच्या आवाजात एक सुंदर गाणं तुम्ही केलेलं आहे. त्याविषयी जरा सांगा ना ? त्याची चाल तुम्हाला कशी सुचली?

मीनाताई : सुरुवातीला त्या गाण्याला मला मनासारखी चाल सुचतच नव्हती. ते शब्द

घेऊन मी एक -दोन दिवस फक्त त्यावर विचारच करत होते, पण चाल काही लागत नव्हती. तेव्हा बाळ मला म्हणाला, 'मीनाताई तू बाबांचं स्मरण कर आणि चाल लाव आणि खरोखरच मग बाबांच्या एका चिजेवर मी ह्या गाण्याला चाल लावली ,म्हणजे मुखडा त्या चिजेवरून केला, कारण बाबांनी ती चीज आम्हाला शिकविली होती आणि अंतरा मात्र मग मी स्वतंत्रपणे वेगळ्या चालीत तयार केला.

अद्वैत धर्माधिकारी : संगीत करताना तुमची काय पद्धत आहे ? चाल देताना तुम्ही चालीवर काव्य करायला सांगता की काव्याला त्या अनुरूप चाल लावता?

मीनाताई : मला चालीवर जर शब्द दिले, तर त्यातून त्या गाण्याला योग्य न्याय मिळत नाही असे वाटते, किंवा त्या काव्याला अपेक्षित वजन येत नाही असे वाटते, मला पसंत असणारे काव्य असेल, तरच मी त्याला चाल लावते.अजूनपर्यंत मला तीच सवय आहे. मुलांची गाणी मी केली, त्यावेळी सुद्धा ह्याच पद्धतीने केली.

अद्वैत धर्माधिकारी : तुम्ही सुरुवातीला पार्श्वगायन केलेत, मग चित्रपटाला संगीत दिलं, त्यानंतर तुम्हाला मुलांची गाणी का करावीशी वाटली ?

मीनाताई : १९६० मध्ये 'माणसाला पंख असतात', ह्या चित्रपटाला मी संगीत दिलं. त्यानंतर १९६३ साली माझं लग्न झालं त्यानंतर दीदी म्हणाली की तू आता फक्त संसाराकडे लक्ष दे. त्यापूर्वी मी गाण्याचे कार्यक्रम करीत असे. मी,उषा आणि बाळ आम्ही स्टेज शोज करीत असू. ते सगळं थांबलं. दीदीबरोबर मी रेकॉर्डिंगला जात असे, ते पण बंद झालं. मग काही वर्षांनी योगेश माझा मोठा मुलगा, त्याचा जन्म झाला, पुढे रचना ही मुलगी. हे दोघे जरा मोठे झाले तर गायचे, छान गायचे. मग मला वाटलं की मुलं आता मोठी झालीत तर पुन्हा संगीताकडे वळावं आणि मुलांची गाणी करावी. कारण मला असं लक्षात आलं की, आत्तापर्यंत मुलांसाठी म्हणून जी गाणी होती, ती मोठ्यांनी म्हटलेली होती. तर मुलांची गाणी मी माझ्या मुलांकडून गाऊन घेईन. त्याप्रमाणे त्यांच्या गळ्याला झेपेल असं काव्य मी शोधायला सुरुवात केली. तेव्हा मला राजा मंगळवेढेकरांचं पुस्तक मिळालं , त्यामध्ये 'असावा सुंदर चॉकलेटचा बंगला', 'शाळेत गेला ससा', अशी काही काव्यं मला फार आवडली. मी मग राजाभाऊंची परवानगी घेतली, त्यावेळेस मी पहिल्यांदा 'चॉकलेटचा बंगला', आणि 'कोणास ठाऊक कसा' ही गाणी केली. त्यावेळेस मी सारखी टी.व्ही. बघत असे. तर काव्यवाचनाच्या एका कार्यक्रमात मंगेशराव पाडगावकरांनी मुलांसाठी 'सांग सांग भोलानाथ' ही कविता म्हटली, मला ती कविता फारच आवडली. मी लगेच मंगेशरावांना फोन केला आणि त्यांना विचारलं 'तुमची सांग सांग भोलानाथ ' ही कविता मला द्याल का? मला ती रेकॉर्ड करायला आवडेल. त्यांनी लगेच होकार दिला. एक-दोन दिवसांत ती कविता मला पाठविली. मग मी त्याला चाल दिली आणि ते गाणं खूप प्रसिद्ध झालं.

अद्वैत धर्माधिकारी : तुम्ही केलेली बालगीतं मी लहान असताना ऐकली, पुढच्या पिढीनं ऐकली , आज आमची मुलंपण ही गाणी आवडीने ऐकतात. पण मुलांकडून गाणी म्हणून घेणे हे खूप कठीण काम, तर मुलांकडून ही गाणी तुम्ही कशी बसवून घेतलीत ?

बालगीतांच्या रेकॉर्डिंगच्यावेळी मीनाताई, उषाताई, संगीतकार श्रीनिवास खळे व बालकलाकार योगेश, रचना खडीकर आणि शमा खळे

मीनाताई : तुम्ही म्हणता ते अगदी बरोबर आहे. ही सगळी मुलं योगेश, रचना आणि शमा खळे (सं. श्रीनिवास खळे ह्यांची मुलगी) फारच लहान होती, रचनाला तर वाचता पण येत नव्हतं आणि योगेश नुकताच शाळेत जायला लागला होता. त्यावेळी उषाने मला फार मदत केली. रेकॉर्डिंगच्या वेळी रचनाला ती अक्षरक्ष: मांडीवर घेऊन लीप मूव्हमेंटने गाणं सांगत असे ,अशा प्रकारे ते रेकॉर्डिंग व्हायचं. काही वेळेला रचना रडायची मग रेकॉर्डिंग थांबवावं लागायचं, पण शमा मात्र सगळं व्यवस्थित ऐकायची. त्यानंतर मी मुलांची बरीच गाणी केली. 'चॉकलेटचा बंगला' लोकप्रिय झाल्यावर मी ते बंगालीमधूनपण केले. संगीतकार मानस मुखर्जी यांना बोलावून शान आणि सागरिका ह्यांच्याकडून ते गाणं बंगालीमध्ये गाऊन घेतलं आणि बंगालीतपण ते लोकप्रिय झालं. त्यानंतर मी संगीतकार अविनाश व्यासांकडे गेले, त्यांच्याकडून हे गाणं गुजराथीमध्ये केले. त्यामध्ये गाणारे बालकलाकार होते साधना सरगम, दुर्गा आणि शारंगदेव जसराज आणि शिवांगी कोल्हापुरे. माझ्याकडे त्यानंतर अनेक आजचे प्रसिद्ध गायक बालकलाकार म्हणून गाऊन गेले.

अद्वैत धर्माधिकारी : मला एक गोष्ट नेहमी अशी जाणवते की, आपलं महाराष्ट्र राज्य हे प्रगत राज्य. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करतात, पण संगीत दिग्दर्शनाच्या क्षेत्रात मात्र महिलांनी अपवादात्मकच काम केलेलं आहे.

मीनाताई : पूर्वी थोडं संगीत हिराबाई बडोदेकरांनी दिलेलं आहे. सुंदराबाई, हिराबाई पेडणेकर पुढे दीदी , मी, उषाने दोन चित्रपटांना संगीत दिलं आणि वीणा चिटको, पण तसं हिंदीमध्येसुद्धा सरस्वतीदेवी आणि उषा खन्ना ही दोनच नावं. 'कानून का शिकार' ह्या हिंदी चित्रपटाला मी संगीत दिले होते. त्यानंतर हिंदीमधील एका मोठ्या बॅनरच्या

पिक्चरच्या म्यूझिकचं काम माझ्याकडे आलं होतं. त्यात दीदी, आशा, उषा गायल्या होत्या. पण दुर्दैवाने ते पिक्चर मध्येच बंद पडलं .

अद्वैत धर्माधिकारी : मराठी सोडून इतर कोणत्या भाषांमध्ये तुम्ही पार्श्वगायन केलेलं आहे?

मीनाताई : मराठी सोडून पंजाबीमध्ये संगीतकार सार्दुल क्वात्रा ह्यांच्याकडे मी एक ड्युएट गायलं आहे. तर हिंदीमध्ये 'फरमाईश' ह्या चित्रपटात हुस्नलाल भगतराम ह्यांच्याकडे एक सोलो व रफीसाहेबांबरोबर एक ड्युएट गायलं आहे. रफींबरोबरचं ते ड्युएट 'आपने छिन लिया दिल इसे क्या कहते है ' हे त्याकाळी खूप लोकप्रिय झालं. त्यानंतर सी. रामचंद्रांकडे मी गायले. लग्नानंतर मात्र मी जवळ जवळ गाणं बंदच केलं. फक्त बंगालीमध्ये संगीतकार मानस मुखर्जीकडे उषाबरोबर एक ड्युएट गायलं आणि त्यानंतर संगीतकार भुपेन हजारिकांकडे आशाबरोबर एक ड्युएट अशी दोन बंगाली गाणी गायले, मात्र ह्या काळात बालगीतांनंतर मी अनेक भावगीतांना चाली दिल्या. उषा त्या गायली आहे. तसेच श्रीकांत पाडगावकरांकडून पण काही भावगीतं गाऊन घेतली, 'रथ जगन्नाथाचा' ह्या मराठी चित्रपटाला संगीत दिलं. त्यातील सुरेश वाडकरांच्या एका गाण्याला राज्य सरकारचा उत्कृष्ट पार्श्वगायनाचा पुरस्कार मिळाला. त्याच चित्रपटात शैलेन्द्र सिंग पण माझ्याकडे गायला आहे.

अद्वैत धर्माधिकारी : काही वर्षापूर्वी तुम्ही आणि उषाताईंनी काही भजनांना चाली दिल्या आणि आशाताईंकडून गाऊन घेतली त्याबद्दल जरा सविस्तर सांगाल का ?

मीनाताई : मधल्या काळात मी आणि उषा नी परत संगीत दिग्दर्शनाकडे वळायचं ठरविलं. मग आशा म्हणाली तुम्ही संगीत द्या, मी तुमच्याकडे गाते. मग आम्ही आशाच्या आवाजात भजन करायचं ठरविलं. त्यासाठी आम्ही पंडित नरेंद्र शर्माकडे गेलो त्यांनी आम्हाला भजनांची निवड करायला मदत केली. मग काही पदांना मी चाली लावल्या, तर काही पदांना उषानी आणि अशा प्रकारे

मग ती भजनं आशाच्या आवाजात रेकॉर्ड झाली. त्यातील 'फागुन के दिन चार' ह्या भजनाला आम्ही होळीचं गीत असल्यामुळे जरा जोशपूर्ण चाल लावली.

अद्वैत धर्माधिकारी : अगामी काळातील तुमचे काय संकल्प आहेत ?

मीनाताई : नवीन पिढीच्या बालकांसाठी पुन्हा काही बालगीतं करण्याचा विचार आहे. तसेच सुरेश भटांच्या काही गजलापण मला भावल्या आहेत, त्यावर सध्या विचार चालू आहे.

अद्वैत धर्माधिकारी : तुमच्या ह्या कार्याला रसिक मोहिनी तर्फे हार्दिक शुभेच्छा !!

मीना मंगेशकर – खडीकरांची गाजलेली मराठी गाणी

१) हात जोडिते पदर पसरिते
-राम राम पाव्हणं

२) माझ्या शेतात सोनंच पिकतंय
(सी. रामचंद्रांसोबत) *

३) बावरले मी बावरले
-एक होता राजा

४) वसंत हसता
-कांचनगंगा

५) मनी वसे ते स्वप्नी दिसे
-कांचनगंगा

६) दयाळा तूच आता संभाळा
-संत भानुदास

७) माझं नाव शोभंल मैना
पाटलाचं पोर

मीना मंगेशकर – खडीकरांनी संगीत दिलेली लोकप्रिय गाणी

१) असावा सुंदर चॉकलेटचा बंगला

२) माझ्या दादाला बायको आणायची

३) कुणास ठाऊक कसा पण शाळेत गेला ससा

४) आला आला पाऊस आला

५) ए आई मला पावसात जाऊ दे

६) पुस्तक नंतर वाचा आता खेळा नाचा

७) ढील दे रे ढील दे

८) सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल काय ?

९) पिरपिर पावसाची

१०) खोडी माझी काढाल तर

११) तु नसता मज संगे (वेदना मनाची)

१२) साजणी सई गं

१३) कान्हू घेऊन जाय आणि धेनु घेऊन जाय

१४) ये जवळी घे जवळी प्रिय सखया भागवंता

१५) रम्य अशा स्थानी

१६) पतित पावन नाम

सूर सनईत नादावला

अद्वैत धर्माधिकारी

मंगेशकरांकडे प्रत्येकाच्या आवाजाचे एक वैशिष्ट्य व बाज बघायला मिळतो. उषाताईंच्या आवाजाला निराळीच धार आहे. मराठी लावणीत लागणारा ठसका, भावगीतांतला प्रेमळ नखरा, भक्तिगीतांतली आळवणी त्या त्या पद्धतीने फार सुंदर साकारली जाते. लताबाई व आशाताईंच्या मानाने उषाताई कमी प्रमाणात गायल्या, तरीपण त्यांनी स्वतंत्र ठसा उमटविलेला आहे. हिंदी गाण्यांमध्येही हे अनुभवायला मिळते. त्यांचे सर्वात गाजलेले 'आरती उतारूँ मैं संतोषी माता की' हे गीत भारतभर गाजले. स्वत: लेखकाकडे ध्वनिमुद्रित आणि ध्वनिफितींचा मोठा संग्रह आहे. भारतातील विविध भाषांतील गाण्यांचे संकलन करण्याचा मानस असून गाण्यांच्या काही कार्यक्रमांसाठी निवेदन केले आहे.

सकाळचे साडेसात वाजलेले. रेडिओ सिलोनवर 'पुराने फिल्मोंका संगीत' या कार्यक्रमात घोषणा होते. 'पुराने फिल्मों के गीतों के कार्यक्रम में अब आप सुनेंगे उषा मंगेशकर को फिल्म 'सुबह का तारा' में आणि मग गाणं सुरू होतं. 'मेरी भाभी आई, भाभी आई', अतिशय खेळकर व प्रसन्न अशा या गाण्यामुळे परिचय झाला तो उषा मंगेशकर या आवाजाशी. साधारण ६१ किंवा ६२ चा सुमार असावा, त्यावेळी करमणुकीसाठी चित्रपट आणि रेडिओ हीच साधनं होती. रेडिओ हेच त्यातल्या त्यात स्वस्त आणि तिन्हीत्रिकाळ घरामध्ये उपलब्ध असलेलं साधन. मग कानी पडायला लागली उषाताईंची विविध प्रकारची, विविध भाषांतली गाणी. गाणी ऐकताना जाणवले की, उषाताई लताबाई आणि आशाताई यांची धाकटी बहीण असूनही त्यांची शैली मोठ्या बहिणींपेक्षा वेगळी आहे. उषा मंगेशकर ह्या आवाजाने गेली ४५ वर्षे हिंदी व मराठी चित्रपटसंगीतात एक वेगळा ठसा उमटवला आहे.

उषाताईंच्या गाण्याची सुरुवात त्या अगदी लहान असताना प्रफुल्लच्या 'माझं बाळ' या चित्रपटापासून झाली. संगीतकार श्री. दत्ता डावजेकरांच्या दिग्दर्शनात लता, मीना, आशा, उषा आणि हृदयनाथ या सर्व मंगेशकर भावंडांनी 'चला चला नवबाला' हे गाणे गायिले व या सर्वांवरच हे गाणं चित्रित झालं होतं.

त्यानंतर काही वर्षांनी संगीतकार मुहम्मद शफी यांनी उषाताईंकडून एका चित्रपटात एक बालगीत गाऊन घेतलं होतं. पण दुर्दैवाने हा चित्रपट पडद्यावर येऊ शकला नाही.

हिंदी चित्रपटात उषाताई अनेक नामवंत संगीतकारांकडे गायल्या आहेत. त्यामध्ये नौशाद, सी. रामचंद्र, हेमंतकुमार, सलील चौधरी, शंकर जयकिशन, रोशन, लक्ष्मीकांत-प्यारेलाल, कल्याणजी-आनंदजी, चित्रगुप्त, जयदेव इत्यादी

आघाडीचे, तर जी. एस. कोहली, इक्बाल कुरेशी, सी. अर्जुन इत्यादी गुणी संगीतकारांचा समावेश होतो.

उषाताईंनी हिंदी चित्रपटात गायलेली काही गाणी अविस्मरणीय आहेत. उदाहरणार्थ, 'माँ बेटा' या चित्रपटात हेमंतकुमार यांनी स्वरबद्ध केलेले 'प्यासी है ममता मेरी आ जारे' हे एक हळुवार गाणं. संगीतकार शंकर -जयकिशन यांच्या 'मैं नशे में हूँ' या चित्रपटातील 'ये न थी हमारी किस्मत', 'मिर्जा गालिब' या चित्रपटातील हीच गजल सुरैय्या यांनी पण गायली होती. परंतु उषाताईंनी ही गजल अतिशय परिणामकारकरीत्या म्हटली. लोकांना नवीन चालीतली ही गजल फार आवडली.

संगीतकार रोशन यांची गाणी पूर्णत: शास्त्रीय संगीतावर आधारित असत. त्यांची गाणी म्हणणं-ज्यांचा शास्त्रीय संगीताचा अभ्यास आहे, त्यांनाच शक्य होतं. 'चित्रलेखा' चित्रपटात उषाताईंनी आशाबाईबरोबर एक सुंदर द्वंद्वगीत गायलेले आहे 'काहे तरसाये जीयरा' तसंच शास्त्रीय संगीत हाच मूल प्राण मानणारे संगीतकार जयदेव यांच्याकडे मुहम्मद रफी समवेत गायलेलं 'किनारे किनारे' चित्रपटातील 'ओ पगले देर न कर पल छीन की' हे आशयसंपन्न गाणंसुद्धा असंच आठवतं. इक्बाल कुरैशी या आणखी एका गुणी संगीतकाराकडे उषाताईंनी बरीच गाणी म्हटली आहेत, त्यातील पटकन आठवतं. ते 'बनारसी ठग' या चित्रपटातील मुकेश समवेत म्हटलेलं 'एक बात पूछता हूँ' तसंच 'मुहब्बत और जंग' या चित्रपटातील 'ऐ मोहतरिम, ऐ मेहेरबाँ' हे आशा भोसलेंबरोबरचं द्वंद्वगीत, 'समाँ खूबसूरत है

तुम्हारी जरूरत है' हे सोलोगीत, दिनेश पुरोहित या गायकाबरोबर गायलेले 'कैसे समजाऊँ बडे बेशरम हो' हे विडंबनगीत.

लताबाईंबरोबर उषाताईंनी अनेक द्वंद्वगीते म्हटली आहेत. त्या काळात ती अतिशय गाजली पण होती. त्यातील लक्षात राहतात 'आझाद' चित्रपटातील 'अपलम चपलम' जी. एस. कोहली यांनी संगीत दिलेल्या 'शिकारी' चित्रपटातलं 'तुमको पिया दिल दिया.'

लताबाईंचे स्टेज शो गेली अनेक वर्षे जगाच्या कानाकोपऱ्यात होत असतात. अशा वेळी उषाताई त्यांच्याबरोबर असतात. लंडन किंवा न्यूयॉर्कमध्ये कार्यक्रम असतो. लताबाईंनी नेहमीची लोकप्रिय गाणी म्हणून कार्यक्रमात रंग जमवलेला असतो. अशा वेळी गाणं म्हणणे एक प्रचंड दडपण असते. निवेदक उषाताईंच्या गाण्याची घोषणा करतो. उषाताई स्टेजवर येतात. अतिशय लीलया गाणे म्हणतात. गाणे संपल्यावर प्रेक्षकांच्या टाळ्यांचा कडकडाट सुरूच असतो.

आशा भोसले यांच्या समवेत उषाताईंनी अनेक गाणी म्हटली आहेत. ओ. पी. नय्यर यांच्या संगीत दिग्दर्शनात 'किस्मत' या चित्रपटात 'तन नादिर दिरदा' हे रागदारीवर आधारित गीत किंवा 'ज्यूली' या चित्रपटात संगीतकार राजेश रोशन यांचे 'सांचा नाम तेरा' हे भजन. इथे एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते, लता बाईंबरोबरचे द्वंद्वगीत असो अथवा आशाबाईंबरोबरचे; उषाताईंचा आवाज दोघींच्याही गायनशैलीला नेहमीच पूरक ठरला आहे. त्यामागे त्यांचा शास्त्रीय संगीताचा रियाज निश्चितच जाणवतो. उषाताईंच्या शास्त्रीय संगीताच्या प्रभुत्वाची चुणूक दाखविणारे असेच एक गाणे आहे, 'महाभारत' चित्रपटातील चित्रगुप्त यांनी स्वरबद्ध केलेला तराणा 'दिर दिर धीम'.

मराठी चित्रपटात १९६० सालापासून १९९० सालापर्यंत उषाताईंनी अक्षरश: पार्श्वगायनाचे सुवर्णयुग गाजविले. त्यातील अनेक चित्रपट तुफान हीट झाले. दादा कोंडक्यांच्या प्रत्येक चित्रपटात नायिकेच्या तोंडी त्यांनी गायिलेली गाणी असायची. संगीतकार राम कदम यांच्याकडची उषाताईंनी गायलेली गाणी एकापाठोपाठ एक लोकप्रिय होत होती. त्याच सुमारास त्यांची भावगीतं पण रेकॉर्ड होत होती. मराठीमध्ये उषाताईंनी नाट्यगीत (नाटक : देवाचे पाय), बालगीत, चित्रपट गीत, लावणी, भावगीत, भजन व संगीत दिग्दर्शन असा चौफेर संचार केला आहे. त्यांच्या लावण्यांनी ग्रामीण जनतेला तर संगीतकार श्रीनिवास खळे व यशवंत देव यांच्या भावगीतांनी अभिजात संगीत ऐकणाऱ्या वर्गाला एकाच वेळी आकर्षित केले आहे. घरच्या संगीतकारांकडे आनंदघन (लता बाई), मीना मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर यांच्याकडे गायलेली भावगीते, चित्रपटगीते आजही लोकांच्या स्मरणात आहेत. कवी वसंत बापट यांनी रचलेली, यशवंत देवांनी स्वरबद्ध केलेली आणि उषाताईंनी गायलेली, अष्टविनायकाची गाणी, गणपती उत्सवात आणि दर चतुर्थीला भाविक भक्तांकडून गेली वीस वर्षे सतत ऐकली जातात. या सर्व व्यग्र व्यापातून वेळ काढून उषाताईंनी १९६२ साली 'आई मी कुठं जाऊ' या मराठी चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन केले आहे. विशेष म्हणजे स्वत: लोकप्रिय गायिका असूनही, ह्या चित्रपटात स्वत:च्या आवाजाचा वापर न करता लताबाई, मीनाताई, आशाबाई आणि पं. हृदयनाथ या भावंडांकडून गाणी गाऊन घेतली आहेत. तसंच 'रामरतन धन पायो' या लताबाईंच्या गाजलेल्या अल्बममधील 'श्रीरामचंद्र कृ पालु' या तुलसीदासांच्या काव्याला उषाताईंची चाल आहे.

लहानपणी उषाताईंचा ओढा चित्रकलेकडे जास्त होता. हा वारसा त्यांना त्यांच्या मातोश्री माई मंगेशकरांकडून मिळाला आहे. त्यानंतर चित्रकार एम. आर. आचरेकरांच्या मार्गदर्शनाने त्यांची चित्रकला बहरली. त्यांच्या चित्रांची प्रदर्शने भरली. जाणकारांनी त्यांच्या चित्रकलेचे कौतुक केले. त्यातील काही चित्रं रेकॉर्डसच्या मुखपृष्ठांवर आली. त्यातील काही उल्लेखनीय अशी : आदिनाथची गाणी (लताबाईंच्या गणपतीच्या गाण्याच्या रेकॉर्डवरील गणपतीचे चित्र), कोळी गीत (मुखपृष्ठ कोळीण), चाला वाही देस (लताबाईंच्या मीरेच्या भजनांची रेकॉर्ड मुखपृष्ठ एकतारी आणि वाळवंटातील पाऊलखुणा)

लताबाईंची गालीबच्या गजलांची रेकॉर्ड, अभंग तुकयाचे रेकॉर्डवरील मकरकुंडल तळपती श्रवणी कंठी कौस्तुभमणी विराजित असलेला सावळा विठुराया उषाताईंनी असा काही साकारला आहे की पाहताच देहभान हरपून जाते आणि म्हणावेसे वाटते की, उषाताईंचा कुंचला सतत रंगात भिजू दे आणि त्यांचा मधाळ, ठसकेबाज सूर गानलुब्धांना असाच नादावत राहो !

❀ ❀ ❀

✻ मानाचा मुजरा ✻

संगीत रंगभूमी हे खास महाराष्ट्राचं वैभव. १९२९ साली हिराबाई, कमलाबाई व सरस्वतीबाईंनी संगीत रंगभूमीवर पदार्पण करून रंगभूमीचं दालन कलावतींना खुलं करून दिलं. आम्ही अशा कलावतींचा उल्लेख करीत आहोत, ज्यांनी संगीत रंगभूमी समृद्ध केली.

सुहासिनी मूळगावकर, गोहर कर्नाटकी, जयमालाबाई शिलेदार, मीनाक्षी, कीर्ती शिलेदार, दीप्ती किरण भोगले, आशालता वाबगावकर, फैयाज, बकुल पंडित, वंदना खांडेकर, क्षमा वैद्य, वंदना गांगुर्डे, निर्मला गोगटे, रजनी जोशी, जयश्री शिवराम, कान्होपात्रा किणीकर, इंदू नावेलकर, आशा खाडिलकर, नीलाक्षी जुवेकर, इंदिराबाई खाडिलकर, प्रियदर्शिनी कुलकर्णी ह्यांना 'स्वरप्रतिभा' रसिक मोहिनी २००६ तर्फे मानाचा मुजरा !

'तू नसता'

मराठी चित्रपटात स्त्री गीतकार म्हणून जे एकच नाव घेता येतं त्या ज्येष्ठ कवयित्री, साहित्यिका कै. शांताबाई शेळके ह्यांचे एक निकटवर्ती उपेंद्र चिंचोरे यांनी मांडलेला हा आठवणींचा हृद्य आलेख....

एक रसिक, संग्राहक, लेखक, कवी म्हणून उपेंद्र चिंचोरे परिचित आहेत. त्यांच्या आठवणी म्हणजे खरोखरी फुलांचे दिवस....

'रेशमांच्या रेघांनी', 'पावणेर गं मायेला करू,' 'पुढे उभा मंगेश'... अशा अगणित चित्रगीतांची झलक वाचकांना अनुभवता येईल.

उपेंद्र चिंचोरे

''चिरंजीव चिंचोरे, तुम्ही छान लिहिता, पण संधी मिळाली पाहिजे, मिळेल मिळेल!''

ज्येष्ठ कवयित्री शांताबाई शेळके, यांचे वरील उद्गार, मी अनेकवेळा त्यांच्या मुखातून ऐकत असे.

आकाशवाणी पुणे केंद्राच्या दुसऱ्या मजल्यावरील टॉक स्टुडिओमध्ये, मी माझ्याच कवितांच्या ध्वनिमुद्रणासाठी माईकसमोर उभा होतो. तेथील तंत्रज्ञांनी मला काही सूचना केल्या. माझ्या हातात कवितांचे कागद होते; पण मनात पूज्य शांताबाईंचे वरील वाक्य जागे झाले होते. शांताबाईंच्या पवित्र आठवणीने जरासा हललो. आज मला रेडिओवर कवितावाचनाची संधी मिळाली आहे. पण ऐकायला शांताबाई कुठेत ? त्या लाक्षणिक अर्थानं नाहीत. पण, आजचा दिवस, 'सहा जून', त्यांच्या पुण्यतिथीचा! त्या पावन आत्म्याचा मला खरा आशीर्वाद लाभला, अन् तोही त्यांच्या पवित्र स्मृतिदिनी!

खूप लहानपणापासून अगदी शाळेत असल्यापासूनच, शांताबाईंच्या कविता खूप आवडायच्या. त्यांनी लिहिलेली गाणी मन लावून ऐकायचो. त्यांनी लिहिलेले लेख आवर्जून वाचायचो. शांताबाईंचे सोपे शब्द, बोली भाषा, चित्रदर्शी वर्णनं, यांनी मनाचा केव्हाच ठाव घेतला होता. बघता-बघता, माझ्या त्या पोरवयात शांताबाई माझे श्रद्धास्थान झाल्या.

अजून आठवतंय, चाळीस वर्षांपूर्वीपासून मी त्यांना पत्रं पाठवत आलोय. तेव्हा पोस्टकार्ड पाच पैशाला मिळायचं, तेव्हा त्या दादरला रहात. जे जे वाचनात येई, ऐकलं असेल, ते ते आवडल्याचं, मी पत्रात लिहीत असे. माझ्या दृष्टीनं आनंदाचा भाग म्हणजे, माझ्या भाबड्या भावनेला दाद देणारी, शांताबाईंची असंख्य पत्रंही मला येऊ लागली. आजवर मला आलेली त्यांची सर्व पत्रं मी मोठ्या आदराने जपून ठेवली आहेत. पोस्ट कार्डावरचं, सुवाच्य वळणदार अक्षरांत, शांताबाई पत्र लिहीत. त्यांच्या पत्राचं मला अप्रूप वाटे !

पुढे शांताबाई दादरहून, बांद्रयाला साहित्य सहवासमध्ये राहावयास गेल्या. एकदा मी त्यांच्या भेटीची इच्छा, माझ्या पत्रात व्यक्त केली. शांताबाईंचे लगोलग पत्र आले, ''मुंबईत याल, तेव्हा जरूर या!''

पुढे काही दिवसांनी, घरगुती समारंभासाठी मी मुंबईस गेलो होतो. रविवारचा दिवस ! माझ्या मनात आलं, घरातले समारंभ सारखेच असतात, आज शांताबाईंकडे समक्ष जावे. झालं, मनातल्या विचारानं, कृतीत रूपांतर केलं. बांद्र्याच्या साहित्य सहवासमध्ये गेलो. 'शाकुंतल' बिल्डिंगमधील शांताबाईंच्या दारावरची बेल वाजवली. काय आश्चर्य ! खुद्द शांताबाईंनीच दरवाजा उघडला, मी नाव सांगताच, 'पत्र पाठवणारे चिंचोरे', असे हसत हसत म्हणत, माझं स्वागत झालं. माझ्या अचानक जाण्याने, माझ्यावरचं आलेलं दडपण, केव्हाच पळालं. त्या पहिल्या भेटीत शांताबाईंचा आणि माझा



खूप छान संवाद झाला. त्या दिवशी संध्याकाळी दादरला त्यांच 'गुरुवर्य गडकरी' यावर व्याख्यान होतं. त्यांच्याबरोबरच त्यांनी मला टॅक्सीनं दादरला स्टेशनवर सोडल्याचं, आजही चांगलं आठवतंय !

ऑगस्ट पंच्याऐंशी मध्ये शांताबाई पुण्यात स्थायिक झाल्या. पुणे-सातारा रोडवरच्या आदर्शनगरमध्ये त्यांच वास्तव्य होतं. आता तर काय ? शांताबाईंकडे माझं वरचेवर जाणं सुरू झालं. पत्रं पाठवणं बंद झालं, समक्ष भेटी घडू लागल्या.

मला सुरुवातीला एका गोष्टीचं अवघड वाटलं ! ते म्हणजे त्यांना कोणत्या नावानं संबोधायचं ? त्या मला मातेसमान, त्यांच्या घरातले, भाऊ, बहिणी, त्यांची आई म्हणजेच 'वहिनी' त्यांना शांताबाई नावाने हाक

मारायचे. भाचरं आत्याबाई म्हणायचे. एकदा मी त्यांना याविषयी बोललो, त्या खळखळून हसल्या, म्हणाल्या, ''अहो चिंचोरे मला, शांताबाईच म्हणा, मुंबईला मला कॉलेजमधील विद्यार्थीही, शांताबाईच म्हणत.''

एक झालं, माझ्या सारख्या जाण्यानं, मी त्यांच्या घरचा कधी झालो, हे कळलंच नाही. शांताबाईंबरोबरच, त्यांचे भाऊ-भावजय, अप्पा आणि काकी तसेच वहिनींशी माझं आपुलकीचं नातं जडलं गेलं.

शांताबाईंचा केव्हाही सहज फोन यायचा, मी घरात असो वा नसो, शांताबाई माझ्या घरच्यांशीही प्रेमानं बोलत. चार-आठ दिवसांतून माझं त्यांच्याकडे जाणं असे !

कधी शांताबाईंकडे कुणी कामाचं बोलायला आलेलं असायचं, अशावेळी शांताबाईंची आई-वहिनी माझ्याशी गप्पागोष्टी करत आणि आत जाऊन सांगत, ''शांताबाई, तुझा चिंचोरे आलाय गं!''

शांताबाईंच्या दरवाढदिवसाला, तारखेने आणि तिथीनेसुद्धा मी जात असे. पण शांताबाईंना कौतुक होतं, ते मी त्यांच्या वहिनीच्याही वाढदिवसाला जायचो.

पुण्याच्या घरात वरच्या मजल्यावर शांताबाईंचं स्वत:चं असं एक छोटेखानी ग्रंथालय होतं. विविध साहित्यिकांचे ग्रंथ त्यांच्या मांडणीमध्ये शिस्तीमध्ये उभे ठाकलेले दिसायचे. त्या ग्रंथांना जिवापलीकडे जपत. अतिशय नीटनेटकी बांधणी असलेल्या नव्या पुस्तकांनासुद्धा त्या वेष्टणे घालीत. पुस्तकांचा मुक्तपणे वापर, वाचनासाठी त्यांना मंजूर होता. परंतु पुस्तकाची पाने दुमडलेली त्यांना खपायचं नाही. पुस्तकं खराब होतील, कोपरे मुडपतील, बांधणी उसवेल, असा वापर त्यांना अजिबात चालायचा नाही. नव्या-जुन्या पुस्तकांचा दर्पही त्यांना आवडायचा. वाचनानंतर पुस्तक जागच्याजागी ठेवण्याची त्यांची सवय स्पृहणीय होती.

शांताबाई गप्पांची मैफल फार छान जमवत. त्यांच्या गप्पांमध्ये नेहमीच निखळ-निर्मळ आनंद मिळायचा. विनोद, चेष्टामस्करीही चालायची. शांताबाईंची स्मरणशक्ती अफाट होती. कित्येकवेळा नव्या-जुन्या कविता, गीतं, सुभाषितं, श्लोक, आर्या, दिंड्या, ओव्या अगदी घडाघडा म्हणून दाखवित. बऱ्याच वेळा सुभाषितांचा अर्थ सांगत. भाषांतरित भागाचा मूळ गाभा समजावून सांगत. कधी कधी आठवणीतल्या कवितांचे वाचन होई. 'बघ आई आकाशात, सूर्य हा आला,' 'चावडीच्या पाठीमागे, जुना सरकारी वाडा,' किंवा 'आजीच्या जवळी घड्याळ कसले ?' या आणि अशा असंख्य कवितांची उजळणी होई. कधी मधी मीही, पाठ असलेल्या कविता त्यांच्याबरोबर म्हणायचो. माझी एक खोड होती, मी गाण्यांच्या चालीवर कविता म्हणायचो, की शांताबाई त्या गाण्यांच्या आठवणींवर मुक्तपणे बोलत. एकदा मात्र माझी फजिती झाली. मी एक कविता म्हटली. अगदी पाठ ! मी विचारले, ''शांताबाई, ही कविता कुणाची?'' शांताबाईंच्या चेहऱ्यावर मिस्कील भाव प्रगटले, म्हणाल्या, ''भल्या गृहस्था, या कवितेच्या कवयित्री आपल्या समोरच बसल्या आहेत.'' ती कविता होती 'पैठणी'!

शांताबाईंचं मन अतिशय हळुवार होतं. त्या खूप संवेदनशील होत्या. तेवढ्याच मनाने उमद्याही होत्या. नवागतांना त्या नेहमीच प्रोत्साहन देत, प्रेरणा देत. माझ्यासारख्यानं कुठे लिहिलं, बोललं तर त्या उत्स्फूर्तपणे दाद द्यायच्या.

चार जुलै सत्याण्णव हा दिवस मी कसा विसरेन ? भारतरत्न लतादीदी यांनी लिहिलेल्या लेखांचं संकलन, 'फुले वेचिता' या पुस्तकाच्या रूपात त्या दिवशी प्रकाशित झालं. त्या कार्यक्रमात माझं मनोगत मी व्यक्त केलं होतं, ते एक संग्राहक म्हणून! दुसऱ्या दिवशी ती बातमी वर्तमानपत्रातून आली. मी मुंबईहून पुण्याला पोहोचायच्या आत, शांताबाईंचा आनंदाने चारएक वेळ घरी फोन आला.

शांताबाईंकडे जाण्याने एक होऊ लागलं, ते म्हणजे, दोन भेटींच्या दरम्यान, त्यांनी जे जे लिहिलेलं असे, ते लेखन त्या मला आवर्जून वाचायला द्यायच्या. काही वेळा, त्या स्वत:ही वाचून दाखवीत असत. विशेष म्हणजे त्या लेखनाचे प्रयोजन, त्या संदर्भातली मूळ कल्पना, स्मृती, प्रसंग त्या लेखाशी कसे निगडित आहेत, हे सोदाहरण सांगायच्या. अगदी शेवटी म्हणजे, ज्येष्ठ कवी गुलझारजींच्या काव्याचं मराठी भाषांतर, 'त्रिवेणी'! मी भाग्यवान असा की, त्यांचं बहुतांशी लेखन, प्रसिद्धीपूर्वीच मला वाचायला मिळालं.

शांताबाई उगाचंच गंभीर मुद्रेनं बसल्यात, असं पाहिल्याचं मला कधीच आठवत नाही. हां ! प्रसन्न वृत्तीने लिहिणाऱ्या शांताबाई डोळ्यांसमोर आजही दिसतात. छोट्याशा लाकडी डेस्कवर, एकाग्र होऊन, तन्मयतेनं त्या तावच्या ताव लिहीत, तेही शाई पेनने !

शांताबाईंबरोबर प्रवास करणं, ही आनंदपर्वणी असायची. वेगवेगळ्या निमित्तानं मी त्यांच्यासह प्रवासाच्या सुखद आठवणी अनुभवल्या.

एके दिवशी भल्या पहाटे, शांताबाईंचा फोन आला. म्हणाल्या, ''चिरंजीवा, मुंबईला प्रभुकुंजमध्ये जायचंय''.

बाळकृष्णाप्रमाणे मी एका पायावर लगेच तयार झालो. आम्ही दोघं टॅक्सीनं मुंबईच्या दिशेनं निघालो. तासाभरातच, लोणावळ्यास चहासाठी गुरुकृपा हॉटेलमध्ये थांबलो; तोच कुठल्याशा कॉलेजचे विद्यार्थी-विद्यार्थिनी तेथे सहलीसाठी आलेले दिसले. ''अरे, त्या बघा शांता शेळके!'' झालं, शांताबाईंभोवती तिथेच गोल गर्दी झाली. कुणाला सही हवी होती, तर कुणाला ग्रुप फोटो हवा होता. शांताबाईही मुलांमध्ये मोकळेपणे रमल्या. आम्ही टॅक्सीत बसून, ती दिसेनाशी होईपर्यंत मुले आनंदाने हात हलवून टाटा करीत होती.

तो नारळी पौर्णिमेचा दिवस होता. खंडाळ्याच्या डोंगरमाथ्यावर पाऊस अक्षरश:

कोसळत होता. निसर्गाची ती लीला पाहून, शांताबाई गप्प बसल्या असतील ? शक्यच नाही. शांताबाईंनी कालिदासाच्या मेघदूतापासून अनेक कवींच्या पावसाच्या काव्यपंक्ती भराभर म्हणून दाखविल्या. ते डोंगर, त्या दऱ्या, ती रानझाडे, ते धबधबे सारे जणू शांताबाईंकडून स्वत:चं कौतुक ऐकून घेत होते.

आम्ही मुंबईला पेडर रोडवरच्या प्रभुकुंजच्या दाराशी आलो, तोवर आमच्या गप्पा सुरूच होत्या.

रक्षाबंधनाचा तो दिवस होता. आदरणीय दीदी, मीनाताई, आशाताई आणि उषाताई आपल्यापेक्षा वयानं लहान असलेल्या; पण कर्तृत्वाने महान असलेल्या लाडक्या भावाला, हृदयनाथांना राखी बांधून औक्षण करीत होत्या. शांताबाईंनी लिहिलेली गणपतीची गाणी, पं. हृदयनाथजी चालीत बांधत होते. मालकंस मधलं, ''आले रे गणपती आज दारी रे'', तसंच हंसध्वनी मधलं, ''दाता तू गणपती गजानन.'' तेव्हाचा हा संस्मरणीय प्रसंग माझ्या मनात मी जपून ठेवलाय.

मंगेशकर घराविषयीचा त्यांना वाटणारा जिव्हाळा सर्वज्ञात आहेच. त्या असंख्य प्रसंगांचा साक्षीदार होण्याचं भाग्य मला लाभलं, त्याचं वर्णन कसं करू? पुण्यात वा पुण्याबाहेर कुठेही कार्यक्रमाचं निमंत्रण असो, शांताबाईंबरोबर मी असे.

शांताबाईंना रेखाचित्रांची मोठी आवड होती. लहान वयात आईच्या रांगोळ्यांनी त्यांना आकृष्ट केलं होतं. त्यामुळे कुठल्याही पुस्तकात अगर मासिकात रेखाचित्र आढळलं की त्या नीट बघून घेत; आणि मग. तसंच रेखाटायचा सराव करत. त्या रेखाचित्रांची पुस्तकही जपून संग्रही ठेवत. शांताबाई गप्प बसल्या आणि हातात कागद-पेन दिसलं की, खुश्शाल समजावं, रेखांकन चालू आहे. मांजर हा त्यांच्या जिव्हाळ्याचा प्राणी ! त्यांच्या घरात, खोलीत, आजू-बाजूला सतत मांजर असायची. कधी कौतुकानं मांजराला जवळ घेऊन, अगदी माणसांप्रमाणे गप्पागोष्टी करत. तर अशा मांजराचं चित्र रेखाटण, त्यांच्या सरावाचं होत. अगदी एखाद्या कार्यक्रमाला गेल्यावर, छोट्याच्या फुरसतीच्या क्षणी निमंत्रण पत्रिकेवर, झटकन् बोकोबांची छबी, शांताबाईंच्या पेनमधून साकारली जायची. उषा मंगेशकरांनी काढलेली चित्रं पाहण्यात तर त्या भान हरखून जायच्या.

शांताबाई साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा होत्या, तेव्हा तीनही दिवस आळंदीला वाचकांचं, साहित्यप्रेमींचं जे उधाण आलं होतं, त्याला तोड नाही.

शांताबाईंचा वाचकवर्ग, चाहतावर्ग विशाल होता. त्याचं प्रत्यंतर मी अनेकदा अनुभवलं. · शांताबाई, पुण्याच्या के.ई.एम्. हॉस्पिटलमध्ये तीनशे पंधरा क्रमांकाच्या खोलीत औषधोपचार घेत होत्या. मी रोज सकाळ-संध्याकाळ आणि सुटीच्या दिवशी दिवसभर तिथेच असायचो. अशाच एका सकाळी, मी हॉस्पिटलमध्ये गेलो, शांताबाई म्हणाल्या, ''चिरंजीवा, शांताबाई आंधळी झाली, चष्म्याची काडी तुटली.''

त्या दिवशी रविवार होता. दुकानं बंद ! रास्ता पेठेत, पॉवर हाऊसपाशी दुकान शोधत मी फिरत होतो. एका दुकानापाशी कळलं, दुकान-मालक वरच राहतो. झालं, मी वरती गेलो. दुकानदाराला सांगितलं, ''अहो,' शांता शेळके यांच्या चष्म्याला काडी बसवून देणार कां?'' त्या आता दवाखान्यात आहेत,'' मी त्यांना सांगितलं, त्या साहित्यप्रेमीने, खाली येऊन दुकान उघडलं, चष्म्याची काडी दुरुस्त करून दिली, इतकंच काय, माझ्याबरोबर ते स्वत: हॉस्पिटलमध्ये आले. शांताबाई भेटल्याचा आनंद त्यांच्या चेहेऱ्यावरून ओसंडून वाहत होता. त्यांनी चष्मादुरुस्तीचे पैसे नम्रपणे नाकारले. शांताबाईंच्या आज चाळीस वर्षांतल्या कित्येक आठवणी सांगता येतील, ही तर केवळ एक झलकच आहे.

त्या एक ज्येष्ठ श्रेष्ठ साहित्यिका आणि मी एक वाचक ! पण आमच्यात अकृत्रिम आपलेपणाचं नातं चिरकाल टिकून राहिलं. माझ्या विवाहप्रसंगी त्या जातीनं पुण्यास आल्या आणि दिवसभर आम्हा कुटुंबीयांमध्ये रमल्या. माझी मुलगी मेधा हिचं नावही त्यांनीच सुचवलं. मेधा त्यांना 'शांताआजी' म्हणायची. त्यांना ते विशेष वाटायचं. त्या म्हणायच्या, ''घरातली-दारातली लहान-सहान मुलं, शांताबाई म्हणतात, फक्त मेधाच मला शांताआजी म्हणते !'' लहान मुलांची पुस्तकं त्या मेधाला आवर्जून भेट देत, त्यावर 'शांताआजी' अशीच स्वाक्षरी करीत.

पुस्तकावरून आठवलं, शांताबाई मोठ्या मनानं, ज्याला त्याला पुस्तकनिर्मितीतलं यश वाटत. एकदा मी त्यांच्याकडे गेलो असता, त्यांनी नुकतीच लिहिलेली प्रस्तावना मला वाचावयास दिली. शेवटच्या परिच्छेदापाशी मी घुटमळलो, म्हणालो, ''शांताबाई, माझे कसले आभार मानता ?'' त्यावर त्या म्हणाल्या, ''अरे बाबा, माझ्या जुन्या कविता, गाणी इतस्तत: विखुरलेली होती, ती गोळा करण्यात तुमचा मोठा हातभार होता, तुम्हाला श्रेय द्यायलाच हवे.' ते पुस्तक होतं,'फुलांचे दिवस, कळ्यांच्या राती.'

सतत भरभरून बोलणाऱ्या शांताबाई, अखेर दु:साध्य आजाराला बळी पडल्या. दुसऱ्याच्या मदतीने का होईना, शांताबाई चालत फिरत होत्या.

दवाखान्यात दाखल करण्यापूर्वीच काही दिवस आधी मी त्यांच्याकडे गेलो होतो. संगीतकार मीनाताई मंगेशकर खडीकर यांनी स्वरबद्ध केलेली ध्वनिफीत नुकतीच प्रसिद्ध झाली होती. ती मी त्यांना दिली. त्या निवांत बसल्या होत्या. म्हणाल्या, ''चिरंजीवा, ऐकू या कॅसेट.''

शांताबाईंनी लिहिलेलं गाणं होतं, 'तू नसता मज संगे, वाट ही उन्हाची,' गायलं होतं, उषाताईंनी ! त्या गाण्यानं रसिकांना वेडं केलं. आज जाणवतं, शांताबाईंनी, ते गाणं लिहिलं, म्हणजे त्यांच्या माघारी आपली रसिकांची जी मनोवस्था होईल, त्याचं शब्दचित्रणही त्यांनी आधीच लिहून ठेवलं की काय?

लता-गीतांचा हिन्दीमहासागर

जयंत कुलकर्णी

लता मंगेशकर यांच्या हिंदी गाण्यांचा ध्यास घेतलेल्या, जयंत कुलकर्णींनी एकेक गाणं जमवलं, त्यांची सूची तयार केली. जी दुर्मिळ आहेत, त्यांचा शोध घेतला. पैसे खर्च करून ती मिळवली. त्यांचा संग्रह पूर्णत्वाला नेण्याचा संकल्प दृढ आहे. त्या खजिन्यांची छोटी झलक या लेखात पाहता येईल.

\- संपादक

केसरीवाड्याच्या समोरच्या घरापाशी मी शाळेतल्या मित्रांची वाट पहात उभा असे. नू.म.वि.त जाण्यासाठी दोन चौक पार करावे लागत असत. सोबती येईपर्यंत अकरा ते सव्वाअकरा ह्या वेळी विविध भारतीवरून गाणी प्रसारित होत ती कानांवर पडत. हे अठ्ठावन्न साल होतं. माझी चौथी इयत्ता 'चलती का नाम गाडी', 'लव्ह मॅरेज', 'यहुदी'च्या गाण्यांनी भरून गेलेली होती.

चित्रपट पहायला मिळायचे शाळेच्या सभागृहात. ते होते 'वासुदेव बळवंत फडके', 'सिंहगड', 'गजगौरी' असे. वडिलांनी थिएटरमध्ये नेऊन दाखवलेला चित्रपट होता. 'डिम्बो'. 'प्रभात' टॉकीजजवळ 'क्रिकेटवीर देवआनंद' चं 'लव्ह मॅरेज' मधलं भलं मोठं पोस्टर रोज पहात असे. 'दिल के व्हर्सेस दिल का हो गया एल बी डब्ल्यू' फक्त कानांवर पडत असे. पुढे कॉलेजच्या मॅटिनीच्या दिवसांत तो पाहिला.

माझ्या मावशीचे यजमान चित्रपट शौकीन. ते बारामतीचे. पुण्यात आले की एक चित्रपट हमखास पाहायला मिळत असे. सुट्टीत बारामतीला मावशीकडे गेलो की भल्या मोठ्या कापसाच्या गिरणीच्या परिसरात मनसोक्त खेळणं व एखादा सिनेमा पाहणं, असा क्रम असे. 'टंकसाल', 'शारदा', 'देवबाप्पा', 'शिकलेली बायको', 'शरारत', 'सातजन्माचा सोबती' असे काही चित्रपट पाहिल्याचे आठवते. 'विविध भारती'वरून गीतकार, संगीतकार, गायक, चित्रपट अशी तपशीलवार माहिती अभ्यासापेक्षा पाठ असे.

६३-६४ ह्या काळात मी आपोआप बोंगो वाजवायला शिकलो. शाळेच्या व पुढे कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये ऑकेस्ट्रात वाजवीत असे.

श्यामकांत परांजपे मेंडोलीन व ॲकॉर्डिन वाजवीत असे. रमाकांत व्हायोलिन व तबला, उपेंद्र लक्ष्मेश्वर गिटार, तर अरुण नूलकर निवेदनाबरोबर तबलाही वाजवीत असे. छोटे घरगुती कार्यक्रम, गणेशोत्सव यात आम्ही ऑकेस्ट्रा सादर करीत असू. आजचे आघाडीचे वाद्यवृंद संयोजक विवेक परांजपे हा आमच्यात छोटा भिडू होता.

अनाथ विद्यार्थी गृहासमोर, कधी नाना क्लासमध्ये आमची प्रॅक्टिस होत असे. कधी तरी मिळणाऱ्या छोट्या मानधनात आम्ही बेहद्द खूष असू.

७० सालच्या जुलै महिन्यात स्टेट बँकेत रुजू झालो आणि मित्रांची हळूहळू पांगापांग झाली. श्यामकांत फिल्म डिव्हिजनमध्ये मुंबईला गेला. ७१ सालच्या मे महिन्यात माझी भोरला बदली झाली. शनिवार, रविवारी पुण्याला येत असे. आठवडाभर काम आणि भोरच्या थिएटरमध्ये सिनेमा पाहणं असा उद्योग असे. पुण्यात आल्यावर चरणजीत सिंहचं क्लव्हायोलिन, महेशकुमारचा ऑर्केस्ट्रा, इनॉक डॅनियलचं ॲकॉर्डिन असे

कार्यक्रम ऐकत असे. पण तोपर्यंत १९५५ सालच्या आधीचं चित्रपट संगीत मात्र ऐकलेलं नव्हतं. भोर मुक्कामी 'मैं नशेमे हूँ' इत्यादी जुने चित्रपट पाहिले. रेडिओ सिलोनच्या अद्भुत गीतविश्वात मात्र अजूनही पाऊल पडलं नव्हतं....

नंतरचं पर्व संगीत कोडी सोडवण्याचं होतं. 'कोहिनूर गीतगुंजार' 'कोकाकोला गीत नवनीत', 'मोदी संगीत खजाना', 'मराठा दरबार', देना बँक पुरस्कृत पहेली' अशा कार्यक्रमांतली सर्व कोडी मी पटापट सोडवीत असे. माधुरी, रसरंग ह्या मासिकांतली कोडी सोडवित असे. एखादा जुना फोटो, शब्द क्लू म्हणून द्यायचे. मग जुन्या गोष्टींसाठी अलका टॉकिजचे बी. व्ही. धारप मदतीस येत. मग ते पटकन सांगत. अरे ही 'मिस लीला'. हे 'केशवराव दाते', हा 'अमरज्योती'तला फोटो.

फिरोज रंगूनवालांचं 'फोल्मोग्राफी' हे पुस्तक इंटरनॅशनल बुक सर्व्हिस येथल्या

पराडकरांनी कलकत्त्याहून मागवून आणून दिलं. फिल्म अर्काइव्हज् मध्ये जाऊन शोधून काढून आणण्याचा छंद लागला. पण तो ७८ मध्ये थांबला. 'रसरंग'चे विजय जानोरकर माझा पत्ता शोधीत घरी आले. कोडी सोडविणारा विजयवीर होतो. त्यांच्याकडे माझा पत्ता होता. इसाक मुजावर रसरंग सोडून गेले होते. जानोरकरांनी मला कोडी तयार करण्याची ऑफर दिली. महिन्यास एक कोडं तयार करण्याचा उद्योग ७८ ते ९० पर्यंत केला. पुढे अनियमितपणे चालणारं 'रसरंग' बंद झालं व माझा उत्साहही मावळलाच....

बँकेतल्या कपूरनी बदलून जाताना माझ्या हातात, दहा कॅसेटस् ठेवल्या. 'पद्मिनी', 'रागरंग', 'बाजूबंद', 'निर्मोही', 'नौबहार', 'बाजार', 'लाहोर', 'आप की सेवामें' अशा ४५ ते ५५ ह्या कालखंडातल्या लता मंगेशकरांच्या ह्या कोवळ्या, मधुर स्वरांनी मी मंत्रमुग्ध झालो. हृदयापासून गायलेल्या गाण्यांनी माझा कब्जा घेतला.

हरमंदिर 'हमराज' ह्या कानपूरच्या गीतकोशकारानं ५१ ते ६० ह्या कालखंडाचा कोश ८१ मध्ये प्रकाशित केलेला होता. तो मिळवून त्यातले संदर्भ शोधण्याचं वेड लागलं.

फिल्म अर्काइव्हज्चे पी. के. नायर यांना मराठी चित्रपटगीतांचा अशा धर्तीचा कोश करावा असं सुचवलं; पण ते करावंसं मात्र वाटलं नाही. रफींचा गीतसंग्रह करावा असा विचारही सोडून दिला. लतागीतांनी मोहिनी टाकलेली होती.

व्हिडीओ, ऑडीओ कॅसेट्स, ७८आरपीएम व्हीसीडी, सीडी ह्या स्रोतातून लताचं एकेक गाणं जमवू लागलो.

पन्नाशीचा उंबरठा ओलांडलेला होता. ३१ मार्च २००१ मध्ये बँकेतून स्वेच्छा निवृत्ती घेतली. प्रपंचातही थोडं स्थैर्य आलेलं होतं. 'लता गंधार स्वरयात्रा' ही हाताशी आलेलं होतं.

मग एकेक फूल वेचावं, एकेक रत्न मिळवावं अशी लतागीतांच्या संग्रहाची सुरुवात झाली. हे ध्यासपर्व आजही सुरू आहे.

निवांत वेळ मिळताच रेडिओ सिलोनच्या श्रवणभक्तीचा चांगलाच ध्यास घेतला. सिलोनच्या वैविध्यपूर्ण कार्यक्रमांतून आपल्याला हवं ते मिळवायचा जणू निश्चयच केला. रसिकांना ह्या संग्रहाचे तपशील देत आहे. कारण लता मंगेशकर यांच्या ज्ञात असलेल्या गाण्याचं रूप हे एखाद्या हिमनगासारखं आहे व त्याहीपेक्षा त्यांची अज्ञात, विस्मृत; पण अतिशय अनमोल अशी गाणी, निदान त्यांची झलक पाहता यावी. रसिकांनी त्यांचा शोध घ्यावा, वेध घ्यावा असं वाटतं. माझा अल्पसा प्रयत्न काहीसा रस्ता दाखवेल असं नम्रपणे वाटतं.

लता गंधार स्वरयात्रा व हरमंदिर सिंह 'हमराज' यांचे गीतकोश यांचा वापर करून गाणी मिळताच ती अधोरेखित करून ठेवू लागलो. त्यात नजरचुकीनं समाविष्ट न झालेल्या गाण्यांची नोंदही करून ठेवू लागलो.

पहिला टप्पा १९४६ ते १९५० हा आव्हानात्मक होता. आजही आहेच.

आज मला सांगायला आनंद वाटतो की, ज्याचे रेकॉर्ड निघाले नाही. पण जी गाणी अन्य मार्गातून, ओरिजनल साऊंड ट्रॅकमधून मजकडे आलेली आहेत, त्यांचे मला अप्रूप आहे.

१९४६ पासून ते ५० पर्यंतच्या काळातली अतीव सुंदर; पण संग्रह करण्यासाठी, मिळविण्यासाठी कठीण अशी काही दुर्मिळ गाणी मजकडे आहेत.

'सोनाचांदी' (१९४६) ह्या चित्रपटातलं संगीतकार डी.सी. दत्त यांनी संगीतबद्ध केलेलं 'प्यारे बापू की जीवनयात्रा'. १९४६ मधलं वसंत देसाई यांनी संगीतबद्ध केलेलं 'चिडिया बोले', १९४८ सालातलं के. दत्ता यांचं 'मेरी कहानी', 'नन्ही नन्ही बुंदिया', 'बिहारी' (४८) या चित्रपटातलं संगीतकार रामकृष्ण शिंदे यांचं 'सब्जे की झुल्फिशानी', एस. पुरुषोत्तम यांची संगीतरचना असलेलं 'हम... घर बन जाये, महलोंसे प्यारा' हे 'मेरे ला... (१९४८) चित्रपटातलं गीत, 'आशा' (४८... हे खेमचंद प्रकाश यांनी स्वरबद्ध केलेलं 'इ... मूरत मनोहर' हे गीत अशी काही उदाह... सांगता येतील. 'मंदिर' व 'चकोरी' मध... 'लो वह आयी निंदरिया' व 'कभी हँस हँ... के नैन मिलाये' मात्र मिळाली नाहीत.

हे तपशिलानं लिहायचं कारण त... पिढीतल्या रसिकांनी ह्या गीतांच्या माधुर्या... आनंद घ्यावा, ती गाणी शोधावीत. म... विनायकांच्या 'प्रफुल्ल'चा 'मंदिर' अर्ध... राहिलेला असल्यानं 'मंदिर'चं गाणं लु... झालेलं आहे.

व्हिडीओच्या माध्यमातूनही काही गा... शोधली. रेकॉर्ड्स उपलब्ध नाही, तरीही गा... शोधता आली.

'संग्राम' (५०) मधलं 'दिन आये प्या... प्यारे बरसात के' व लताजी-शमशाद, ह... जोडीचे 'कस के कमर हो जाए तैया... व्हिडीओतून मिळवता आली. संगीतक... सरस्वतीदेवी आणि गायिका लता मंगेश... यांचं 'उदाहरण' (४९) ह्या चित्रपटाती... शास्त्रीय संगीतावर आधारित 'कभी लहरों... नाचूँ' दोन भागातलं एक सुंदर गीत आ... पी. रमाकांत या संगीतकाराचं 'भेदी बंग... (४९) मधलं 'मन में तेरी याद बसी' हे गी... 'मैं तडपूँ तेरी यादमें तू ना जा रे परदेस' 'राजमुकुट' (५०) मधलं पं. गोविंदराम य... संगीतबद्ध केलेलं गीत. दत्ता कोरगावकर य... संगीतरचना. 'माता तेरे चरणोंमें' हे '... माँ' मधलं गीत, 'नरसिंह अवतार' (४९... 'हरि को बिसारो ना' ही तबकड्यांव... मिळाली. ७८ आरपीएमच्या तबकड्यांवर... गाणी असत. पुढे ई.पी.एल.पी. कॅसेट व ... सी.डी.चा जमाना आहे. गाणी वि... मिळतात. पण विशिष्ट गाण्यासाठी प्राणप... तबकड्या जमवणाऱ्या, जपणाऱ्या र... संग्राहकाकडेच धाव घ्यावी लागते.

४६ ते ५० ह्या काळातल्या लता मंगेशकरांच्या २४७ गीतांपैकी तीनच गाणी मला मिळाली नाहीत. 'मंदिर', 'चकोरी' व 'हमारी कहानी' या चित्रपटांतील ही गाणी मिळाली तर त्यांचं स्वागत करेन. अत्यंत सुंदर पण दुर्मिळ गाण्यांपैकी माझ्या संग्रहातील काही गाणी सांगितलीच पाहिजेत.

'हीररॉंझा' (४८) मधलं अझीझखान-खय्याम जोडीचं 'काहे को, ब्याही बिदेस', श्रीधर पार्सेकर या महान व्हायोलिन वादकानं संगीत दिलेल्या 'अंधोंका सहारा' (४८) मधलं 'मैं तो नॉचू छमा छम', 'हँसते रहना' (५०) मधलं 'है कितना प्यारा समा सुहाना' हे संगीतकार श्यामबाबू पाठक यांचं संगीत असलेलं गीत, विनोद ह्या संगीतकाराची 'वफा' (५०) मधली दोन गाणी, 'तारे वहीं हैं', 'का गा रे जा रे जा रे' व मुकुंद मसुरेकर यांनी संगीतबद्ध केलेलं 'तेरे नैनोंमें निंदिया' हे 'दीदी' (४८) मधलं गीतं म्हणजे अल्पकाळ काम केलेल्या संगीतकारांच्या नितांत श्रवणीय, मधुर गीतांची सुरीली मैफल आहे.

'हमारी कहानी' ह्या हेमंत-केदार संगीतकार द्वयींच्या चित्रपटातल्या पाच गाण्यांपैकी मजकडे चार आहेत. 'देखो दुनियावालों, उजडा है संसार, प्रीतम से जा के कह दे' हे लता मंगेशकरांचं लाजबाब गाणं संग्रहात नाही, तसेच 'अमर समाधी' मधलं लता-सलामत - नजाकत त्रयींचं गाणंही नाही.

पं. गोविंदराम यांच्या 'माँ का प्यार' मधलं 'तुने जहाँ बनाकर एहसान क्या किया है' हे अर्थपूर्ण व श्रवणीय गाणं, 'शादीसे पहले (४७) या चित्रपटातलं लता-रफींचं युगुलगीत हा माझ्या संग्रहातला मोलाचा ठेवा आहे.

'दिले नाशाद को जीने की हसरत हो गयी तुमसे' हे मुजरा गीत 'चुनरिया' (४८) चित्रपटात हंसराज बहलनी संगीतबद्ध केलेलं सुंदर गीत ऐकलं, तर लक्ष्मीप्यारेच्या 'जीवनमृत्यू' मधल्या 'जमानेमें अजी ऐसे कई नादान होते हैं' या गाण्याची आठवण होईल. 'पद्मिनी' (४८) मधलं 'बेदर्द तेरे दर्द को', गर्ल्स स्कूल (४९) मधलं 'कुछ शरमाते हुए', 'खेल' (५०) मधलं 'जाते हो तो जाओ', 'निर्दोष (५०) मधलं संगीतकार श्यामसुंदर यांचं 'ये मेरी चलती फिरती लाश', किनारा (४९) मधलं मधुसूदन आचार्य यांचं 'जानेवाले ये जवानी चार दिनकी' अशी गाणी म्हणजे अर्थपूर्ण, भावपूर्ण गाण्यांचा दुर्मिळ खजिना वाटतो.

'रूपबसंत आयी नहीं', 'राजपूत' (५१), 'मेरे नैहर का बडा मोह', 'छत्रपती शिवाजी' (५२), 'चमन जल रहा है लुटा आशियाना', 'भाईसाब' (५४), 'तीसमारखाँ' (५५), 'दिलकी निगाहोंनें छीना है मेरा दिल' हे 'महासतीसावित्री' मधलं 'जग की रखवाली करनेवाले' 'आन' मधलं 'आती न यूँ बहारे' अद्यापही संग्रहात दाखल झालेली नाहीत, पण आशावादी आणि प्रयत्नवादी असल्यानं ती मिळवणं फारसं अवघडही नाही. '२६ जनवरी' मधल्या पाचपैकी एका गाण्यासाठी 'ओ चाँद मुझ को ये बता' साठी थोडी प्रतीक्षा जरूर करेन.

'राजरानी मीरा' (५६) मधली 'करुँगी मैं तो हरिसे प्रेम' व 'आओ रे गिरधारी', ५७ च्या 'रामहनुमान युद्ध' मधलं 'सुन तू मन की बीन पर', ५८ च्या सालच्या 'मेहंदी' मधलं 'मेहंदी रंग तो लायी लेकिन', 'सिंदबाद की बेटी' मधलं 'जिधर बुलाये जवा निगाहे' ही गाणीदेखील माझ्याजवळ पोहोचलेली नाहीत.

'रसिया' मधल्या 'फिर छेडने आयी है' व 'चुपके चुपके मेरा दिल' साठी मी अजूनही वाट पाहात आहे.

एकूण लेखाजोखा काढणं अवघड आहे. ८९ सालापर्यंतची 'नाही' ची यादी फक्त १८२ आहे. त्यापुढील गाणी मिळवणं अवघड नाही अन् अशक्य तर नाहीच.

पण मन आधीच्या कालखंडात गुंतलेलं आहे. त्याचा शोध घेणं, आस्वाद घेणं हे पुरवणारं काम आहे.

लता मंगेशकर हा गीतांचा शोध घेण्याचा सुरम्य विषय आहे. त्यात रमून जाणं माझा छंद आहे.

आपण जी गाणी ऐकतो, ते हिमनगाचं टोक आहे.

आत अथांग सागर आहे.

हा संग्रह माझ्यासारख्या साध्यासुध्या माणसाची पुंजी आहे. कधीतरी लताबाईंना त्याची झलक दाखवता आली तर मी धन्य होईन.

✻ मानाचा मुजरा ✻

दाक्षिणात्य कलावतींना 'स्वरप्रतिभा'च्या रसिकमोहिनी २००६ च्या विशेषांकातून मानाचा मुजरा करीत आहोत.

एल.आर. ईश्वरी, एस. जानकी, शकुंतला नरसिंहम, अरुणा साईराम, चित्रा, पी. सुशीला यांनी सुस्वरांनी दक्षिण भारताच्या रसिकांना मोहित केले. आम्ही त्यांना मन:पूर्वक आठवीत आहोत.

'खजाँची' (१९४१) ह्या चित्रपटात संगीतकार गुलाम हैदरनी एक खणखणीत आवाज आणला शमशाद बेगमचा. 'कभी आर कभी पार लागा तीरे नजर' सारखा तो रसिकहृदयात घुसला.

काळाचा महिमा असा की, शमशाद बेगम स्वेच्छेनं एकांतवासात गेल्या.

सुप्रसिद्ध सिने-समीक्षक, लेखक शशिकांत किणीकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

संपादक

बूझ मेरा क्या नाम रे -

शशिकांत किणीकर

१९७२-७३ साल असावे ते. एका वृत्तपत्रात जाहिरात आलेली होती. ती वाचून माझा डोळ्यांवर विश्वासच बसे ना ! मुंबईच्या षण्मुखानंद हॉलमध्ये पार्श्वगायिका शमशाद बेगम आपल्या गीतांचा कार्यक्रम सादर करणार होती. सिने संगीतवेड्या माझ्यासारख्या शौकिनाला ती तर एक पर्वणीच होती.

मी तडक मुंबई गाठली आणि बरोबरच्या सामानासकटच षण्मुखानंद हॉलवर गेलो आणि संगीतरजनीचे तिकीट खरेदी केले. आता उत्सुकता होती शमशाद बेगम दिसते कशी, गाते कशी हे जाणून घेण्याची. कारण तिचा फोटोही कधी पहायला मिळालेला नव्हता.

कार्यक्रमाच्या आधी बराच वेळ थिएटरवर गेलो आणि स्टेजवरून आत डोकावू लागलो. पडदा पडलेलाच होता. मंचावर बाजूला काळेभोर केस असलेली तरुण मुलगी वादकांना कसल्यातरी सूचना देत होती. आतल्या बाजूला केस पिकलेली गोरीपान बाई चष्मा सावरत शांतपणे खुर्चीवर बसलेली होती. मी अंदाज केला, हीच असावी शमशाद बेगम. तिला खोलीत जाऊन भेटणार तोच त्या खोलीतल्या माणसाने आवाज चढवून सांगितल. ''शमशाद बेगम किसी भी पत्रकारसे बात नही करेगी, सब लोग यहाँसे दफा हो जाओ.'' नाखुशीने व नाईलाजाने परत येऊन खुर्चीवर बसलो.

योग्यवेळी पडदा उघडला आणि खुर्च्यांवर सुप्रसिद्ध क्रिकेटपटू विजय मर्चंट, संगीत दिग्दर्शक नौशाद, अभिनेत्री वहीदा रेहमान व त्यांच्यासमवेत शमशाद बेगम आणि त्यांची मुलगी मिसेस बात्रा बसलेल्या होत्या. नौशादनी शमशादच्या काही अठवणी सांगितल्या. विजय मर्चंट म्हणाले, ''क्रिकेट मॅचमध्ये शतक ठोकल्यानंतर मला जसा आनंद व्हायचा, तसाच आनंद मला शमशाद बेगम यांचं गाणं ऐकल्यावर व्हायचा. त्यांचा मी असीम फॅन होतो, आहे आणि असेनही!'' थोडक्यात हा कार्यक्रम आवरल्यावर शमशादने गाण्यांचा कार्यक्रम सुरू केला. पहिलेच गाणे-'धरती को आकाश पुकारे'; त्यांचा आवाज उमटल्यावर टाळ्यांचा इतका कडकडाट सुरू झाला, तो थांबता थांबेनाच. मग शमशादनेच हात उंच करून आपल्या चाहत्यांना थांबण्याची सूचना दिली.

वास्तविक पहाता 'धरती को आकाश पुकारे' हे 'मेला' या चित्रपटातले गाणे. ते होते फक्त दोनच ओळींचे. पण शमशादने शकील बदायुनींकडून ते पुरे लिहवून घेतले व स्वतःच त्याला चाल लावून पुढे गाणे ऐकवले. हीसुद्धा आम्हा संगीतशौकिनांना पर्वणीच लाभली होती. मग त्यानंतर एका पाठोपाठ एक गाण्यांचा सिलसिला सुरू झाला. त्यामध्ये 'काहे कोमल शोर मचाये रे' (चित्रपट-आग.संगीत-राम गांगुली), 'एक दो तीन आया मौसम है रंगीन' (चित्रपट-आवारा. संगीत-शंकर जयकिशन), 'दुनियाका मजा लेलो दुनिया तुम्हारी है' (चित्रपट - बहार: संगीत-एस.डी. बर्मन), 'बडी मुश्किलसे दिलके बेकरारी को करार आया' (चित्रपट नग्मा, संगीत नाशाद,) 'अदा को झूमते हुए' (चित्रपट-सिंदबाद दी सेलर-संगीत चित्रगुप्त) अशी अनेक लोकप्रिय गाणी शमशादने अगदी ठसक्यात सादर केली.

लोकांना रहावेना. त्यांनी जोरात जल्लो
सुरू केला. नौशाद... नौशाद... नौशाद.. म
अगदी नम्रपणे ती म्हणाली, ''उनकी तो मैं
खास पेशकश की तजवीज की है मगर आ
चाहते ही है तो मुलाहिजा फरमाईये!''
त्यानंतर नौशाद मियाँची 'दुलारी', 'चाँद
रात', 'आन', 'दर्द', 'अनोखी अदा',
'मेला', 'बाबुल', 'दीदार' या चित्रपटांतल
गाणी तिने गाऊन प्रेक्षकांकडून वाहव
मिळविली. ओ. पी. नय्यर यांच्याही गाण्यां
प्रेक्षकांनी चांगलीच दाद दिली.

तीन तास चाललेला कार्यक्रम केव्
संपला ते कळालेच नाही. मी अक्षरशः दिङ्मू
होऊन तिची गाणी व तिचा आवाज पुन्
पुन्हा आठवत होतो. मुळातच जाडा, भरद
व खडा आवाज असलेली ही गायिक
वैजयंतीमाला, नर्गिस, वहीदा, मीनाकुमा
वगैरे नाजूक अभिनेत्रींना न शोभणारा; प
केवळ आवाजाच्या सामर्थ्यावरच या गायिके
अनेक गाणी लोकप्रिय केलेली होती. ती गा
ज्या ज्या वेळी प्रसृत झाली, त्यावेळ
शमशादचा आवाज आणि प्रत्यक्ष ऐकले
आवाज यामध्ये तसूभरही अंतर नव्हते.
पूर्णपणे खलास झालो होतो. आयुष्य
काहीतरी मिळवले याचा आनंद होत हो
मला !

शमशाद बेगमचा जन्म लाहोर येथे
एप्रिल १९१९ रोजी झाला. तिच्या कुटुं
गाणे-बजावणे नव्हते; पण वडिलांना शे
शायरीचा छंद असल्याने त्यांची गीतका
शायर यांच्याशी जान-पहचान होती.

दिल्ली ते संगीतकार गुलाम हैदरना आपल्या घरी घेऊन आले. त्यावेळी ते जेनोफोन रेकॉर्ड कंपनीत नोकरी करत होते. शमशादच्या वडिलांनी तिला गुलाम हैदर यांना काहीतरी गाऊन दाखवायला सांगितले. तिने एक पंजाबी धून म्हटली. शमशादच्या आवाजाची जान गुलाम हैदरना एवढी आवडली की, पहिल्या बैठकीतच त्यांनी तिच्याबरोबर गाण्याचा करार करून टाकला. यावेळी शमशाद अवघी पंधरा वर्षांची होती.

त्यानंतर लवकरच गुलाम हैदर यांच्या संगीतरचनेत तिने गायलेले पहिले गीत आले. त्याचे बोल होते - 'हाथ जोडन तेनू--- कमन खुदादी' हे होते पंजाबी भाषेत. त्या गाण्यासाठी शमशादला खच्चून पंचवीस रुपये मिळाले होते. त्या काळात ती खूपच मोठी बिदागी होती.

यानंतर नात पैगंबराचं स्तुतिपर गाणं व धार्मिक गाणी जेनोफोन कंपनीने शमशाद बेगमच्या आवाजात घेण्याचा सपाटा लावला. 'एकबार फिर कहो जरा' हे गीत याच काळात आले. शमशादची गाणी त्या काळात लाहोर, दिल्ली, पेशावर वगैरे ठिकाणी आकाशवाणीवर लागायची. ती पांचोलींच्या कानांवरही गेली व त्यांनी संगीतक़ार गुलाम हैदर यांना याच मुलीच्या आवाजात गाणी द्या म्हणून सांगितले. ''काहीही करा व या मुलीला शोधून आणा,'' असे सांगायला ते विसरले नाहीत. गुलाम हैदर यांनीच या मुलीचं पहिलं गाणं रेकॉर्ड केलेलं होतं हे त्यांना माहीतच नव्हतं. शमशाद बेगमला गुलाम हैदर यांनी पांचोली आर्ट स्टुडिओमध्ये बोलावले व तिच्या आवाजात चित्रपटासाठी पहिले गीत टेप केले. त्याचे बोल होते-'आ सजना, दोंवे रलके चली मैं परले पार'. या पंजाबी चित्रपटाचे नाव होते यमलाजट (१९४०)

१९४१ साली पांचोलींनीच 'खजाँची' हा हिंदी चित्रपट केला. त्यालाही गुलाम हैदर यांचेच संगीत होते. त्या चित्रपटात तर सारी गाणी शमशादनेच गायलेली होती. पहिल्याच हिंदी चित्रपटात सारीच्या सारी गाणी एका गायिकेने गाणे व ती अत्यंत लोकप्रिय होणे हे त्याकाळचे एक रेकॉर्डच होते.

'खजाँची' हा चित्रपट सर्वत्र गाजला. ठिकठिकाणी त्या चित्रपटाचे रौप्यमहोत्सव, सुवर्णमहोत्सव झाले. पुणे येथे त्या चित्रपटातल्या गाण्यांची स्पर्धा आयोजित केलेली होती व त्या स्पर्धेत एका चिमुरड्या मुलीने पहिला क्रमांक पटकावला होता, तिचे नाव लता मंगेशकर.

'खजाँची' नंतर शमशादने लाहोर येथेच आणखीही काही चित्रपटांत गाणी म्हटली. निर्माते/दिग्दर्शक मेहबूब काही कामानिमित्त लाहोरला गेले होते. ते शमशादला भेटले व त्यांनी तिला मुंबईला येण्याची विनंती केली. पण वडिलांना सोडून मुंबईसारख्या दूर ठिकाणी जाणे तिला योग्य वाटेना. तिच्या वडिलांचाही याला विरोधच होता. पण मेहबूबनी शमशादच्या वडिलांना अनेक प्रकारे लालूच दाखवली व त्यांना पटवले. मग शमशाद मुंबईला आली व 'तकदीर' (१९४३) साठी तिने मुंबईत आल्यावर पहिल्यांदा उसना आवाज दिला. त्यानंतर 'हुमायूँ' (१९४५) साठीही ती गायली व त्यानंतर आजपर्यंत मुंबईकरच बनली.

अत्यंत वेगळ्या व अप्रतिम आवाजाची गायिका, मुंबईत येऊन हिंदी सिनेमासाठी गाते आहे, ही गोष्ट फिल्म इंडस्ट्रीत पसरायला वेळ लागला नाही. ताबडतोब तिचा आवाज वापरण्यासाठी सी. रामचंद्र, हुस्न लाल भगतराम, नौशाद, राम गांगुली, हंसराज बहल, गुलाम महंमद, पं. अमरनाथ, शामसुंदर असे अनेक जण तिच्याकडे धावले व तिच्या आवाजात त्यांनी गाणी सादर केली. १९४० च्या दशकाच्या अखेरीस शमशादबेगम ही अगदी जादूची कांडी होती. तिच्या आवाजातली गाणी हमखास लोकप्रिय होत असत.

१९५० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काही वर्षांत शमशाद बेगमला आणखी लोकप्रियतेची उंची मिळवून देण्यात ओ.पी. नय्यर या पंजाबी संगीत दिग्दर्शकाने खूपच मदत केली. 'आरपार', 'मि. अँड मिसेस', 'नया अंदाज', 'सी. आय. डी.', 'छू मंतर',

'नया दौर' वगैरे चित्रपटांसाठी ओ. पी. नय्यर यांनी केलेली गाणी खूपच चालली. १९८० साली प्रदर्शित झालेले 'कजरा मुहब्बतवाला' हे 'किस्मत' या चित्रपटासाठी गायलेले शमशाद बेगमचे शेवटचे गाणे, तेही खूप गाजले.

आपल्या जमान्यात तिने महंमद रफी, तलत महंमद, मुकेश, मन्नाडे वगैरे गायकांबरोबर तसेच नूरजहाँ, लता मंगेशकर यांच्यासारख्या गायिकांबरोबरही द्वंद्वगीते गायली. तिचा धारदार, भरदार आणि उंच स्वरातला आवाज पहाता तिच्याबरोबर गाणारे इतर गायक फिके पडत असत. पण नंतरच्या काळात ध्वनिमुद्रणाचे तंत्र सुधारले, तेव्हा लता मंगेशकरच्या आवाजाला प्राधान्य दिले जाऊ लागले व त्यामुळे शमशाद बेगमचे गाणे मागे पडायला सुरुवात झाली.

शमशाद बेगमचे वय आज ८७ वर्षांचे आहे. जुन्या जमान्यातल्या आठवणी उगाळत ती एकटीच घरी बसलेली असते. बरोबर तिची कन्या व जावई असतात. ती कधी मुलाखती देत नाही अथवा कुणाला आपला फोटो काढू देत नाही. सध्याच्या री-मिक्सच्या जमान्यावर ती एकदम खुष आहे. ''आमच्या गतकाळातली गाणी पुन्हा एकदा लोकांसमोर येत आहेत, आणखी माझ्यासारख्या गायिकेला काय हवं,'' असे ती म्हणते आणि आनंदून जाते.

> अन्नपूर्णादेवींच्या संगीतसाधनेबद्दल, त्यांच्या व्यक्तिगत जीवनाबद्दल रसिकांना फारसे ठाऊक नाही. त्यांच्यावरील पुस्तकातून काही पैलू उलगडतात. त्याबद्दल काही थोडेसे.
>
> संपादक

अन्नपूर्णादेवी : एकांतगीत

सुलभा तेरणीकर

'An unheard melody : Annapurna Devi - An Authorised biography' ह्या स्वपनकुमार बंदोपाध्याय लिखित पुस्तकानं लक्ष वेधून घेतलं.

पुस्तकाच्या आरंभी अन्नपूर्णादेवीचे चार बोलके शब्द आहेत. त्या लिहितात 'माझे वडील आणि गुरू बाबा अल्लाउद्दीनखान, यांच्या शिष्यपरिवारापैकी मी एक संगीताची नम्र विद्यार्थिनी आहे.

त्या लेखकाला म्हणतात, 'खरं तर हा फार मोठा कालापव्यय आहे, असं वाटतं आणि जिद्दीनं तू माझ्याबद्दल ग्रंथाचा खटाटोप केलास, त्या तुझ्या सहनशीलतेचं कौतुक वाटतं.'

'वाचकांना बाबांच्या महानतेची, त्यांच्या त्यागाची, त्यांनी शिष्यपरिवाराला दिलेल्या संगीतविद्येच्या स्वर्गीय देणगीची थोडी कल्पना आली तरी मला आनंद होईल.

'मात्र अतिशयोक्ती, रोमांचरंजकता टाळावी असं वाटतं. माझ्या जीवनाबद्दल म्हणशील तर त्यात लिहिण्याजोगं फारसं काही आहे, असं वाटत नाही...'

पुस्तकात या पुढे पात्रपरिचय आहे.

बाबा अल्लाउद्दीन खान : १८६२ च्या सुमारास त्रिपुरा-पूर्व पाकिस्तानातला जन्म. १९१८ पासून मध्य प्रदेशातील मैहर संस्थानात वास्तव्य. विख्यात सरोदवादक. अलीअकबर खाँ, पं. रविशंकर, अन्नपूर्णादेवी, बहादूरखाँ, निखिल बॅनर्जी, ज्योतिन भट्टाचार्य, पन्नालाल घोष यांचे गुरू. मृत्यू : ६ सप्टेंबर १९७२.

उस्ताद अलीअकबर खाँ : जन्म - १४ एप्रिल १९२२, पूर्व पाकिस्तानातल्या शिवपूरचा. मैहरसेन या घराण्याचे अध्वर्यू. विश्वविख्यात सरोदवादक. कोलकात्याच्या अली अकबर कॉलेज ऑफ म्यूझिकचे संस्थापक. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत विदेशात १९५५ साली सरोदवादनातून नेणारे भारतीय कलावंत. संगीतकार व आघाडीचे प्रज्ञावंत वादक.

अन्नपूर्णा देवी : भारतातली एकमेव सूरबहार वाद्य वाजवणारी स्त्री कलावंत. १९२७ साली मैहर येथे चैत्र पौर्णिमेचा जन्म. बाबा अल्लाउद्दीन खाँ यांची सर्वांत धाकटी मुलगी. अलमोरा येथे १५ मे १९४१ या दिवशी पं. रविशंकर यांच्याशी विवाह. ऑक्टोबर १९८२ मध्ये घटस्फोट. ९ डिसेंबर १९८२ मध्ये ऋषिकुमार पंड्या यांच्याशी पुनर्विवाह. अतुल मर्चंट, पं. हरिप्रसाद चौरसिया, सरोदवादक वसंत काबरा, डॅनियल ब्रॅडली इ. शिष्यपरिवाराच्या गुरू.

पं. रविशंकर : भारतरत्न विश्वविख्यात सतारवादक. श्रेष्ठ संगीतकार. अनेक रागांच्या नवनिर्मितीचे जनक. ७ एप्रिल १९२० साली बनारस येथे श्रीमंत, विद्वान कलावंताच्या घराण्यात जन्म. जुलै १९३८पासून मैहर येथे बाबा अल्लाउद्दीन खाँ यांच्याकडे सतार वादनाचे शिक्षण. आकाशवाणीवर दिल्ली येथे उच्चपदविभूषित असा कार्यकाल. अन्नपूर्णा देवी व पं. रविशंकर यांचा पुत्र शुभेन्द्रशंकर याचा ३० मार्च १९४१ रोजी जन्म.

अन्नपूर्णा देवीबरोबर फक्त पाच जुगलबंदीच्या मैफली. त्यानंतर अलीअकबर खान, उस्ताद अल्लारखाँ, यहुदी मेन्युहिन यांच्याबरोबर गाजलेल्या मैफली. 'धरती के लाल', 'पथेर पांचाली', 'अनुराधा', 'गोदान' इ. चित्रपटांचे संगीतकार.

२३ जानेवारी १९८९ मध्ये सुकन्या यांच्याशी विवाह. कन्या अनुष्का शंकर त्यांच्याकडे सतारवादनाचे शिक्षण घेत आहे.

शुभेंद्रशंकर : ३० मार्च १९४१ रोजी जन्मलेला 'कलावंत', माता-पित्यांचा कलावंत पुत्र. जे.जे. स्कूल ऑफ आर्टस्‌चा विद्यार्थी. उत्तम सतारवादक.

१९७० नंतर अमेरिकेत वडिलांचा मदतनीस, सहयोगी. अमेरिकन पत्नी लिंडा, सोमशंकर व कावेरी या मुलांसह रहात असता १५ सप्टेंबर रोजी वयाच्या ५१ व्या वर्षी अकस्मात मृत्यू.

कमला : उदयशंकर यांच्या नृत्यवृंदातली कलावती. रविशंकरांची प्रेमिका. दिग्दर्शक अमिय चक्रवर्तींची पत्नी. अमियदांच्या निधनानंतर अमेरिकेत ८१ सालापर्यंत रविशंकरांबरोबरच्या सहचारिणी. आता चेन्नईत वास्तव्य. पं. रविशंकरांचे पिता बॅरिस्टर श्यामशंकर चौधरी तत्त्वज्ञानाचे जिनिव्हा व न्यूयॉर्क विद्यापीठाचे प्राध्यापक. विश्वविख्यात नर्तक उदयशंकर हे रविशंकरांचे बंधू.

हेमांगिनी देवी – रविशंकरांच्या मातोश्री, **मदिना बेगम –** अन्नपूर्णादेवींच्या मातुश्री आणि मैहरची पूज्य देवता शारदामाता.

ही पुस्तकातली पात्रपरिचयाची कथा.

त्यानंतर मध्यप्रदेशच्या मैहरचं १९१७ ते ४१ ह्या कालखंडातलं एक सुंदर चित्र उभं राहतं. रामायणात वर्णन केलेली तमस नदी मैहरमधून वाहत असे. आंबा व चंदनवृक्षांची दाटी असे. शकुंत तलावही गर्द वृक्षांनी घेरलेला असे. आता हा परिसर एखाद्या दंतहीन, विकलांग वृद्धासारखा भासतो असं लेखक म्हणतो.

१९२७ सालच्या चैत्र पौर्णिमेला जन्मलेली सावळी, कृश बालिका - तिची जन्मवार्ता ऐकताच मैहरचे महाराजा उद्गारले, 'बाबा तुमच्या घरी अन्नपूर्णा जन्मलेली आहे. ती सुख-शांती, समृद्धी घेऊन येईल. तिला रोशनआरा हे मुस्लिम नाव मिळतं, पण महाराजांनी दिलेलं अन्नपूर्णा रूढ झालं.....

अन्नपूर्णा, अलीअकबर ह्या भावंडांना लहानपणी सांभाळणारी वृद्ध कुलसुम लेखकाला भेटते अन् म्हणते, 'अन्नपूर्णा सगळं विसरलेली दिसते. तिला शारदा माँचीही आठवण होत नाही का? 'इतरांसारखं ह्या भावंडांचं बालपण होतं. पण त्यांचे संगीताचे धडे घेणं मात्र वैशिष्ट्यपूर्ण वेगळं होतं.

तीव्र बुद्धीच्या अन्नपूर्णेला जाता-येता कानांवर पडतं ते पाठ होतं, हे बाबांच्या लक्षात येतं. तिला संगीत शिकवायचं..... पण थोरल्या जहाँआरानं ढाक्क्याहून माहेरी परतल्यावर आईला सांगितलेलं होतं की, 'तुझा तानपुरा चुलीत घालू....' असं सासरचे लोक म्हणाले. फिकटलेल्या चेहऱ्यांच्या, अश्रूभरल्या डोळ्यांच्या जहाँआरानं सासरी झालेल्या छळानं हाय खाल्लेली होती. ३९ सालच्या डिसेंबरात आईच्या मांडीवर प्राण सोडलेले होते.... ही घटना ताजी होती..... मुलीच्या हाती वाद्य द्यायचं म्हणजे ..... बाबांच्या मनात घालमेल चाललेली होती.... पण ह्या लेकीला संगीताचं शिक्षण द्यावं की नाही, हा प्रश्न एका छोट्याशा घटनेनं सुटलाच. ग्रामोफोन रेकॉर्ड्स् ऐकणं, पतंग उडवणं आणि बाबांचं शिकवणं मुळीच गंभीरपणे न घेणाऱ्या आपल्या मोठ्या भावाला ही छोटी बहीण बाबांनी शिकवलेलं सही सही सांगत होती, त्याला मदत करत होती. हे बाबांनी त्यांच्या नकळत पाहिलं आणि संगीतविद्या अन्नपूर्णेला द्यायची हे ठरलंच...

सरस्वतीच्या मूर्तीसमोर छोट्या अन्नपूर्णेला बाबांनी ओढूनच नेलं. 'आजपासून तू माता सरस्वतीला संगीत ऐकवायचं, स्वतंत्र जगायचं आणि तुझं लग्नबंधन फक्त संगीताशी आहे हे ध्यानात ठेवायचं. अन्नपूर्णानं फक्त बाबांचा आदेश स्वीकारायचं ठरवलं...

बाबांच्या संग्रहात असलेल्या सतार, सरोद, सूरबहार पैकी त्यांनी अन्नपूर्णेला सूरबहार हे वाद्य दिलं. सतार ही लोकरंजनाचं प्रतीक तर सूरबहार हे आत्मरंजनाचं ! बाबांना मिळालेल्या गुरुविद्येला अन्नपूर्णेच्या हाती सोपवताना त्यांनी सूरबहाराचं हे साधन मानलं....

स्वत:चा अहंकार सोडून शाश्वत संगीताच्या साधनेसाठी अन्नपूर्णेचा प्रवास सुरू झाला....

बाबांनी शिकवलेल्या धृपदशैलीचं अंग, शांतपणे. शिस्तबद्धपणे चाललेलं अध्ययन, एकेका सुरातून उभं राहणारं रागाचं रूप, वादनात मींड, गमक, दोन्ही हात व मस्तक व हृदय यांचा समतोल वापर, वादनातली आत्ममग्नता, गांभीर्य यामुळे अन्नपूर्णादेवींची वादनाची स्वतंत्र शैली निर्माण झाली.

बनारसच्या श्यामसुंदर चौधरी [illegible] बॅरिस्टर, उच्चविद्याविभूषित, तत्त्वज्ञा[illegible] कलावंत घराण्यातील सुपुत्र उदयश[illegible] रविशंकर राजेंद्रशंकर यांचा परिचय घड[illegible] चौदा वर्षांच्या अन्नपूर्णेचा रविशंकर [illegible] देखण्या, हरहुन्नरी कलावंताशी विवाह झा[illegible] शुभोचं आगमन झालं. रविशंकर - अन्न[illegible] यांच्या जुगलबंदीच्या ५ मैफिली झाल्[illegible] अन्नपूर्णादेवींच्यावर प्रशंसेची बरसात झा[illegible] दिल्लीच्या उच्चभ्रू वर्तुळात ह्या अनो[illegible] मैफलींची चर्चा झाली.

पत्नीवर प्रेम करणाऱ्या रविशंकरना अ[illegible] स्त्रियांवरही प्रेम करण्यात काही गैर वा[illegible] नसे. कलेतील एकेक शिखरं सर करणा[illegible] रविशंकरच्या भोवती मोहजाल हो[illegible] लक्ष्मीशंकर ह्या भावजयीच्या बहिणीव[illegible] कमलावर रविशंकर प्रेम करीत असल्या[illegible] चाहूल अन्नपूर्णादेवींना लागली होती[illegible] सतार-सूरबहारच्या जुगलबं[illegible] लोकानुरंजनाच्या सतारीची वाहवा होत[illegible] विशुद्ध,आत्मानंदात मग्न, लीन सूरबहार[illegible] वादनाचं आंतरिक सौंदर्य, ध्रुपदअंगाची [illegible] ह्यावर कुणीतरी कालबाह्यतेचा, संथप[illegible] आरोप केला... हे निमित्तमात्र होतं.... त्यातून विरोधी, विसंवादी सूर लागल[illegible] रविशंकर-अन्नपूर्णा यांच्या वैवा[illegible] जीवनाच्या मैफलीतले सूर विखरून जाण्[illegible] ती नांदी होती....

शुभोचं संगोपन, अलीअकबरखाँ[illegible] म्यूझिक कॉलेजात अध्यापन आणि मैफ[illegible] दरवाजे मिटून घेऊन आळवलेलं एकांत स[illegible] हे अन्नपूर्णादेवींनी स्वीकारलं....

बाबांना हे सर्व न सांगताच सम[illegible] संगीताच्या अवलियाचं अंत:करण द्रव[illegible] थोरल्या जहाँआराच्यासाठी हळह[illegible] तसंच.... अन्नपूर्णादेवींच्या जीवनातलं मौ[illegible] सुरू झालं.

संवाद होता छोट्या शुभोशी... [illegible] सूरबहारशी....

जीवन – एक मधुर मैफल

टी. वसंताकुमारी

संगीत हे ईश्वरी वरदान असतं आणि आपलं जीवन ही ईश्वरानं बहाल केलेली देणगी असते. गाण्यातून ईश्वराचा शोध घेणाऱ्या भारतरत्न एम. एस. सुब्बलक्ष्मींनी आपल्या जीवनाची सुरेल मैफल जागवली. श्रोत्यांनाही त्यात सहभागी करून घेतलं. संगीतसाधना आणि जीवन अभिन्न मानलं. त्याची थोडीशी झलक पाहता येईल.

संपादक

१६ सप्टेंबर १९१६ रोजी भरणी नक्षत्रावर जन्मलेल्या बालिकेचं भविष्य वर्तवलं गेलं होतं, ही मुलगी जगावर राज्य करेल. मदुराईच्या मीनाक्षी मंदिराच्या परिसरातल्या एका लहानशा गल्लीत वीणाई षण्मुखवादिक ह्या कलावतीच्या घरात जन्मलेल्या मुलीला सारेजण कुंजाम्मा म्हणत असत. पुढे भारतरत्न म्हणून गौरविलेल्या एम.एस. सुब्बलक्ष्मी ह्या विश्वविख्यात गायिकेचं बालपण आर्थिकदृष्ट्या सामान्य होतं, तरी कलासंपन्न होतं. वीणावादन, नादस्वरमनं भारलेल्या वातावरणात ती मोठी झाली.

आईच्या वीणावादनात ती सहभागी होत असे. भाऊ शक्तीवेलु मृदंगवादनात असामान्य लयकारी करीत असे व बहीण वीणावादन करीत असे. लयकारी व वीणावादनातल्या श्रुतींमुळे छोट्या कुंजाम्माचं गाणं श्रुतिमनोहर होऊ लागलं.

मद्रास म्यूझिक अकादमीत किशोरवयीन कुंजाम्मानं स्वतंत्रपणे गायन सादर केलं तेव्हा जाणकारांनी प्रशंसा केली. गुरू श्रीनिवास अय्यंगार यांचं मार्गदर्शन व घरातील सुरेल संस्कारांनी तयार गळ्याच्या कुंजाम्मानं कलाविश्वात लक्ष वेधून घेतलं. पुरुषांचं वर्चस्व असलेल्या तात्कालीन संगीतक्षेत्रात ह्या छोट्या मुलीनं प्रवेश केला. तिची ध्वनिमुद्रिकाही बाहेर पडलेली होती.

लयकारीतले दिग्गज अलतुर बंधू तिच्या अचूक स्वरांनी मंत्रमुग्ध झाले. कंठसंगीतात तिचं नाव गाजत होतं. १९३६ मध्ये 'सेवासदन' ह्या तामिळ बोलपटातून त्या रूपेरी पडद्यावर झाल्या. 'शकुंतला' व 'सावित्री' मधून चित्रपटात आल्या.

ह्यावेळी त्यांच्या आयुष्यात टी. सदाशिवन आले. गांधीवादी तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते, स्वातंत्र्यसैनिक, निर्भीड पत्रकार सदाशिवन तरुण होते. १९४० साली दोघे विवाहबद्ध झाले. आपल्या दोन मुली राधा व विजया त्यांनी सुब्बलक्ष्मींच्या स्वाधीन केल्या. सुब्बलक्ष्मी ह्या मुलींच्या आई झाल्या व लोकविलक्षण अशा त्यांच्या कलासंसारास सुरुवात झाली.

चित्रपटातील कामे मुख्यत: आर्थिक बाजू सावरण्यासाठी होती. त्यांच्या पतींनी 'कल्की' ह्या साप्ताहिकाची निर्मिती केली. तमिळविश्वात आज त्याची लोकप्रियता शिखरावर टिकून आहे. १९४४ साली सदाशिवननी तमीळ मध्ये 'मीरा'ची निर्मिती केली. १९४७ मध्ये त्याची हिंदी आवृत्ती निघाली. त्यांच्या मीराभजनांनी रसिकांवर मोहिनी टाकली. लता मंगेशकरांनी अनेक वेळा 'मीरा' पाहिल्याचं आपल्या आठवणीत नमूद केलेलं आहे. त्यानंतर मात्र चित्रपटातून दूर होण्याचा निर्णय त्यांनी घेतला व अभिजात शास्त्रीय संगीताला वाहून घेतलं.

महात्मा गांधींच्या इच्छेनुसार त्यांनी हरि तुम हरो जन की पीर' हे भजन ध्वनिमुद्रित करून पाठवलं होत. महात्माजींच्या शेवटच्या वाढदिवशी त्यांना हे आवडतं भजन एकेवलेलं होतं. स्वातंत्र्यदिनी म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ ह्या दिवशी सुब्बलक्ष्मी व त्यांचे प[…] महात्माजींना दिल्लीत बिर्ला हाऊसमध्ये भेट[…] होते. त्या दिवशी महात्माजींना त्यांची प्रि[…] रामधुन 'रघुपती राघव राजाराम' ऐकव[…] होती.

हिंदुस्थानी संगीताचं शिक्षण त्यांनी [...] नारायणराव व्यास यांच्याकडे घेतले, त[...] बनारसच्या सिद्धेश्वरी देवींकडून ठुमरी, टप[...] याचं शिक्षण काही काळ घेतलं.

विख्यात नृत्यांगना बालसरस्वती यां[...] 'पदम्'चं शिक्षण दिलं.

देश-विदेशांत त्यांच्या मैफली हो[...] लागल्या. केवळ दाक्षिणात्य शैलीत गाणा[...] अशी त्यांची ओळख नव्हती. कारण कबी[...] सूरदास, नानक, मीरा, तुकाराम यांच्या रच[...] त्या गात असत.

एडिंबर्गच्या म्यूझिक फेस्टिव्हलम[...] १९६० मध्ये त्यांनी विदेशात गायन के[...] लंडनच्या रॉयल अल्बर्ट हॉलमध्ये १९[...] साली सादर केलेल्या कार्यक्रमासाठी रा[...] एलिझाबेथ स्वत: हजर राहिलेल्या होत[...] ६६ साली सुब्बलक्ष्मी युनोत गायल[...] देशातल्या त्यागराज महोत्सवातही त्यां[...] गायन केलेलं आहे. पण तितक्याच सहज[...] खेड्यातून आलेल्या त्यांच्या साध्याभोळ[...] चाहत्यांनाही त्या गाऊन दाखवीत. अग[...] क्रेमलिन राजवाड्यात गायल्या तशा !

तिरूपती देवस्थानासाठी अन्नमाचार्यां[...] कृती, बहात्तर राग मेळ त्यांनी केले. का[...] कामकोटी पीठाच्या शंकराचार्यांनी आचंद्र[...]

टिकणारे संगीत म्हणून ते गौरविले.

ध्वनिमुद्रिका, ध्वनिफिती, मैफली यातून मिळालेल्या मानधनातून फार मोठे अर्थसाहाय्य त्यांनी मेडिकल रिसर्च सेंटर्स, वैदिक पाठशाला यांना केलेलं आहे. शांतिनिकेतनचा 'देशिकोत्तमा सप्तगिरी संगीत विद्वन्मणी', मद्रास म्यूझिक अकादमीचा 'संगीत कलानिधी' इ. पुरस्कार त्यांना मिळाले.

सुब्बलक्ष्मींनी अमर केलेलं 'व्यंकटेश सुप्रभातम्' व 'विष्णुसहस्रनाम' यांना जगभरातून आजही प्रचंड मागणी आहे. अद्भुत गायकी असलेल्या सुब्बलक्ष्मी व्यक्तिगत आयुष्यात कमालीच्या साध्या होत्या. फुलांचे सुंदर हार, दाक्षिणात्य पद्धतीची रांगोळी कोलम त्या तन्मयतेनं करीत असत. कार्यक्रमाला जायच्या आधीच तयार होऊन बसलेल्या सुब्बलक्ष्मी साथीदारांना विचारीत, 'आज आवाज ठीक आहे ना'?

अंगावरील मोजक्या दागिन्यांशिवाय जडजवाहीर अन् स्वत:चा असा बँक बॅलन्स नव्हता. ह्या शतकातील असाधारण व संपूर्ण भारतीय व्यक्तित्वं असं त्यांचं वर्णन खरोखर सार्थ ठरावं.

त्यांच्या गाण्याचं वर्णन विख्यात संगीताचार्य मैसूर वासुदेवाचार्य करतात, 'लग्नात केवळ काळी पोत व काचेच्या बांगड्यात घातलेली आपली मुलगी काही काळानंतर वस्त्रालंकारांनी सजलेली पाहताना पित्याला जे वाटतं तसं आपली रचना सुब्बलक्ष्मींच्या कंठातून ऐकताना तिचं सुभग रूप पाहून संगीतकाराला वाटतं .....'

त्यांच्याविषयी एका समीक्षकानं म्हटलं आहे, 'त्यांचे आलाप आणि योग्यवेळी श्वास घेऊन मग तार सप्तकातला लावलेला षड्ज श्रोत्यांचे भक्तात रूपांतर करतो.'

'दीप मंगल ज्योत नमो' म्हणताच आंधळ्यांना ज्योत प्रकाशमान झाल्याचे जाणवते.. तर 'चंद्रशेखरम् आश्रये' म्हणताच नास्तिकालाही ईश्वरी अस्तित्वाची जाणीव होते.

भारतरत्न एम.एस. सुब्बलक्ष्मी यांनी दोन वर्षांमागेच अखेरचा श्वास घेतला. जीवन हे सुंदर असतं, अर्थपूर्ण असतं, सुरेल असतं, हेच त्यांचं स्वरमय जीवन सांगतं... जीवनाची सुमधुर मैफल संपली तर स्वरमयी अस्तित्व अखंड असतं... हे त्यांचं संगीत सांगतं.....

अष्टावधानी

कर्नाटक संगीतात गायकाला अष्टावधानी असावं लागतं असा संकेत आहे. श्रुतीयुक्त गायन, लयीवर प्रभुत्व, साहित्याची जाण व भावार्थ जाणणे, भाव प्रकट करणे, योग्य उच्चार, रागाचे वैशिष्ट्य, गमकांचा प्रयोग ही अष्टावधानी गायकाची लक्षणे.

सुब्बलक्ष्मी ह्या खऱ्या अर्थाने अष्टावधानी गायिका होत्या, असं म्हटलं जातं.

अल्ला तेरो नाम ; भारतरत्नगीत

संगीतकार जयदेव यांनी 'हम दोनो' चित्रपटाच्या सुप्रसिद्ध भजनासाठी - 'अल्ला तेरो नाम' साठी सुब्बलक्ष्मींना विचारलं होतं.

१९४७ सालीच सुब्बलक्ष्मींनी चित्रपटाकडे पाठ फिरविली असल्याने त्यांनी चित्रपटगीत गाण्यास नम्र नकार दिला.

लता मंगेशकर यांनी हे भजन अजरामर केलं.

रंगभूमीची कुलवधू

रंगभूमीच्या मरगळलेल्या अवस्थेत ज्योत्स्नाबाईंनी 'आंधळ्यांची शाळा' या नाटकात १९३३ मध्ये प्रवेश केला अन् सांजदीप लावला. ४२ सालच्या 'कुलवधू'नं तर इतिहास घडविला. संगीत आणि रंगभूमी यांचं तुटलेलं नातं जोडलं गेलं. 'माझिया माहेरा जा...'ह्या भावगीताशी रसिकांचे ऋणानुबंध जोडले. शास्त्रीय संगीताची मैफलही जागती ठेवली.... 'आराधना' सारखं नाटक, 'अंतरीच्या खुणा'च्या आठवणी लिहून लेखणीही चालविली...ज्योत्स्नाबाईंच्या चौफेर कलासक्त जीवनाचे काही कवडसे ....

– संपादक

संगीत नाटकांचे वैभवशाली दिवस सरत चालल्याच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या. संगीत नाटक कंपन्यांचे संसार मोडकळीला येत होते. देवयानी, भामिनी, रुक्मिणी, सुभद्रा, सिंधू रंगभूमीवर पुरुष करीत. ते पाहण्याची रसिकांची मानसिकता बदलत चालली होती. १९१३ मध्ये दादासाहेब फाळक्यांच्या मूकपटाच्या मालिकेत 'भस्मासुर मोहिनी' मध्ये कमलाबाई गोखले व दुर्गाबाई कामत ह्या मायलेकींनी रुपेरी पडद्यावर पदार्पण केले होते.

१९२९ मध्ये हिराबाई, कमलाबाई, सरस्वतीबाई यांनी पुढे येऊन संगीत रंगभूमीवर पाऊल टाकलं.

१९३१ सालच्या 'आलमआरा' ह्या टॉकीनं संगीत रंगभूमीसमोरची वर्दळ ओसरलीच..... अशावेळी 'नाट्यमन्वन्तर' १९३३ साली 'आंधळ्यांची शाळा' हे गद्य परंतु संगीतही असलेलं एक नाटक घेऊन आले.

ज्योत्स्नाबाई सांगत, 'त्यातल्या बिंबा या नायिकेसारखीच निरागस, बाहेरील जगाची कल्पना नसलेली अवघी एकोणीस वर्षांची मुलगी होते...' वर्तक, अनंत काणेकर, केशवराव भोळे, रांगणेकर अशी नव्या विचारांची माणसं भोवती होती. बर्नार्ड शॉ, इब्सेन अशी नावं कानांवर पडत असत. चौपाटीवर त्यांच्या तावातावानं चर्चा होत तेव्हा एका छोट्या मुलाची नुकतीच आई झालेल्या ज्योत्स्नाबाई वाळूवर रेघोट्या मारत

किंवा शहाळ्याचं पाणी पीत ते ऐकत असत. पती केशवराव भोळे यांच्या प्रोत्साहनानं अखेर ज्योत्स्नाबाई सामाजिक घडीच्या नाटकात नितांत सुंदर संगीत घेऊन रंगभूमीवर आल्या. सालं होतं १९३३.

पुण्यातल्या प्रयोगात काही संस्कृतिरक्षक टिंगलटवाळी करण्यासाठी, प्रयोग बंद पाडण्यासाठी, भजी मारण्यासाठी आले होते. ज्योत्स्नाबाईंच्या प्रवेशानं, बिंबाच्या हसऱ्या भूमिकेनं प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला. 'एकलेपणाची आग लागली हृदया' ह्या गाण्यानं जी मंडळी आली होती ती विरघळली. आणलेली भजी मध्यंतरात चहापानात खाल्ली गेली. त्यांचं कौतुक केलं गेलं.

३३ ते ४१ या काळात गाण्याचा रियाज, मुलांचं संगोपन, घरप्रपंच ह्यात व्यग्र असलेल्या ज्योत्स्नाबाई 'नाट्यनिकेतन'च्या 'कुलवधू' मध्ये आल्या. २३ ऑगस्ट १९४२ हा दिवस पहिल्या प्रयोगाचा होता. अभिनेत्री पत्नी हीदेखील कोणत्याही मिळवत्या स्त्रीसारखी घर सांभाळणारी; पती, सासू-सासरे यांची मनं राखणारी 'कुलवधू' असू शकते.... कथानक. सुंदर सेट, मा. कृष्णाचं सुमधु संगीत, ज्योत्स्नाबाईंनी उभी केलेली घरंदा भानुमती, 'मनरमणा मधुसूदना', 'बोला अमृ बोला' सारख्या गाण्यांची मैफल, रांगणेकरांच देखणा, आटोपशीर प्रयोग... ह्यांनी इतिहा घडला.

बांदोड्याच्या महालक्ष्मीच्या देवळाजव राहणाऱ्या केळेकर कुटुंबातली दुर्गा मोगऱ्याच अबोलीच्या वळेसराच्या बदल्यात भरप गाणी म्हणून दाखवीत असे. गिरिजाबा केसरबाई या भगिनींना शिकवायला येणा वझेबुवांची तालीम ऐकून गाणं पाठ म्हण असे. हिराबाईंचं 'साध्वी मीराबाई' पा त्यातलं 'राधेकृष्ण बोल' सही सही म्हण असे. दीनानाथांची गायकी त्यांना फ आवडत असे. त्यांच्या चाली त्यांना गाउ दाखवित असे. सुंदर रूप, गोड ग लाभलेल्या दुर्गा केळेकर केशवराव भोळे यां पत्नी ज्योत्स्ना भोळे झाल्या.

संगीतकार भोळे स्वत: ग्रंथसंग्राह इंग्रजी-मराठी साहित्य वाचणारे, प्रयोगशी गुणग्राहक, नव्या कल्पनांचं स्वागत कर पुरोगामी विचारांचे होते.

दुर्गाला त्यांनी सुंदर भावगीतं शिकव आग्रा घराण्याची तालीम ज्योत्स्नाबा खादिमहुसेन खाँ साहेबांकडे घेता घेता स्व सुंदर शैलीदार गाणं केलं.

भावना ओतून कसं गायचं याचे केशवरावांनी दिले होते.

'संत सखू' व 'सुवर्णमंदिर' हे दोनच चित्रपट त्यांनी केले. त्यात मन रमलं नाही.

लहानपणी रेडिओवर लहान मुलांच्या कार्यक्रमांत गाणी म्हणणाऱ्या दुर्गानं पुढे ज्योत्स्ना भोळे म्हणून मोठं नाव मिळवलं. काही काळ सुखदेव कथ्थककांकडे नृत्याचे धडे घेतले होते व लॅमिंग्टन रोडवरच्या शाळेतही बक्षिसं मिळविली होती. अतिशय गुणी असलेल्या मुलीची लग्नानंतर केशवराव भोळ्यांच्या संस्कारानं 'फुलराणी' झाली....

ज्योत्स्नाबाईंच्या रंगभूमीवरील पदार्पणानंतर त्यांचं दैवत असलेल्या बालगंधर्वांनी आशीर्वाद दिले. त्यांचं कौतुक केलं. आपल्या वारसदारांत त्यांचा उल्लेख केला. 'आशीर्वाद', 'एक होता म्हातारा', 'भूमिकन्या सीता', 'राधामाई' ह्या नाटकांतून ज्योत्स्नाबाईंनी कामं केली.

पण 'कुलवधू'नं अभूतपूर्व लोकप्रियता मिळवली. त्यात पु.ल. देशपांडे हे हरहुन्नरी नट, गायक सामील असत. 'नाट्यनिकेतन' ही एक गुणिजनांची संस्था होती. 'मनरमणा', 'बोला अमृत बोला', 'मानसी राजहंस पोहतो', 'मी पुन्हा वनांतरी फिरेन हरिणीवाणी', 'खेळेल का देव, माझिया अंगणी', 'किती वयाचे धराल भय हे', 'छंद तुझा मजला', 'तू माझा अन् तुझीच मी' अशी कितीतरी गाणी लोकांच्या ओठांवर खेळत होती. पण 'माझिया माहेरा जा'नं खूप लोकप्रियता मिळविली. खुद्द पुलंची चाल होती त्या गाण्याला. रँग्लर परांजपे यांनी एकदा ज्योत्स्नाबाईंना ते आजारी असताना बोलावून हे गाणं गायला लावलं होतं.....

रेडिओवरचं भाषण लिहून द्या, अशी एकदा त्यांनी केशवरावांना विनंती केली. पण त्यांनी ते स्वत: लिहावं, असं सांगण्यात आलं. मग ज्योत्स्नाबाईंनी ते लिहून काढलं. मोठ्या शैलीदारपणे वाचून दाखवलं... पुढे स्वत:चं भाषण त्यांनी कधी दुसऱ्याला लिहायला सांगितलं नाही. स्वत: सुंदर भाषणं केली.

कोकणी कवितांना चाली लावल्या. बा.भ. बोरकरांची गोड कोकणी गाणी ज्योत्स्नाबाई म्हणत असत, अगदी स्वत:च्या चालीत.

शिकोण्यानं रातचो माका
करता कासावीस
खाल्लो गोटो लागना अंगा
काटता असा दीस
तोच वखत पथ्य माझो तोच जसो जोर
नंदालो पोर बहुत मस्तेखोर

'आराधना' नावाचं नाटकही त्यांनी स्वत: लिहिलं. निर्मिती, लेखन, दिग्दर्शन, नेपथ्य, संगीत, अभिनय सबकुछ ज्योत्स्ना भोळे.

ज्योत्स्नाबाई देशविदेशांत बऱ्याच फिरल्या. इंग्लंड, चीन, अमेरिका.... आपटे रोडच्या 'स्वरवंदना' भोवती कोकण वैभव उभं केलं. नातवंडं, पतवंडं खेळवली. पुस्तकं लिहिली. पुरस्कार मिळवले, भाषणं केली.

पण गाण्यावर त्यांचं खरं प्रेम. आजारपणातही त्याची साथ सुटली नाहीच. बांदोड्याच्या महालक्ष्मीवर अशीच अभंग श्रद्धा. गोव्याच्या दीनामामांच्या जोरकस गायकीचा आणि बालगंधर्वांच्या मधुर गायकीचा प्रभाव घेऊनही स्वत:चा ठसा उमटवला. बालपणी आपण मोठी फिलॉसॉफर व्हावं असं त्यांनी स्वप्न पाहिलं.

पण प्रत्येक क्षण सुरेल आणि सुंदर करणाऱ्या कलावतीला जीवनाची भाष्यकार, फिलॉसॉफर असं कोण म्हणणार नाही?

शब्द सूर बरवे

कवयित्री डॉ. संगीता बर्वे आणि श्री. राजीव बर्वे यांनी आपल्या दोन मुली प्रियंका व प्रांजली यांच्यासह एक शब्दसुरांचा अभिनव कार्यक्रम केलेला आहे - "शब्द सूर बरवे". आकाशवाणीवरील अधिकारी कै. पद्माकर बर्वे हे स्वत: संगीतकार व शास्त्रीय संगीताचे बंदिशी रचणारे कवी, तर कै. मालती पांडे-बर्वे ह्या ज्येष्ठ गायिका. यांच्या मुलानं, सुनेनं, नातींनी सुरांशी-शब्दांशी नातं सांभाळलं आणि एक सुरेल कार्यक्रम उलगडला....

संपादक

ये हैं आशा

श्रीगौरी कोगेकर

> आशाताईंच्या आठवणीत सांगलीतलं बालपण म्हणजे भरपूर जेवण... दुधावरची साय, दही, लोणचं, तिखट मिरची आणि काळज्या, चिंता यापासून खूप दूरवरचं सुरक्षित, आई-बाबांच्या प्रेमाचं जगं... भावंडांच्या सहवासाचं जग असं होतं.
>
> संपादकीय

प्रफुल्ल पिक्चर्स मास्टर विनायकांच्या माझं बाळ ' मध्ये संगीतकार दत्ता डावजेकरांनी मंगेशकर भावंडांना १९४३ मध्ये एक गाणं गायला लावलं होतं. ' चला चला नवबाला...' त्यात ती पहिल्यांदा गायली होती. १९४८ मध्ये ' चुनरिया ' या चित्रपटात संगीतकार हंसराज बहल यांनी तिला एक गाणं गायला दिलं होतं. ' सावन आया रे, जागे मोरे भाग सखी री... ' ते तिचं पहिलंच पार्श्वगीत होतं. तेव्हापासून आजच्या घडीपर्यंत आशा भोसले नावाचं चैतन्य सळसळत आहे. एवढ्या कालखंडात खूप काही घडलं आहे. वेदना, उपेक्षा, यश, कीर्ती, साधना, कष्ट, सन्मान यांचा अद्भुत असा खेळ पाहिला आहे. त्यांची जीवनकथा म्हणजे अद्भुतरम्य, रोमांचकारी कादंबरीच आहे.

८ सप्टेंबर १९३३ सांगलीत मास्टर दीनानाथ मंगेशकर आणि माई मंगेशकर यांची तिसऱ्या क्रमांकाची ही मुलगी जन्मली, तेव्हा मोठी विचित्र परिस्थिती होती. बलवंत संगीत नाटक मंडळीनं नाटककार विश्राम बेडेकरलिखित ' संगीत ब्रह्मकुमारी ' या नाटकाचा पहिला प्रयोग १५ जून १९३३ रोजी सांगलीच्या ' सदासुख ' थिएटरात केला होता. त्यातला ' सुहास्य तुझे मनासी मोही ' व ' विलोपले मधुमिलनात' या नाट्यगीतांनी श्रोत्यांना, प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं होतं, तरी मोडकळीस आलेल्या संगीत रंगभूमीला निरोप देऊन नवीन चित्रपटाच्या माध्यमाकडे वाटचाल करावी, अशा मन:स्थितीत मा. दीनानाथ व त्यांचे सहकारी होते. रंगभूमीच्या वैभवाला उतरती कळा लागलेली होती. कंपनीची आर्थिक स्थिती कठीण झाली होती. अशा काळात मा.दीनानाथांच्या घरात मात्र अलौकि स्वरांचं लेणं घेऊन आलेल्या मुलांनी आपल्या पाऊलखुणा उमटवलेल्या होत्या...बाहेर घडणाऱ्या घटनांपासून दीनानाथांनी, माईंनी मुलांना जपलेलं होतं... त्यांनी भरवलेल्या घासात संगीताचं दिव्य अमृतही होतं...

आशाताईंच्या आठवणीत सांगलीतलं बालपण म्हणजे भरपूर जेवण... दुधावरची साय, दही, लोणचं, तिखट मिरची आणि काळज्या, चिंता यापासून खूप दूरवरचं सुरक्षित, आई-बाबांच्या प्रेमाचं जगं... भावंडांच्या सहवासाचं जग असं होतं. थोरल्या बहिणींनी पहाटे बाबांपाशी गाण्याला बसावं, तर हिने पांघरूणातून डोकं काढून माईला विचारावं- '' माई, आज जेवायला काय बनवणार आहेस ? '' क्वचित बाबांनी गायला बसवल्याच्या, बाबांची नाटकं विंगेत बसून पाहिल्याच्या, त्यांची छान नक्कल करण्याच्या आठवणी आहेत. तिनं घरकाम करावं, छोट्या भावाला सांभाळावं, खेळावं... अशा बालपणात एक वादळ आलं. पुण्यात २४ एप्रिल रोजी मा. दीनानाथांनी जगाचा निरोप अकालीच घेतला. मोठ्या मुलीचं भविष्य तर त्यांनी वर्तविलं होतं. जगद्विख्यात गायिकेचा उदय जवळच आहे, अशी त्यांची खात्री होती; पण या छोट्या मुलीची त्यांना भारी काळजी

वाटत असे. ते तिला ' हब ' म्हणत. हब म्हणजे खुळं पोर. भविष्यात या पोरीनं बाबांची गाणी तडफदारपणे म्हटली, हा इतिहास सर्वांना ठाऊक आहे.

लतादीदींनी सर्वांवर मायेची पाखर घातली. त्यासाठी आपलं बालपण विसरून गेल्या. ' प्रफुल्ल ',' नवयुग' मध्ये नोकरी धरली. कोल्हापूर, पुणे, थाळनेर, मुंबई अस प्रवास करताना अत्यंत कष्टमय, प अभिमानाचे कठीण दिवस काढले. घरातल्य गरिबीनं आनंद, हसू आणि संगीत मावळल नव्हतं. मुंबईत १९४५ मध्ये पाऊल टाकल तेव्हा तीव्र जीवनसंघर्ष चालला होता. नान चौकातल्या शंकरशेटच्या वाड्यात तरु पोरींसाठी जागत माई पेशन्सचा डाव मांडू बसायच्या. स्वातंत्र्यलढ्याचे दिवस होते दीदीची पायपीट सुरू होती. १९४७ मध

हा संघर्ष संपला. लता मंगेशकर हा दिव्य स्वर भारतात निनादू लागला; पण तिच्या छोटया बहिणीनं वयाच्या चौदाव्या वर्षीच घरातून पळून जाऊन गणपत भोसले या ओळखीच्या तरुणाशी लग्न करायचा धाडसी निर्णय घेतला. तिला असं दूर करण्यात नियतीच्या मनात काही वेगळंच असावं.

बोरिवलीच्या गरीब वस्तीत, भोसल्यांच्या कडक निर्बंधांत बालपण केव्हाच हरवलं. तिनं नावं यासाठी भोसल्यांनी आग्रह धरला. रेडिओवर ऑडिशन देताना डी. अमेंबलांनी ' कोण, कुठली ' चौकशी करताच मा. दीनानाथांची आपण मुलगी आहोत, हे सांगताना रडू फुटलं. लहानपणी ऐकलेलं बाबांचं गाणं म्हणताना गळा दाटला. मग गाणं शिकण्याची जिद्द जागी झाली. मास्टर नवरंग, शंकरराव व्यास यांच्याकडून गाण्याचे धडे घेतले. घरकाम करून तानपुऱ्यावर रियाज आरंभला. मूळ आवाजाचं सोनं लखलखू लागलं. छोट्या हेमंतचं आगमन झाल्यावर या छोट्या आईला बालपणीचा सवंगडी मिळाला होता; पण कामाचे डोंगर डोळ्यांसमोर उभे होते. गाण्यांच्या दुनियेत आपलं स्थान निर्माण करायचं होतं. दीदी एकेक पाऊल शिखरावर चालली होती. नव्हे, पोहोचली होती... मग एके दिवशी हंसराय बहल या संगीतकारानं गायला बोलावलं. चित्रपट 'चुनरिया'. हे घडलंच नियतीनं ठरवल्याप्रमाणं.

कामाची गती आता आणखी वाढली. माहेरघर दुरावलं होतं. सासरी कष्टांना अंत नव्हता. हिंदी-उर्दूचे शब्दोच्चार शिकायचे, गाणी आत्मसात करायची, कामासाठी स्टुडिओतून पायपीट करायची... हे सुरू होतं. १९५१ मध्ये ' दामन ' मधलं गाणं दीदीबरोबर गायचं होतं. भोसल्यांचा कडक पहारा होता. ' ये रुकी रुकी हवाएँ ' गाताना मनाची घालमेल झाली.

५० च्या जुलैमध्ये संगीतकार सुधीर फडके यांनी पुण्यात बोलावून घेतलं. दत्ता डावजेकरांनी मराठी गाणी गाऊन घेतली ; पण ' पुढचं पाऊल ' मध्ये या दाणेदार आवाजाच्या गायिकेला ' माझ्या जाळ्यात गावला मासा ' शिकताना सुधीर फडके यांना तिच्यातल्या सुप्त गणांचा साक्षात्कार झाला. पुढे गदिमा, सुधीर फडके, आशा भोसले यांनी मराठी चित्रपटाच्या शारदेला भरजरी वस्त्रालंकारांनी नटवलं. ' जगाच्या पाठीवर ',' सुवासिनी ' ... सुधीर फडक्यांसाठी गाणाऱ्या आशाबाईंनी श्रीधर फडके या बाबूजींच्या मुलासाठी ' ऋतू हिरवा' गायलं.

हिंदीमध्ये संघर्ष सुरू होता. पौराणिक, देमार चित्रपटांचं नष्टचर्य लवकरच संपलं... एस. डी. बर्मनसाठी ' लाजवंती ' मधलं ' गा मेरे मन गा ' या गाण्यानं, ओ.पी. नय्यर यांच्या ' मंगू ' मधल्या ' मन मोरे गा झूमके ' नं आवाजातलं सोनं तळपायला लागलं. घरात वर्षाच्या रूपानं लक्ष्मी आली. छोट्या नंदूच्या आगमनाची चाहूल लागली. घर, संसार, मुलं यात सुख मानणाऱ्या आशाताईंना घरात राहणं अशक्य झालं. मग भावंडाचा, माईचा निरोप घेऊन धाकटा भाऊ आला. माहेरचं बोलावणं आलं. ' प्रभुकुंज ' मध्ये घर थाटलं. माई,दीदी, मीनाताई, उषाताई, हृदयनाथ यांच्या दृष्टीसमोर पुन्हा नवी मांडामांड केली. छोट्या नंदूनं घरात आनंद झाला.

हिंदी चित्रपटाच्या संगीतकारांना आशा भोसले या आवाजाची दखल घ्यावी लागली. ओ.पीं. ना त्यातलं बावन्नकशी सोनं दिसलं. ' नया दौर ' पासून भोसले - नय्यर यांनी हिंदी गाण्यांत अशी जादू केली, की लोकप्रियतेची लाट भोसले हे नाव घेऊन रसिकांवर कोसळली.

दुःख- वेदना पचवलेला, रियाजानं तयार झालेला, कोणत्याही मूडचं गाणं गायला तयार असलेला आवाज आशा भोसले हे जादूभरं नाव घेऊन सर्वत्र प्रकटला. बाबांच्या ध्वनिमुद्रिका फक्त ऐकून नाट्यगीतांच्या गाण्यांची ध्वनिमुद्रिका बाहेर पडली, तेव्हा जाणकार म्हणाले - ' अरे, ही तर दीनानाथांची गायकी ! '

बॉय जॉर्जबरोबर अवे मारीया गात लंडनचं थिएटर गाजवणाऱ्या आशाताईंचं कर्तृत्व नवनवी क्षितिजे शोधत राहिलं आहे. मराठीतलं नक्षत्रांचं देणंही त्यांनी आपल्याला देऊन टाकलं आहे. पं.हृदयनाथ मंगेशकर या आपल्या संगीतकार भावासाठी ' जिवलगा ' सारखं आर्त-जीवघेणं गाण्यातून ते दिलं आहे. पाकिस्तानी गुलाम अलींच्या रचना 'मेराज-ए-गजल ' मध्ये गायल्या आहेत.

सुरेश भटांच्या मराठीतल्या टपोऱ्या मोगऱ्यासारख्या गझलादेखील त्यांनी गायल्या आहेत. अदनान सामीबरोबरची अत्याधुनिक तरुणांच्या टेस्टची गाणी गाऊन त्या लोकप्रियतेच्या शिखरावर आहेत. फाळके पुरस्कारासारखे सन्मानही आता लाभले आहेत.

घरात सुगरण, गृहिणी, आई म्हणून वावरणाऱ्या आशाताई मायक्रोफोनसमोर उभ्या राहून ' तरुण आहे रात्र अजुनी ' सारखं विलक्षण गाणं गातात. पुण्याच्या मंडईत ताजी भाजी खरीदतात. लखनौच्या बावर्चीकडून रेसिपी घेतात. तसं त्यालाही काही शिकवून येतात. मंचावर आर.डी.बर्मनची धमाल गाणी ऐकवतात. घर सजवतात. लॉस एंजलिसच्या भव्य ऑडिटोरियममध्ये भरगच्च प्रोग्राम करतात. दीनानाथ मंगेशकरांची लाडकी लेक... हेमंत-वर्षा- नंदूची आई... लतादीदी, मीनाताई, उषाताई, हृदयनाथ यांची बहीण... गाणं म्हणण्याच्या क्षणात विरघळून जाते, तेव्हा एक आगळंवेगळं चैतन्य जागं होतं. मग त्याचं सुरेल गाणं होतं. त्या गाण्याला वय नसतं.

चिरतारुण्याचं वरदान असतं. दीर्घायुष्याचं लेणं असतं. ते आशाताईंनाही लाभो, असं त्यांच्या चाहत्यांना वाटत राहतं.

आवाज दे कहाँ है

❋ अद्वैत धर्माधिकारी

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर चित्रपटसृष्टीत अनेक वादळं आली. एका झंझावातात नूरजहाँ पाकिस्तानात गेल्या. त्यांच्या सुमधुर आवाजाची मोहिनी आजही भारतीयांच्या मनावर आहे. दोन्ही देशांतल्या त्यांच्या कारकिर्दीच्या संगीतमय खुणा अद्वैत धर्माधिकारी यांनी ह्या लेखात मांडलेल्या आहेत. स्मृतिरंजनासाठी हा विशेष लेख.

संपादक

मलिका-ए-तरन्नुम् नूरजहाँ हिंदी चित्रपट सृष्टीतील एक सौंदर्यवती नायिका, अजरामर स्वर्गीय गळ्याची गायिका. गेली साठपेक्षा अधिक वर्षे भारतीय उपखंडात नूरजहाँची हजारो गाणी गाजत आहेत.

मलिका-ए-तरन्नुम नूरजहाँ यांचा जन्म २१ सप्टेंबर १९२९ साली कसुर दमसल पंजाब (पाकिस्तान) येथे झाला. त्यांचे मूळ नाव अल्ला वसई, वडिलांचे नाव मदद अली व आईचे नाव फतेह बीबी. ह्या दोघांना एकंदर १४ अपत्ये, त्यापैकी नूरजहाँ ह्या सहावे अपत्य. लहानपणापासूनच नूरजहाँ ह्यांचा कल संगीताकडे होता. त्यांचा सुरेल आवाज लक्षात येताच त्यांच्या आई वडिलांनी अगदी लहान वयात सुप्रसिद्ध गायिका कज्जनबाई ह्यांची तालीम सुरू केली. साधारणत: १९३५-३६ च्या आसपास त्यांच्या कुटुंबाने कलकत्त्याला स्थलांतर केले. नूरजहाँच्या दोन मोठ्या बहिणी कलकत्त्याच्या नाटक कंपनीत स्टेजवर काम करू लागल्या, तर वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी नूरजहाँने बालकलाकार म्हणून स्टेजवर कामाला सुरुवात केली.

ह्याच सुमारास नूरजहाँ व त्यांच्या दोघी बहिणींची ओळख कलकत्त्यातील सुप्रसिद्ध गायिका मुख्तार बेगम (नाटककार आगा हश्र यांच्या पत्नी) ह्यांच्याशी झाली. ह्या ओळखीचे रूपांतर स्नेहात झाले व पुढे मुख्तार बेगम नूरजहाँवर आपल्या पोटच्या पोरींवत प्रेम करू लागल्या. त्यांच्या गायकीचा व वागण्याच्या पद्धतीचा आदर्श त्यांनी स्वत:समोर ठेवला. आपल्या गाण्यावर मुख्तार बेगम ह्यांचा कसा प्रभाव होता व त्यांच्याप्रमाणेच पांढरी साडी नेसून स्टेजवर कार्यक्रम करावा हेच माझे त्यावेळी स्वप्न होते. हा उल्लेख नूरजहाँनी १९८२ साली Mortal Meh. Immortal Melodies ह्या कार्यक्रमासाठी त्या ३५ वर्षानंतर जेव्हा

भारतात आल्या होत्या, त्यावेळी श्री. अमीन सायानी ह्यांनी रेडिओसाठी त्यांची एक प्रदीर्घ मुलाखत घेतली होती, त्या मुलाखतीमध्ये आवर्जून केला होता. ह्या मुख्तार बेगम अनेक नामवंत कलाकारांकडे नूरजहाँ व त्यांच्या बहिणींची चित्रपटांसाठी शिफारस करीत. नूरजहाँ ह्यांचे शास्त्रीय संगीताचे शिक्षण उस्ताद गुलाम मुहम्मद खान ह्यांच्याकडे सुरू होते. रोज ८ तास त्यांचा ध्रुपद , ख्याल, ठुमरी ह्या सर्व प्रकारांचा रियाझ होत असे.

ह्याच सुमारास पंजाबी चित्रपट निर्माते के.डी. मिश्र ह्यांनी बालकलाकार म्हणून नूरजहाँना काम दिले. 'धैबी', 'गोला', 'मिस्त्र का सितारा', 'आझादी', 'नारीराज' 'फख्र-ए-इस्लाम' इत्यादी चित्रपटांत त्या बेबी नूरजहाँ ह्या नावाने बालकलाकार म्हणून झळकल्या.

साधारणपणे ३८ साली नूरजहाँ कलकत्त्याहून लाहोरला आल्या. नूरजहाँ व त्यांची आई पंचोली स्टुडिओच्या दारात उभ्या राहत व पंचोली स्टुडिओचे मालक श्री. दलसुखराय पंचोली ह्यांची मोटर फाटकातून आत जाऊ लागली की गाणं म्हणत. अशा प्रकारे एक दिवस दलसुखराय पंचोली ह्यांनी नूरजहाँ यांना स्टुडिओमध्ये बोलाविले व गुलेबकावली ह्या पंजाबी चित्रपटात उल्लेखनीय काम दिले. ३९ सालच्या ह्या चित्रपटाला मास्टर गुलाम हैदर ह्यांचं संगीत होतं. 'शाल्ला जवाजिया माने' हे नूरजहाँच पहिलं गाणं

गुलेबकावली चित्रपटाच्या वेळी दलसुखराय पंचोली व कथालेखक आणि दिग्दर्शक शौकत हुसेन रिझवी यांची भेट झाली पंचोली ह्यांनी 'खानदान' ह्या त्यांच्या आगामी चित्रपटासाठी शौकत हुसेन ह्यांना दिग्दर्शक म्हणून करारबद्ध केलं. त्यांनी प्रमुख भूमिकांसाठी नूरजहाँ व प्राण ह्यांना घेतलं. नायिका म्हणून 'खानदान' हा नूरजहाँ चा पहिला चित्रपट. 'मेरे लिए जहान में,तू कौन सी बदली में मेरे चाँद है आजा', 'हम खेलेंगे आँख मिचौली इत्यादी गाणी प्रचंड लोकप्रिय झाली आणि गायिका म्हणून नूरजहाँ सर्वोच्च स्थानावर आरुढ झाल्या. त्यांच्या समकालीन

गायिकांपेक्षा त्यांचा आवाज अनुनासिक असला तरी पातळ व गोड होता. त्यात अतोनात लाडिकपणा व स्वरांवरची हुकूमत होती.

'खानदान' चित्रपट १९४२ सालचा तर, १९४७ सालातील 'मिर्झा साहेबा' हा नूरजहाँचा भारतातील शेवटचा चित्रपट पाच वर्षांची त्याची भारतीय चित्रपटसृष्टीतील कारकीर्द अवघी ५ वर्षाची. ह्या पाच वर्षात 'नादान'(सं.के.दत्ता) 'दोस्त' (सं. सज्जाद हुसेन) 'नौकर'(सं. रफीक गजनवी, शांतीकुमार), 'लाल हवेली'(सं. मीर साहेब)' गाँव की गोरी '(सं.शाम सुंदर), 'बडी माँ '(सं. के. दत्ता), दिल (सं झफर खुर्शीद), 'हमजोली '(सं. हफीज खान), 'झीनत '(सं. हफीज खान) , 'अनमोल घडी '(सं. नौशाद), 'जुगनू'(सं. फिरोज निझामी), 'मिर्झा साहेब'(सं. पं. अमरनाथ, हुस्नलाल भगतराम) इत्यादी केवळ १३ चित्रपटांत नूरजहाँने अभिनय व गायन केले. ह्या चित्रपटात त्यांनी गायलेल्या गाण्यांची संख्या १०० च्या आसपास सुद्धा नसेल, 'परंतु बदनाम मुहब्बत कौन करे'(दोस्त), 'किस तरह भुलेगा दिल', 'बैठी हूँ तेरी याद का' (गाँव की गोरी) 'ऐ हवा जा जा पिया के घर जा' (दिल) 'दिया जलाकर आप बुझाया', 'किसी तरह से मुहब्बत में चैन पा न सके' , 'आ इंतजार है तेरा' (बडी माँ) 'उमंगे दिल मी मचली', 'आज की रात, हमे तो शामे गम म' (जुगनू) इत्यादी गाणी आज ६० वर्षानंतर सुद्धा लोकप्रिय आहेत. 'दोस्त' मधल्या बदनाम 'मुहब्बत कौन करे' मधल्या बदनाम ह्या शब्दावर त्यांनी घेतलेली हरकत केवळ लाजवाब आहे. ह्याच गाण्यापासून प्रेरणा घेऊन सी. रामचंद्रानी मलमली तारुण्य माझे ह्या गाण्याची चाल तयार केली. 'अनमोल घडी'ह्या चित्रपटात नूरजहाँ हे नाव घराघरात पोचलं. 'जवा है मुहब्बत', 'आजा मेरी बर्बाद मुहब्बत के सहारे', 'क्या मिल गया भगवान', 'मेरे बचपन के साथी' ह्या नूरजहाँच्या गाण्यांनी लोकप्रियतेचा उच्चांक मोडला. सुरेंद्र व नूरजहाँ ह्यांच्या आवाजातील 'आवाज दे कहाँ है' हे द्वंद्वगीत अजरामर आहे. पाकिस्तानात गेल्यावर नूरजहाँनी त्यांच्या स्टेजवरील कार्यक्रमात कोणतेही भारतातील गाणे म्हटले नाही, त्याला अपवाद 'आवाज दे कहाँ है' ह्या गाण्याचा. त्यांच्या मैफलीची सुरुवात कायम 'आवाज दे कहाँ है' ह्या गाण्याने होत असे. तसेच 'हाथ सीने पे रख दो तो करार आ जाए व तुम आँखो से दूर हो' (दोन्ही गाणी जी.एम. दुर्राणीसमवेत, मिर्झासाहेब) 'यहाँ बदला वफा का' (मुहम्मद रफी समवेत ,जुगनू) ही नूरजहाँची गाजलेली अन्य द्वंद्वगीते.

'खानदान' चित्रपटाच्या वेळी नूरजहाँ व शौकत हुसैन एकमेकांच्या प्रेमात पडले व त्यानंतर काही दिवसांनी त्यांचे लग्न झाले. १९४४ साली शौकत हुसेन ह्यांनी शौकत आर्ट प्रॉडक्शन नावाची चित्रपट संस्था मुंबईमध्ये सुरू केली त्या वेळी नवीन असलेला २४ वर्षीय युवक युसुफ खान (दिलीपकुमारला) याला नूरजहाँचा नायक म्हणून जुगनू चित्रपटात घेतले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर शौकत हुसैन ह्यांनी पाकिस्तानात स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानात गेल्यावर १९५१ साली 'चन्वे' हा पंजाबी चित्रपट निर्माण केला, तर १९५२ साली 'दुपट्टा'हा चित्रपट आला. ह्या चित्रपटाला फिरोज निझामी ह्यांचं संगीत होतं. हा चित्रपट भारतातपण प्रदर्शित झाला होता. नूरजहाँची 'मोरे मन के राजा', 'मैं बन पतंग उड जाऊँ रे', 'बात ही बात में', 'चाँदनी राते', 'जिगर की आग से', 'सावरिया लोहे कोई पुकारे', 'तुम जिंदगी की गम का फसाना' ही सारी गाणी श्रवणीय आहेत. 'गुलजार', 'इन्तजार', 'कोयल', 'नींद', 'कैदी','अनारकली' इत्यादी त्यांचे गाजलेले चित्रपट आहेत कैदी चित्रपटातील 'मुझसे पहली सी मुहब्बत, मेरे महबूब न मांग ही अहमद फैज ह्यांची नज्म नूरजहाँ ज्या आर्ततेने गायली आहे त्याचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात.

पाकिस्तानात गेल्यावर नूरजहाँनी सुरुवातीला काही चित्रपटांतून अभिनय केल्यावर पुढे फक्त पार्श्वगायनातच कारकीर्द केली. उर्दू, पंजाबी, सिंधी अशा अनेक भाषांतून त्यांनी गायन केले. कोयल ह्या चित्रपटातील 'दिल का दिया जलाया है' कातिल शिफाई ह्यांचे गीत खुर्शीद अन्वर ह्यांच्या संगीतात नूरजहाँनी एखाद्या खानदानी छोट्या खयालातील बंदिशीप्रमाणे गायले आहे. बागेश्री अंगाच्या जयजयवंती रागातील ह्या गीताची तुलना लताबाईंच्या मनमोहना बडे 'झुठे' किंवा 'झन झन झन पायल' ह्या गाण्यांशी करता येईल , तसेच नूरजहाँनी गायलेल्या 'दमादम मस्त कलंदर' ह्या कव्वालीमध्ये भक्तिरस प्रकटलेला आहे. आज नूरजहाँ लौकिक अर्थाने ह्या जगात नसल्या तरी, त्यांची हजारो गाणी चिरकाल त्यांची आठवण श्रोत्यांच्या मनात ठेवतील !

✻ मानाचा मुजरा ✻

रसिकांना व कलावंतांना देश, धर्म, प्रांत यांच्या सीमा ठाऊक नसतात. भारतीय रसिकांना शेजारच्या देशातल्या गायक कलावंतांनी रिझवलेलं आहे.

इकबाल बानू, आबेदा परवीन, नाहिद अख्तर, फरीदा खानम, मेहनाज, मलिका पुखराज, नय्यरानूर, ताहिरा सय्यद, रेश्मा, रूना लैला, माला, सबीना, फिरोझा बेगम, गुलबहार बानू यांचा चाहता वर्ग भारतीय रसिकांत आहे.

'स्वरप्रतिभा'च्या 'रसिकमोहिनी' २००६ विशेषांकाच्यावतीने त्यांना मानाचा मुजरा.

आम्ही कलावती– अनुराधा मराठे

चित्रपट, भावगीत, नाट्यसंगीताचे सुरेल संस्कार झालेल्या युवा पिढीनं पुन्हा नव्याने सुवर्णसंगीत ऐकवलं. स्मृतिरंजन केले. अनुराधा मराठे ह्या पिढीचं नेतृत्व करतात. स्वत:बद्दल अनुराधा मराठे लिहितात.

संपादक

शब्दांकन – अद्वैत धर्माधिकारी

गेली अनेक वर्षे मी सुगम संगीत, चित्रपट संगीत गात आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही की माझं लग्न होईपर्यंत मी फक्त क्लासिकलच गात असे. माझं बालपण आणि लग्नापूर्वी शिक्षण धुळ्यात झालं. माझी आई पूर्वी मेळ्यात गात असे, तर वडील गोपाळ गायन समाजात गाणं शिकलेले. माझी मोठी बहीण गाणं शिकत होती. त्यावेळी ती गाणं शिकते मग मी का नाही ? म्हणून मी पण गाणं शिकायला लागले. वयाच्या ८ व्या वर्षापासून ते २४व्या वर्षी लग्न होईपर्यंत मी गाणं शिकत होते आणि फक्त क्लासिकल गाणंच गायचं एवढंच उद्दिष्ट डोळ्यांसमोर होतं. डॉ. श्रीपाद नायक हे माझे गुरुजी. त्यांचे गुरू हे उस्ताद फैय्याज खाँ साहेबांचे शिष्य, त्यामुळे माझ्या गळ्यावर आग्रा गायकीचे संस्कार झाले होते. पुढे मी संगीतालंकार झाले आणि मग आमच्या खानदेश भागात माझ्या क्लासिकलच्या मैफिली सुरू झाल्या. धुळे, जळगाव, टाकळी भुसावळ येथे माझ्या मैफिली होत असत. दरम्यानच्या काळात माझं लग्न झालं आणि धुळ्याहून मी पुण्याला आले.

पुण्यात आल्यावर मला माझ्या गुरुजींनीच श्री पं. त्रिंबकराव जानोरीकरांकडे माझं गाणं सुरू ठेवावं असं सांगितलं. त्याप्रमाणे मी त्यांच्याकडे गेले. त्यांना मी मारूबिहाग राग गाऊन दाखविला. त्यांना माझं गाणं आवडलं आणि त्यांनी लगेच मला विचारलं की तू यंदा सवाई गंधर्वमध्ये गाशील का ? मला खूप आनंद झाला. पण त्यावेळी मला दिवस असल्यामुळे खूप त्रास होत होता. म्हणून सवाई गंधर्वमध्ये गाणे जमले नाही. मग अंजलीचा जन्म झाला . त्यानंतर ती थोडी मोठी होईपर्यंत तीन-चार वर्षे गाण्यात खंड पडला. त्यानंतर मात्र जानोरीकरांकडे क्लासिकलची तालीम पुन्हा व्यवस्थित सुरू झाली.

माझ्या गाण्यात मूळ संस्कार आग्रा घराण्याचे होते. त्यामुळे जानोरीकर बुवांकडे शिकताना सुरुवातीला मला थोडं अवघड गेलं. गुरुजी म्हणाले, 'तुझ्या गळ्यात आग्रा घराण्याची जी तान आहे, ती तुझ्या आवाजाला सूट होणारी नाही. त्यांनी माझ्याकडून मग खूप रियाज करून घेतला आणि अशाप्रकारे माझ्या गळ्यावर भेंडीबाजार

घराण्याची गायकी चढली. काही गोष्टी दोन्ही घराण्यांत सारख्या आहेत. पण आवाज लावण्याच्या पद्धती मात्र वेगळ्या आहेत. जोरकस गाणं व खडे सूर हे आग्रा गायकीचं वैशिष्ट्य, तर ताल, खंडमेरू पद्धतीची गायकी व रस हे भेंडीबाजार घराण्याचं वैशिष्ट्य.

ह्याच काळात वाढत्या कौटुंबिक जबाबदारीमुळे मी सुगम संगीताकडे वळायचं ठरविलं. तसेच आकाशवाणीची ऑडिशन देण्याचा निश्चय केला. मग मार्गदर्शनासाठी मी गजाननराव वाटव्यांकडे गेले. त्यांनी मला मनापासून शिकवलं. मुंबई रेडिओला माझी ऑडिशन झाली, त्यात मी पास झाले. पण तेव्हा लक्षात आलं की सुगम संगीत गाणं हे वाटतं इतकं सोपं नाही. क्लासिकल गाताना तुम्ही भरपूर आलापी किंवा ताना करू शकता, पण सुगम संगीतामध्ये प्रत्येक शब्द आणि सूर महत्त्वाचा असतो. उगाचच आलापी किंवा ताना घेतल्यास त्या गीताचा रसभंग होतो. एकदा वाटव्यांकडे मी शिकत असताना श्री. सुधीर मोघे व श्री. अजित सोमण तेथे आले. त्यांनी माझं गाणं ऐकून मला 'चैत्रबन'मध्ये गाण्याची विचारणा केली. खरंतर चैत्रबनमध्ये गाण्याची संधी मला त्याअगोदरच मिळाली असती. त्याचं असं झालं की, मी लग्नानंतर पुण्यात आल्यावर एका शास्त्रीय संगीताच्या स्पर्धेत भाग घेता होता. ही स्पर्धा भारत गायन समाजात होती. मुहम्मद हुसेन खाँ साहेब परीक्षक होते. त्यावेळी शैला दातार भारत गायन समाजात खालच्या मजल्यावर राहत होत्या. माझं गाणं ऐकून त्या वर आल्या. गाणं संपल्यावर त्यांनी मला चैत्रबनमध्ये गाणार का म्हणून विचारलं; पण त्यावेळी ते जमलं नाही. त्या स्पर्धेमध्ये मात्र मी पहिली आले होते.

पुढे मात्र 'मी आणिले टिपुनी अमृतकण' या ग. दि. माडगूळकरांच्या गीतांचा कार्यक्रम व चैत्रबनमध्ये गाऊ लागले. आमचा ग्रुप फारच चांगला जमला होता.

पुढे 'स्वर आले दुरुनि' ह्या कार्यक्रमासाठी मी गायले. त्यावेळी १५ दिवस श्री. यशवंत देवांनी माझ्याकडून गाणी बसवून घेतली. त्यामुळे शब्दोच्चारांच्या बाबतीत त्यांचे खूप मार्गदर्शन झाले. गाण्यापूर्वी ते एक-एक गाणं १० वेळा वाचायला लावायचे, त्याचा मला पुढे सुगम संगीत, चित्रपट गीत गाताना फार उपयोग झाला.

आम्ही कलावती- मंजिरी आलेगावकर

शब्दांकन - अद्वैत धर्माधिकारी

गाणाऱ्या घरात जन्मलेल्या मंजिरीनी गाण्याची वाट शोधली. त्या शास्त्रीय संगीत; ठुमरी, गझल यात रमलेल्या आहेत. कुणाची नक्कल न करता स्वत: प्रयोगानं गायकी सिद्ध करीत आहे. त्यांच्याच शब्दात हे सांगत आहेत.

संपादक

माझ्या लहानपणापासून आमच्या घरात गाणे होते. माझे वडील पं. मोहनराव कर्वे हे गाणारे. आम्ही चौघं भावंडं; पण फक्त मी एकटी गाणारी. लहान वयातच मला गाणं आवडायचं.अगदी मॉन्टेसरीत असतानासुद्धा शाळा सुटताना मला पसायदान म्हणायला सांगत. आमच्या शाळेत वेलिंगकर म्हणून सर होते, ते पप्पांचे मित्र होते. गाण्याचा तास झाल्यावर ते मला पप्पांनी काय काय शिकविले ते गायला सांगायचे. पप्पा मला अगदी सुरुवातीपासूनच डग्गयावर ठेका धरूनच गाणं शिकवित. त्यामुळे पहिल्यापासूनच माझा ताल पण पक्का झाला. माझ्या आईच्या आग्रहामुळे मी गांधर्व महाविद्यालयात गाणं शिकू लागले. तिथे आम्हाला गाणं शिकवायला मोडक सर आणि ठाकूर बाई होत्या. त्या दोघांनीही बंदिशीवर आलाप उत्तम प्रकारे शिकविले.

शालेय वयापासूनच मी गाण्याच्या स्पर्धांमध्ये आवर्जून भाग घेत असे. आकाशवाणीच्या बालोद्यान कार्यक्रमात मी भाग घेत असे. तेथे तेव्हा गोपीनाथ तळवलकर आणि हरबा होते. दर दोन महिन्यांनी मला कार्यक्रम मिळत असे. त्या कार्यक्रमात क्लासिकलच गात असे. तेव्हा आकाशवाणीवर एका कार्यक्रमाचे ५ रु. मिळत. त्या ५ रुपयाच्या कोऱ्या करकरीत नोटेचे फार अप्रूप असे. त्याचे चॉकलेट आणि काय काय घ्यायचे ते मी आधीपासूनच ठरवित असे.

शालेय शिक्षण सुरू असतानाच एकीकडे गांधर्व महाविद्यालय, घरी पप्पा तसेच नवनीतभाई पटेल म्हणून आकाशवाणीवर म्युझिक कंपोझर होते, ते आमच्या घरी येत. ते जलतरंग वाजवायचे, बंदिशी रचायचे. त्यांना गायनाचे अंग नव्हते; पण ते अतिशय ज्ञानी होते. त्यांनी रचलेल्या बंदिशी अतिशय कॅची आहेत. हिंदुस्थानी आणि कर्नाटकी दोन्ही संगीतातील अनेक रागांतील उत्तमोत्तम बंदिशी त्यांनी मला शिकविल्या. जवळ जवळ ५-६ वर्षे ते मला शिकवित होते. शालेय शिक्षणानंतर मी गरवारे कॉलेजात शिकू लागले. तेव्हा पण अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतला व अनेक पारितोषिके मिळविली. त्याच बरोबर एस.एन.डी.टी. मधून गाण्यात एम.ए. पण झाले.

काही दिवसांनी एका कार्यक्रमात मी रागदारी व नाट्यसंगीत गायले, त्यावेळी वामनराव देशपांडे व छोटा गंधर्व त्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आले होते. किशोरीताईंच्या भूप रागाच्या रेकॉर्डवरून मी प्रभावित होऊन त्यावेळी भूप राग व नाट्यगीत गायले. वामनरावांनी माझं त्यावेळी खूप कौतुक केलं. मग मी आणि पप्पांनी त्यांना मला ते शिकवतील का, म्हणून विचारले. 'संगीतातील वटवृक्ष सुरेशबाबू माने, मोगुबाई कुर्डीकरांची त्यांना तालीम मिळालेली. त्यांनी मला होकार दिला. त्यानंतर एक दिवस सकाळी मी आणि पप्पा वामनरावांच्या घरी गेलो. त्यांनी मला गायला सांगितले. सकाळची वेळ असल्यामुळे पप्पा मला म्हणाले की, अहिर भैरव गा. त्या दिवशी वामनरावांच्या समोर गायला मला इतकं दडपण आलं की मी गाऊ शकले नाही. त्यानंतर दोन दिवसांनी वामनरावांची रीतसर तालीम सुरू झाली. त्यांनी पहिल्यांदा सावनी कल्याण रा शिकविला वामनरावांची तालीम मला ८- वर्षे लाभली. ही ८-९ वर्षे रोज सकाळ संध्याकाळ त्यांनी मनापासून विद्यादान केल त्यांच्याकडे शिकत असताना भीमसेनजी अभिषेकी, पु.ल.देशपांडे, कुमारजी मालिनीबाई ही सगळी नामवंत मंडळी येत त्यांच्या संगीतावरच्या चर्चेचासुद्धा मला फा उपयोग झाला. वामनराव एकेक बंदिश मल दोन महिने शिकवित, त्यातले बारकावे लयकारी, सौंदर्य त्यामुळे उलगडत अस रागामधील प्रत्येक सुराचा, बंदिशीमधी प्रत्येक अक्षराचा, अर्थाचा विचार करण्याच दृष्टी त्यामुळे निर्माण झाली. याचबरोब श्री. नाना घोटणकरांकडे बारा वर्षे नाट्यसंगीताची तालीम घेतली. त्यामु नाट्यसंगीत विशेषत: बालगंधर्व आणि म दीनानाथ ह्या दोन वेगवेगळ्या शैलीती गायकीचा मी अभ्यास केला.

कलाकारांनी मैफलीत गाताना स प्रकारांची तयारी करावी अशी माझी धार आहे. म्हणून मी रागदारी संगीताबरो नाट्यसंगीत, ठुमरी, गजल इत्यादी प्रक शिकले. ठुमरीसाठी मला नाडकर्णी सरांक मार्गदर्शन घेतले व अजूनही जात असते, त गजलसाठी अब्दुल रशिदांकडे जात असे. फ गजलचेही मी काही कार्यक्रम केले आहेत.

माझ्या गाण्यावर जयपूर गायकीबरो कुमार गंधर्वांच्या गायकीचा हा प्रभाव आ पण त्यांच्या गायकीची नक्कल न कर अनुसरण करण्याचा माझा प्रयत्न असत आज जयपूर गायकीची तालीम मला अ कानिटकरांकडून मिळत आहे.

गायन-संशोधन-लेखन

निर्गुणाचा संग धरिला जो आवडी

डॉ. सुहासिनी कोरटकर

भारतीय शास्त्रीय संगीताच्या भेंडीबझार घराण्याच्या ज्येष्ठ गायिका. पुणे, औरंगाबाद, नवी दिल्ली, पणजी येथे आकाशवाणीवरील प्रोड्युसर, स्टेशन डायरेक्टर ही पदं भूषवलेल्या अधिकारी, संगीताबद्दल विपुल लेखन करणाऱ्या लेखिका, संगीतज्ञ म्हणून डॉ. सुहासिनी कोरटकर महाराष्ट्रात व देशात प्रसिद्ध आहेत.

शास्त्रीय संगीताची साधना म्हणजे निर्गुणाचा संग, काट्यांची वाट ! प्रतिकूल प्रकृतीची पर्वा न करता गुरू पं. त्र्यंबकराव जानोरकर यांचे मार्गदर्शन व आई-वडिलांचे आशीर्वाद यांच्या साह्याने सुहासिनीताई ही काटेरी वाट चालल्या. संगीतसाधनेत, विद्यादान, संगीत, संशोधन, लेखनात त्या व्यग्र आहेत, त्याचे हे काही कवडसे....

जिचे वडील मुलींच्या बाबतीत प्रगत आणि पुरोगामी विचारांचे असतील, ती मुलगी खऱ्या अर्थानं भाग्यवान असते असं मी मानते. हे भाग्य परमेश्वरानं मला दिलं. म्हणून मी त्यांची जन्मजन्मांतरीची ऋणी आहे.

मुलींनी शास्त्रीय संगीत, नृत्य यात प्रावीण्य मिळवावं असं त्यांना वाटत होतंच; पण आपल्या पत्नीला त्यांनी हार्मोनियम, व्हायोलिन गायन शिकण्यासाठी प्रोत्साहन दिलेलं होतं. लाहोरसारख्या ठिकाणी १९३२ साली आईसाठी पं. लक्ष्मणराव बोडस शिकवायला येत असत. मुंबईला आल्यावर ताई गाण्याच्या क्लासला जात असे, तेव्हा चारपाच वर्षांची मीही पाठोपाठ जात असे. पुढे लग्नानंतर ताईचं गाणं थांबलं; पण जिद्दीमुळे माझं सुरू राहिलं. बहुतेक सुरेल आवाज, तालाची समज चांगली असल्याने, ते पुढे सुरू राहिलं. शास्त्रीय संगीताबरोबर मी माणिक वर्मांची भावगीतं, भक्तिगीतं, लतादीदींची गाणी म्हणत असे. आई गाणी बसवायला मदत करीत असे व स्पर्धांतून मान घेऊन सर्व बक्षिसं पटकावून घरी आणत असे.

१९५७ साली पुण्यात आलो आणि गायन शिक्षणाच्या बाबतीत आणखी एक सुदैवी घटना घडली, ती म्हणजे पं. त्र्यंबकराव जानोरीकर यांच्यासारख्या गाढ्या विद्वान, सहृदयी अशा महान गुरूची भेट ! भेंडीबझार घराण्याचं दुर्मिळ गाणं त्यांच्यामुळेच मला मिळालं. माझ्या आयुष्याला निराळंच वळण लागलं. विषय अत्यंत सोपा करून सांगण्याची पद्धत, स्वरलयीचा पाया पक्का व्हावा म्हणून प्रत्येक रागाचे तालात बांधलेले स्वरावर्त, आलाप, तान तयार करून घेण्याची पद्धत ही त्यांची वैशिष्ट्ये होती. विलंबित व द्रुत बंदिशींबरोबर ते नीटसपणे आले पाहिजेत याकडे ते बारकाईनं लक्ष देत. स्वत: वहीत नोटेशन लिहून देत. त्यांचं वळणदार अक्षर, रेखीव लेखन, यात माझे बालपणाचे सूर

गुंफलेले आहेत. त्यात त्यांच्या प्रेमळ स्वभावाच्या, शिस्तबद्धतेच्या मुद्रा उमटलेल्या आहेत. अजूनही मी त्या उघडून पाहते. लहानपणीदेखील काहीशी एकटी राहणारी, नियमित अभ्यास व रियाज करणारी होते. वाचनाची गोडी लागल्यानं मी स्वत:मध्ये रमत असे. आपण काही तरी विशेष केलं पाहिजे असं त्यावेळीं मनानं घेतलं होतं. पुढील वाटचालीत ह्या जिद्दीचा उपयोग झाला.

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची संगीत विशारद परीक्षा (B.A. in Music) मला द्यायला लावली. हेतू हा की संगीताचं शास्त्रही कळावं. माझा रियाज व अभ्यास ह्यातलं सातत्य व प्रगती पाहून गुरुजींनी भेंडीबझार घराण्याची गायकी शिकवण्यास सुरुवात केली. त्या गायकीच्यामुळे स्वरलयीचं एक अद्‌भुत असं विश्व माझ्यासमोर अवतरलं. त्यानं माझं जीवन व्यापून टाकलं.

आवाजाचा गुंजनयुक्त लगाव, मींड, सूत, कण इ. गायनक्रियांनी परिपूर्ण आलाप, लययुक्त बोल, आलाप, गमकेच्या जोरकस ताना, लयीत गुंफलेले सरगम आणि बंदिश प्रस्तुत करण्याची सौंदर्यपूर्ण पद्धत, असं ह्या गायकीचं वर्णन करता येईल. श्रवणीय, आकर्षक, वैशिष्ट्यपूर्ण म्हणून आत्मसात करायला कठीण ! खूप मेहनत घ्यावी लागणार होती. गायकी नुसती शिकावी नव्हे, तर मुरावी लागते. मला ठाऊक होतं, हा सोपा मार्ग नाही. गुरुजींमुळेच मला याची भीती वगैरे वाटली नाही. आव्हान स्वीकारायला तर हवंच असं वाटलं.

पुण्यात खूप मोठ्या कलावंतांचे कार्यक्रम जवळून ऐकायला मिळाले. चांगलं ऐकायला मिळालं ते आईमुळे. ती मला घेऊन जाई.

स्टेजच्या मध्यभागी बसावं आणि श्रोत्यांची दाद घ्यावी, असं स्वप्न मी पहात असे. त्या स्वप्नाच्या वाटेवर मी पाऊल टाकलेलं होतं.

टेपरेकॉर्डरचं फारसं प्रस्थ ज्या काळी नव्हतं, त्या काळात स्पूलचा टेपरेकॉर्डर वडिलांनी माझ्यासाठी आणला. त्याचा भरपूर

उपयोग मी केला. तो आता वडिलांची आठवण म्हणून ठेवला आहे. रियाजासाठी एक तबलजी येत असे.

मॅट्रिकच्या परीक्षेत डिस्टिंक्शन मिळालं होतं तरीही मी आर्टसकडे जायचं ठरवलं. संगीतात प्रावीण्य मिळवायचं हे ठरलं होतं.

सतत प्रोत्साहन देणारे उदारमतवादी आई-वडील, गाढे विद्वान असे गुरू, अनुकूल वातावरण हे सर्व होतं. पण माझी तब्येत खराब असे. सर्दी, सायनस, खोकला, युसिनोफेलिया, त्याच्या जोडीला कावीळ असे गायनाचे शत्रू मानले गेलेले आजार झाले. मग ॲसिडीटी, पोटदुखी, अशक्तपणा मुक्कामाला आले. आजाराचं चक्र सुरू असे. माझा सोशिकपणा, नियमित रियाज करण्याची पद्धत ह्याला आव्हान मिळत असे. मग अशावेळी गुरुजी मला रागांची, बंदिशींची उजळणी, नवीन रागांची माहिती, तालांची माहिती, तालांच्या ठेक्यांचा सराव, संगीतावरील पुस्तकांचं वाचन, इ. अनेक पद्धतींनी संगीतसाधना करायला लावीत. संकटांचा, अडचणींचा असा उपयोग करायचा हा त्यांचा कानमंत्र मला फार उपयोगी ठरला. नाहीतर शारीरिक दुखण्यानं कदाचित् गाणं तेव्हाच संपलं असतं.

दीर्घ श्वास व मोकळा आवाज ह्यावर आधारलेली भेंडीबझारची गायकी हिला कशी पेलणारं, याची चिंता गुरुजींना लागून राहिलेली होती. गुरुजी मला एका विख्यात वैद्याकडे घेऊन गेले. नाडीपरीक्षा केल्यावर ते म्हणाले, 'ही तर सिंगल फासळीची मुलगी आहे. (म्हणजे हिची फुफ्फुसं कमजोर आहेत.) हिला तुमची दमदार गायकी जमणार नाही !'

माझ्या जिवाला धोका नव्हता; पण संगीत शिक्षणावर टांगती तलवार होती. मोठी गायिका होण्याचं स्वप्न विरून चाललं होतं. माझं मन आतल्या आत रडत होतं. आई-वडिलांना हे दुःख कळत होतं. पण गुरुजींनी हे आव्हान स्वीकारलं. घराण्याच्या दमदार गायकीसाठी हिला सक्षम करीन, हा निश्चय त्यांनी जणू केला.

माझं वेळापत्रक तयार केलं. सकाळी आसनं, प्राणायाम, नंतर ओंकार साधना, आवाजाची एक वेगळी साधना, वैद्यकीय सल्ल्यानुसार पथ्य, योग्य आहार, नियमित औषधं, पुड्या, काढे इ.मीही काटेकोरपणे पाळायचं ठरवलं. हे सर्व झटपट परिणाम दाखवणारं नव्हतचं. संयमाने, धीराने मीही तयार झाले. तालमींना खंड पडू दिला नाही. अर्थशास्त्राची पदवी बी. ए. (ऑनर्स) व 'संगीतालंकार' दोन्हीही उत्तम गुणांनी मिळवलं. गाण्यात काम करायचं हे ठरलं.

गुरुजींच्या आखून दिलेल्या दिनक्रमानं माझ्या श्वासात सुधारणा दिसू लागली. दिसायला अगदी काटकुळी होते, पण आवाजाला वजन प्राप्त होऊ लागलं. लयदार बंदिशीचं सौंदर्य उमगू लागलं. गुरुजी पुन्हा यमन, भूप शिकवू लागले. नव्या शैलीत ते सुंदर भासू लागले. 'भूप' तर पूर्वी यांत्रिक, नीरस वाटायचा; पण स्वरांचं गुंजन, विशेष लगाव, रागविस्ताराचं सौंदर्य यामुळे तो राग आवडू लागला. गुरुजी आलाप सांगत ते संपू नयेत असं वाटू लागे. प्रत्येक राग हा सुंदर, स्वयंपूर्ण असतो, आपल्या क्षमतेवर त्याचे पैलू उलगडून दाखवता येतात व त्याचं रूप खुलतं हे समजलं. व्याकरणापलीकडे असलेली रागाची सुंदर भाषा थोडी समजू लागली.

आता मी संगीतात पीएच.डी करण्याची तयारी आरंभली. 'भारतीय संगीताचे आध्यात्मिक महत्त्व' असा विषय गुरुजींनी सुचवला. मार्गदर्शन त्यांचंच होतं. परीक्षेसाठी १५०-२०० अप्रचलित रागही शिकायचे होते. संगीताचं ध्येय मुख्य असलंतरी कौटुंबिक जबाबदाऱ्या, घरकाम, चित्रकलेचा छंद, बागकाम, उत्तम चित्रपट ह्या सर्वांचा आनंदही मी घेत असे.

संगीतकार केशवराव भोळे, रसिकाग्रणी श्रीमंत आबासाहेब मुजुमदार, बुद्धिवंत रँग्लर परांजपे यांच्यासारख्या ज्येष्ठ मान्यवरां[ं]
आमच्याकडे येणं-जाणं असे. गुरुजींमु[ळे]
हिराबाई बडोदेकर, ज्योत्स्ना भोळे, प[ं.]
विनायकबुवा पटवर्धन, वसंतराव देशपां[डे]
यांना भेटता येत असे. ह्या सर्वांच्या व्यक्तिमत्त्वांचा माझ्यावर मोठा प्रभाव आहे.

आमच्या बंगल्यासमोर एक टांगा उभा राहिला. पाहते तो आबासाहेब मुजुमदार दहा-बारा मोठे ग्रंथ घेऊन उभे. पीएच.डी करीत होते ना मी ! कौतुकच नव्हे तर प्रत्यक्ष मदतीला स्वत: आले होते. माझा उत्साह किती वाढला असेल ते सांगायला नकोच !

पं. जानोरीकर बुवांची होतकरू शिष्या म्हणून मला लोक ओळखू लागले. डोळस रियाजात स्वराकृतींवर, दाणेदार तानांवर भर असे. ठुमरी, दादरा, नाट्यगीत, गझल यांचाही समावेश अभ्यासात झाला.

बेगम अख्तर माझं ठुमरी, दादरा, गझल गायनातलं दैवत होतं. त्यांच्या खूप ध्वनिमुद्रिका माझ्या संग्रहात जमा केल्या. त्यांचे उर्दू उच्चारण अभ्यासले. माझ्या गाण्यात ते उतरवण्याचा प्रयत्न केला. ठुमरी, दादरा, गझलशी माझ्या आवाजाचं नातं जुळतं हे लक्षात आलं.

'कलोपासना' हे तरुण कलाकारांचं आमचं एक मंडळ होतं. एकमेकांचं गाणं ऐकायचं, सूचना करायच्या, चर्चा करायच्या असं ठरलं. त्यामुळे आम्हा सर्वांना फार फायदा झाला. दहा-बारा वर्षांनंतर हे थांबलं; पण मैत्रीचं नातं आम्ही टिकवून आहोत.

आता आपण अर्थार्जन करावं अशी ओढ लागली. मात्र गुरुजींनी शिकवण्या करू नकोस असा सल्ला दिला.

सप्टेंबर १९६८ मध्ये खडकीच्या केंद्रीय विद्यालयात नोकरी धरली. दोन बसेस बदलून प्रवास, सात-आठ तास नोकरी, रियाज अशी बरीच धावपळ होत असे. पहिल्या पगाराचा आनंद अनुभवला आणि अचानक वडिलांचा मृत्यू झाला. हा धक्का सहन करणं कठीण होतं. कित्येक दिवस मी गाणं म्हणू

बंदिशींसाठी प्रसिद्ध आहे. त्यात थोडी ओंजळ मीही टाकली. परात्पर गुरू उस्ताद अमान अलीखाँ साहेबांच्या बंदिशीत स्वर, शब्द व लय यांचा सुरेख त्रिवेणी संगम आहे. त्यांचे संस्कार मनावर होते. त्यातून स्फूर्ती घेऊन काही बंदिशी अवतरल्या. साहित्याची रुची, हिन्दी-व्रज भाषांची थोडी जाण याचा उपयोग झाला.

प्रत्येक राग आपल्यासमोर एक भाव घेऊन येतो. ह्याला अनुकूल अशी बंदिशीची शब्दरचना असेल तर तो भाव अधिक सुस्पष्ट, रेखीवपणे मांडता येतो असं मला वाटतं. प्रत्येक रागाचं स्वत:चं व्यक्तिमत्त्व अनुरूप बंदिशीतून खुलतं असा अनुभव आहे.

'यमन' आळवताना एकदा मनात अतीव शांत, शरणागत असा भाव निर्माण झाला. गुरुजींच्या आठवणीनं अधिक गहिरा झाला आणि अचानक शब्द उमटले.

'गुरू शरण जा, मन मेरे'

मग ह्या शब्दांबरोबर यमन रागाचे आलाप घेताना आगळाच आनंद अनुभवता आला. भाव आधी प्रकटला आणि पाठोपाठ शब्द धावत आले असा काहीसा संमिश्र भावनांचा आनंद झाला. मग संपूर्ण बंदिश तयार झाली.

'गुरू शरन जा, मन मेरे
छोंड दे सब मान अभिमान ॥धृ॥
सूरसागर अपार,
मुनी-गुनी न जाने पार
गुरू न भेद विचार,
दीन्हो निगुनी को गुन ग्यान ॥'

तो दिवस होता २९ सप्टें. १९८२

औरंगाबादच्या वास्तव्यात हे घडलं आणि संगीत साधनेत बंदिशींच्या अभिव्यक्तीचं सुंदर साधन हाती आलं. माझं नाव बंदिशींसाठी 'निगुनी' असं घेतलं.. गुण नसलेली निगुनी. गाण्यात जे काही गुण आहेत ते गुरूंचं श्रेय. त्यांच्याविना कुठलेच सांगीतिक गुण आले नसते. म्हणून मी 'निगुनी'

'राग शहानी' मधील बंदिशीत व्यक्त केलेल्या भावनेप्रमाणे

गुनहीन हूँ तो निगुनी
तुम गुननकी हो खानि
तुम सकल कला के धनी ॥धृ॥
नादब्रह्म अति पावन
मुनि गुनी जन ध्यावत मन
आयो शरन, तेरो चरन,
गुरुदाता महाग्यानी ॥

औरंगाबादमध्येच मी स्टेशन डायरेक्टर झाले होते.

१९८५ मध्ये दिल्लीला महानिदेशालयात डायरेक्टर ऑफ प्रोग्राम्स (म्यूझिक) म्हणून नेमणूक झाली. आकाशवाणी केंद्र म्हणजे एक कुटुंब, तर महानिदेशालय म्हणजे जणू एक बिन चेहऱ्याचा माणूस.

फाईल्स, टेप्स आणि माझी केबिन. कलाकार आणि संगीताशी हे संबंधित होतं एवढाच काय तो दिलासा.

पं. जानोरीकरांचे गुरू उस्ताद अमान अली खाँसाहेब यांचं दिल्लीतच १९५३ साली अचानक निधन झालं होतं. पुण्यातच राहात होते खाँसाहेब, कामानिमित्त दिल्लीत आलेले होते. माझ्यादृष्टीनं दिल्लीतल्या माझ्या वास्तव्याला असं भावनिक महत्त्व होतं. मला व गुरुजींना दिल्लीतच त्यांच्या अखेरच्या दिव्य गायनाच्या स्मृती असल्यानं तसं वाटत होतं. पहिल्यांदा दिल्लीत वेगवेगळ्या ठिकाणी दोन दोन महिने राहात होते. अखेर घर मिळालं. तोवर तानपुऱ्याची गवसणीही काढू शकले नव्हते. दिल्लीतल्या रसिक व कलावंतांना आमच्या घराण्याची गायकी ऐकवायला उत्सुक होते.

माझ्याकडे अनेक कामांचे चार्ज होते. त्यात मुख्य म्हणजे देशभरातल्या ऑडिशन्स-शास्त्रीय व सुगम संगीताच्या होत्या. राष्ट्रीय कार्यक्रमांचं आयोजन, तक्रारीची पत्रं, रेडिओ संगीत संमेलनं, मंत्रालयाकडून आलेल्या विचारणा इत्यादी कामांत मी व्यग्र असे. माझं गाणं ह्या काळात थोडसं थांबलं तरी जनसंपर्क वाढलेला होता. दिल्लीत स्वत:ची राहती जागा, क्वार्टर मिळविण्याच्या कामी बरेच

प्रयत्न केलेले होते. मिळणं आणि मि[...]
यातला फरक ह्यावेळी समजला होता.

दिल्लीत माझी पहिली मैफल सुप्र[...]
गायिका नैनादेवींनी स्वत:च्या बंगल्[...]
ऑक्टो. १९८६ मध्ये आयोजित केली ह[...]
शहरातले मान्यवर व रसिक आलेले ह[...]
गुरूंचं स्मरण करून 'यमन' चे आलाप [...]
केले. 'गुरु शरन जा', आवाज चांगला ल[...]
होता. घराण्याची गायकी, मींडयुक्त [...]
भाव असलेले आलाप लयदार सर[...]
दाणेदार ताना श्रोत्यांना ऐकवित होते. त[...]
श्रोते मंत्रमुग्ध झाले. १९५३ साली उस्[...]
अमान अली खाँ साहेबांचं अखेरचं गाणं ज्[...]
ऐकलेलं होतं, ते काही बुजुर्ग कलाकार रसि[...]
श्रोत्यांमध्ये होते. त्यांनाही खाँसाहेब[...]
परंपरा जीवित असल्याचं ऐकून आनंद झा[...]
ठुमरी, भैरवीनं सांगता केली अ[...]
स्तुतिसुमनांचा वर्षाव झेलला. गुरुजींचा प्र[...]
चेहरा समोर आला. कृतज्ञता मनात दाट[...]
वृत्तपत्रांनी मुक्तकंठानं प्रशंसा केली. घराण्[...]
गाणं ऐकवण्याच्या मिशनची दिल्लीत
सुरुवात चांगली झाली.

उस्ताद अमानअली खाँसाहेबां[...]
पुण्यतिथीनिमित्त फेब्रुवारीत नैनादेवी व रा[...]
ह्या संस्थेनं एक भव्य संगीत समारोह के[...]
भेंडीबझार घराण्याची समृद्ध गायकी, वैशि[...]
सांगणारी पुस्तिका, माहितीपूर्ण लेख इ[...]
प्रसिद्धी, पुण्याहून गुरुजी व गुरुबंधू-भ[...]
आलेले, घराण्याचं श्रवणीय गायन य[...]
भरगच्च कार्यक्रम झाला. ह्यानंतर कलक[...]
अहमदाबाद, चंडीगड ते बंगळूरप[...]
घराण्याच्या गायकीचे प्रसारकार्य करीत [...]
आकाशवाणी, संगीत नाटक अकादमी[...]
गुरुजींची विशेष ध्वनिमुद्रणं करून ठेवण्[...]
काम केलं. संगीताच्या अभ्यासकांना [...]
ती मार्गदर्शक ठरतील. गुरुजींना अनेक स[...]
संशोधन संस्थांनी आमंत्रित केलं. गाय[...]
विश्लेषणात्मक विवरण सप्रयोग करण्[...]
कार्यक्रम मीदेखील केले.

नैनादेवींप्रमाणे दिल्लीत श्री. जय[...]

पोतदार यांचीही मदत झाली. हार्मोनियम ऑर्गनचे संगीतकार, नाट्यसंगीत प्रेमी पोतदार उत्साहाने मदत करीत. त्यांच्या बरोबर नाट्यगीतांचा कार्यक्रम करीत असू. महाराष्ट्राबाहेर असूनही नाट्यसंगीताशी संबंधित राहता आलं. नाट्यसंगीताचं हिंदीत संहिता लेखन व प्रस्तुतीकरण अमराठी प्रांतीय रसिकांना आवडलं.

ठुमरी, दादरा ह्या गायन प्रकाराशी माझा खास लगाव आहे. मी ते गात असे पण ते फक्त 'ऐकिव' आहे याची जाणीव होती. त्याचं मूळ उत्तरेकडे असल्याने त्यातलं मर्म गायकाराकडून जाणावं असं वाटलं. नैनादेवींकडे याचं मार्गदर्शन घेतलं. ठुमरीच्या नायिकेचं भावविश्व, ठुमरीची बढत, सूफी रचनांमधलं अध्यात्म असं भरभरुन त्यांच्याकडून मिळालं.

पं. सी. आर. व्यास, पं. रामाश्रय झा, पं. विनयचंद्र मौदगल्य अशा ज्येष्ठ संगीततज्ज्ञांकडून त्यांच्या बंदिशी व राग शिकले. दिल्लीत माझं घर मध्यवर्ती ठिकाणी असल्याने कलावंतांची, पाहुण्यांची रेलचेल असे. पं. व्यासांसारखे कलावंत सपत्निक आले की मला दसरा-दिवाळी असल्यासारखं वाटे.

माझी स्वत:ची आजारपणं व आईच्या प्रकृतीच्या तक्रारी यांच्याशी झुंज देत कलासाधना सुरू होती. दिल्लीच्या वास्तव्यात बालगंधर्व, हिराबाई तसेच कव्वाली, लोकगीतं नाटकगीत इ. याचं संहिता लेखन हिंदीत केलं. लेखन व गायनाचा पुष्कळ अनुभव गाठीशी बांधता आला.

९३ साली माझी बदली गोव्याला राजधानीला झाली. भेंडीबझारच्या उस्ताद अमान अली खाँ साहेबांच्या दिल्लीतून अंजनीबाई मालपेकरांच्या गोव्याला मी यावं हा नक्कीच दैवी संकेत आहे असं वाटलं. अंजनीबाईंच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी अनेक संगीत संमेलनं व इतर कार्यक्रमांचं आयोजन करण्यात व्यग्र झाले. गोवा कला अकादमीला अंजनाबाईंचा मोठा रंगीत फोटो दिला.

आकाशवाणीच्या सेवेला जानेवारी ९६ मध्ये वीस वर्ष पूर्ण झाली. संगीताचा मी ध्यास घेतला तरी आर्थिक स्थैर्य, स्वावलंबन, स्वयंपूर्णता ह्यासाठी नोकरी करणं क्रमप्राप्त होतं. आकाशवाणीनं मला स्थैर्य, मान दिला. संगीत प्रसाराचं श्रम, वेळ, पैसा खर्च होणारं अवघड काम मी नोकरीमुळे करू शकले.

छोटा फ्लॅट कर्ज काढून घेऊन ठेवला होता. भावी काळात बढती, पाचव्या वित्त आयोगाचे फायदे इ.लाभ होते पण आवाज साथ देईतोवर भविष्यकालीन कार्याची आखणी आताच करणं भाग होतं. सरकारी सेवेत सर्व काही अनुकूल होतं तरी गाण्यासाठी मी निवृत्त होण्याचा निर्णय स्वेच्छेनं घेतला. परंपरेचं इतिहास लेखन, बंदिशींचं ध्वनिमुद्रण, मुलाखती इ. खूप कामं राहिलेली होती.

आकाशवाणीबद्दल कृतज्ञभाव, आत्मीयता वाटत होती तरी मी सेवामुक्त झाले.

केंद्रीय मानव संसाधन मंत्रालयाची फेलोशिप दोन वर्षासाठी मिळाली. माझ्या गुरुजींचं ध्वनिमुद्रण चांगल्या स्टुडिओत मनासारखं करता आलं. यशाबरोबर अपयश, निराशाही आली. चढउतार आले, पण घराण्याची गायकी प्रस्तुत करण्यासाठी माझा गायनप्रपंच मांडला व गुरुकृपेनं, देवदयेनं रंगमंचीय आविष्काराचा आनंद उपभोगत आहे. मौखिक परंपरेनं सुरू ठेवलेलं गुरु-शिष्य नात्याचं चक्र मीही सुरू ठेवलेलं आहे. अर्थार्जनासाठी शिकवणी करू नये असा एकेकाळी मला गुरुंनी सल्ला दिलेला होता; पण संगीतविद्येचं धन युवापिढीसाठी सुपूर्त करण्याच्या हेतूनं विद्यादानाचं कार्य सुरू आहे. 'संगीत'चा वर्षारंभ विशेषांक 'भेंडिबझार घराना विशेषांक २००६' प्रसिद्ध झाला. या निमित्तानं घराण्याच्या विषयांच्या माहितीचं काहीतरी भरीव लेखन देता आलं याचं समाधान आहे. त्यासाठी विशेष लेखन केलं. 'स्वरसेतु' साठी अंजनीबाई मालपेकरांचे जीवनचरित्राचं लेखन केलेलं आहे. मात्र हे सर्व सूसूत्रपणे लिहून काढायचं आहे.

'भारतीय संगीताचे आध्यात्मिक महत्त्व' हा प्रबंध लिहिताना ह्या गहन विषयाची एक रूपरेखा मांडलेली होती. योगाभ्यासानं शरीरातील सात चक्रं जागृत होतात तशी विशिष्ट गानसाधनेतही ती होतात. प्राणायामादी क्रिया होतात व अंतिम समाधी साधनही साध्य करता येते.

तसेच संगीत व अध्यात्माची सांगड भक्तिभावाच्या आधारानं संगीताचं विशेष ज्ञान नसलेल्यालाही एकतारी घेऊन घालता येते. योग, भक्ती आणि ज्ञान ह्या तिन्ही वाटांनी संगीत ईश्वरापर्यंत घेऊन जातं. ह्या विषयांवर पुन्हा एकदा अनुभवाधिष्ठित असं साधार लेखन करण्याचा विचार आहे. अर्थात गुरुकृपेमुळेच हे शक्य होईल.

२ मार्च २००२ ह्या दिवशी पं.जानोरीकर बुवांचा सहस्रचंददर्शन सोहळा सुरू असताना सत्काराला उत्तर देताना स्वत: गुरुजींनी मला स्टेजवर बोलावलं व सुरेख फ्रेम केलेलं गौरवपत्र दिलं. त्यांचं शब्दमय कौतुक स्वीकारताना मन भरून पावलं

गुरुंच्या आशीर्वादापेक्षा आणखी काय हवं?

गायन-संशोधन-लेखन

देवगंधर्वांचं देणं

मराठी संगीत नाटकाला 'स्वयंवर' सारखं कैलासलेणं देणाऱ्या देवगंधर्व भास्करबुवा बखले यांच्या निधनानंतर त्र्याहत्तरवर्षांनंतर त्यांच्या नातसुनेनं शैला दातार यांनी बुवांच्या जीवनाचा, संगीताचा शोध पुन्हा नव्यानं घेतला आणि 'देवगंधर्व' हा बुवांचा चरित्रग्रंथ साकारला.

संशोधन, गायन आणि लेखन ह्या तिन्ही क्षेत्रांत शैला दातार नावाजलेल्या आहेत. हे अनुभव कथन त्यांच्या कर्तृत्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकेल.

शैला दातार

'भास्करबुवांचं महान व्यक्तिमत्त्व हे माझं आयुष्यभराचं सेवास्थान आहे' असं मला नेहमीच वाटत आलेलं आहे. १८६९ हे बुवांचं जन्मसाल. त्या काळात संगीतकलेला समाजमनसात एका ठराविक वर्गापुरतंच स्थान होतं, तेही जास्त करून संस्थानिकांच्या आश्रयानं, शिवाय जातिभेदाचं अवास्तव स्तोम माजलेलं. अशा काळात सर्व मुसलमान गुरूंची सेवा करून विद्या मिळवणं किती कठीण असणार याची कल्पनाच केलेली बरी. त्यातही पुन्हा बहुसंख्य गुरू लहरीच असत. अशा या लहरी गुरूंना प्रसन्न करून घेऊन त्यांनी मिळवलेली विद्या स्वत:जवळ राखून न ठेवता भास्करबुवांनी शिष्यांना भरभरून दिलीच, पण ज्या काळात जिथं गुरूला एखाद्या बंदिशीमधला शब्द अडला तर विचारायची हिंमत नसे, गुरूसमोर बंदिश लिहिलेली चालत नसे, एखाद्या बंदिशीची अस्ताईच माहिती आहे अन् अंतरा गुरूच्या मर्जीप्रमाणे मिळणार, अशी परिस्थिती असे; अशा त्या प्रतिकूल काळात अनंत अडचणी असूनही मिळालेल्या हजारो बंदिशी पुढच्या पिढ्यांना माहिती व्हाव्यात म्हणून बुवांनी स्वतः टिपून लिहून ठेवल्या, याचं आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही. -

लोकमान्य टिळकांसारखा महापुरुष ज्यांच्या विद्येची कदर करतो, सामान्यांपासून असामान्य असे गायक, पंडित, रसिक ज्यांच्याबद्दल फक्त चांगलंच बोलतात, ते भास्करबुवा हे सिद्धपुरुषच म्हणायला हवेत. त्यांची पुण्याई अशी जबरदस्त की, जसजसा काळ जातो आहे, तसतसं त्यांचं मोठेपण वाढतच जातं आहे. त्यांचं निधन होऊन ७३ वर्षे झाली. त्यांनी १९११ साली स्थापन केलेला पुणे भारत गायन समाज ८५ व्या वर्षाकडे दिमाखात वाटचाल करतो आहे. त्यांनी गाऊन अजरामर केलेल्या बंदिशी आज नामांकित गवई अभिमानानं गात आहेत. त्यांनी संगीत दिलेल्या 'स्वयंवर', 'द्रौपदी', 'विद्याहरण' नाटकांतील चाली अजूनही ताज्या, टवटवीत राहिल्या आहेत. परमेश्वर शक्तिरूपानं आहे, असं मानलं जातं. तसंच या सर्वांमुळं भास्करबुवाही शक्तिरूपानं आपल्यात आहेत असं निश्चित वाटत राहतं.

गायनाचार्य वझेबुवा हे भास्करबुवांचे समकालीन. त्यांनी एके ठिकाणी असं म्हटलं आहे, ''भास्करबुवांकडून गाण्याशिवाय अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.'' अशा या भास्करबुवांच्या व्यक्तिमत्त्वाचा, सांगीतिक कामगिरीचा शोध पिढ्यान् पिढ्या न संपणारा आहे.

भास्करबुवांची मी नातसून. नात्यानं जबाबदारी ओळखून हा शोध घेण्याचा प्रयत्न करणारं हे चरित्र लिहिलं; पण नातसून या नात्यानं बुवांकडे मी पाहिलं नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास अनेक अंगांनी करायचा प्रयत्न मी केला आहे. गुरू, शिष्य, पती, पिता, मित्र, रसिक श्रोता, गवई, संगीतदिग्दर्शक, अभ्यासू कलावंत आणि शेवटी एक माणूस अशा प्रत्येक अंगानं बुवांचं जे दर्शन मला घडलं; ते सर्वांना घडवण्याचा माझा हा प्रयत्न आहे.

यात माझ्याकडून जे लिहिलं गेलं आहे, ते भास्करबुवांचा गौरव करणारंच आहे. त्यामुळे कोणालाही असं वाटेल की, हा जणू गौरवग्रंथच आहे. त्यांच्यावर देवपण लादलं गेलं आहे. त्यात बुवांची प्रतिकूल बाजू, कदाचित असलाच तर त्यांचा लहरी स्वभाव, त्यांच्या हातून झालेल्या चुका-असं काहीच दाखवलेलं नाही. पण ह्या गोष्टींना आपोआपच मर्यादा पडल्या. कारण बुवांबद्दल कोणी प्रतिकूल सांगणारं, लिहिणारं शोधूनही सापडलं नाही. बुवांना 'देवगंधर्व' पदवी का मिळाली त्याचं उत्तर कदाचित या घटनेत सापडावं.

आमच्या पिढीनं भास्करबुवांना तर नाहीच पण त्यांच्या दोन-तीन शिष्यांशिवाय कोणालाही पाहिलेलं नाही. म्हणूनच चरित्र लिहिताना जे लेखी पुरावे मिळाले किंवा ज्यांनी स्वत:चं रेकॉर्डिंग करण्याची परवानगी दिली त्यांचंच म्हणणं मी प्रमाण मानलं. कारण कुठंही इतिहासाला सोडून लिहिलं जाणार नाही, हे प्रथम बघणं माझ्या दृष्टीनं आवश्यक होतं. पुन्हा मला जे पुरावे उपलब्ध झाले, त्यांमध्ये कोणतेही फेरफार न करता जे आहे त्यांचंच संकलन करून सर्वांपुढे मांडणं एवढंच काम मी येथे केलं आहे. या चरित्रासाठीची साधनसामग्री गोळा करायला, मिळालेल्या सामग्रीचा कसोशीनं अभ्यास करायला अन् प्रत्यक्ष हे चरित्र लिहायला मला एकूण १५

वर्षे लागली.

आम्ही १९७९ साली भारत गायन समाजातून श्री. मकरंद बाक्रे यांच्या घरी रहायला गेलो तेव्हापासून मी बुवांवरचं लिखाण एकत्र करायला सुरुवात केली. याकरिता मी अनेक पुस्तकांचं वाचन केलं. आई-वडिलांनंतरचे (मनोहरपंत व लीला सरदेसाई) माझे पहिले गुरुजी डॉ. वसंतराव देशपांडे यांना भेटून बुवांच्या चरित्रलेखनासंबंधीची माझी कल्पना सांगितली. ते म्हणाले, ''हे व्हायलाच हवं. त्याची गरजही आहे. मला जेवढी शक्य आहे, तेवढी मदत मी करीन.'' त्याचवेळी सुप्रसिद्ध लेखक व. पु. काळे यांनी या कामाची ओळख व्हावी म्हणून सुंदर विनंतीपत्रकं नुसती लिहून न देता छापूनच दिली. ही पत्रकं सर्व संबंधितांना पाठवून या कामात मला सहकार्य करण्याची मी विनंती केली.

त्याच सुमारास पं. रामभाऊ मराठे आमच्या घरी मुक्कामाला आले आणि घरात गाण्याच्या, मास्तर कृष्णरावांच्या, भास्करबुवांच्या गोष्टींना उधाण आलं. त्यांनाही चरित्रलेखनाची माझी कल्पना आवडली. त्यांनी आमच्याकडेच उतरायचं, बुवांच्या बंदिशीची, मास्तरांच्या बंदिशींची माहिती करून द्यायची असं ठरलं. महाराष्ट्र सरकारची संगीताची शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे १९८० सालापासून माणिकबाईंचाही सहवास आम्हाला लाभला. त्यामुळे शास्त्रीय संगीताचा माझा खरा अभ्यास सुरू झाला. १९८० सालीच पं. गजाननबुवा जोशी आमच्याकडे प्रथम रहायला आले. तेव्हापासून जवळजवळ ८ वर्षे ते पुण्यात आले की आमच्याकडेच उतरत. पं. गजाननबुवा रहायला आले की आम्ही बुवांच्या वह्या त्यांच्यासमोर ठेवत असू. त्यांतल्या बंदिशी ते रेकॉर्ड करून देत. पं. गजाननबुवांनी किती रेकॉर्डिंग करून दिलं, किती विद्या दिली, याचं मोजमाप करता येणं शक्य नाही.

हळूहळू बुवांच्या आठवणी अन् रेकॉर्डिंग यांचा संग्रह वाढू लागला. या कामात कधीही खंड पडला नाही. १९८६ सालापासून आणखी दोन गवयांचा, गुरुजनांचा आम्हाला लाभ झाला. एक म्हणजे पं. मल्लिकार्जुन मन्सूर आणि दुसरे स्वरराज छोटा गंधर्व.

८६ सालापासून पं. मल्लिकार्जुन मन्सूर हे बाक्रे साहेबांकडे उतरायला लागले. मग वेळ मिळाला की ते घरात येऊन बसत. बुवांच्या वह्यातल्या बंदिशी म्हणून दाखवत. कार्यक्रमाचं रेकॉर्डिंग करायला परवानगी देत. काही बंदिशी शिकवतही. वेळीअवेळी त्यांच्याबरोबर होणाऱ्या गप्पाही रंगत.

याच वर्षापासून स्वरराज छोटा गंधर्वही घरी नियमित येऊ लागले. त्यांनी भास्करबुवांनी संगीत दिलेल्या 'स्वयंवर', 'द्रौपदी', 'विद्याहरण' या नाटकांतील पदांच्या अनेक बंदिशी ध्वनिमुद्रित करून दिल्या.

शिवाय त्यांनी सांगितलेल्या ठिकाणी आम्ही बुवांच्या बंदिशींचा शोध घेतला आणि 'स्वयंवर' व 'द्रौपदी' या दोन नाटकांतील १०१ पदांपैकी ८९ पदांच्या मूळ बंदिशी आम्ही मिळवू शकलो. याशिवाय स्वरराजांनी त्यांच्याजवळचा संगीताचा दुर्मिळ खजिना पं. रामभाऊ मराठे आणि पं. गजाननबुवांप्रमाणेच रेकॉर्ड करून दिला. या सर्वांनी, आमची ऐपत नसताना आम्ही त्यांची जी थोडीफार सेवा करू शकलो, ती गोड मानून घेऊन, आम्हाला भरपूर विद्या दिली. या सर्वांचंच ऋण न फेडता येणारं. बुवांच्याच पुण्याईनं आम्हाला हे सारं मिळालं, असं म्हटल्यास वावगं होणार नाही.

याशिवाय भास्करबुवांचं आतापर्यंत ४ मिनिटांचं रेकॉर्डिंगही उपलब्ध झालं. शिवाय त्यांच्या काही शिष्यांच्या रेकॉर्ड्सही होत्या. कुर्ल्याच्या श्री. प्रभाकर दातारांनी बालगंधर्व, मास्तरांबरोबर गोविंदराव टेंबे (हार्मोनियम), नरहरबुवा पाटणकर, ताराबाई शिरोडकर, बापूराव केतकर, माधवराव लेले, कृष्णराव गोरे ह्या शिष्यांच्या व बुवांच्या कन्या प्रमिलाताई बखले (दातार) यांच्या रेकॉर्ड्स दिल्या. त्यामुळे ह्या सर्वांच्या गाण्या[...]
पद्धतीची खूप माहिती झाली. पुण्या[...]
कीर्तनकार कानडेबुवांनी व करवीर[...]
शंकराचार्यांनी (कऱ्हाडकर बुवांचे चिरंजी[...]
कऱ्हाडकर बुवांच्या कीर्तनाच्या ३ कॅसे[...]
दिल्या. त्यात कीर्तनातलं ख्याली गा[...]
ऐकायला मिळालं, जावरे पती-पत्नी[...]
कलकत्त्याच्या श्री. ओम्लान दासगु[...]
यांच्याकडून भास्करबुवा, चंदा कारवार[...]
दिलीपचंद वेदी, गोविंदराव टेंबे, अंजनीबा[...]
मालपेकर यांच्या गायनाचं रेकॉर्डिंग मिळ[...]
दिलं.

आता साहित्य गोळा करण्याब[...]
सांगायचं, तर त्याही बाबतीत पहिल्यापा[...]
अनेकांचं बहुमोल सहकार्य मिळत गेलं. अ[...]
मदत केलेल्या हितचिंतकांची संख्या खू[...]
मोठी आहे. पण काहींचा इथे उल्लेख क[...]
मला आवश्यक वाटतं.

सुरुवातीला सर्वात जास्त मदत झा[...]
ती मुंबईच्या ट्रिनिटी क्लबच्या श्री. गोपाळ[...]
मेहेंदळे यांची. बी. आर. देवधर, रामकृष्णबु[...]
जोशी, लक्ष्मणराव बोडस, शरच्चंद्र गोख[...]
अशा अनेक मान्यवरांकडे त्यांनी मला ने[...]
अनेकांचे पत्ते दिले. अनेकांना त्यांनी माझ्या[...]
वतीनं पत्रं पाठवली.

भय्यासाहेब धामणकर हे तर बुवां[...]
जावईच. त्यांनी गोळा केलेल्या[...]
साहित्यावरूनच नी. म. केळकरांनी बुवां[...]
चरित्र लिहिलं. धामणकरांनी जी कागद[...]
जंमवली ती आमच्या घरातच होती. ती स[...]
माझे मोठे दीर श्री. सुहास दातार यां[...]
उपलब्ध करून दिली. त्यात असा बरा[...]
मजकूर होता की ज्याचा केळकरां[...]
लिहिलेल्या चरित्रात उल्लेख आलेला नव्हत[...]
त्याचा उपयोग मी केला. शिवाय लिखि[...]
कागदपत्रं पुरावे म्हणूनही माझ्या हाता[...]
राहिली. ही सर्व कागदपत्रं झेरॉक्स कर[...]
ठेवली आहेत. कै. नी. म. केळकरांना उपल[...]
झाली नव्हती अशी अनेक दुर्मिळ हस्तलिखि[...]
मला मिळाली. त्यातली महत्त्वाची म्हण[...]

इच्छा होती. पण मध्यमवर्गीय गृहिणी असल्यानं ते जमू शकलं नाही. शेवटी असं लक्षात आलं, की हा शोध न संपणारा आहे. कदाचित काही वर्षांनी आणखीही काही मिळेल.

हे जे काम हातून घडलं त्यासाठी जवळच्या मंडळींची मला फार मदत झाली. चरित्राच्या पूर्वार्धाची प्रेसकॉपी माझी धाकटी जाऊ सौ. स्मिता हिनं केली, तर उत्तरार्धाची प्रेसकॉपी विद्यार्थिनी सौ. देवयानी दीक्षित हिनं केली.

भास्करबुवांच्या निधनानंतर ७३ वर्षांनी हे पुस्तक प्रकाशित करायचं होतं. त्याकरिता दर्जेदार प्रकाशन संस्थाच हवी होती. आमचे हितचिंतक श्री. मधू गानू यांच्यामुळे श्री. दिलीप माजगावकर यांच्या 'राजहंस' प्रकाशनानं ह्या पुस्तकाचा स्वीकार केला आणि माझी ही इच्छादेखील पूर्ण झाली. श्री. मधू गानू आणि श्री. दिलीप माजगावकर यांचे आभार मानायला माझ्याजवळ शब्दच नाहीत.

या चरित्राला मी ज्या विविध प्रकारच्या सूची जोडू इच्छित होते, त्या सर्व सूचींचं पुनर्लेखन करून त्यांना शास्त्राशुद्ध स्वरूप देण्याचं महत्त्वपूर्ण काम प्रा. द. दि. पुंडे व सौ. शकुंतला पुंडे यांनी मनापासून केलं. त्यामुळे या चरित्राची सप्रमाणता वाढली आहे. तसेच प्रेसकॉपी तपासण्याची मोठी जबाबदारी प्रा. श्रीरंग संगोराम यांनी श्रद्धेनं केली व चरित्रातील बंदिशी सुधारून दिल्या. मुद्रितं तपासण्याचं किचकट काम सौ. शकुंतला पुंडे यांनी केलं. या सर्वांचे आभार मानणं हे माझं कर्तव्यच समजते.

दि. १७ ऑक्टोबर १९९५ रोजी बालगंधर्व रंगमंदिरात 'देवगंधर्व' या ललित चरित्र प्रकाशनाचा सोहळा थाटामाटात व्हावा यासाठी पुण्यातील उद्योगपती श्री. डी.एस्. कुलकर्णी फाउंडेशन यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांचे आभार या प्रस्तावनेत मानणं उचित होईल.

माझे पती श्री. सुधीर दातार आणि मुलं चि. शिल्पा आणि चि. हृषीकेश यांनी तर मला किती सांभाळून घेतलं हे सांगताच येणार नाही. तिघांनीही भरपूर सहकार्य दिलं आणि सतत मदतही केली. सुधीर यांनी तर मला सुरुवातीलाच सांगितलं, ''हे काम करण्याची माझीही खूप इच्छा आहे. पण नोकरी सांभाळून मला जमणार नाही. एक वेळ मी घर सांभाळीन. तू सगळीकडे खुशाल जा अन् हे काम चांगल्या रीतीनं पुरं कर.'' त्यांनी असा पूर्ण विश्वास टाकल्यानं चरित्रलेखनाचं काम शांतचित्तानं होऊ शकलं.

लेखनाचा कुठलाही अनुभव नसल्यानं आणि मी एक केवळ मध्यमवर्गीय गृहिणी असल्यानं माझ्या या कामाला शेवटी काही मर्यादा असणारच. ह्या ग्रंथात ज्या काही उणिवा असतील तो दोष माझा आणि जे काही चांगलं असेल ते आमच्या बुवांचं.

गाणं घरातच होतं. अगदी कळायला लागल्यापासून ते कानांवर पडलं. पं. मनोहर सरदेसाई व लीला सरदेसाई हे संगीतात रमलेले आई-वडील लाभले. दोन खोल्यांच्या बिऱ्हाडातल्या एका खोलीत गाण्याच्या शिकवण्या चालत असत. तबला-पेटीवर बोटं कधी फिरू लागली ते कळलंच नाही. आईला बरं नसलं की बसलेच पेटीवर, नाही तर तबल्यावर. माझी आई पूर्वाश्रमीची लीला खरे. तिचं घराणं बालगंधर्व-भक्त. खऱ्यांच्या घरी पूर्वी कृष्णा मास्तर लहानपणी येत असत. मग आजी त्या छोट्या मुलाकडून गाणं म्हणून घेत असे! म्हणे आईच्या ध्वनिमुद्रिकाही निघालेल्या होत्या. गंधर्व गायकीचा परिचय बालपणीच घडला.

वडिलांबरोबर कै. दादासाहेब जेस्ते यांच्या घरी जात असे. जेस्ते दीनानाथप्रेमी होते. त्यांच्याकडे गेल्यावर मा. दीनानाथांच्या आवाजातल्या ध्वनिमुद्रिका ऐकल्यावर मी मंत्रमुग्ध होत असे. बालगंधर्व व दीनानाथांच्या सुरांनी माझी बोटं धरली होती. ह्या सुरेल प्रवासात बेलबागेत होणारी रसाळ कीर्तनंही भेटली. निजामपूरकर बुवा, कऱ्हाडकर [...] यांच्या कीर्तनांनी मला अक्षरश: वेड ला[...]

पुढील आयुष्यात सुधीर दातारांशी [...] झाल्यावर आणखी एका दिव्य विभूतीचं द[...] झालं. प्रत्यक्ष नाही, पण त्यांच्या विराट स[...] विचारातून. देवगंधर्व भास्करबुवा बखले य[...] नातसून झाले.

ह्या नात्यानेच नव्हे; पण बुवांच्या स[...] व्यक्तिमत्त्वानं मला भारून टाकलं. भा[...] गायन समाजाच्या वास्तूत राहताना बुवांच्[...] संगीताबद्दल, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्द[...] संदर्भ खुणावू लागले. मात्र १९७९ सा[...] प्रत्यक्ष साहित्य जमवाजमवीला सुरुवात केल[...] देवगंधर्वांचं देणं शब्दरूपातून घ्यायचा ध्य[...] घेतला.

देवगंधर्व ह्या ग्रंथाची अल्पावधीत दुस[...] आवृत्ती निघाली. ह्या ग्रंथाची कै. डॉ. श्री[...] संगोराम यांनी केलेली हिंदी आवृत्ती[...] प्रकाशित झाली. इंग्रजी आवृत्तीचंही का[...] सुरू आहे.

देवगंधर्वांचं देणं एवढं मोठं की मा[...] अक्षय्यपात्र भरून वाहत आहे. सास[...] माहेरघरांच्या गंगा-यमुनांनी माझं आयुष्[...] स्वरांनी भरून टाकलेलं आहे.

संशोधन, लेखन आणि गायन ह्यांच्या अंगणात माझी इवलीशी पणती तेवत आहे.

विचारांना वळण दिलं.

पं. व्यासांनी सहा महिन्यांच्या अवधीत प्रेमळपणे; पण तितक्याच शिस्तीने गाणं शिकवलं. नंतरच्या पुण्याच्या वास्तव्यात डॉ. वीणा सहस्रबुद्धे यांच्याकडून गायनातली शिस्त, प्रयोगशीलता याचा वस्तुपाठ मिळाला. वीणाताईंची चिकाटी, बुद्धिमत्ता, काटेकोर प्लॅन्ड् गायन हे पाहता आलं, ऐकता आलं. रोज दहा ते दोन ह्या वेळात आमचं गायन आणि संवाद चालत असे. प्रश्न विचारायला, आपली मतं व्यक्त करायला पूर्ण मुभा; मग हा संवाद, गाणं टेप करून घेत असे व घरी जाऊन त्यावर विचारमंथन चालत असे. ह्या सर्वांचा मला अतिशय उपयोग झाला. विवाहानंतर पुण्यात घर केलं ते औंध परिसरात, वीणाताईंच्या घराजवळ असावं म्हणून. मालकरांचं माझ्या गाण्यासाठी संपूर्ण प्रोत्साहन होतं व आजही आहे, हे सांगायला हवं.

वीणाताईंचं गाणं हे सुंदर, स्वत: घडवलेलं, प्रयत्नानं सिद्ध केलेलं गाणं आहे. ह्यातून स्फूर्ती घेऊन आपणही असंच गाणं करायला हवं असं वाटलं. ह्या विचारात असताना माझी मैत्रीण श्यामा जोशी हिनं मला डॉ. विकास कशाळकर यांचं गाणं ऐकायला नेलं. त्यांची मखमली स्वरांची ग्वाल्हेर गायकी मला फार आवडली. संगीत शिक्षणाच्या प्रवासातलं काही अपुरेपण सरांच्या गायकीतून पूर्ण होईल, असा विश्वास वाटला.

डॉ. विकास कशाळकरांसारख्या सहृदय, नेहमी मदतीस तत्पर, शिष्यांना प्रोत्साहन देणाऱ्या गुरूंची भेट झाली.

पुण्यातलं वास्तव्य ह्याचवेळी संपुष्टात आलं. मालकरांची औरंगाबादला बदली झाली. माझी राधा, जनक ही मुलं लहान होती; पण मालकरांच्या प्रोत्साहनामुळे पुणे-औरंगाबाद अशा फेऱ्या करून गायनाचं शिक्षण सुरू ठेवता आलं. काही वेळा गुरुगृही राहत असे. सौ. उज्ज्वलावहिनी आईच्या मायेनं जेऊ घालत असत. मग तिथला क्षणन्‌क्षण सार्थकी लावावा असं मला वाटत असे.

सरांचे सूफी संगीत, हवेली संगीताचे प्रयोग, त्यावरचं भाष्य ऐकायला मिळालं, त्यात सहभागी व्हायला मिळालं. सरांनी नेट्‌ची परीक्षा द्यायला लावली. त्यांचं संगीताचं मुक्त चिंतन ऐकायला मिळालं. ह्या विचारमंथनातून देवगिरीच्या संगीत वैभवाची शिखरं खुणावीत होती.

देवगिरीच्या यादवकालापासून आजपर्यंत

रागविद्येचा आविष्कार, कीर्तन परंपरा, नाट्यसंगीत... हे सर्व जीवित ठेवणारे मराठवाड्यातले निस्पृह कलावंत, त्यांची संगीत साधना, याचा एक पट समोर साकारत होता. संगीताच्या इतिहास-वर्तमानातल्या घटना वाचलेल्या, ऐकलेल्या, पाहिलेल्या होत्या. मात्र हे सर्व लिहावं असं काही चित्र उमटत नव्हतं.

साहित्य संस्कृती मंडळाचे श्री. रा. रं. बोराडे यांनी मराठवाड्याच्या अभिजात संगीताबद्दल लिहावं असं सुचवलं; तेव्हाही हे सर्व धूसर वाटत होतं.

ह्या विषयावर लिहिण्यासाठी खुद्द सरांनीच सुचवलं आणि मग मात्र माझी परीक्षा सुरू झाली. हे आव्हान पेलायचं बळ माझ्या ठायी कसं आलं; याचा वि[illegible] करताना आज वाटतं की, माझे गुरू, [illegible] आई-वडील, स्नेही यांच्याबरो[illegible] संगीतप्रेमी, अभ्यासक, रसि[illegible] संगीतशास्त्रवेत्ते यांचाही मदतीचा हात [illegible] आला. मराठवाड्याचा सांगीतिक वा[illegible] शब्दांतून मांडण्यासाठी ह्या ज्ञात-अ[illegible] शक्तीनं प्रोत्साहित केलं.

कॉन्व्हेन्टच्या शिक्षणामुळे मराठी[illegible] शैलीदार लेखन कसं असतं याचा फार म[illegible] अनुभव गाठीशी नव्हता. संस्कार होते; [illegible] सराव नव्हता. मग केवळ मराठी लेख[illegible] शैलीसाठी अनेक ग्रंथ अभ्यासले.

मालकरांनी केलेल्या काही सूचनां[illegible] उपयोग झाला. समाजातील साम[illegible] वाचकालाही लेखन समजावं, विषय कळा[illegible] हा त्यांचा बहुमोल सल्ला अमल[illegible] आणण्याचं ठरवलं.

माझ्या सरांनी ह्या ग्रंथाच्या विषयास[illegible] वैचारिक स्पष्टता येण्यास फार मदत केल[illegible] नव्हे ठामपणे ते माझ्यामागे उभे राहि[illegible] पुणे-औरंगाबाद अशा फेऱ्यांतून, चर्च[illegible] बरेचसे चित्र स्पष्ट होत गेले. लेखाची [illegible] कुरियरने रवाना करायची व त्यांच्याक[illegible] आलेल्या टिपणांना पुन्हा सुसूत्रपणे लि[illegible] काढायचं असा क्रम सुरू राहिला. माझ्[illegible] अनेक प्रश्नांना उत्तरं देण्याचा सरांनी क[illegible] कंटाळा केलेला नाही, मला कधीही नाउमे[illegible] केलं नाही, हे मला कृतज्ञतापूर्वक सांगित[illegible] पाहिजे.

तेराव्या शतकापासून विसाव्[illegible] शतकापर्यंतच्या मराठवाड्याती[illegible] रागसंगीताच्या प्रवासाचा मागोवा घेण्याच[illegible] प्रयत्न या पुस्तकात केला गेला आहे[illegible] मराठवाड्यातील रागसंगीताविषयी एकत्रि[illegible] अशी माहिती कुठेही उपलब्ध न झाल्यामु[illegible] उपलब्ध मासिके, संमेलनांच्या स्मरणिका[illegible]

लेख, चरित्रात्मक पुस्तके, ज्येष्ठ कलाकार व रसिकांशी यासंबंधी केलेले हितगुज, या मांडवलावर मी एकटी प्रवासाला निघाले. ललितकलांचा, विशेषत: शास्त्रीय संगीतासारख्या प्रवाही श्राव्य कलेचा मागोवा घेणे सोपे नाही याची जाणीव सारखी होत होती. परंतु गुरुजनांचे मार्गदर्शन आणि ज्येष्ठ कलाकारांनी दिलेल्या प्रचंड प्रतिसादाच्या बळावर मी मार्गक्रमण करू शकले. हा प्रवास आनंददायी आणि तितकाच उद्बोधक झाला. प्रवासात डॉ. ...नंद देशपांडेसरांनी महानुभाव पंथाची अनेक दुर्मिळ पुस्तके व त्यातील गायनाचे संदर्भ स्वत: दाखवून उत्साहाने सुरुवात करून दिली. ज्येष्ठ संगीतज्ञ कै. ना. द. कशाळकरांच्या, संतसाहित्यातील रचनांची गेयता आणि रागसंगीत, यावरच्या मूलभूत संशोधनात्मक लेखांनी एखाद्या दीपस्तंभासारखा मार्ग दाखविला. नाथ साहित्याचे अभ्यासक डॉ. चंद्रकांत ...डेसरांनी अत्यंत आत्मीयतेने हवे असलेले संदर्भ काढून दिले. 'सरस्वती भुवन महाविद्यालया' चे ग्रंथपाल होळंबेसरांनी पुढाकार घेऊन मला लागणाऱ्या विषयातील सर्व पुस्तके उपलब्ध करून दिली. लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. प्रभाकर ...डेसरांशी झालेल्या चर्चेतून 'ओवी ते लावणी' या डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांच्या पुस्तकाचे नाव पुढे आले आणि ते वाचल्यावर अक्षरश: खजिना हाती लागल्याचा आनंद झाला. याशिवाय द. ग. ...पांडे यांच्या 'नाट्यवेडा मराठवाडा' या पुस्तकातूनही बहुमोल माहिती मिळाली. ...दास देगलूरकरांनी प्रकाशित केलेल्या 'मराठवाडा गौरव विशेषांक' ग्रंथाची साथ ... आधीपासून होती. त्यातील आजी-माजी कलाकारांचे पत्ते, दूरध्वनी क्रमांक या माहितीमुळे बरेच कष्ट वाचले. ज्येष्ठ कलाकारांशी बोलताना प्रत्येक जण, त्यांनी अनुभवलेला काळ इतक्या समरसून उभा करीत की, मीपण सहजपणे त्या भावनिक हिंदोळ्यामध्ये सामावली जाऊ लागले. अनंत अडचणी सोसून त्यांनी रागविद्येची केलेली जपणूक त्यांच्यातील असामान्यत्वाचे दर्शन घडवित होती. रजाकारांच्या काळात पलुस्कर पुण्यतिथी साजरी करण्यासाठी कंदिलाच्या प्रकाशात त्यांचा पुस्तकावरचा फोटो समोर ठेवून गायन करणे, गणेशमेळ्यात आपला मेळा सर्वोत्तम ठरावा म्हणून केलेल्या क्लृप्त्या, संगीत प्रेमामुळे नात्यापेक्षा घट्ट विणेचे असे मैत्रीचे निर्मळ संबंध, असे अनेक प्रसंग मला नतमस्तक करीत होते. भाऊसाहेब दीक्षितांसारखे ऐंशी वर्षांचे 'तरुण' वादक या वयातही इतक्या उत्साहाने साथ करतात, हे पाहिल्यावर त्यांनी आयुष्यभर कमावलेल्या संगीताच्या श्रीमंतीचे तेज त्यांच्या चेहऱ्यावर झळकते आहे, हे सांगायचीही गरज पडत नाही. माझ्या या ऐतिहासिक प्रवासातील अशा सहप्रवाशांनी आपल्या अनुभवांनी या पुस्तकाला समृद्ध केले, या विषयाकडे बघण्याची नवी दृष्टी दिली.

एकूण आठ प्रकरणांत या पुस्तकाची विभागणी केली गेली आहे. पहिल्या तीन प्रकरणांत यादवकाळ, संत एकनाथ महाराजांचा कालखंड आणि निजामशाही (अठरावे शतक) या कालखंडांतील शास्त्रीय संगीताच्या प्रवासाचा थोडक्यात परामर्श घेतल्यानंतर चौथ्या प्रकरणापासून आठव्या प्रकरणापर्यंत मराठवाड्यातील पूर्वीचे पाच जिल्हे (औरंगाबाद+जालना, नांदेड, परभणी+हिंगोली, बीड आणि उस्मानाबाद+लातूर) यातील रागसंगीताच्या प्रसाराचे सविस्तर विवेचन केले आहे. त्यात प्रामुख्याने विसाव्या शतकावर भर दिला गेला आहे. तसेच शास्त्रीय संगीतापुरताच हा विषय मर्यादित ठेवण्यात आला आहे. रागसंगीताचे महत्त्व अधिक स्पष्टपणे विषद करताना काही प्रसंगांचा कल्पनाविस्तारही करावा लागला आहे. या पुस्तकातील रागविद्येच्या प्रवासाची कालमर्यादा एवढी विस्तृत आहे की, अनेक कलाकारांची नावे, प्रसंग, कार्य यांची दखल घेणे अवघड होते; किंवा जे लिहिले आहे, त्यातही त्रुटी असण्याची शक्यता आहे. रसिक वाचकांनी या मर्यादा समजून घ्याव्यात ही विनंती.

हे पुस्तक पूर्णत्वास नेण्यासाठी मानसिक आणि बौद्धिक बळ देणारे माझे आदरणीय गुरू डॉ. विकास कशाळकर, वहिनी डॉ. उज्ज्वला कशाळकर यांच्या ऋणातच मी राहू इच्छिते. मला वेळोवेळी सहकार्य करणारे श्रोत्रीय आजोबा, मृदुला आणि प्राजक्ता कशाळकर यांची मी आभारी आहे. पुस्तक वेळेत पूर्ण करण्याची वारंवार आठवण करून देणाऱ्या रा. रं. बोराडेसरांचेही मी आभार मानते. मला वेळोवेळी मौलिक सल्ला देऊन सर्वतोपरी साहाय्य करणारे माझे पती यमाजी मालकर, कौटुंबिक आघाडी बिनबोभाट सांभाळणारी माझी मुलं राधा आणि जनक, भाचा वाल्मीक आणि मदतनीस रत्नाबाई यांचेही ऋण व्यक्त करते.

यापुढे लेखन, गायन, संशोधन करावं ह्या बरोबरच वेगवेगळे प्रयोग करावेत असं वाटतं. एखाद्या रागाची रूपरेषा नवीन गाणं शिकणाऱ्या मुलाला कशी दाखवता येईल याचा विचार मी करते आहे. शिकवता शिकवता आपणही कितीतरी नव्यानं शिकतो, हा अनुभव वेगळाच आनंद देऊन जातो.

रोशन सातारकर

एक झगमगती संगीतबारी

अॅड. दिनेश ननवरे

झगमगती संगीतबारी संपली की प्रशंसा, वाहवा यांची हवा थोडावेळ तरळते, गर्दी हटते अन् मग फक्त एकाकीपण, गृहकलह, वंचना, उपेक्षा यांनी घेरलं जातं.

मनाला विचारावं असं वाटतं - ' का धरली मी ही वाट ?'

सुखानं जगता यावं म्हणून दुसरं काही करता आलं असतंच की ! ' गाण्याची, नाचाची वाट का शोधली मी !' कला, निष्ठा, लोकप्रियता, मानसन्मान यांच्यासाठी ? की कुटुंब जगवण्यासाठी ? की स्वत:साठी...?

अॅड. दिनेश ननवरे यांनी मांडलेली रोशन सातारकर यांची शब्दमय संगीतबारी ह्या प्रश्नांची उत्तरं देते का, की फक्त प्रश्नच उरतात..... ?

संपादक

दिवस पारतंत्र्याचे होते. साधारणपणे सन १९३५-३६ चा काळ. पुणे जिल्ह्यातील भोर संस्थानच्या राजधानीचे ठिकाण. मौजे भोर. रात्रीची. किर्रर्र काळोखात सारं गाव झोपी गेलं. पण गावालगतच्या त्या झोपडीवजा घरामध्ये मात्र चांगलीच जाग होती. कारणही तसं होतं. त्या घरामध्ये दहावं अपत्य जन्मास येऊ घातलं होतं. वडील मारुतराव बाहेर चिंताग्रस्त चेहऱ्याने बसलेले होते, तर आतमध्ये आई यमुनाबाई प्रसूतिवेदनेने तळमळत होती. अगोदरच्या अपत्यांपैकी कोणी अर्धवट झोपेमध्ये होते, तर कोणी गाढ निद्रेमध्ये होते. शेजारी राहणाऱ्या मुस्लिम कुटुंबातील स्त्रियांना मदतीकरिता बोलावले होते. मध्यरात्र उलटून गेली तरी सुटका होण्याची चिन्हे दिसत नव्हती. हां हां म्हणता पहाट झाली. त्या सुमारास शेजारच्या मुस्लिम कुटुंबाकडे फकिरांचा आलेला एक समूह पहाटेच्या पहिल्या प्रार्थनेकरिता उठला होता. त्यावेळी चिंताग्रस्त मारुतरावांना त्यांपैकी एक फकीर म्हणाला, 'एवढी कसली काळजी करतोस बेटा, तुला मुलगीच होणार आहे आणि ती मुलगी या दुनियेमध्ये तुझे नाव रोशन करणार आहे.' आणि फकिरांचा समूह तेथून निघून गेला. काही क्षणातच यमुनाबाई प्रसूत झाल्या आणि त्यांना कन्यारत्न प्राप्त झाले. वडील मारुतरावांनी अत्यानंदाने या मुलीचे ताबडतोब नामकरण करून तिचे नाव रोशन असे ठेवले. आईने मात्र या मुलीचे नाव रुक्मिणी असे ठेवले आणि खरोखरच त्या अवलिया फकिराचे बोल खरे ठरले ! या कन्यारत्नाने तिच्या आई-वडिलांचे नाव कलेच्या क्षेत्रामध्ये खऱ्या अर्थाने रोशन केले. हे कन्यारत्न म्हणजेच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लावणी गायिका आणि लोकनाट्य तमाशा कलाकार श्रीमती रुक्मिणी उर्फ रोशन सातारकर होय.

श्रीमती रुक्मिणी सातारकर यांचे आजोबा श्री. बळवंत कुडाळकर यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कुडाळ हे होते. श्री. बळवंत कुडाळकर हे कोल्हाटी समाजातील होते. या समाजाचे चरितार्थाचे साधन म्हणजे कसरतीचे मर्दानी खेळ, तसेच नृत्य, गायन आदी परंपरागत कला हे होते. रोशनबाईंचे आजोबादेखील त्यांच्या समाजातील प्रचलित रीतीप्रमाणे कसरतीचे मर्दानी खेळ करून कुटुंबाचा चरितार्थ चालवीत असत. कोल्हाटी समाज हा त्यावेळी भटका आणि विमुक्त असा समाज होता. गावोगाव कसरतीचे खेळ करून आणि नृत्यगायनादी कलेने लोकांचे मन रिझवून, त्यांची करमणूक करून उदरनिर्वाह करावा लागत असे. श्री. बळवंतरावदेखील त्याकाळी संपूर्ण भारतभर फिरलेले होते. भोर संस्थानच्या अधिपत्यांसमोर कसरतीचे खेळ वरचेवर सादर करीत असत. काही काळ त्यांना भोर संस्थानचा राजाश्रयदेखील लाभला होता. त्यांना संस्थानामध्ये मौजे अहिरे-मोरवे या गावी वतनदेखील मिळाले होते. बळवंतराव यांच्या कसरतीच्या खेळाची कीर्ती सर्वदूर पसरलेली होती. राणी व्हिक्टोरियाचे भारतात आगमन झाले होते तेव्हा राणीच्या मुंबईभेटीमध्ये राणीसमोरदेखील त्यांचे कसरतीचे खेळ सादर झाले होते आणि राणी व्हिक्टोरियाकडून बळवंतरावांचा सन्मानदेखील झाला होता. कालांतराने बळवंतरावांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा मारुतराव वडिलांप्रमाणेच कसरतीचे-मर्दानी खेळ रयतेसमोर सादर करून कुटुंबाचा चरितार्थ चालवू लागला. मारुतराव मात्र एका जागी स्थिर न राहता आपला कुटुंबकबीला घेऊन हिंदुस्थानभर फिरून आपली कला सादर करीत होते. दिल्ली, आग्रा, कोलकाता, येथे त्यांच्या कसरतीच्या खेळांचे विशेष कौतुक झाले होते. त्याकाळी दळणवळणाची अत्यंत अपुरी साधने होती. अक्षरश: डोक्यावर ओझी घेऊन फिरस्ती करावी लागे. कोणत्याही सोयी-सुविधा, लाईटदेखील नव्हती, तर वैद्यकीय सेवा दूरच. त्यामुळे त्यांच्या दोन लहान मुलांचा बालमृत्युदेखील झाला होता. पारतंत्र्याच्या त्या काळातील स्वातंत्र्यआंदोलनाच्या, चळवळीच्या काळात मारुतरावांना कुटुंबकबीला घेऊन फिरस्ती करणे हळूहळू अशक्य होऊ लागले. त्यामुळे लहानग्या रोशनच्या जन्मानंतर त्यांनी त्यांची

भारतभरची भ्रमंती थांबविली आणि त्यावेळच्या मुंबई प्रांतामध्येच आपले कसरतीचे खेळ करणे चालू ठेवले होते.

कै. मारुतरावांच्या एकूण दहा अपत्यांपैकी हयात असलेली अपत्ये म्हणजे पहिला मुलगा लक्ष्मण, त्यानंतर गजराबाई, ताराबाई, सुंदरबाई आणि फुलचंदबाई, त्यानंतरचा मुलगा विठ्ठल, त्यापाठी सावित्राबाई व शेवटी रुक्मिणीबाई ऊर्फ रोशन अशी होती. गजराबाई, ताराबाई, सुंदरबाई, फुलचंदबाई या चारही मुलींना आवाजाची उपजत, पिढीजात देणगी मिळालेली होती. चौघींचेही आवाज अतिशय गोड, मधुर होते. दोन्ही मुले लक्ष्मण आणि विठ्ठल हे कसरतीच्या खेळांबरोबर विविध तालवाद्यांमध्ये हळूहळू तरबेज होत होते. फिरस्ती थांबवल्यानंतर कुटुंबाच्या चरितार्थाकरिता स्वत:चा तमाशा-लोकनाट्य मंडळ काढण्याचे ठरविले. त्याकरिता मारुतरावांनी व त्यांच्या पत्नी सौ. यमुनाबाई यांनी घरच्याच कलाकारांना म्हणजे चार मुलींना नृत्य व गायन शिकविले, तर मोठा मुलगा लक्ष्मण याला हार्मोनियम - पायपेटी वाजविण्यास शिकविले व लहान मुलगा विठ्ठल याला तबला- ढोलकी वाजविण्यास शिकविले आणि मारुतरावांनी सन १९४० मध्ये 'तारा-गजरा सातारकर संगीत पार्टी' या नावाने तमाशाचा फड सुरू केला.

या तमाशा फडाचे सुरुवातीचे खेळ पुण्याच्या 'आर्यभूषण थिएटर'मध्ये सुरू झाले. रसिकांचा त्यांस उदंड आश्रय मिळाला. त्यावेळी गजराबाई, ताराबाई, सुंदरबाई, फुलचंदबाई या चार बहिणी नृत्य-गायन, तर दोन्ही भाऊ लक्ष्मण व विठ्ठल हार्मोनियम, तबला-ढोलकी वाजवीत होते. उर्वरित दोघी बहिणी म्हणजे सावित्राबाई व रोशन या लहान होत्या. या दोघी मोठ्या भगिनींचे गाणे रोजच्या रोज मन लावून ऐकत असत. ताल-स्वर तर रोजच्या रोज कानांवर होताच. हळूहळू लहानग्या रोशनचेदेखील ऐकून ऐकून गाणे तयार होऊ लागले होते. फिरस्तीमुळे कोणत्याही भावंडांना शालेय शिक्षण घेता आले नव्हते. परंतु चिमुरड्या रोशनला मात्र वडिलांनी शालेय शिक्षण देण्याचे ठरविले. पार्टीचा मुक्काम पुण्यात स्थिर होता. सबब आर्यभूषण थिएटरच्या समोरच पुणे महानगरपालिकेच्या शाळेमध्ये रोशनचे नाव घातले गेले. लहान रोशनचा आवाज अतिशय मधुर असल्यामुळे शाळेतदेखील रोशनला शिक्षकांकडून सतत गाणे म्हणण्याचा आग्रह होत असे. शाळा सुटल्यानंतर रोशन पुन्हा थिएटरच्या वातावरणामध्ये परत येत असे. त्यामुळे रोशनचे अभ्यासाकडे पूर्णत: दुर्लक्ष होत असे. संध्याकाळी थिएटरमध्ये संगीतबारीचे कार्यक्रम सुरू झाले की, लहान रोशन रोजच्या रोज सगळ्या कलाकारांचे नृत्य व गायन अगदी मन:पूर्वक ऐकून ग्रहण करीत असे व दुसऱ्या दिवशी सकाळी त्याचे हुबेहूब सादरीकरण करीत असे. एकूणच लहान रोशनची शिक्षणापेक्षा नृत्य-गायनामध्ये अधिक गती होती. रोशन शाळेत नियमित जावी, तिने अभ्यासाकडे लक्ष द्यावे, यारिता रोशनला बदाम, काजू, पिस्ते या खाऊचे रोज आमिष दाखविले जाई. खाऊ फस्त करून रोशन पुन्हा शाळेतून बुट्टी मारून थिएटरमध्ये दुपारी कलाकारांच्या रिहर्सलला हजर होत असे. लहान रोशनचे बालपण संगीतबारी-तमाशा कलाकारांच्या सहवासात आणि त्यांच्या नृत्यगायनाच्या संस्कारामध्ये चालले होते.

आर्यभूषण थिएटरमध्ये पहिल्या संगीत पार्टीचा कार्यक्रम संपून दुसऱ्या पार्टीचा कार्यक्रम सुरू होण्याच्या कालावधीमध्ये छोटी रोशन फ्रॉकचा ओचा खोचून व वरून ओढणी घेऊन 'आओ आओ मोहन भैय्या, कृष्ण कन्हैया, गोकूळ के राज, रखो मेरी लाज' हे गीत मोठ्या जोशात धिटाईने सादर करायची आणि गाणे संपल्यानंतर प्रेक्षकांमधून फ्रॉकच्या ओच्यामध्ये त्यांनी दिलेली कौतुकाची बक्षिसी-बिदागी गोळा करीत असे.

चिमुरड्या रोशनच्या गोड गळ्याची म हळूहळू पुणे शहरात पसरू लागली हो त्या काळात गणेशोत्सवामध्ये लहान मुल मेळ्यांची प्रथा प्रचलित होती. अ मेळ्यांमधून रोशनला गाणे गाण्याक बोलावणे येई. गणेशोत्सवातील मेळ्या आणि त्यानंतर शहरातील विविध सांस्कृ कार्यक्रमांमध्ये रोशन गाणी गात असे. ह भारतीय स्वातंत्र्यसंग्राम तीव्र होऊ ल होता. दुसऱ्या महायुद्धामुळे आलेली जा मंदी व स्वातंत्र्यसंग्राम यामुळे आर्य थिएटरवर मंदीचे सावट पडले. थि रसिकांविना ओस पडू लागले. त्यामुळे न नाइलाजाने श्री. मारुतरावांना त्या फडाचा पुण्यातील मुक्काम हलवावा ल त्यांच्या कुटुंबावर पुन्हा फिरस्ती आली काळात लहानग्या रोशनवर तिच्या चार म बहिणींकडून व आईकडून गाण्याचे सं होत होते. त्यांचे गाणे ऐकून रोश आत्मसात करीत होती. वडील मारुतरा रोशन हिने शास्त्रीय गायन शिकावे अशी इच्छा होती. परंतु उदरनिर्वाहाकरिता गा फिरावे लागत असल्यामुळे रोशनला क शास्त्रीय गायन शिकता आले नाही, कि गुरू करून शास्त्रीय संगीताचे प्राथ धडेदेखील गिरविता आले नाहीत.

रोशनचे संपूर्ण कुटुंब त्यांच्या फिरस्ती अहमदनगर येथे आले आणि त्या कुटुंबामध्ये दु:खद घटनांची मालिकाच सुरू झाली. पहिल्यांदा रोशनबाईंची भगिनी फुलचंदबाई हिचे अल्प आ निधन झाले आणि या कुटुंबावर दु: डोंगरच जणू कोसळला. त्या आघात सावरून त्यांचे संगीतबारीचे का अहमदनगर येथे सुरू झाले. जरा कु घडी बसते न बसते तोपावेतो पुढचे म संकट उभे ठाकले. प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला होता. त्या साथीची व या कुटुंबाकडे वळाली आणि हा हा म रोशनबाईच्या तीनही बहिणी म गजराबाई, ताराबाई व सुंदरबा

अहमदनगर येथे प्लेगच्या साथीत मृत्युमुखी पडल्या. कुटुंबावरचा हा आघात अतिभीषण आणि प्रकोपी ठरला. चारही मुलींच्या निधनामुळे आई-वडिलांना फार मोठा मानसिक धक्का बसला. तमाशा फड बंद पडला. संपूर्ण कुटुंबाची सैरभैर अवस्था झाली. आणि कोणाला सावरावे, हेच कळेनासे झाले. लहान दोन्ही मुलगे व दोन मुलींकडे पाहून आई-वडिलांनी त्यांचे दु:ख निमूटपणे गिळले. नियतीच्या आघातामुळे खचून न जाता लहान मुलांच्या अन्न-पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरिता, त्यांना जगविण्याकरिता मात्र धीर एकवटून ते पुन्हा उभे राहिले. कौटुंबिक गरजा भागविण्याकरिता अहमदनगर येथील मिलिटरी कॅम्पमध्ये त्यांनी मोलमजुरी करण्यास सुरुवात केली. मिळेल ते कष्टाचे काम संपूर्ण कुटुंबीय करून पोटाची खळगी भरू लागले. या काळात संपूर्ण कुटुंबाला फार हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. मजुरी उपलब्ध झाली नाही तर दोन-दोन दिवस उपास पडू लागला. फार खडतर कालावधीमधून संपूर्ण कुटुंबास जावे लागत होते. छोटी रोशन कॅम्पमधील सैनिकांना गाणी म्हणून दाखवीत असे. त्यांचे मनोरंजन केल्यानंतर सैनिकांकडून कॅम्पमधील शिजवलेल्या अन्नामधले शिल्लक अन्न रोशनला बिदागी म्हणून मिळत असे. ते अन्न दोन दोन दिवस पुरवून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असे. जगण्याच्या, अस्तित्वाच्या लढाईमध्ये छोट्या रोशनला कोणत्याही प्रकारचे संगीताचे शिक्षण घेणे शक्य नव्हतेच; परंतु घरामधले संगीतदेखील काळाच्या आघातामुळे थांबले होते.

रोशनचे कुटुंब यामधून हळूहळू सावरू लागले. त्यांच्या कुटुंबामधील प्रत्येकामधील कलाकाराचे मन स्वस्थ बसू देईना. शेवटी रोशनच्या वडिलांनी माळीवाडा, अहमदनगर येथील 'इब्राहीम थिएटर'चे मालक श्री. इब्राहीमशेठ यांची भेट घेऊन त्यांना त्यांच्या कुटुंबीयांवर कोसळलेल्या आपत्तीबाबत सांगून या संकटामधून काहीतरी मार्ग काढण्याची विनंती केली. इब्राहीमशेठदेखील तारा-गजरा संगीत पार्टीची ख्यातकीर्ती ऐकून होतेच. त्यांनी रोशनच्या वडिलांना नवीन तमाशाचा फड काढण्याची सूचना केली व त्याकरिता लागणारी आर्थिक मदत देऊन नवीन फडाला-संगीत पार्टीला त्यांच्या थिएटरमध्ये आश्रय देण्याचे आश्वासन दिले. त्याप्रमाणे इब्राहीमशेठच्या सहकार्यामुळे, आर्थिक मदतीमुळे रोशनच्या वडिलांनी त्यांच्या दोन मुले व दोन मुलींना घेऊन 'रोशन-सावित्री सातारकर' या नावाने नवीन तमाशाचा फड (संगीतबारी) उभा केला. त्यावेळी रोशन सातारकर यांचे वय अवघे बारा वर्षांचे होते. वयाच्या बाराव्या वर्षी तारुण्यात पदार्पण करण्यापूर्वीच रोशनच्या पायात घुंगरु-चाळ बांधले गेले आणि 'रोशन सातारकर' या महाराष्ट्राच्या लोकसंगीतातल्या सुरांच्या अधिराज्याची जणू मुहूर्तमेढच रोवली गेली.

रोशन सातारकरांच्या नवीन संगीतबारीचे रसिकांकडून स्वागत होऊन त्यांना चांगला प्रतिसाद मिळू लागला. हळूहळू या संगीतबारीने अहमदनगर व परिसरात लोकप्रियता मिळविण्यास सुरुवात केली. याच सुमारास म्हणजे सन १९४७ मध्ये भारतास स्वातंत्र्य मिळाले. आनंदाच्या जल्लोषाला फाळणीमुळे जातीय दंगलीचे गालबोट लागलेले होतेच. त्याचा फटका रोशन सातारकर यांच्या संगीतबारीला बसला. 'रोशन' या नावामुळे रोशनबाई मुस्लिम धर्मीय वाटत असल्याने या दंगलीच्या काळात समाजकंटकांनी रोशन सातारकरांच्या संगीतबारीकडे आपला रोख वळविला व त्यांना दहशत दाखवून त्रास देण्यास सुरुवात केली. त्यामुळे घाबरून रोशन सातारकर यांना स्वत:चे नामकरण करून घ्यावे लागले आणि या काळात रोशनचे 'शकुंतला' या नावामध्ये रूपांतर होऊन संगीतबारीचे 'शकुंतला-सावित्रा सातारकर' या नावाने कार्यक्रम सुरू झाले. परंतु अहमदनगर येथील जातीय दंगलींमुळे आणि नंतरच्या गांधीहत्येमुळे निर्माण झालेल्या जाळपोळीमुळे रोशन सातारकरांच्या संगीतबारीला अहमदनगर सोडावे लागले. त्यांनी तेथूनच जवळ असलेल्या विसापूर येथे मुक्काम हलविला. (होय, तेच आत्ताचे 'विसापूर सेंट्रल जेल' वाले विसापूर) तेथे फाळणीनंतर निर्वासितांचे कॅम्प वसविले गेले होते. त्यामुळे तेथे काही काळ निर्वासित रसिकांच्या प्रतिसादामुळे संगीतबारीचे कार्यक्रम चांगले चालले. परंतु विसापूर येथेही व्यावसायिक मंदीमुळे काही दिवसांतच तेथून रोशन सातारकर यांचा तमाशा फड खानदेशामध्ये जळगाव येथे हलविला गेला.

रोशन आणि सावित्रा या दोघी बहिणींनी तारुण्यात पदार्पण केलेले होते. जळगाव येथे त्यांनी पुन्हा त्यांच्या तमाशाफडाचे नामकरण 'रोशन-सावित्रा सातारकर' असे करून संगीतबारीच्या कार्यक्रमांना सुरुवात केली. रोशनबाईंच्या सुरेल, मधाळ आवाजाने जळगावच्या रसिकांवर मोहिनी घातली आणि तेथेदेखील अल्पावधीतच रोशनबाईंनी लोकप्रियतेचा कळस गाठला. आणि रोशनबाई आपल्या तमाशा फडासह जळगाव येथे स्थिरावल्या. दुर्दैवाने आणखी एक मोठा आघात रोशनबाईंवर जळगाव मुक्कामी केला. त्यांचे तेथे पितृछत्र हरपले. रोशनबाईंचे वडील मारुतराव यांचे वृद्धापकाळामुळे जळगाव येथे दु:खद निधन झाले. परंतु हा आघात पचविण्याची ताकद दोघी बहिणी व दोघा भावांमध्ये आता नियतीचे घाव सोसून सोसून आलेली होती. मोठे बंधू श्री. लक्ष्मण यांनी संपूर्ण कुटुंबाला त्यावेळी भक्कमपणे मानसिक आधार दिला, तर लहान भाऊ श्री. विठ्ठल याने तमाशा फडाच्या संयोजनाची जबाबदारी त्यावेळी स्वीकारली.

वडिलांच्या निधनानंतर रोशनाबाईंना त्यांचे ज्येष्ठ बंधू श्री. लक्ष्मण यांनी दिलेल्या भक्कम मानसिक आधारामुळे रोशनबाईंसह त्यांचे संपूर्ण कुटुंब त्यांना त्यानंतर 'भक्कम भाऊ' असे संबोधून रोजच्या व्यवहारामध्ये याच नावाने त्यांचा उल्लेख करू लागले. त्यामुळे नंतर नंतर रोजच्या प्रचलित वापरामध्ये 'लक्ष्मण भाऊ' ऐवजी 'भक्कम भाऊ' आणि व्यवहारामध्ये त्यांचा उल्लेख 'श्री. भक्कमशेठ' असा होऊ लागला आणि

त्यानंतर तमाशाच्या होर्डिंगमध्ये, जाहिरातीत, हॅण्डबिलामध्येदेखील त्यांचा उल्लेख 'रोशन-सावित्रा सातारकर सह भक्कमशेठ सातारकर' असा होऊ लागला व नामवैशिष्ट्यामुळे तोच उल्लेख त्यांच्या अखेरपर्यंत कायम राहिला. परंतु रोशनबाई आणि भक्कमशेठ यांच्या नातेसंबंधांबाबत रसिकांमध्ये मात्र बऱ्याचदा गैरसमज निर्माण होत असे त्यामुळे ऐन चलतीच्या काळात तमाशाफडाचे नामकरण फक्त रोशन यांच्या एकटीच्या नावाने म्हणजे 'रोशन सातारकर आणि पार्टी' असे केले गेले.

जळगाव येथे रोशनबाईंचा तमाशाफड स्थिर झाल्यानंतरदेखील लोकप्रियता वाढून ती हळूहळू महाराष्ट्रामध्ये पसरू लागली. परंतु जळगाव हेच मुख्य केंद्र ठेवून रोशनबाई महाराष्ट्राशिवाय त्यावेळच्या मध्य प्रदेशातील इंदूर, भोपाळ, खांडवा, नागपूर येथे कार्यक्रम करू लागल्या. त्या तेथे लोकप्रिय होऊ लागल्या. रोशनबाईंनी कोठेही शास्त्रीय अथवा उपशास्त्रीय, सुगम संगीताचे कोणतेही शिक्षण घेतले नाही. केवळ सुरेल कंठ आणि पारंपरिक लावण्यांचे जीव ओतून केलेले सादरीकरण, याच्या बळावर त्यांची वाटचाल चालली होती. रोशनबाईंच्या व्यक्तिमत्त्वामध्ये रूपगुणांचा संगम होता. अत्यंत गोड सुरेल गळा आणि नितळ-पारदर्शी सौंदर्य, या दोहोंमुळे रोशनबाईंचे अनेक चाहते निर्माण झाले. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, सीमावर्ती कर्नाटक, गोवा या राज्यांमध्ये रोशनबाईंना लोकप्रियता मिळत होती. परंतु रोशनबाई जळगाव मुक्कामी केंद्रस्थान ठेवून सर्वत्र कार्यक्रम करीत होत्या. ऐन तारुण्यामध्ये रोशनबाईंनादेखील प्रेमाच्या अनुभूतीमधून जावे लागले. रसिकांच्या गराड्यामध्येदेखील त्यांच्या मनात प्रेमांकुर फुटला. तो औरंगाबाद येथील राहणारा होता. इंजिनिअरिंग शाखेचा पदवीधर, व्यवसायाने बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर, असा सुशिक्षित तरुण रोशनबाईंचा प्रथम चाहता झाला आणि नंतर चक्क प्रेमात पडला. सुरुवातीला रोशनबाईंनी त्याला त्यांची जात, व्यवसाय याची स्पष्ट कल्पना देऊन तो पदवीधर तर त्या अशिक्षित, अडाणी असल्याची स्पष्ट जाणीव करून दिली. परंतु त्याच्या प्रेमाच्या आड यामधील कोणतीही बाब न येता त्याने त्याची प्रेमाराधना चालूच ठेवली. त्या दोघांनीही विवाह करण्याचे ठरविले. परंतु या आंतरजातीय विवाहास दोघांच्याही घरून विरोध होता. दोघांच्या घरून सदर विवाहास परवानगी मिळण्याकरिता दोघांनाही आठ वर्षे वाट पाहावी लागली. नंतर होकार मिळाल्यावर त्या तरुणाबरोबर रोशन सातारकर सन १९६५मध्ये विवाहबद्ध झाल्या.

रोशनबाईंचा संसार व तमाशा फडाचे कार्यक्रम एकाचवेळी सुरू झाले. किंबहुना लग्नानंतरही रोशनबाई त्यांची कलासेवा चालू ठेवणार, ह्या मुख्य अटीवरच सदर विवाह पार पडला होता. सन १९६६ साली रोशनबाई जळगाव येथे प्रसूत होऊन त्यांना दोन जुळे मुलगे झाले. परंतु जन्मानंतर काही वेळातच दोन्ही बालकांचा मृत्यू झाला. त्यामुळे रोशनबाई काही काळ हळव्या झाल्या होत्या. परंतु त्यांची कलासेवा अखंड चालू होती. त्यानंतर ऑक्टोबर १९६७ मध्ये कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी रोशनबाईंना कन्यारत्न (चि. नंदा) प्राप्त झाले. यथायोग्य कालावधीनंतर रोशनबाई पूर्वीप्रमाणे त्यांचे कलासेवेमध्ये रुजू झाल्या. रोशनबाईंचा अत्यंत गोड, आर्जवी स्वर व त्या करीत असलेले पारंपरिक लावण्यांचे सादरीकरण, ताना, हरकतीसहित सादर करीत असलेल्या विविध प्रकारच्या पारंपरिक लावण्यांमुळे रोशनबाईंची कीर्ती सर्वदूर पोहोचली होती. रोशनबाईंची विदर्भामधली लोकप्रियता शिगेला गेली होती. सबब जळगावहून नागपूरला थिएटरमध्ये एकसलग रोशनबाईंचे संगीतबारीचे कार्यक्रम लागले होते. नागपूरकर रसिकांनी रोशनबाईंच्या लावणीला भरभरून दाद दिली. त्यांच्या लावणीवर मनस्वी प्रेम केले. इतके की एकसलग ५० कार्यक्रम रोशनबाईंनी नागपूरमध्ये केल्यानंतर सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमादिवशी म्हणजे दिनांक २९/८/१९६१ रोजी नागपूरच्या रसिकांनी रोशनबाईंना उत्स्फूर्तपणे 'गानकोकिळा' पदवी प्रदान करून तशी ट्रॉफी समारंभपूर्वक दिली आणि रोशनबाईंचा नागरी सत्कार घडवून आणला. रोशनबाईंच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत रोशनबाई नागपूरकर रसिकांनी केलेल्या सन्मानाच्या आठवणीमुळे गहिवरून जात असत.

नागपूरकर रसिक मोठ्या प्रेमाने रोशनबाईंचा उल्लेख 'प्रति लता मंगेशकर' असा करीत. नागपूरच्या कार्यक्रमांच्या वेळेस 'बिस साल बाद' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता व त्यामधील लता दीदींचे 'कही दीप जले कही दिल' हे गाणे अतिशय लोकप्रिय झालेले होते. रसिक हे गीत रोशनबाईंना कार्यक्रमात गाण्याची फर्माईश करीत असत. एका कार्यक्रमात किमान दहा वेळा तरी हे गीत त्यांना रसिकांच्या आग्रहाखातर सादर करावे लागत असे. मूळ चालीबरहुकूम रोशनबाई हे गीत सादर करीत असत. या गाण्यामुळे लता मंगेशकर व रोशन सातारकर ही दोन्ही नावे त्यावेळी नागपूरकर रसिकांच्या ओठांवर एकाचवेळी घोळत होती.

रोशनबाई लोकप्रियतेच्या शिखरावर असताना त्यांना त्यांच्या वैयक्तिक-कौटुंबिक आयुष्यातील कलहास तोंड द्यावे लागले. त्यांचे पती व त्यांच्या दरम्यान वैचारिक मतभेद निर्माण झाले. सदर वैचारिक मतभेद इतके विकोपास गेले की, त्यामुळे रोशनबाईंना त्यांचे पतीबरोबरचे सहजीवन, वैवाहिक जीवन

सुव्यवस्थितीने पार पाडणे केवळ अशक्य झाले व रोशनबाई आणि त्यांच्या पतींनी कोणतीही वादावादी भांडणे न करता एकमेकांपासून विभक्त होण्याचे ठरविले व त्याप्रमाणे सन १९६८ मध्ये रोशनबाई त्यांच्या पतीपासून विभक्त झाल्या. त्यांचे वैवाहिक आयुष्य अल्पजीवी ठरले. परंतु लहान मुलगी कु. नंदा हिचा कायदेशीर ताबा रोशनबाईंकडे राहिला आणि त्यानंतर हा वैयक्तिक आघात पचवून रोशनबाईंनी पूर्णवेळ स्वत:ला कलेसाठी वाहून घेण्याचे ठरविले आणि त्याकरिता नागपूर, जळगाव, औरंगाबाद या त्यांच्या कलाकार्यक्षेत्रापासून दूर जाऊन महाराष्ट्राच्या कुलदैवताच्या म्हणजे श्री क्षेत्र जेजुरी या मल्हाररायाच्या पायांपाशी येऊन कायमस्वरूपी रहाण्याचे त्यांनी ठरविले व त्याप्रमाणे सन १९६९ साली कलाकारांची नगरी जेजुरी येथे रोशनबाई सातारकर स्थायिक झाल्या.

रोशनबाईंनी जेजुरी येथे जागा खरेदी करून त्यावरं स्वत:ची वास्तू बांधली. दोन्ही भाऊ व बहीणी सावित्राबाई यांसह एकत्र राहू लागल्या. बहीण सावित्राबाई अविवाहित राहिली. रोशनबाईंनी दोन्ही भावांचे विवाह करून त्यांचे संसार मांडून दिले. या प्रापंचिक जबाबदाऱ्यांबरोबर संगीतबारीचे कार्यक्रम चालूच होते. पुण्यात आर्यभूषण थिएटरमध्ये कार्यक्रम लावले. ज्या आर्यभूषणमध्ये रोशनबाईंचे बालपण गेले, वडील- मोठ्या बहिणींचे संगीतबारीचे कार्यक्रम झाले, त्याच आर्यभूषणमध्ये कालांतराने 'रोशन सातारकर' या नावाने रोशनबाईंचे स्वतंत्र कार्यक्रम होऊ लागले होते. मुंबई येथे 'पिला हाऊस' थिएटरमध्येदेखील रोशनबाईंचे कार्यक्रम होऊ लागले होते. हे कार्यक्रम करताना रोशनबाईंनी त्यांच्या सामाजिक जाणिवा जिवंत ठेवल्या होत्या. रोशनबाईंनी सैनिक जवानांकरिता या काळात युद्धभूमीवर जाऊन मनोरंजनाचे कार्यक्रम केले, तर नैसर्गिक आपत्तीनंतरच्या मदतीकरिता अनेक कार्यक्रम केले. कुठे शाळेच्या इमारतनिधीकरिता, तर कुठे सामाजिक संस्थांच्या मदतीकरिता विनामूल्य कार्यक्रम केले आणि विविध सामाजिक उपक्रमांना हातभार लावला. अशाच एका कार्यक्रमामध्ये गीतकार - संगीतकार-गायक विठ्ठल शिंदे यांची आणि रोशनबाईंची भेट झाली. विठ्ठल शिंदे यांनी रोशनबाईंच्या आवाजातील माधुर्य, लावणीगायकीचा ढंग अचूक हेरला आणि त्यांनी रोशनबाईंकडे एच.एम.व्ही. कंपनीकरिता लावणी गायचा व लावणी ध्वनिमुद्रिका काढण्याचा प्रस्ताव मांडला.

रोशनबाईंनी सुरुवातीला आनंदीत व्हायच्याऐवजी अनेक शंका त्यांच्याकडे उपस्थित केल्या. सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे रोशनबाई या अशिक्षित होत्या व त्यांना लिहिता-वाचता येत नव्हते, तर रेकॉर्डिंगच्या वेळी, मर्यादित वेळेत हातात कागद घेऊन गाणे गायला जमणार कसे ? ही अडचण त्यांनी विठ्ठल शिंदे यांना सांगितली. त्यावर विठ्ठल शिंदेंनी विचारणा केली की, बाई तुमच्या इतक्या पारंपरिक लावण्या तोंडपाठ आहेत, इतकी भावगीते-भक्तिगीते-चित्रपटगीते मुखोद्गत आहेत ती कशी ? त्यावर रोशनबाईंनी खुलासा केला की, मी समोरच्या वाचायला येणाऱ्या व्यक्तीकडून ते गीत वाचून घेते, तो वाचत असता श्रवण करते आणि ध्यानात ठेवते. मग चार पाच वेळा गाणे ऐकले की ते मला पाठ होते. त्यावर हसून विठ्ठल शिंदे म्हणाले की, बाइ रेकॉर्डिंगलासुद्धा आपण हीच पद्धत वापरू. मी तुमच्याकडून अगोदर गाणे पाठ करून घेतो आणि त्यानंतर चाल समजावून लावणी बसवून घेतो व त्यानंतर रेकॉर्डिंगचे पाहू असे त्यांनी सांगितले. त्याप्रमाणे रोशनबाईंनी होकार दिल्यानंतर श्री. विठ्ठल शिंदे स्वत: जेजुरी येथे रोशनाबाईंकडे आले आणि त्यांनी सुमारे पंधरा दिवस बाईंकडून गाण्याचे पाठांतर व तालीम करून घेतली आणि रोशनबाईंना एच.एम.व्ही. मध्ये रेकॉर्डिंगकरिता सन १९७१ साली नेले. रोशनबाईंच्या आवाजाची रेकॉर्डिंग टेस्ट झाली. रिपोर्ट उत्तम आला आणि लगेचच रोशनबाईंचे पहिले गाणे रेकार्ड झाले, त्याचे गीत-संगीत श्री. विठ्ठल शिंदे यांचेच होते. गीताचे बोल होते. 'राया नजरेशी जेव्हा नजर भिडली, प्रीत माझी तुझ्यावर जडली' या गाण्याबरोबर इतर तीन गाणी रेकॉर्ड झाली. या पहिल्या ध्वनिमुद्रिकेची त्यावेळी कोणी फारशी दखल घेतली नाही. गाण्यांचे थंडे स्वागत झाले. परंतु संगीतकार विठ्ठल शिंदे यांना रोशनबाईंच्या गाण्याबद्दल प्रचंड आत्मविश्वास होता. त्यांनी रोशनबाईंच्या दुसऱ्या ध्वनिमुद्रिकेची तयारी सुरू केली.

सन १९७२ मध्ये संगीतकार विठ्ठल शिंदे यांनी स्वत: गीते तयार केली होती आणि रोशनबाईंना त्यांच्या संगीतबारीच्या कार्यक्रमांमुळे सतत मुंबई येथे तालमींना जाणे शक्य होत नव्हते. म्हणून स्वत: विठ्ठल शिंदे सुमारे एक महिना सतत जेजुरी येथे रोशनबाईंच्या घरी येऊन त्यांची वेळ उपलब्ध होईल त्याप्रमाणे तालीम घेत होते. नव्या लावणीगीतांच्या रेकॉर्डिंगकरिता रोशनबाई मुंबई येथे गेल्या. स्टुडिओमध्ये वादकांसोबत रिहर्सल सुरू झाली. रोशनबाईंचे शब्दोच्चार चुकायचे. रोशनबाई ज्या समाजात वाढल्या, ज्या वातावरणात लहानाच्या मोठ्या झाल्या आणि तमाशाफडाच्या वातावरणात राहून त्यांच्या जिभेवर त्यांचे ग्रामीण बाजाच्या भाषेचे जे आघात अगदी घट्ट रुजले होते, त्यामुळे त्यांना रेकॉर्डिंगपुरते तरी शुद्ध शब्दोच्चार त्या शब्दांच्या ध्वनीत अर्थाप्रमाणे करणे शक्य होत नव्हते. सबब सकाळी सुरू झालेली रिहर्सल दुपार झाली तरी संपली नाही, कंटाळून वादक निघून गेले. परंतु जिद्दीने रोशनबाईंनी त्या सायंकाळी विठ्ठल शिंदे यांना अपेक्षित असलेल्या

शब्दोच्चारांसहित रिहर्सल पूर्ण केली आणि ताबडतोब वादकांना बोलावून त्या सायंकाळी त्या लावणीचे रेकॉर्डिंग पूर्ण केले आणि त्या लावणीने महाराष्ट्राच्या लोकसंगीताच्या विश्वात प्रसिद्धीचे, लोकप्रियतेचे नवे नवे उच्चांक प्रस्थापित केले. रसिकांमध्येच नव्हे, तर समाजाच्या अगदी तळातील स्तरामध्ये म्हणजे जनसामान्यांमध्ये देखील ही लावणी तुफान लोकप्रिय झाली. त्या लावणीचे बोल होते, 'नेहमीच राया तुमची घाई, नका लाऊं गठूडं बांधायला, येऊ कशी तशी मी नांदायला हो, येऊ कशी तशी मी नांदायला' या लावणीगीताची रेकॉर्ड प्रसिद्ध झाल्यानंतर या गीताच्या लोकप्रियतेमुळे 'रोशन सातारकर' हे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचले.

'नेहमीच राया .....' या गीताच्या रेकॉर्ड्स हातोहात खपल्या होत्या. एम.एम.व्ही. कंपनीकडून पुन: पुन्हा रेकॉर्डच्या आवृत्या निघत होत्या. परंतु या गीताची लोकप्रियताच एवढी होती की, त्याकाळी एका रेकॉर्डसाठी रुपये ५००/- एवढी काळ्या बाजारामध्ये किंमत मोजून रसिक रेकॉर्ड खरेदी करीत होते. ब्लॅकमार्केटमध्ये रेकॉर्ड विक्री होण्याची मराठी लोकसंगीताच्या रेकॉर्डविक्रीच्या इतिहासात ही पहिलीच वेळ होती.

रोशनबाईंच्या त्यानंतर एच.एम.व्ही. कंपनीने अनेक रेकॉर्ड्स काढल्या. गीतकार राम मोरे यांच्या अनेक गीतांना संगीतकार विठ्ठल शिंदे आणि विश्वनाथ मोरे यांनी स्वरसाज चढविले. रोशनबाईंची प्रत्येक लावणी गाजत होती. त्यांच्या लावणीस लोकाश्रय मिळत होता. महाराष्ट्रामध्ये घराघरांमध्ये त्यांची गाणी गुणगुणली जात होती. बहुतांश तमाशा फडांमध्ये त्यांच्या या लावण्या सादर केल्या जात होत्या. नव्हे रसिकांची ही फर्माईशच असे. रोशनबाईंचा तमाशा व संगीतबारी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचली होती. स्वत: रोशनबाईंना त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या लावण्या गाव्या लागत होत्या. रोशनबाई स्वत: नाचून त्या लावण्या रसिकांसमोर सादर करीत असत. परंतु त्याचबरोबर त्यांनी पारंपरिक लावण्यांचे सादरीकरण थांबवले नाही. उलटपक्षी रोशनबाई यांचा कटाक्ष हा पारंपरिक लावण्या सादर करण्यावरच असायचा. मोठ्या नाईलाजाने त्या त्यांच्याच लावण्या रसिकांच्या आग्रहास्तव सादर करीत होत्या. अगदी पूर्वीप्रमाणे लता मंगेशकरांची जुनी गाजलेली गाणीदेखील सादर करावी लागत. रोशनबाईंची खरी आवड होती ती नृत्य करून पारंपरिक खडी लावणी, बैठकीची लावणी सादर करणे ही. त्या अदाकारी करून ठुमरी अंगाच्या लावण्या अतिशय तन्मयतेने सादर करीत असत. शिवाय गझल हा गीतप्रकार त्यांच्या विशेष आवडीचा होता. भावगीत-भक्तिगीत तर त्या समरसून गायच्या. परंतु तमाशाच्या क्षेत्रामध्ये त्यांना मनाजोगते भक्तिसंगीत सादर करता येत नसे. त्याची उणीव त्या प्रत्येक कार्यक्रमाच्या अखेरीस भैरवी सादर करण्याच्या वेळी भरून काढीत. अगदी भैरवीमध्ये एकापाठोपाठ चार-चार भक्तिगीते त्या सादर करून स्वत:चेही समाधान करून घ्यायच्या.

रोशनबाईंना प्रसिद्ध मिळाली. परंतु त्याप्रमाणेच त्यांच्यावर कौटुंबिक जबाबदारीदेखील वाढली होती. 'रोशन सातारकर' या नावाने तमाशाफड चालू होता. फडामध्ये जवळजवळ साठ कलाकार होते. त्यापैकी सुमारे पंचवीस कलाकार घरचेच होते. परंतु त्या सर्वांचे पगार-मानधन द्यावे लागे. तमाशा साहित्याच्या व कलाकारांच्या वाहतुकीकरिता स्वत:चा मालट्रक आणि जीपगाडीदेखील घेतली. त्यामधूनच त्यांच्या कार्यक्रमाचे सर्वत्र दौरे होत होते. त्यांच्या तमाशात त्या पारंपरिक पद्धतीने गण, गौळण, बतावणी व त्यानंतर रंगबाजी आणि मध्यांतरानंतर वगनाट्य सादर कर[illegible] कार्यक्रमाची आखणी, रूपरेषा आणि संयो[illegible] त्या स्वत: करीत असत. त्यांच्या तमा[illegible] संपूर्ण जबाबदारी त्यांच्या एकटीवर हो[illegible] चरितार्थाकरिता तमाशाचा फड चालू ठेव[illegible] लागत होता. त्यामुळे त्यांना म[illegible] चित्रपटाच्या पार्श्वगायनाकरिता स[illegible] मिळूनदेखील त्याकडे या व्यापामुळे त्या [illegible] केंद्रित करू शकल्या नाहीत. नाही म्हण[illegible] त्यांच्या मुंबईतील मुक्कामाच्या काळात त्य[illegible] 'पटलं तर व्हय म्हणा', 'अशी[illegible] साताऱ्याची तऱ्हा' आणि 'मानाचा मु[illegible] या मराठी चित्रपटांमध्ये पार्श्वगायन के[illegible] तसेच राजकमल स्टुडिओमध्ये महेंद्र [illegible] यांच्यासोबत एका हिंदी गीताम[illegible] कोरसगायन केले. परंतु या क्षेत्रामध्ये [illegible] कधीच रमल्या नाहीत. त्यांचे पहिले [illegible] तमाशा हेच होते.

रोशनबाईंची लोकप्रियता, त्यांच्या प्र[illegible] पावलेल्या लावण्यांची ख्याती स्वरसम्र[illegible] लता मंगेशकर यांच्या कानांवर गेली [illegible] लतादीदींनी रोशनबाईंना प्रत्यक्ष भेटण्[illegible] इच्छा व्यक्त केली. त्याप्रमाणे लतादी[illegible] एम.एच.व्ही. मध्ये रोशनबाई ज्या[illegible] रेकॉर्डिंगकरिता मुंबईत येतील त्यावेळी त[illegible] कळविण्याबाबत निरोप ठेवला अ[illegible] त्याप्रमाणे या दोन कलाकारांची भेट आयो[illegible] करण्याचे ठरले. रोशनबाई मुंबईला गेल्या[illegible] त्यांचा मुक्काम पिला हाऊस थिएटरमध्ये ह[illegible] तेथे लतादीदींनी रोशनबाईंना त्यांच्या [illegible] येऊन जाण्याकरिता त्यांची स्वत:ची [illegible] पाठविली. त्याप्रमाणे रोशनबाई त्यांचे [illegible] बंधू श्री. भक्कमशेठ यांच्यासोबत [illegible] मंगेशकर यांच्या निवासस्थानी गेल्या. लतादीदींनी अत्यंत प्रेमपूर्वक व जिव्हा[illegible] स्वागत केले आणि रोशनबाईंना त्यांची [illegible] ऐकविण्याची दीदींनी विनंती केली. त्य[illegible] लतादीदींच्या मातोश्री माई, बंधू हृदय[illegible] आणि कवियत्री शांता शेळके तेथे उप[illegible]

होत्या. ज्या लतादीदींची अनेक गीते ...शाच्या संगीतबारीमध्ये गायली, त्या ...दींसारख्या महान कलाकाराला पाहून खरे ... रोशनबाईंचे हृदय भरून आले होते आणि ... मोठे मानसिक दडपण आले होते. लतादीदींनी गाणे गाण्याचा आग्रह केल्यावर ...शनबाईंनी त्यांच्यावरील मानसिक ...णामुळे गाऊ शकणार नसल्याची स्पष्ट ...ली दिली. त्यावर लतादीदी हसल्या आणि ...ल्या, ''रोशनबाई, तुमच्यावर जर माझे ...ण येत असेल तर मी रुमच्या दाराआड ... राहते, तेथे उभे राहून तुमचे गाणे ऐकते, तुम्ही निर्धास्त पणे गा.'' असे म्हणून ...तून दीदी उठल्या, त्याक्षणी सारा धीर ...वटून रोशनबाईंनी त्यांना थांबविले व ...च्यासमोर आपली कला सादर केली. गाणे ...ल्यानंतर लतादीदींनी रोशनबाईंच्या ...ाचे कौतुक केले. त्यांना रोशनबाईंच्या ...ामधून निघणाऱ्या ताना व हरकती खूपच ...वडल्या. गाण्याचे शास्त्रीय शिक्षण न घेता आणि पूर्णपणे अशिक्षित असणाऱ्या ...नबाईंच्या गायनकलेचे त्यांनी मन:पूर्वक कौतुक केले आणि रोशनबाईंना लतादीदी ...गी देऊ लागल्या. त्याक्षणी लतादीदी ... असलेली बिदागी रोशनबाईंनी नाकारली ... लतादीदींना 'मी पैसे तर रोजच कमावते, ... आपल्यासारख्या साक्षात सरस्वतीचे ... आज दर्शन झाले आहे, तुम्ही माझी ... ऐकली, मी धन्य आहे. तुम्ही माझे गाणे ... हीच मला आयुष्यातली सर्वांत मोठी ...ालेली बिदागी आहे.' असे म्हणून लतादीदींना, तेथे उपस्थित असणाऱ्या सर्वांना ...नबाईंनी लवून नमस्कार केला. लतादीदींनी देखील त्यावेळी रोशनबाईंचा ...चित सन्मान करून त्यांना परत मुक्कामी ...विले. यावेळी माई, शांताबाई शेळके, ...नाथ मंगेशकर आणि आशा भोसले ...देखील रोशनबाईंच्या आवाजाचे व ...च्या लावणी गायनकलेचे कौतुक केले.

सन १९७३,१९७४ व १९७५ मध्ये रोशनबाईंच्या अनेक ध्वनिमुद्रिका निघाल्या. त्यामधील सर्वच गाणी, लावण्या गाजल्या त्यापैकी ' माझ्या नवऱ्यानं सोडलिया दारू, बाय देव पावलाय गं' ही लावणी अत्यंत गाजली, इतकी की महाराष्ट्र शासनाच्या दारूबंदी विभागाने दारूबंदी प्रचार कार्यक्रमात ही लावणी सर्वत्र वाजविण्यास सुरुवात केली. 'डार्लिंग डार्लिंग काय म्हणतोस' या लावणीने तर कॉलेज कुमारांमध्ये, युवकांमध्ये अक्षरश: धुमाकूळ घातला होता. रोशनबाईंची लग्नगीतेदेखील खूपच गाजली. 'नांदायला नांदायला नांदायला, मला बाई जायाचं नांदायला' आणि 'उद्या जाईन मी माझ्या गावा, माझ्या अंगाला हळद लावा.' ही गीते खेडोपाडी विवाहसमारंभात हमखास वाजू लागली, तर रसिकांनी 'मला म्हणत्यात हो पुण्याची मैना' आणि 'राया माझी हौस करावी पुरी', 'तुम्ही माझे सावकार', 'तरुण ड्रायव्हर पाहिजे मला', 'राया मी रंभा कि उर्वशी' यांसारख्या लावण्या अगदी डोक्यावर घेतल्या होत्या.

पुण्याच्या डेक्कन जिमखान्यासारख्या आधुनिक व मॉडर्न विभागातील नटराज सिनेमासमोरच्या 'सनराइज' या ईराणी हॉटेलमध्ये पैसे देऊन रेकॉर्ड गाणी ऐकण्याची सुविधा त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे उपलब्ध होती. सन १९७५ मध्ये 'डार्लिंग डार्लिंग काय म्हणतोस' या लावणीची लोकप्रियता त्यावेळच्या कॉलेजकुमारांमध्ये इतकी होती की, सहसा त्या हॉटेलमध्ये बसल्यानंतर चुकूनही मराठीमध्ये संवाददेखील न करणाऱ्या मॉड मराठी कॉलेज युवकांमध्ये, तसेच बिगरमराठी व परदेशी विद्यार्थ्यांमध्येदेखील ही लावणी लोकप्रिय झाली होती आणि दिवस-दिवस एकसलग -एकापाठोपाठ एक हीच 'डार्लिंग डार्लिंग' ही लावणी सनराईज हॉटेलमध्ये ऐकायला मिळत असे. त्यावेळच्या कॉलेज युवकांमध्ये (म्हणजे आत्ताच्या पालकांमध्ये) ही आठवण आजदेखील ताजी आहे.

रोशनबाईंच्या संगीतबारीच्या कार्यक्रमांबरोबरच राज्य सरकारकडून दारूबंदी प्रचार मोहिमेमध्ये भाग घेण्याकरिता बोलावणे येऊ लागले. त्या त्या प्रत्येकवेळी रोशनबाईंनी त्यांच्या तमाशाचा बाज दारूबंदीच्या प्रचारकी थाटाचा ठेवला होता. दारूबंदी प्रचार मोहिमेमध्ये रोशनबाईंनी अगदी हिरिरीने भाग घेतला होता. रोशनबाईंना आकाशवाणीकडूनदेखील विविध कार्यक्रमांमध्ये जाण्याकरिता बोलावणे होत असे. त्या प्रत्येक कार्यक्रमामध्ये रोशनबाई भाग घेत असत. शिवाय वीर जवानांच्या मनोरंजनार्थ रोशनबाई स्वखर्चानेदेखील प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या ठिकाणापर्यंत जात असत. महाराष्ट्र राज्य पोलिसदलाच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये, उपक्रमांमध्ये रोशनबाईंनी त्यांची तमाशाकला-संगीतबारी विनामूल्य सादर केली आहे. रोशनबाई त्यांच्या फुरसदीच्या वेळेत नवीन नवीन मुलींना नाच-गाणे, अदाकारी शिकवित असत. अनेक शिष्या त्यांनी तयार केल्या. आजही महाराष्ट्रातील विविध तमाशांमध्ये संगीतबाऱ्यांमधून रोशनबाईंच्या शिष्या काम करीत आहेत. पावसाळ्याचे चार महिने मात्र रोशनबाई या जेजुरी मुक्कामी राहात असत. या काळात त्यांच्या नृत्य-गायन-अदाकारीच्या शिकवण्या चालू असत.

सन १९८० मध्ये रोशन सातारकर यांच्या कुटुंबांतर्गत कलह निर्माण झाला. त्याचा रोशनबाईंना फार मोठा मानसिक त्रास झाला. याच काळात रोशनबाईंना मधुमेह आणि उच्च रक्तदाब या विकारांनी ग्रासले. डॉक्टरांनी नाच-गाण्यावर बंदी घातली. कुटुंबाचा चरितार्थ चालवायचा होता, फडाची जबाबदारी होतीच; पण रोशनबाई खचल्या

नाहीत. त्यांची लहान मुलगी कु. नंदा हिचे ...च्या फिरस्तीमुळे योग्यरीतीने शालेय ...ण पूर्ण होऊ शकले नव्हते. किंबहुना रोशनबाई स्वत:च्या मुलीच्या शालेय ...णाकडे लक्ष देऊ शकल्या नाहीत. मात्र त्यांनी त्यांची गायनकला व अदाकारी मात्र ...ची मुलगी नंदा हिला शिकविली. त्याचबरोबर कु. नंदा हिला श्री. गोविंद कुलकर्णी-मुंबई, श्री. घाडगे गुरुजी, श्री. निर्मल ...जी आणि पुण्याचे श्री. बाळासाहेब गोखले ...जी या गुरूंकडे अदाकारी, लाईट डान्स, ...यक आदी नृत्यप्रकार शिकविले. रोशनबाईंच्या तमाशामध्ये त्यांची मुलगी कु. नंदा लहान वयातच नाचू-गाऊ लागली. ...चावर रोशनाबाई हार्मोनियमशेजारी उभे ...न फक्त गाणी गाऊ लागल्या. वास्तविक ...ता त्यांना त्यांच्या मुलीला या व्यवसायात ...ायचे नव्हते. शिकून सवरून इतर ...मध्ये मुलीने चमकावे, असे त्यांना वाटत ... परंतु स्वत:चे आजारपण, कुटुंबाची ...बदारी, फडाची जबाबदारी व तमाशाकला ...त ठेवून चालू ठेवण्याची धडपड यामुळे ...नी त्यांच्या मुलीला याच व्यवसायामध्ये ...ले. पुढे त्यांच्या मुलीनेदेखील त्यांच्या ...विरुद्ध प्रेमविवाह केला. तो सुमारे दोन ...टिकला. मुलीला एक मुलगा (चि. लक्ष्मण) ...यानंतर सदर विवाह अयशस्वी होऊन ...ला. हा आघातदेखील रोशनबाईंनी अत्यंत ...ने सहन केला. जणू काही आघात ...याची त्यांना सवयच झाली होती. त्यांची ...ी नंदा पुन्हा त्यांच्या तमाशामध्ये परत ...ली. हळूहळू रोशनबाईंनी त्यांची ...शातील जबाबदारी मुलीच्या खांद्यावर ...ण्यास सुरुवात केली व स्वत: निवृत्तीच्या ...ने हळूहळू प्रवास करू लागल्या.

रोशनबाईंची प्रकृती त्यांना साथ देत नसे. ...तु रंगमंचावर आल्यानंतर रसिक प्रेक्षकांच्या ...हामुळे त्यांना चार-पाच गाणी गावी लागत ...त. गाणी संपल्यानंतर रसिक बराच वेळ टाळ्यांचा कडकडाट करीत असत. रसिकांच्या प्रेमाने रोशनबाई भारावून जात असत. त्यांना पुन:पुन्हा गाणी म्हणण्याचा आग्रह होत असे. परंतु प्रकृती अस्वास्थ्यामुळे रसिकांची मागणी त्या नम्रपणे नाकारीत असत. त्याचबरोबर रसिकांचे आता आपण पूर्वीच्या जोमाने-ताकतीने समाधान करू शकत नसल्याची खंतदेखील त्यांना सतत वाटत असे.

आता मुलगी नंदा तमाशाफड योग्यरीतीने चालवू लागली होती. रोशनबाईंना त्यांचे आजारपण त्रास देत होतेच. औषधोपचारावर खर्चदेखील भरपूर होत असे. मिळणाऱ्या आमदनीमध्ये आणि अपुऱ्या सरकारी मानधनामध्ये खर्चाचा ताळमेळ बसत नसे. त्यांची आर्थिक परिस्थिती ओढग्रस्तीची होऊ लागली होती. पण रोशनबाईंनी मदतीकरिता कोणापुढेही हात पसरले नाहीत अथवा याचना केली नाही. तमाशा क्षेत्रातील बदलामुळे, परिवर्तनामुळे अनेक नव्या नव्या गोष्टी तमाशामध्ये येत होत्या. जुन्या पारंपरिक लावण्या आणि रंगबाजी सादर करायला तबला, पेटी, ढोलकी व इतर तालवाद्यांची साथ चालू शकत होती. परंतु नव्या काळातील रसिकांची मागणी पूर्ण करण्यासाठी तमाशातील नवीन बदलाप्रमाणे पाश्चिमात्य वाद्यवृंदाचा समावेश तमाशामध्ये करणे गरजेचे झालेले होते. तसेच लाईट इफेक्ट आणि साऊंड सिस्टीम याचादेखील समावेश करणे गरजेचे झाले होते. त्याकरिता फार मोठा खर्च येणार होता. सबब, जुन्या घाटणीच्या आणि जुन्या वळणाच्या रोशनबाईंच्या तमाशाला हळूहळू कमी मागणी येऊ लागली. त्यामुळे त्यांच्या व्यवसायावर परिणाम झाला. परिस्थिती ओढग्रस्तीची झाली.

अशाच एका तमाशा महोत्सवामध्ये महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व खासदार श्री. शरद पवार यांनी रोशनबाईंची आणि त्यांच्या तमाशा फडाची दुरवस्था स्वत: पाहिली. श्री. पवार साहेबांमधील कलेचे जाण करणारे असलेले मन हळहळले आणि मा. पवार साहेबांनी सरकारी औपचारिकता बाजूला ठेवून ताबडतोब रोशनबाईंना रुपये ७५,०००/- ची रोख स्वरूपात आर्थिक मदत केली. त्याचवेळेस मा.ना. विजयसिंह मोहिते-पाटील यांनीदेखील रुपये २५,०००/- ची रोख स्वरूपातील आर्थिक मदत रोशनबाईंना तातडीने देऊ केली. प्रख्यात गायिका प्रमिला दातार यांनीदेखील रु. ११,०००/- ची रोख मदत रोशनबाईंना केली. त्यामुळे रोशनबाईंना पुन्हा एकदा उभारी आली आणि त्यांनी त्यांच्या तमाशाफडातील वाद्यवृंदाची नव्याने रचना केली व नव्या उल्हासाने व जोमाने रोशनाबाई त्यांची संगीतबारी सादर करू लागल्या. सन १९९३-९४ मध्ये राज्य सरकारने जेजुरी येथे तमाशा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. त्यामध्येदेखील संपूर्ण प्रशिक्षण शिबिर कालावधीमध्ये रोशनबाईंनी कोणतेही मानधन न घेता शिबिरार्थींना मार्गदर्शन केले होते. रोशनबाईंचे त्यांच्या स्वत:च्या फडातील मुलींना नृत्य-गायन शिकविण्याचे काम चालूच होते. नवीन मुलींकडून त्या सक्तीने दहा दहा तास सलग रियाज करून घेत असत. त्या स्वत:देखील न थकता, न कंटाळता शिकवीत असत.

रोशनबाईंच्या लावणीगायकीचा चाहता वर्गदेखील फार मोठा होता. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्यासमोर लावणी सादर करण्याचे भाग्य रोशनबाईंना लाभले होते. आचार्य अत्रे रोशनबाईंच्या लावणी गायकीचे नेहमी कौतुक करीत असत. त्याचबरोबर मा. बाळासाहेब ठाकरे यांनी देखील रोशनबाईंचे बऱ्याचदा कौतुक केलेले आहे. तर त्यांच्या लावणीच्या रेकॉर्ड्स ऐकून शास्त्रीय संगीत गाणाऱ्या अनेक महिला कलाकार अचंबित होत असत

रोशनबाईंनी गाण्याचे कोणतेही शुद्ध शिक्षण घेतले नसल्याच्या वर विश्वास ठेवीत नसत.

शनबाईंना सन १९९५ सालचा महाराष्ट्र नाचा 'महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक स्कार' जाहीर झाला. तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या हस्ते दिनांक २.१९९६ रोजी रवींद्र नाट्यमंदिर, मुंबई ल दिमाखदार सोहळ्यामध्ये सदर स्कार रोशनबाईंना प्रदान करण्यात आला. न्मान, सत्कार रोशनबाईंचा नसून त्यांनी ल्या पारंपरिक लावणीचाच होता, असे नबाई शेवटपर्यंत मानीत होत्या. हा पुरस्कार मिळूनदेखील रोशनबाईंच्या वातील मितभाषीपणा टिकून राहिलेला त्या तितक्याच विनम्र होत्या.

दिवसेंदिवस तमाशा क्षेत्रामध्ये होणाऱ्या बाबत रोशनबाई जाहीर नाराजी प्रकट असत. नव्या तमाशातील वेडेवाकडे विक्षेप व चाळे करून सादर केले जाणारे , नृत्यांगनांची जास्तीत जास्त अंग उघडे ण्याची प्रवृत्ती, द्वीअर्थी संवाद व त्यांचा रेकी वापर करून त्यामधून केली जाणारी विलवाणी व अश्लील विनोदनिर्मिती, रिक लावण्यांऐवजी पाश्चात्त्य पद्धतीचे व गीत आणि कलेशी विसंगत असे विक्रय करून चंगळवादाकडे, भोगवादाकडे लेली प्रवृत्ती याबाबत रोशनबाई अत्यंत थित होत असत. त्याबाबत त्या वारंवार तदेखील व्यक्त करीत आणि या यावरून त्यांच्याकडे शिकायला आलेल्या ना त्या प्रबोधनदेखील करीत असत.

आजकालच्या रीमिक्स संगीताबाबत- ल त्या नाराजी व्यक्त करीत असत. त्यांचे :चे गाणे, 'माझ्या नवऱ्यानं सोडलिया ' ची रीमिक्सच्या नावाखाली झालेली डतोड पाहून त्या अत्यंत दुःखी होत. इतर शातून हे गाणे सादर होताना त्याचे देखील बदलले जात व 'माझ्या नवऱ्यानं' च्याऐवजी माझ्या 'साहेबांन', माझ्या 'मालकानं', माझ्या 'घ्यानं', माझ्या 'त्यानं' सोडलिया दारू ... यांसारखे शब्दप्रयोग करून, त्यावर अश्लील हावभाव करून गीत सादर होताना पाहून रोशनबाईंना फार मोठ्या यातना होत असत. तसेच आज काल म्यूझिक अल्बम या नावाने निघणाऱ्या गीतप्रकारांमध्येदेखील मधूनच त्यांची सुप्रसिद्ध लावणी 'नेहमीच राया तुमची घाई' मधील काही ओळी घेऊन त्यावर केले जाणारे हावभाव व चाळेदेखील पाहून रोशनबाई दुःखी होत असत. रोशनबाईंच्या म्हणण्याप्रमाणे लावणी ही खानदानी नजाकतीने आणि संपूर्ण पोशाख व साज करून सादर झाली पाहिजे, तिचे बाजारीकरण व्हायला नको. परंतु आजकाल त्याची कोणाला चाड राहिलेली नाही, असेदेखील त्या विषादाने म्हणत असत. रोशनबाईंना आर्थिक व्यवहारदेखील कधीही जमला नाही. सादर केलेल्या कलेचीदेखील संपूर्ण बिदागी त्यांना कधी मिळाली नाही. किंवा ठेकेदारांनी, मदतीसाठी दिलेल्या प्रयोगाच्या नाममात्र मानधनाबाबत आयोजकांनी, केलेल्या फसवणुकीबाबत देखील त्यांनी कधीही कोठेही तक्रार केली नाही. परंतु त्याबाबतची खंत मात्र त्यांनी शेवटपर्यंत बाळगली होती. रोशनबाईंना दिल्ली तसेच परदेशांतील संस्थांकडून कार्यक्रमांची बोलावणी आली होती. परंतु योग्य मार्गदर्शन आणि मध्यस्थांचा अभाव यामुळे रोशनबाई परदेशी जाऊ शकल्या नाहीत, याचीदेखील त्यांना खंत वाटत असे.

दिवसेंदिवस प्रकृती अस्वास्थ्यामुळे रोशनबाईंना तमाशा फडामध्ये अथवा संगीतबारीमध्ये पूर्ण वेळ काम करता येत नव्हते. संपूर्ण आयुष्य तमाशाकलेला वाहिल्यानंतर अखेरच्या पर्वामध्ये रोशनबाईंना त्यांच्या मनाप्रमाणे व इच्छेप्रमाणे परमेश्वराची भक्ती, आराधना आणि आध्यात्म याकरिता वेळ उपलब्ध होऊ लागला होता. रोशनबाईंची मल्हारी मार्तण्डावर नितांत श्रद्धा होती. खंडोच्याच आशीर्वादाने आणि कृपाछत्राने माझे सर्व काही सुरळीत चालले आहे, अशी त्यांची भावना होती. रोशनबाई स्वामी समर्थांच्यादेखील भक्त होत्या. घरामध्ये स्वामीसमर्थांची मोठी मूर्ती त्यांनी देवघरात आणून ठेवलेली होती. स्वामींवर त्यांची नितांत श्रद्धा होती. त्यांच्या मुखामध्ये सतत स्वामीसमर्थांचे नामस्मरण चालू असे. सन १९९५ पासून त्यांनी मांसाहारदेखील सोडलेला होता व घरामध्येदेखील त्या स्वतः तसेच संपूर्ण कुटुंबीय शाकाहारी झालेले होते. रोजची पूजा आणि देवदर्शन झाल्याशिवाय त्या मुखामध्ये पाणीदेखील घेत नसत. परंपरेप्रमाणे नवरात्रामध्ये खंडोबा देवाची सेवा करण्याचे व्रत त्यांनी कधीही सोडले नव्हते. नवरात्रामध्ये संपूर्ण काळ त्या जेजुरी गडावर हजेरीकरिता व सेवेकरिता जात असत. त्यांच्या या धार्मिक आणि मनमिळाऊ स्वभावप्रवृत्तीमुळे संपूर्ण जेजुरी गावच्या त्या 'गावआत्या' झालेल्या होत्या. जेजुरीमधून रोशनबाई रस्त्याने देवदर्शनाला निघाल्या, तर ओळखीच्या सर्वांनी त्यांना 'काय आत्या? बरे आहे का ?' असे विचारावे आणि त्यांनीदेखील सुस्मित वदनाने त्यास प्रतिसाद द्यावा, हे दृश्य नेहमीचेच झाले होते.

रोशनबाईंना स्वतःला शिकता आले नाही, स्वतःच्या मुलीला शालेय शिक्षण देता आले नाही, याची कायम खंत वाटत असे. म्हणून नव्या पिढीमध्ये त्यांनी त्यांच्या तमाशाकलेच्या शिक्षणाबरोबर शालेय शिक्षणालादेखील तितकेच महत्त्व दिले. रोशनबाईंचे एकत्र कुटुंब होते आणि कुटुंबामध्ये त्या स्वतः, त्यांची मुलगी नंदा, ज्येष्ठ भगिनी सावित्राबाई असे सर्वजण राहत असत. शिवाय त्यांचे दोन्ही बंधू श्री. भक्कमशेठ आणि श्री. विठ्ठल यांच्या पत्नी - मुले असे सर्वजण एकत्र राहतात. श्री. भक्कमशेठ यांच्या मुलांपैकी श्री. भरत शेठ हा त्यांच्या तमाशा

फडामध्ये हार्मोनियम वाजवतो, तर मुलींपैकी सरोजा व शोभा या दोघीही गायन आणि नृत्य करतात. श्री. भक्कमशेठ यांची इतर दोन मुले मात्र अन्य व्यवसाय करून उपजीविका करतात. रोशनबाईंचे दुसरे बंधू श्री. विठ्ठल यांच्या मुलांपैकी श्री. गोविंदा हा तबला आणि ढोलकी वाजवतो, तर श्री. मल्हारी हा हार्मोनियम वाजवतो. त्यांच्या मुलींपैकी लता, पुष्पा आणि लक्ष्मी या तिघीही नृत्यगायन करतात. विठ्ठल यांची एक मुलगी सौ. जनाबाई ही मात्र पदवीधारक असून, सध्या ती महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन खात्यामध्ये अधिकारी पदावर नोकरीस आहे, तर कुमारी लक्ष्मी ही जेजुरी येथील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये नृत्य-गायन शिक्षिका म्हणून नोकरी करते. त्याचबरोबर रोशनबाईंच्या तमाशाफडामध्ये कु. लक्ष्मी ही मुलगी असूनदेखील अत्यंत कुशलतेने ढोलकीवादन करते. रोशनबाईंनी त्यांच्या पुढच्या पिढीमध्ये त्यांच्या पारंपरिक तमाशा कलेबरोबर शालेय शिक्षणालादेखील तितकेच महत्त्व दिले. त्यामुळे आज तिसऱ्या पिढीकडूनदेखील रोशनबाईंचा तमाशा दिमाखामध्ये चालू आहे.

गेल्या सुमारे चार वर्षांपासून रोशनबाईंनी तमाशामध्ये काम करणे जवळपास थांबविलेले होते. परंतु दूरदर्शन, झी सिनेमा या टीव्ही चॅनेल्सवर मुलाखती देणे, काही विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे संयोजन असल्यास त्यामध्ये भाग घेणे, यांसारखे कार्यक्रम रोशनबाईंचे चालूच होते. ह्यापूर्वी हिंदी सिनेकलाकारांनी आयोजित केलेल्या 'मैत्री २०००' या कार्यक्रमामध्येदेखील रोशनबाईंनी मराठी लावणी सादर करून आपला वेगळा ठसा उमटविला होता. प्रकृती अस्वास्थ्यकारणामुळे रोशनबाईंना त्यांच्या अखेरच्या काळामध्ये प्रवास करणेदेखील झेपत नव्हते. त्यामुळे जेजुरीसारख्या आडवळणाच्या गावामध्ये राहून कलेच्या क्षेत्रामध्ये सतत कार्यरत राहणे त्यांना शक्य होत नव्हते. जेजुरी येथेच राहून त्या जमेल तितकी कलेची सेवा करीतच होत्या.

रोशनबाईंचे भाऊ भक्कमशेठ यांनी त्यांचा पहिल्यांदा तमाशा फड उभारायच्या वेळी त्यावेळेच्या जुन्या तमाशा कलावंतांकडून पारंपरिक लावण्या शिकून आत्मसात केल्या. शिवाय शाहीर सगनभाऊ व पठ्ठे बापूराव यांच्या फडाच्या आणि बैठकीच्या लावण्यादेखील शिकून घेतल्या होत्या आणि त्या सर्व पारंपरिक लावण्या भक्कमशेठ यांनी रोशनबाई यांना शिकविल्या होत्या. तो अस्सल खजिना रोशनबाईंनी त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत मोठ्या निष्ठेने जपला होता.

रोशनबाईंचे नागपूर शहरातील एकसलग कार्यक्रम त्या वेळेच्या 'मोहन भवन' या थिएटरमध्ये होत असत. तेथे फक्त पुरुषच या कार्यक्रमांना हजेरी लावीत असत. रोशनबाईंची लोकप्रियता तत्कालीन मुख्यमंत्री ना. कन्नमवार यांच्या पत्नी सौ. ताईसाहेब कन्नमवार तसेच मा. सुमतीदेवी धनवटे यांच्या कानांवर गेली होती. सबब त्यांना रोशनबाईंचा कार्यक्रम पाहण्याची इच्छा झाली आणि त्यावेळी त्यांनी खास महिलांकरिता नागपुरातील 'धनवटे रंगमंदिर' येथे कार्यक्रम आयोजित केला. तो कार्यक्रम तेथील महिलांना इतका आवडला की, रसिक महिलांनी रोशनबाईंची कार्यक्रम संपल्यानंतर खणानारळाने ओटीदेखील भरली होती आणि विविध भेटवस्तू, साड्या, बांगड्या वगैरे महिला रसिकांनी रोशनबाईंना भेट म्हणून दिल्या होत्या.

रोशनबाईंच्या नागपूर मुक्कामामध्ये आचार्य अत्र्यांच्या नाटकांचा दौरा नागपूर येथे आलेला होता. एकाच वेळी आचार्य अत्रे यांची नाटके आणि रोशनबाईंचे कार्यक्रम नागपुरात चालू होते. रोशनबाईंच्या कार्यक्रमाचा इतका गवगवा

झालेला होता [...] आचार्य अत्र्यांच्या [...] नाटकांवरदेखी[...] त्याचा परिणाम [...] लागला होता. [...] आचार्य अत्रे हे [...] काही कामानिमित्त नागपुरात उ[...] होते. त्यांनी रोशनबाईंचा [...] पाहण्याचे ठरविले आणि त्य[...] स्वत:च्या नाटकाच्या प्रयोगास [...] राहण्याऐवजी ते रोशनबाईंचा का[...] पाहण्यास आले. रोशनबाईंचे गाणे [...] आचार्य अत्रे बेहद्द खुष झाले आणि [...] संपल्यावर ताबडतोब त्यांनी [...] २००/- बक्षीस म्हणून रोशनब[...] दिले व त्यांचे जाहीररीत्या कौतुक [...] होते.

रोशनबाईंना अनेक मान-सन[...] पुरस्कार मिळाले. शासकीय सन्मान[...] झाला. खऱ्या कलावंताला पाहिजे अस[...] रसिकमान्यता तर केव्हाच मिळाली [...] कलाकार म्हणून त्यांनी आपला स्वतं[...] उमटविला होता. पारंपरिक लावण्यांचा [...] मोलाचा खजिना त्यांनी जपला [...] त्यांच्याकडे असलेल्या कलेबाबत [...] नेहमीच 'देवाचं देणं मी ल्यायले, गळ्या[...] ते मी उतरवले, गळ्यातल्या सुरांची [...] अवतार म्हणून जपणूक केली, माझे [...] त्यात काय होते?' असे म्हणत. पा[...] लावण्यांबरोबरच रसिकांची बदल[...] अभिरुची लक्षात घेऊन रोशनब[...] चित्रपटगीते, हिंदी गझल [...] कव्वाल्यासुद्धा त्यांच्या संगीतबारीमध्ये [...] केल्या. लावणी गायिका [...] महाराष्ट्रातल्या रसिकांवर त्यांनी अधि[...] केले. त्यांच्या लावणीने रसिकांवर घा[...] मोहिनी आजदेखील कायम आहे.

सन २००५ साल उजाडले ते रोशन[...] त्रास देण्यासाठीच, असे म्हणावे ल[...]

नबाईच्या आजारांनी उचल खाल्लेली ती. त्यांच्या औषधोपचाराकरिता बराच खर्च येत होता. तसेच संपूर्ण कुटुंबाच्या र्थाकरितादेखील बराच मोठा खर्च येत . खर्चाच्या तुलनेत उत्पन्न मात्र अगदीच तुजे झालेले होते. बरेच खासगी कर्जदेखील लेले होते. त्या कर्जाच्या निवारणार्थ नबाईंना जेजुरी येथील त्यांचा दुसरा बंगला वा लागला. या आर्थिक अडचणींबाबत नबाईंनी कधीही कोणाकडेही कसलीही र केली नाही अथवा मदतीसाठी देखील पसरला नाही. अत्यंत भिमानाने ती कलावती तिचे आयुष्य जगत ली. दिनांक २१.९.२००५ रोजी जेजुरी ील घरी सकाळी नेहमीप्रमाणे रोशनबाई ल्या आणि त्यांनी नित्यकर्म आटोपली. च्या शिरस्त्याप्रमाणे त्या श्री स्वामी च्या मठामध्ये जाऊन आल्या. तेथून श्री खंडेरायाच्या दर्शनास गेल्या. दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास त्या घरी परत आल्या. येताना नेहमीप्रमाणे त्यांना दिल्या जाणाऱ्या आत्येच्या हाकेस प्रतिसाद देत देत, त्या सर्वांची चौकशी करीत करीत घरी परत आल्या. नेहमीप्रमाणे त्यांनी भोजनही घेतले आणि दुपारच्या वेळेत रोजच्या घेतल्या जाणाऱ्या रिहर्सलची तयारी त्यांची मुलगी नंदा ही करू लागली. रिहर्सलला बसण्याऐवजी त्या थोडे अस्वस्थ वाटते आहे, असे सांगून थोडा वेळ अंथरुणावर पडते, असे म्हणून मुलीकडून त्यांनी अंथरूण घालून घेतले आणि त्या अंथरुणावर लवंडल्या. पण काही क्षणांतच त्यांनी त्यांची मुलगी नंदा हिला हाक मारून बोलावून घेतले आणि त्यांच्या शेजारी त्यांच्या कुशीत तिला झोपवून घेतले. दोघी मायलेकी अंथरुणात पडून होत्या. रोशनबाई मायेने आणि वात्सल्याने नंदाच्या अंगाखांद्यावरून हात फिरवित होत्या आणि अचानक फिरणारा हाथ थांबल्यामुळे नंदाला वाटले की, आईला झोप लागली आहे, म्हणून नंदाने रोशनबाईंकडे पाहिले, त्याच सुमारास रोशनबाईंची प्राणज्योत अनंतात विलीन झाली होती. अगदी शांतपणे रोशनबाई स्वरांची आळवणी करण्याकरिता देवी सरस्वतीच्या दरबारामध्ये कायमच्याच रुजू झाल्या होत्या. रोशनबाई त्यांच्या मोहमयी दुनियेतून कायमच्या निघून गेल्या असल्या तरी त्यांचा सच्चा सूर मात्र इथे कायमचा वास करून राहिलेला आहे. रोशनबाई आजदेखील रसिकांच्या मनामध्ये घर करून राहिलेल्या आहेत. देहरूपाने त्या नश्वर दुनियेत आता नाहीत. परंतु सूररूपाने मात्र त्या ईश्वरीय दुनियेत अजरामर झालेल्या आहेत.

❀ ❀ ❀

मलमली तारुण्य माझे ...

मलमली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे
मोकळ्या केसांत माझ्या तू जिवाला गुंतवावे ॥

•

लागुनी थंडी गुलाबी
शिरशिरी यावी अशी की -
राजसा माझ्यात तू अन्
मी तुझ्यामाजी भिनावे ॥१॥

आपल्या माझ्या तनूची
तार झंकारून जावी
रेशमी संगीत स्पर्शाचे
पुन्हा तू पेटवावे ॥२॥

रे तुला बाहूत माझ्या
रूपगंधा जाग यावी
मी तुला जागे करावे
तू मला बिलगून जावे ॥३॥

कवी : सुरेश भट, ✻ गायिका : आशा भोसले
संगीत : सी. रामचंद्र ✻ चित्रपट : घरकुल

सी. रामचंद्र या नावाभोवती मधुर सुरांची शेकडो गाण्यांची जी मोहिनी आहे, त्याबद्दल वेगळे सांगायला नकोच. 'ये जिंदगी उसी की है' या अजरामर गाण्यामागची, 'मूर्तिमंत भीती उभी' या नाट्यगीताची मराठीबाण्याची परंपरा दोन हात पुढे नेणाऱ्या सी. रामचंद्रांनी नव्हे रामचंद्र नरहर चितळकर या मराठी संगीतकाराने मराठी चित्रपटांत मात्र फारशी कामगिरी केली नाही. या मोहक गाण्यांच्या जादूगिरीपासून मराठी चित्रपटसंगीत वंचित राहिलं. पण हे गीत म्हणजे सी. रामचंद्रांनी जाता जाता आपल्या माय-मराठीला घातलेला मोत्याचा कंठाच आहे. सुरेश भटांची ही मलमली गझल आशा भोसलेंच्या आवाजात सी. रामचंद्रांनी नजर लागेल अशी बंदिवान केली आहे.

चंदेरी आठवणी

सजना साँझ भयी....

सितारादेवी

अंधेरी-वेसाव्याच्या रस्त्यानं जाताना डाव्या हाताला समुद्र आणि दुसरीकडे माडाच्या झाडांमधून लपलेली धनिकांची घरं पाहणं हा सुखद अनुभव असतो; पण तो अनुभव घेण्यासाठी माझं चित्त थाऱ्यावर नव्हतं. प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर सितारादेवी भेटणार होत्या. त्यांच्याबद्दलच्या आख्यायिका ऐकून भेटीबद्दल उत्सुकता, आनंद आणि भय अशा संमिश्र भावनांनी गर्दी केली होती. यारी रोडवरील एका [illegible]म्या वसाहतीमधलं 'ट्रँक्विल स्ट्रीट' मी उत्सुकपणे शोधलं खरं; पण त्यांच्या दारापाशी जाताना क्षणभर थांबलेच... कथक नृत्यशैलीचं असामान्य कौशल्य, चित्रपटातील कारकीर्द, नृत्य, गाणी, सन्मान आणि वाऱ्यावर उडणाऱ्या ओढणीसारखं व्यक्तिगत आयुष्य... साठ-सत्तर वर्षांचा आलेख मनात जुळवता येईना.

दहा-बारा वर्षांचा एक चुणचुणीत, काम करणारा पोरगा सांगत आला, "आपको आँटी ने बुलाया है." घरात पाऊल ठेवताच समजून चुकलं, घराची आवराआवर चालली होती. असंख्य वस्तू, पेटारे, तसबीरी, कागदपत्रं, कोर्टाच्या फायली, गठ्ठे बांधलेले. सिताराजी जबर खोकल्यानं हैराण. अजून दिवसाला सुरुवातच नव्हती... "तुला थोडं बसावं लागेल. मी आलेच..."

सामानाची बांधाबांध करून राहतं घर बदलायची तयारी चालली होती, यारी रोडचं घर फार दूर पडतं म्हणून. पाच मिनिटांत त्या आल्या. आरशासमोर बसून काजळाची रेघ ओढली आणि फिकीशी ओष्ठशलाका. ऐंशीच्या घरात उमर उलटलेल्या त्या स्त्रीनं साऱ्या खोलीचा नूर पालटून टाकला. नृत्याच्या तयारीसारखी मुलाखतीची

तयारी चालली होती.

"बोल, काय सांगू तुला?"

"सिताराजी, हा इथला फोटो तुमच्या वडिलांचा-पंडित सुखदेव महाराजांचा आहे ना?"

डोळ्यांतले भाव बदलतात. गळ्यातला सूर थोडा ओलावतो. "हे माझे गुरू आणि वडील. बनारस घराण्याचे आधारस्तंभ. त्यांच्या बंदिशी, साहित्य-संगीत यांचं भांडार अजूनही संपत नाही. पूर्वी नृत्यगायनाचं धन फक्त राजा महाराजांनाच लुटता येत असे. ते जनसामान्यांपर्यंत जावं यासाठी तळमळणारा हा माणूस विलक्षण होता. दूरदृष्टीचा होता. त्यांचे वडील काशीमहाराजांचे राजपुरोहित, तर माझी आई मत्स्यकुमारी नेपाळनरेशांच्या राजपुरोहितांची मुलगी. ही दोघंही उदारमतवादी होती. वडिलांनी आम्हा मुलींना नृत्य शिकायचं ठरवलं. तो काळ सनातनी विचारांचा होता. काशीमधल्या ब्राह्मण कुळातल्या मुलींनी नाच करायचा म्हणजे भलतंच मोठं पाप. कबीर चौराहा परिसरात आमचं राधाकृष्ण कलामंदिर होतं. ते संगीताचं, साहित्याचं मुक्तद्वार होतं. वडिलांच्या पुरोगामी विचारांमुळे त्यावेळच्या कर्मठ सनातनी लोकांनी आमच्यावर बहिष्कार टाकला. आम्हाला मोहल्ल्यातून अक्षरश: बाहेर काढलं. मग गावाबाहेर राहून वडिलांनी आपलं काम चालूच ठेवलं.

"आमच्या घरातल्या मुलींची नावं गंगेची असायची. अलकनंदा, त्रिवेणी... पण माझा जन्म धनत्रयोदशीच्या दिवशी पहाटेचा, म्हणून मी धनलक्ष्मी. घरातली धन्नो. मी नंदादीदीला शिकवायला येणाऱ्या मास्तरांचं शिकवणं चोरून ऐकत असे, पाहत असे. एके दिवशी मी सर्वांसमोर 'छोडो साँवरिया, भरूँ मैं गगरिया' साभिनय करून दाखवलं. मी अवघी चार-पाच वर्षांची होते. मग वडिलांनी मला नाच शिकवायला सुरुवात केली. मला वाटतं मी अगदी दिवसभर नाचतच राही. गंगेत पोहण्यात पटाईत होते. स्केटिंग करायचं-नाच करायचा.

"मला शाळेत घातलं. अभ्यासापेक्षा माझ्या नाचाचं कौतुकच जास्त. एके दिवशी शिक्षक म्हणाले, 'आम्हाला नाच शिकवशील का?' मी एखाद्या मोठ्या मुलीसारखी त्या सर्वांना नाच शिकवू लागले. सत्यवान-सावित्रीचं आख्यान बसवून घेतलं. मग वडिलांनी मला घरातच शिकवायचं ठरवलं. उर्दू शिकवायला, संस्कृत शिकवायला मास्तर येत. व्यायामाचंही शिक्षण, सराव असे. मी पायांत घुंगरू बांधून दोरीवरच्या उड्या मारत असे. माझ्या मोठ्या बहिणीकडे दादरे विपुल होते. बनारस खरं तर दादऱ्यांचं आगरच. तर तारादीदीकडे ठुमरी, ध्रुपद, धमार यांचं भांडार होतं.

"आम्ही काही वर्षे कलकत्त्यात राहिलो. अलीपूर भागात मूक चित्रपटाच्या जमान्यात मध्यंतरात नंदादीदी, तारादीदी नाच करीत. लोकांना ते फार आवडे. मग मीही हळूच त्यांच्यात सामील होत असे. एकदा तारादिदी म्हणाली, आपण धन्नोचं नाव बदलू. काहीतरीच वाटतं ते. त्यावेळी आमच्या ओळखीचं एक कुटुंब होतं. त्यांच्या घरात मुलींची नावं श्यामसितारा, तारा अशी होती. त्रिवेणी नाव उच्चारायला कठीण म्हणून दीदीनं स्वत:साठी तारा हे नाव निवडलं आणि माझं सितारा. मोठी बहीण म्हणाली, मी नाही माझं नाव बदलणार! वडिलांनी माझ्या नावात बदल सुचवला. ते म्हणाले, आपण सितारादेवी म्हणू.

"आम्ही मुली चांगल्या नाचू लागलो, तेव्हा वडिलांनी आमच्या मूळ कुटुंबातले, पण लखनौला राहणारे नृत्यातले जाणकार शंभुमहाराज यांना बोलावलं. घरातल्या मुलींना नाच शिकवण्याची कल्पना त्यांनी धुडकावून लावली. अखेर वडिलांनी त्यांना समजावलं. मग शंभुमहाराज, लच्छु महाराज, अच्छनमहाराज हे नृत्यातले दिग्गज आम्हाला शिकवू लागले. आम्ही मुळातले कथक-

कथानृत्य करणारे आणि नृत्यशैलीला त्यांचंच नाव पडलं-कथक.

''मुंबईहून एक दिवस एक जण आले. निरंजन शर्मा. 'उषाहरण' चित्रपट काढत होते. उषेचं काम सुलताना करीत होती. तिच्या सखीचं काम करायला त्यांना नृत्यकुशल मुलगी हवी होती. तोपर्यंत चित्रपटात शास्त्रीय नृत्य जाणणारे नव्हतेच. त्यांनी तिघी बहिणींतून मलाच निवडलं. वडिलांनी मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला. चित्रपटात जायची उदार मनानं परवानगी दिली. उषाहरणमध्ये छोटी छोटी नृत्यं होती. सुलताना मोठी सुंदर होती. मला त्यानंतर चित्रपटातून नृत्य करण्यासाठी बोलावणी येऊ लागली. चित्रपटात शास्त्रीयनृत्याची सुरुवात माझ्यापासून झाली, असं म्हणायला हरकत नाही. ही बत्तीस सालची गोष्ट आहे. हा काळ नवनवीन कलावंतांच्या उदयाचा होता. नवीन स्टुडिओ उभे राहत होते. त्याचनंतर 'वसंतसेना' आला. शंकरराव चारुदत्त, जोहरा वसंतसेना, तारादीदी द्युता, तर मी छोटी मदनिका होते. त्यातलं एक गाणं 'छेडो ना गोपाल लाल व्रज की बाँट छोडो नंदलाल', असं काहीसं मला आठवतंय.

मेहबूबखानसाहेबांची ती पहिलीच फिल्म होती... जजमेंट ऑफ अल्लाह. बहुतेक पस्तीस सालची. नृत्यप्रधान भूमिका असलेल्या चित्रपटांतून मला भराभर कामं मिळू लागली. त्यावेळी चित्रपटांतून काम करताना मजा येई. युनिटचे लोक म्हणजे घरचेच, एका कुटुंबातले जणू. मी तर स्टुडिओत हुंदडत असे. कॅमेरा-लाईट चालू आहेत, त्याचं गांभीर्य नसे. समवयस्कांबरोबर चेष्टामस्करी, हास्यविनोद. मी अगदी हवेत असे! एकदा गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्यासमोर नाच करण्याची संधी आली होती. मलबार हिलवर मोठं अधिवेशन किंवा तत्सम काहीतरी होतं. सर्व संस्थानिक राजे-महाराज आले होते. मला मिळालेली पंधरा मिनिटं कुठं पुरायला? माझा नाच संपल्यानंतर गुरुदेवांनी माझं कौतुक केलं. बनारसी साडी, मिठाई आणि पैसे, असं हातात दिलं. मी म्हटलं, ''गुरुदेव, यातलं मला काही नको. तुम्ही मला आशीर्वाद लिहून द्या.'' ते म्हणाले, ''हे पहिलं सर्व घे आणि उद्या पुन्हा येऊन नाच करून दाखव.'' मी दुसऱ्या दिवशी पुन्हा भरपूर वेळ नाच करून दाखवला. गुरुदेवांनी माझं कौतुक करणारे शब्द लिहिले आणि मला 'कथकसम्राज्ञी' ही पदवी दिली. त्यांचे शब्द मी अजून जपून ठेवले आहेत. गुरुदेवांनी माझ्या वडिलांचं विशेष कौतुक केलं... मुलींना नृत्य शिकवण्याच्या धैर्याबद्दल.

''चित्रपटाच्या कामामधून सतत नृत्यसराव आणि नृत्यशिक्षण चालू होतंच... एकही क्षण खंड न पडता.''

''खालसा कॉलेज रोडवरील माटुंग्याचा परिसर म्हणजे अगदी स्वर्ग होता. आमचे शेजारी म्हणजे पृथ्वीराज कपूर, मदनपुरी, के. एन. सिंग, मनमोहन कृष्ण असे लोक होते. पृथ्वीराजजींनी होळीच्या दिवशी सर्वांनी एकत्र जमण्याची पद्धत सुरू केली. कॉलेज रोडवरून आम्ही सर्व जण रंग खेळत, नाचत जात आहोत हे अपूर्व दृश्य आजही माझ्या डोळ्यांसमोर तरळतं. राजनं होली पुन्हा एकदा जागवली. आर. के. स्टुडिओत जाऊन मनसोक्त होळी खेळायची अन् खूप नाचायचं, हे जणू ठरलेलं असे.

''मी स्टेजवर होळीच्या दिवशी नृत्याचा खास कार्यक्रम करीत असे. बनारसमध्ये होळीची नृत्यं आणि गीतं खूप. कार्यक्रम रंगात आल्यानंतर मी स्टेजवरून प्रेक्षकांत येऊन रंग उडवून देत असे. गळ्यातल्या फुलांच्या माळा उधळीत असे. या आश्चर्यानं, अनपेक्षितपणानं प्रेक्षक जल्लोष करीत. ही तर माझी स्वत:ची खास शैली.

''पृथ्वीराजजी माझं दैवत. किती उंच, देखणे, सडपातळ आणि गोरे होते ते! चित्रपटातल्या साऱ्या जणी त्यांच्यावर फिदा. 'डाकू मन्सूर' पाहिल्यानंतर मीही त्यांच्या प्रेमातच होते. मला वाटे, माझा जोडीदार पृथ्वीराजजींसारखा असावा. त्यांच्या घरात आम्हाला मुक्त प्रवेश. कलकत्त्याहून ते आले तेव्हा राज बारा वर्षांचा, शम्मी सहा वर्षांचा तर शशी दीड वर्षांचा होता. पापाजींची मी नायिका बनले-'भलाई' मध्ये. साल बहुतेक त्रेचाळीस.

''पूर्वी स्टुडिओत नाच, गाणं, अभिनय, संवाद हे सारं एकदम व्हायचं. मी नाचत असेल तर माझी आवर्तनं पुरी होत असताना कॅमेरा टिपत असे आणि वर चालणारा माइकही. त्यामुळे सारं जिवंत, प्रत्यक्ष घडणारं. आजच्या डबिंगसारखं कोरडं नाही. मेहबूबखानसाहेबांच्या 'रोटी' मध्ये आदिवासी मुलीच्या हृदयस्पर्शी भूमिकेनं मला फार समाधान दिलं. त्या चि[illegible] अख्तरीबाई म्हणजे बेगम अख्तर होत्[illegible]

''चित्रपट क्षेत्रातल्या उतार-च[illegible] आणि पैशाच्या खेळाचं अपूर्व नाट्य [illegible] आणि एक दिवस सारे पाश तोडून [illegible] सर्वस्वी नृत्याकडे वळले. तसं [illegible] चित्रपटांसाठी नृत्यदिग्दर्शन मी करीत [illegible] अगदी 'सावन को आने दो' पर्यंत. पण [illegible] नृत्यासाठी दिला. देशोदेशी नृत्याचे [illegible] केले. अगदी मध्य प्रदेशात भींड मुरैन[illegible] शिष्य तयार केले. असिफच्या प्रेमा[illegible] आणि बुडले. स्वप्नं पाहिली आणि ती [illegible] पाहिली. 'मुगले आझम' मध्ये 'बह[illegible] करायची होती. असिफ म्हणाला, ''[illegible] मॉडर्न दिसतेस. निगारच अगदी योग्य [illegible] तो पटवून देण्यात अगदी पटाईत! [illegible] मी..

''प्रताप बारोट यांच्याशी लग्न के[illegible] मुलगा लंडनला जन्मला. आज तो मो[illegible] ड्रमर आहे. संगीतकार आहे. माझी छो[illegible] मलिका छान नाचते.

''शंभुमहाराजांनी नृत्यविद्या [illegible] लच्छुमहाराजांनी अभिनय शिक[illegible] अच्छनमहाराजांनी लयकारी, वडि[illegible] नृत्याला प्रतिष्ठा देण्यासाठी प्राण [illegible] लावले. गोपीकृष्णाला बनारस शैली[illegible] मिळालं; पण तो अकालीच निघून [illegible] तारादीदी, नंदादीदी, चौबेमहाराज [illegible] भावंड राहीली नाहीत. तांडव करणा[illegible] राहिलं नाही. मी या जागेत एकटी पडले[illegible] नवीन घर शोधायचं...''

समुद्राची गाज असलेला-माद[illegible] काजळरेखा घातलेला सिताराजींचा [illegible] कथकची शैली-चित्रपटाचं विश्व, [illegible] मानसन्मान, या सर्वांना घेरून रा[illegible] एकाकीपण अटळ, अविचल, हो[illegible] रंगासारखं, बनारसच्या गंगेसारखं अवि[illegible] आहे.

''माझ्या शब्दांतून त्याचं चित्र [illegible] उमटतंय? शिवाय संध्याकाळही [illegible] आलीय''.

चंदेरी आठवणी

अंगणात फुलल्या जाई-जुई...

सरस्वतीबाई राणे

...झी आई मोठी करारी स्त्री होती. सुरेशबाबू, ...ई, कृष्णा, कमलाबाई व मी; या पाच ... तिनं जिद्दीनं वाढवलं. मला गाणं तर ...लंच; पण नाचही शिकवला. स्वयंपाक, ...-टिपण शिकवलं. आणखी एक गोष्ट ...ली, ती म्हणजे संकटांना धैर्यानं सामोरं ... पुढं या शिकवणीचा फार उपयोग ... संकटांचा वर्षाव झाला. मी तो झेलत ... पण गाण्यानं मात्र आयुष्य सफल ...'' सरस्वतीबाईंच्या आठवणी ...साठी मी जिवाचे कान केले होते. माझ्या ...ीत थेंबाथेंबाने त्या गोळा केल्या. ...तली सुख-दुःखे त्यांनी मौनात गोठवून ...त. गाण्यातून मात्र निखळ आनंदाचे ...हत आहेत...

...स्वतीबाई फोनवर बोलल्या आणि त्यांचा ...ता स्वर मी पुन:पुन्हा आठवत राहिले. ...बाईंचा आवाज असाच रुणझुणत ...वयाचा किंचितही ओरखडा न उठलेला ...कल्यावर मी नवल करीत राहिले. ...बाईंचे घर माझ्या घरापासून जवळच ... मी भरभर चालतच अंतर पार केले. ...बाईंशी प्रत्यक्ष बोलण्यासाठी किती वर्षे ... सवाई गंधर्व महोत्सवात पुढच्या रांगेत ...ई, कमलाबाईंबरोबर सरस्वतीबाई ...य श्रोत्यांच्या रूपाने अनेक वर्षे ...ची स्मृती जागी झाली. त्यांना बैठकीत ...हिल्याचे स्मरले. आज त्यांना पाहिले, ... मोठा काळ हातातून निसटला होता. ...ईंच्या चेहऱ्यावरचा शांत स्निग्ध भाव मात्र तसाच होता...

आठवणींचा ओघ सुरू व्हायचा... अन् लक्षात आले, सरस्वतीबाई विलक्षण मितभाषी आहेत, अबोल आहेत. मैफलीत सरसर 'सरगम' फेकणाऱ्या त्या ज्येष्ठ कलावतीला बोलते करण्याची युक्ती सापडेना. सौम्यतेची परिसीमा असलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वापुढे मला संभाषणाचे गणित सुटेना. एकेक आठवण मनाच्या संपुटात जपलेली. एकेक शब्द तोलून... वर्ष-घटना यांचा मेळ घालत, त्यांच्या सुमधुर आवाजात ऐकणे हा रोमांचकारी अनुभव होता. रतन-मीनाने त्यांच्या मुलीने... नातीने मला सामील व्हायचे ठरवले.

''माझी आई ताराबाई ही मोठी करारी स्त्री होती. हिराबाई, सुरेशबाबू, कृष्णा, कमला आणि सर्वात लहान मी म्हणून छोटूताई. या सर्व मुलांचं संगोपन तिनं जिद्दीनं केलं. गाणं तर घरात होतं. मला किराणा घराण्याच्या गायिकी बरोबर जयपूर घराण्याची तालीम देण्याची कल्पना तिचीच होती. जयपूर घराण्याच्या ताना आणि किराणा घराण्याचं माधुर्य असा मिलाफ व्हावा आणि नवीन गायकी सिद्ध करावी, अशा विचाराचं काही तरी तिच्या मनात घोळत असावं. खूप बुद्धिमान होती ती. आम्ही तिला अम्मा म्हणत असू. किराणा घराण्याचं गाणं हिराबाई, सुरेशबाबू यांच्याकडून खूप लहानपणीच माझ्या कानांवर पडलं. अम्मानं माझ्यासाठी नथ्थन खाँ म्हणजे अल्लादिया खाँसाहेबांचे भाचे होते, त्यांनी मला जयपूर घराण्याच्या गायकीचे पाठ दिले. खंबावती, वसंत, छायानाटसारखे राग शिकवले. नथ्थन खाँसाहेबांचं दोन-तीन वर्षांनंतर निधन झालं. मला काही दिवस प्रोफेसर देवधरांकडे शिकायला पाठवत होते. त्यांनी मला चंद्रकंस राग शिकवला. हिराबाईंना शिकवण्यासाठी वहीदखाँसाहेब येत असत. मला ते म्हणत, 'छोटू सामने बैठ और गाना सुन.' मला तर त्यांची खूप भीती वाटे; पण ऐकून ऐकून माझ्या साऱ्या बंदिशी पाठ होऊन जात... अम्मानं मला नाच शिकवला, स्वयंपाक शिकवला, शिवणाचा डिप्लोमा घ्यायला लावला... सर्व संकटांचा धैर्यानं सामना करायचा हेही शिकवलं. कष्ट करण्यासाठी कधी मागे हटायचं नाही, हे अंगवळणी पडलं. पुढच्या आयुष्यात तिच्या शिकवणीचा फार उपयोग झाला. संकटांचा वर्षाव पडला, मी झेलत राहिले...

आम्हाला तिनं मिरजेहून पुण्यात आणलं. मला आठवतंय, त्यावेळी आम्ही शुक्रवार पेठेत राहत होतो. 'नूतन संगीत विद्यालय' ही आमची कंपनी १९२९ मध्ये स्थापन झाली होती. मी छोटी होते तेव्हा दासीच्या, छोट्या बहिणीच्या किरकोळ भूमिका करीत असे. पुढे 'संशयकल्लोळ' मध्ये कृत्तिका, 'सौभद्र' मध्ये सुभद्रा, 'मानापमान' मध्यें भामिनी अशा भूमिका केल्या. एवढंच नव्हे तर बालगंधर्व, नानासाहेब फाटक, मा. कृष्णराव, छोटा गंधर्व यांच्यासारख्या मातब्बर नटांबरोबर कामं केली. 'एकच प्याला' चे तर हजारो प्रयोग झाले असतील.. एचएमव्हीसाठी काही भावगीतं ध्वनिमुद्रित केली होती. सुधीर फडके यांनी संगीतबद्ध केलेली 'जा घेऊन संदेश पाखरा' सारखी गीतं घरोघरी पोचली. 'घन:श्याम नयनी आला' नं विक्रमी लोकप्रियता मिळवली. प्रत्येक मैफलीत मला ही गाणी म्हणावीच लागत.

१९२९ मध्ये सुरू झालेली आमची कंपनी दोनच वर्षात बंद पडली. माझ्या आईला पैशांच्या व्यवहारात कुणी तरी फसवलं होतं... आम्हा सर्वांना एका वस्त्रानिशी बाहेर पडावं लागलं होतं... पण अम्मानं न डगमगता पुन्हा शून्यातून सुरुवात केली... मुंबईला आम्हाला सदानंदवाडीत नेऊन ठेवलं... आमची स्थिती अत्यंत हलाखीची होती. मला तर कागदाच्या पुड्यातून जेवण केल्याचं आठवतं... पण हेही दिवस गेले. आमच्या एका ऐतिहासिक नाटकात सिंहासन खऱ्या चांदीचं होतं. आमच्याकडे म्हामूलाल म्हणून तबलजी येत असे, तो अत्रे पिक्चर्स मध्ये काम करीत असे. एकदा तो विचारत आला, अत्रे यांना एक चांगली गायिका हवी होती. मला आठवतंय, अम्मानं

विरोध केला. 'प्लेबॅक म्हणजे आवाज कायचा का' असं काही तरी तिला वाटत त... अखेर मी 'अत्रे पिक्चर्स' मध्ये गेले. वेळी ते 'पायाची दासी' करीत होते. त्यात ची गाणी खूप गाजली. हा चित्रपट हिंदीत रणोंकी दासी' म्हणून झाला. मराठीत संगीतकार अण्णासाहेब माईणकर होते. गात फुलल्या जाई-जुई', 'फुलामध्ये फूल वे जाईचे', सुख भोगावे आईचे' ही गाणी गाजली. यात एका गाण्यात तर मला ला जातं चालवावं लागलं होतं...

त्यानंतर पार्श्वगायनाची खूप कामं आली. पिक्चर्सच्या 'वसंतसेना', 'ब्रह्म घोटाळा', ची मावशी' मधली गाणी मी गायले. बॉम्बे कीजच्या 'किस्मत' या चित्रपटासाठी मला वणं आलं होतं. अम्मानं इतक्या लांब डला जावं लागेल म्हणून परवानगी दिली . 'किस्मत' मध्ये गायची संधी मिळाली ती, तर माझी 'किस्मत' बदलली असती.. नो.

पण 'रामराज्य' साठी बोलावणं आलं. कराव व्यास यांनी मला फार चांगली गाणी ली. 'लाडक्या राणीला लागले डोहाळे', वू ये चल वीणे' खूप लोकप्रिय झाली. दीत 'बीना मधुर मधुर कछु बोलें' कप्रियतेचा उच्चांक गाठला...

वसंत देसाई, श्रीधर पार्सेकर, सी. रामचंद्र च्यासारख्या संगीतकारांबरोबर काम करायची ी मिळाली. पैसा बोलतो आहे, 'रामबाण', त भेट' असे चित्रपट मिळाले. सी. रामचंद्र च्या 'सरगम' नंतर मात्र माझं सर्व लक्ष शास्त्रीय गीताकडे वळलं. लताबरोबरचं द्वंद्वगीत 'तू ह सखी सरगम...', 'तिनक तिन तानी..' नंतर डं पार्श्वगायन संपुष्टात आलं. अपवाद दहा-रा वर्षांपूर्वी 'भूमिका' चित्रपटाचा. श्याम गलनी छोट्या स्मिता पाटीलसाठी माझ्या तोला-मीना फातर्पेकरला बोलावलं होतं. हा आम्ही सर्व जण मुंबईला गेलो होतो. आजी तोला शिकवत आहे, असं दृश्य होतं. एक ई मीनाला सांगू लागल्या. मीना छोटी होती. तिनं काळी एकच्या पट्टीत आवाज लावला, तेव्हा मी ते गाऊन दाखवू लागले. संगीतकार वनराज भाटिया म्हणाले, 'रेकॉर्डिंग ठेवू का?' शुद्ध कल्याणातली चीज 'मोंदर बाजे' अशा तऱ्हेनं चित्रपटात घेतलं गेलं. त्यानंतर मात्र नाहीच...

१९४४ पासून मी आकाशवाणीवर गात होते. चेन बुकिंग पद्धतीनं मला सर्व भारतातल्या रेडिओ स्टेशनवर गायला मिळालं. मी त्यानंतर इतकी व्यग्र झाले, की सप्टेंबरमध्ये निघालेली मी जानेवारीपर्यंत भ्रमंती करीत असे. कलकत्ता हे त्यावेळी संगीतप्रेमींचं मोठं केंद्र होतं. तिथं रात्रभर मैफली चालत. मुंबई-कलकत्ता प्रथम वर्गाचं भाडं पंचाहत्तर रुपये असायचं, तर मानधन चांगलं पाचशे-सातशे मिळायचं. या निमित्तानं मी खूप हिंडले... त्यावेळी सर्व कलावंतांची कुठं तरी उतरण्याची व्यवस्था असे. एकदा पं. रविशंकर यांच्या पोटात दुखत होतं. माझ्या संग्रही फार चांगली औषधं असत. ती मी त्यांना दिली होती. त्याची त्यांना आजही आठवण आहे...

माझे पती सुंदरराव राणे यांनी मला अतिशय प्रोत्साहन दिलं. खूप मदत केली. आज मी जी सरस्वती राणे आहे ती केवळ त्यांच्यामुळे...

आता सुंदरराव राणे नाहीत. रतन-चित्रा आणि मीना तिच्या छोट्या सायलीसह आहेत. सरस्वतीबाई मीनाला बंदिशी शिकवतात. मीरा पणशीकर, कुसुम शेंडे, शैला आपटेसारखा शिष्यपरिवार त्यांनी तयार केला आहे... पण लग्न झालं की मुली गाणं थांबवतात, याची त्यांना खंत वाटते...

बालगंधर्वांच्या नावाचे तीनही पुरस्कार त्यांना अभिमानाचे वाटतात. हिराबाईंच्याबरोबर जुगलबंदीची सय येते... त्यांची मुलगी सांगते, ''आई खूप छान स्वयंपाक करते. संजीव कपूर 'खाना खजाना' चा तिचा लाडका आहे. ती करंज्यांची मुरड सुंदर घालते. चायनीजसुद्धा घरी बनवते... मध्ये नूरजहाँ भारतात आल्या, तेव्हा एका मोठ्या कार्यक्रमात शबाना आझमी म्हणाली, ''नूरजहाँजी की पसंद का गीत हम पेश कर रहे हैं - 'वीणा मधुर मधुर कछु बोल..' इसे जिसने गाया वह गायिका सरस्वती राणे हमारे बीच नही है...'' सरस्वती राणे आहेत की नाहीत याचाही फिल्म इंडस्ट्रीला पत्ता नाही. त्यांची मुलगी संतापाने बोलते. सरस्वतीबाई नुसत्या हसतात.

पद्मश्रीसारखे पुरस्कार वाट्याला आले नाहीत, याबद्दल सरस्वतीबाई बोलत नाहीत. आचार्य अत्रे यांच्या जन्मशताब्दी सोहळ्यात कुणाला आपली आठवण होऊ नये, याबद्दल तीव्रतेने त्या बोलत नाहीत. तसे बोलणे त्यांच्या स्वभावातच नाही.

पानशेत पुरामध्ये चिखलात बुडलेल्या संसाराची त्यांनी पुन्हा उभारणी केली, त्याबद्दल कधी कटुता नाही, तक्रार नाही.

चार ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस. तिथीप्रमाणे लक्ष्मीपूजनाचा दिवस. मी त्यांना विचारते - खरं तर तुमचं नाव लक्ष्मी असायला हवं ना ? सरस्वती कसं...?

त्यांच्या सवयीने त्या नुसत्या हसतात. किराणा-जयपूर घराण्याच्या असंख्य बंदिशी मनात घोळत असतात. भावाबहिणींच्या-आईच्या आठवणी येत असतात. असंख्य मैफलींच्या आठवणी गर्दी करतात. असे असले तरी हातात पिशवी घेऊन बाजारात जायचा परिपाठ सरस्वतीबाईंचा चुकत नाही...

माणसांना इतकं साधं, इतकं समृद्ध जीवन कसं जगता येतं कुणास ठाऊक ?

दैनिक 'सकाळ' पुणे मधून १९९८ साली गाजलेली 'चंदेरी आठवणी' ही लेखमाला तनया-ईशा प्रकाशन, पुणे यांच्यातर्फे पुस्तकरूपाने लवकरच प्रसिद्ध होत आहे. त्यातील सितारादेवी, सरस्वतीबाई राणे, उषा खन्ना, राजकुमारी, जगजीत कौर सुमन कल्याणपूर व सुधा मल्होत्रा यांच्या मुलाखती सादर करीत आहोत.

मुलाखती - सुलभा तेरणीकर

('दैनिक सकाळ' पुणे व 'तनया-ईशा प्रकाशन', पुणे यांच्या सौजन्याने)

चंदेरी आठवणी

तुम मुझे भूल भी जाओ...

सुधा मल्होत्रा

'दीदी' या चित्रपटाचं संगीत एन. दत्ता करीत होते. ते अचानक आजारी पडल्यामुळे गाण्याचं ध्वनिमुद्रण अडलं होतं. साहिरसाहेब मला म्हणाले, 'तूच चाल कर त्या गाण्याची.' मी त्यापूर्वी चाल केली नव्हती. साहिर म्हणाले, 'प्रयत्न तर कर'.. कविता होती 'तुम मुझे भूल भी जाओ तो यह हक है तुमको, मेरी बात और है मैंने तो मुहब्बत की है..' कविता पाहताक्षणीच मला काही सुचू लागलं. पहाडीचे सूर घेऊन चाल आली. सर्वांनाच खूप आवडली. लगेच मी व मुकेशजींनी ध्वनिमुद्रण करून टाकलं. मी दिलेली पहिली व शेवटची चाल...

ही फार वर्षांपूर्वीची गोष्ट सांगते. रेडिओच्या मंतरलेल्या दिवसांची गोष्ट आहे. दोन यत्ता गाळून पुढचा अभ्यास करणाऱ्या मुलांसारखा माझा रेडिओ सिलोनचा अभ्यास जोरात चालला होता. 'पच्चीस मीटर बँडपर सात हजार एकसो नब्बे किलोहर्ट्सपर' मी तरळत असायची. जमलं तर गणितं सोडवायची, नाही तर हाताचा मुटका गालावर ठेवून 'हूरे अरब' मधलं लताचं 'तारा राम रम..' ऐकायचं किंवा लता-तलतचं 'राजधानी' मधलं 'भूल जा सपने सुहाने भूल जा...' ऐकायचं. माझ्या मावशी मंडळींची मुंबई आकाशवाणीवरचं 'साँग ऑफ द मंथ' ऐकण्यासाठी घाई उडत असे. रेडिओपाशी बसून त्या पटपट गाणं लिहून घेत.

'दृष्टीआड झाल्यावर सृष्टीही निराळी,
व्यवसायही; विविध विषय भोवताली..'

'विसरशील खास मला दृष्टिआड होता - वचने ही गोड गोड देशी जरी आता...' कवी ज. के. उपाध्ये, संगीतकार यशवंत देव आणि गायिका सुधा मल्होत्रा असे तपशील कानांवर पडायचे. लता मंगेशकरांनीच भरपूर अभ्यास देऊन ठेवलेला होता. इतरत्र पहायला वेळच नव्हता. 'तुम्हे अपना कहने की चाह में कभी हो न सके किसी के हम..' या न्यायानं चित्रपट संगीतातून माझ्यावर जीवनरसाचा वर्षाव करणाऱ्या 'लता' च्या स्वराच्या भावनिक गुंत्यात मी अडकलेली होते. 'साँग ऑफ द मंथ' साठी मला वेळच नव्हता. नंतर पुढे बराच काळ गेला. मनाच्या तळघरात लपलेलं गाणं समोर आलं. एव्हाना दर्द वगैरे समजायला लागलं होतं. हिंदीतला एक सुरेख शब्द हाती आला होता. 'सोज...' सुधा मल्होत्रांच्या आवाजातल्या 'सोज' नं पाठलाग केला. 'सोज' म्हणजे एक तऱ्हेची वेदना. त्यांचा स्वतंत्र ओळख असलेला आवाज मी बऱ्याच काळानंतर ओळखला होता...

'सलामें हसरत कुबूल कर लो,
मेरी मुहब्बत कबूल कर लो'..

बाबरमधलं गाणं ऐकलं. बुडलेला अभ्यासक्रमही भरून काढला. मग 'पयामें इश्क मुहब्बत हमें पसंत नहीं..' 'मेरे नदीम, मेरे हमसफर उदास न हो...' आणि 'कश्ती का खामोश सफर है..' ही ऐकली.. पण अनेक वर्षं या जगात येऊनही आपल्याला जशी झाडं ओळखता येत नाहीत, त्यांची नावं ठाऊक नसतात, ग्रह-तारे अचूक शोधता येत नाहीत, माणसं ओळखता येत नाहीत, त्यांच्याबद्दल पाटी अगदी कोरी असते, तसंच सुधा मल्होत्रांबद्दल माझी माहितीची फाईल किंवा फ्लॉपी अगदी कोरी होती. त्यांच्याशी मुलाखतीसंबंधी बोलताना फोनवर झालेल्या संभाषणातून त्यांचा आवाज कानी पडला आणि अंगावर सर्रकन काटा आला. त्यांची सारी गाणी आठवली. एवढं होमवर्क केलं. श्रावणसरी कोसळत होत्या आणि चौदाव्या रस्त्यावरचं खारमधलं त्यांचं घर अचूक शोधून काढलं. घराचं नाव 'ज्ञानघर' त्यांच्या देखण्या वास्तूचं भव्यपण, ऐश्वर्याच्या खुणा ठायी ठायी.

दिवाणखान्याची एक बाजू सुंदर बगिच्यामुळे खुललेली.. सुंदर पेंटिंग्ज, झुंबर, पाय रुतणारे रुजामे.. थोड्याच वेळात येत असल्याचा मालकिणीचा निरोप आला. आवाज किणकिणला आणि दिवाणखान्यात पसरला. 'रोजचाच चंद्र आज भासतो नवा..' मध्ये ऐकलेला आवाज.. 'ना मैं धन चाहूँ..' मध्ये गीताच्या बरोबरीनं गायलेला स्वर. अशा वेळी मी जरा भावुक होते. नेमकं अशा वेळीच मला डायरी, पेन, चष्मा काढायचा असतो. संभाषणाचा सूर शोधायचा असतो.. सुधाजी येतात आणि जेवणाच्या मेजापाशी घेऊन जातात. चाफेगौर वर्ण, सुहास्य मुद्रा आणि अतिशय अनौपचारिक पद्धतीनं स्वागत झालं.

माझा जन्म दिल्लीचा असला तरी माझं शिक्षण भोपाळला झालं. माझे वडील प्राचार्य होते. त्यांना संगीताची जाण होती. घरात पुस्तकं, ध्वनिमुद्रिकांचं साम्राज्य होतं. माझी आई समाजसेविका होती. मला आवाजाची देणगी आहे, हे माझ्या आई-वडिलांना लवकर समजल्यानं त्यांनी लहानपणापासूनच प्रोत्साहन दिलं. फिरोजपूरला हजारो श्रोत्यांच्या मेळाव्यात मी गाणं म्हटलं होतं, त्यावेळी अवघी पाच वर्षांची होते मी. त्यावेळी तिथं प्रसिद्ध संगीतकार गुलाम हैदर आले होते. त्यांनी माझ्या वडिलांना सांगितलं, 'ही मुलगी गायिका होईल व चांगलं नाव काढेल.' मी त्यावेळी लहान होते. मला काहीच आठवत नाही. नाचही येत असे. छान नाच करणारी, गाणारी मुलगी म्हणून माझं सर्वत्र कौतुक होई. काननबाला आणि

नूरजहाँ माझ्या आवडत्या गायिका होत्या. नूरजहाँजींचं 'बुलबुलो मत रो यहाँ..' आणि काननबाला यांचं 'ऐ चाँद छुप न जाना'.. ही गाणी रंगवून म्हणत असे.

त्यावेळी आकाशवाणी संगीत प्रचाराच्या कामात अग्रगण्य होती. मी लाहोर रेडिओ केंद्रावर गायला जात असे.

लाहोरचं रेडिओ केंद्र हे फार सुंदर ठिकाणी होतं. तिथं वादक, संगीतकार, कवी यांचं जणू आगर होतं. ही मंडळी गुणी होती. मी तिथं खूप गाणी गाई. उर्दू गझल, पंजाबी गीतं.. आता ते तपशील मला नेमके आठवत नाहीत. मधून मधून दंगे होत. शहरात वातावरण तंग होई. केंद्रात मात्र सर्व जण शांततेनं काम करीत. एकदा तर पूर्ण संरक्षित व्हॅनमधून मी रेडिओ प्रोग्रामसाठी गेले, मधुर संगीताचा, वादनाचा आनंद घेत. रेडिओतून जेवढं संगीत कानांवर पडलं तेवढं क्वचित अन्य माध्यमातून पोचलं असेल, असं मला वाटतं.

मी लहानपणापासून धीटपणे गात असे. लोकांनी मान डोलवली की अगदी खुषीत येऊन गाणी म्हणे. आजही अंधारात बुडलेल्या प्रेक्षागृहात मला अस्वस्थ वाटतं. श्रोत्यांच्या चेहऱ्यावरचे भाव दिसले पाहिजेत, त्यांच्या पसंतीची पावती मिळायला हवी. रंगमंचावर गाणं गायची हीच तर गंमत असते. शाळेचा अभ्यास मात्र करावाच लागे. वडील शिक्षण क्षेत्रातले असल्यामुळे अभ्यासात दुर्लक्ष केलेलं त्यांना खपत नसे. संगीतकार अनिल विश्वास माझ्या मावशीच्या परिचयाचे असल्यानं ती मला अनिलदांच्या घरी घेऊन गेली. मला आठवतंय अनिलदा पियानोवर बसून चाल शिकवत होते. तिथं लताजी आलेल्या होत्या. त्या फार बारीक होत्या. त्यांचं शिकवणं संपलं. लताजी निघून गेल्या. माझ्या मावशीनं सांगितलं, ही मुलगी गाते. अनिलदा म्हणाले, चल गाऊन दाखव मी काय गायले कुणास ठाऊक ! अनिलदांना माझं गाणं आवडलं. त्यांनी मला 'आरजू' या चित्रपटात गायची संधी दिली. त्यावेळी मी अवघी बारा-तेरा वर्षांची होते, 'मिला गये नैन, मिला गये नैन जिन को जिया तरसे'. याच चित्रपटात तलत मेहमूदही पहिल्यांदा गात होते.

ज्या अभिनेत्रीनं माझं गीत गायलं ती अभिनेत्री होती शशिकला. माझं खूप कौतुक झालं.

पं. हुस्नलालजी मला म्हणाले, तू पं अमरनाथ यांच्याकडे गाणं शिक. पंडितजी दिल्लीत असत. त्यावेळी मुंबई-दिल्ली-भोपाळ असा प्रवास करीत असे. पंडितजींकडे किराणा घराण्याची तालीम मला मिळाली. भोपाळ रेडिओ केंद्रातून श्रुतिकांमधून मी भाग घेत असे. प्रसिद्ध चरित्र अभिनेते ओमप्रकाशही त्यावेळी रेडिओवर येत. फाळणीनंतर लाहोर रेडिओ बंद झाला आणि दिल्ली, भोपाळवर मी गाऊ लागले. नाटकं, नाच, बॅले वगैरे कमी झालं. गाण्यावर लक्ष केंद्रित करायचं ठरवलं. मुंबईत सांताक्रूझला माझे आजी-आजोबा होते. सुटीत मुंबईला यायचं, गाणी म्हणायचं, पुन्हा भोपाळला परत जायचं. शाळा-कॉलेजचा अभ्यास करायचं, असं चालत असे. 'आरजू' नंतर माझ्याकडे चित्रपटाची कामं येऊ लागली. बऱ्याच संगीतकारांकडे गाण्याची संधी मिळत राहिली. पी. एन. अरोरा, ए.आर. कारदार ही मंडळी आमच्या ओळखीची होती.

माझ्यासाठी संगीत शिक्षक म्हणून उस्ताद अब्दुल रहेमान यांचं नाव सुचवलं गेलं. उस्ताद पतियाळा घराण्याचे गायक होते. उपशास्त्रीय संगीताचे जाणकार होते. त्यांच्याकडे मला खूप शिकता आल. पुढे मी लक्ष्मणप्रसाद जयपूरवाले यांच्याकडे गायन शिकले. अशा रीतीनं किराणा, पतियाळा आणि जयपूर या तिन्ही घराण्यांची तालीम मला मिळाली. त्याचा पुढे मला उपयोग झाला.

संगीतकार गुलाम महंमद यांनी माझ्या आवाजाचा चांगला उपयोग केला. 'गौहर' मध्ये 'किस्मत ने लुटा..' किंवा 'साजन चले गये तुम सुनी बहार करके..' किंवा 'आवाज दे रहा है कोई आसमान से..' सारखी गाणी लोकांना आवडली. 'दिले नादान' मध्येही गुलाम मियाँनी माझ्याकडून गाऊन घेतलेली गाणी 'मुहब्बत की धून बेकरारोंसे पूछो..' लोकांना आठवत असतील. अवघ्या सोळा-सतरा वर्षांच्या मुलीच्या हाती बऱ्याच ऑफर होत्या. आपण कुणाचं अनुकरण करायचं नाही, हे माझ्या मनाशी पक्कं केलं होतं... ते मी अखेरपर्यंत पाळलं...

शंकर-जयकिशनचा अपवाद सोडला त[illegible] मी बहुतेक सर्व नामवंत संगीतकारांबरो[illegible] गायले. मदन मोहननी 'देख कबीरा रोया' म[illegible] 'तुम मेरी लाज रखो हरि..', 'नरसी भगत' म[illegible] हेमंतकुमारांबरोबर 'दर्शन दो घनश्याम' 'ह[illegible] मोती' मध्ये सुमन कल्याणपूरबरोबर 'कौन स[illegible] मुंगवा..' रोशनजींनी दिलं. 'चलती का ना[illegible] गाडी' मध्ये आशाजींबरोबर 'हम तुम्हारे है[illegible] गायलं. लताजींबरोबर 'सुवर्ण सुंदरी' म[illegible] जोरकस तराणा गायला. लताजींबरोबर ग[illegible] हा अपूर्व असा अनुभव आहे. त्यांच्याबरो[illegible] गाताना आपणही कुठं कमी पडू नये यास[illegible] आपण खूप मेहनत करून येतो आणि मग गा[illegible] गाताना खरोखर आनंद मिळतो, हा अनुभव म[illegible] घेतला आहे.

गीता दत्तबरोबर 'ना मैं धन चाहूँ..' [illegible] 'काला बाजार' या चित्रपटातलं गीत एस.[illegible] सहायक संगीतकार जयदेवजींनी केलं होतं.

जयदेवजी मला म्हणायचे 'सुधा, तुझ्या[illegible] आवाजात एक 'सोफिस्टिकेशन' आ[illegible] रोशनजींनी मला सुंदर गाणी दिली. 'सला[illegible] हसरत...' त्यांचंच गीत. 'बरसात की रा[illegible] साठी कव्वाली म्हणायला बोलावलं. कव्वा[illegible] खूप गाजली. रोशनजींनी एक्स्प्रेशन्स क[illegible] द्यायची, हे फार चांगल्या तऱ्हेनं शिकवलं. [illegible] खरं तर आमचे गुरूच.

चित्रपटाच्या क्षेत्रात तुमचा कुणी त[illegible] गॉडफादर लागतो. साहिर लुधियानवी मा[illegible] या क्षेत्रात आधार होते. त्यांचा-माझा स्ने[illegible] चांगला जुळला होता. 'दीदी'चं संगीत एन.द[illegible] करीत होते. त्यावेळी ते अचानक आज[illegible] पडले. ध्वनिमुद्रण अडलं होतं. साहिर म[illegible] म्हणाले, 'तूच कर ना या गीताची चाल'. म[illegible] त्यापूर्वी असा प्रयत्नही केला नव्हता. [illegible] म्हणाले, 'प्रयत्न तर कर.' येताना त्यांनी कवि[illegible] आणली होती. 'तुम मुझे भूल भी जाओ त[illegible] यह हक है तुमको, मेरी बात और है, मैंने त[illegible] मुहब्बत की है...'

कविता वाचताच मला सुचत गे[illegible] पहाडीच्या सुरावटींवर चाल तयार झा[illegible] सर्वांनाच खूप आवडली. दुसऱ्या दिव[illegible]

मुकेशजींबरोबर ध्वनिमुद्रणही केलं. मला वाटतं, ही माझी पहिली व अखेरची स्वररचना. त्यानंतर मी चाल करण्याच्या फंदात पडले नाही. ती चाल अतिशय लोकप्रिय झाली. प्रत्येक ठिकाणी मला 'तुम मुझे भूल भी जाओ..' म्हणावंच लागतं, गाण्याची मैफल त्याशिवाय पुरी होत नाही. चित्रपटाशिवाय गझल आणि भजन मी म्हणत असे. गालिबच्या गझल म्हणायची फर्माईश होत असते. 'जिहाले मिस्की मकूम तगाफूल..' ही अमीर खुस्रो यांची रचना माझ्या विशेष आवडीची आहे. अन्य भाषांतूनही मी विपुल गाणी गायली आहेत. यशवंत देव, श्रीनिवास खळे यांनी मला चांगली गाणी दिलीत. तुम्हा मराठी श्रोत्यांना ती आठवतात का? 'विसरशील खास मला..' आकाशवाणीसाठी देवसाहेबांनी केलं होतं. त्यानंतर आशाजींची त्याच गीताची ध्वनिमुद्रिका आली. लोकांना माझ्या गाण्याची आठवण येते का? श्रीनिवास खळे यांनी 'शुक्रतारा' अरुण दाते व माझ्या आवाजात 'साँग ऑफ द मन्थ' म्हणून आकाशवाणीवर केलं. त्या गाण्यानं लोकप्रियतेचं शिखर गाठलं. ध्वनिमुद्रिका मात्र अनुराधाच्या आवाजात निघाली. माझ्या आवाजातली गाणी तुम्हाला आठवतात तरी का आता ?

चित्रपटाच्या क्षेत्रात दबावतंत्र बरंच असतं, राजकारण असतं. सुसंस्कृत व्यक्तीला ते नकोसं होतं. एक निर्णय घेऊन मी चित्रपट संगीताचं क्षेत्र सोडलं, गृहिणी झाले आणि घराकडे लक्ष केंद्रित केलं. कटुता, स्पर्धा, ईर्ष्या काहीच नको होतं मला... 'प्रेमरोग' साठी लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्याकडे मी गाणं गायलं. ते बहुधा अखेरचं. घर सजवणं मला फार आवडतं. शिवाय नटण्याचीही खूप आवड आहे. देशोदेशी प्रवास केला. मनासारखं घर सजवते. व्यायाम करून स्वत:ला फिट ठेवते. संगीत विपुल ऐकते. सध्या पंडित जसराज, किशोरी अमोणकर, जगजित सिंग यांचं संगीत ऐकतेय. वीणा सहस्रबुद्धे यांचं गायनही मी आवडीनं ऐकते. घर-परिवारातल्या माणसांची देखभाल करते.

यशवंत देव सध्या आहेत तरी कुठं ? त्यांनी शिकवलेली गाणी 'सांग सखी हरी घरचे...', 'मागू नको सखया'.. मला अजून आठवतात. बहुधा तुम्ही मराठी श्रोते मला नक्की विसरलात!''

'सुधाजी, तुमचं एखादं गाणं टेपरेकॉर्डवर ऐकायची इच्छा आहे, 'दिले नादान' किंवा 'गौहर' मधलं. इति मी.

''टेप कशाला? मीच ऐकवते ना. कुठलं म्हणू ? 'कभी कभी मेरे दिल में खयाल आता है..' हे साहिरसाहेबांचं गीत चेतन आनंदच्या एका चित्रपटासाठी मी व गीतानं गायलं होतं, खय्यामसाहेबांचीच चाल होती. सुधा मल्होत्रा मुक्तपणे गातात.

त्यांच्या हातातल्या बंगाली पद्धतीच्या कंकणावरचं माझं लक्ष उडतं. बाजूची कोरीव काम केलेली सागवानी-शिसवाची कलाकृती मी विसरते.

साधेपणानं अकृत्रिम गाणाऱ्या कलावतीचं रूप आणि तिचा आवाज मी आठवणींत साठवून घेते.

'कश्ती का खामोश सफर' झुरमुरत्या संध्येची आठवण घेऊन येते.. मला दूर किनाऱ्यावर निनादणाऱ्या लाटेची सनई ऐकायची ओढ लागते...

मी सुधाजींचा निरोप घेते. 'ये दिल्लगी ये शरारत हमें पसंत नहीं..' च्या पुढचा चरण मला का आठवत नाहीये ?

सोळावं वरीस धोक्याचं

तरुणपणाच्या रस्त्यावरचं पहिलं ठिकाण नाक्याचं
सोळावं वरीस धोक्याचं गं सोळावं वरीस धोक्याचं !
शीळ घालता मदनानं, झाली जवानी बेभानं
जागोजागी उभे शिकारी, मचान बांधून मोक्याचं ॥१॥
रात रुपेरी फुलली गं ! मला पौर्णिमा भुलली गं
अंगावरती सांडू लागलं, टिपूर चांदणं रुप्याचं ॥२॥
पिसाट वारा मदनाचा, पतंग उडवी पदराचा ।
तोल सुटावा अशी वेळ ही, तरी चालणं ठेक्याचं ॥३॥
ओढ लागली संगतीची, नजरभेटीच्या गमतीची ।
आज मला हे गुपीत कळलं, जत्रेमधल्या धक्क्याचं ॥४॥
सुलोचना चव्हाण ✻ जगदीश खेबूडकर
वसंत पवार ✻ सवाल माझा ऐका

ठसकेबाज आवाज, खास तमाशापटातलं गीत आणि संगीत असलेलं हे गाणं सुलोचनाबाईंनी लोकप्रिय केलं. पण त्यात कुठेही उत्तानपणा नाही, आहे तो निखळ शृंगार आणि आवाजातला, विचारातला खुलेपणा.

रीमिक्सला सहज आव्हान देणारं हे गीत बेचाळीस वर्षे वयाचं आहे.

मक्तेदारीच्या रिंगणात महिला संगीतकार

✻ उषा खन्ना

''संगीतकाराच्या जीवनात असा समय येतोच, जेव्हा त्याच्यासमोर अनुकूल असा विषय आलेला असतो. मग त्यावर तो मनापासून मेहनत घेतो. त्याची प्रतिभा नुसती फुलून येते. जसा नौशादसाहेबांना 'मुगल-ए-आझम' मिळाला, सलील चौधरींना 'मधुमती' मिळाला. माझ्यापुरतं बोलायचं झालं तर मला हवा तसा विषय अजून मिळालेलाच नाही. मी चांगल्या मनपसंत विषयाच्या प्रतीक्षेत आहे..''

खास पुरुषांची मक्तेदारी असलेल्या प्रांतात एकाकी झुंज देणाऱ्या संगीतकार उषा खन्ना मोकळेपणाने बोलत होत्या...

फार वर्षांपूर्वीची गोष्ट, त्यावेळी चित्रपटाबद्दलचे साहित्य मुलांच्या हाती पडू न देण्याबद्दल पालक जागरूक असत. धडाधड चॅनेल फिरवण्याचे स्वातंत्र्य तेव्हा नव्हते. कुणा मोठ्या माणसाच्या हाती 'फिल्मफेअर' दिसलाच, तर चित्रे पाहण्यासाठी नुसता जीव टाकावा लागे. सिनेमा फार आधी ठरवून, समारंभपूर्वक पाहिला जाई.

चित्रपटसंगीतात मी जरा माझ्या सख्यासोबत्यांपेक्षा दोन पावले पुढे होते, म्हणजे त्या 'मधुमती' त होत्या, तर मी मागच्या 'छुप गया कोई रे' मध्ये. फिल्मफेअर वाचण्यात मग्न असलेल्या कुणाच्या तरी.. मधूनच मी एक सुंदर चेहरा पाहिला होता. तो आशा पारेखचा चेहरा होता. अक्षर लावून वाचले होते. दिल देके देखो रेडिओ सिलोनच्या दलवीरसिंह परमारने गाणी आधीच ऐकवली होती. 'बडे हैं दिल के काले', यार चुलबुला हैं..' शंकर-जयकिशनने बरसातीत सुस्नात होऊन निघालेल्या संगीतावर ओ. पी. स्टाईलचे विदेशी सेंट शिंपलेले होते, असे वर्णन मी आज करेन त्याचे. पण त्यावेळी ती जोशिली-रंगभरी गाणी आवडली होती. संगीतकार उषा खन्ना हे नाव कानी पडले होते.

यथावकाश बालपणाच्या सीमापार झालो आणि एक गाणे कानांवर आले. 'फिर आने लगा याद वही प्यार का आलम' रफीबरोबर एक सुकोमल आवाजाची गायिका म्हणत होती, 'प्यार का आलम'. आवाजाची ओळख पटेना. 'ये दिल किसको दूँ' मधल्या या गाण्याची गायिका होती उषा खन्ना. मग तेव्हापासून माझ्याकडून उषा खन्ना या नावाशी एकतर्फी मैत्र जुळले.

प्रत्यक्ष भेटीसाठी खूप प्रतीक्षा केली. कुणी पैज मारली उषा खन्नाला भेटून दाखवच. पण समर्थ रामदासांचे वचन मी नेहमीच ऐकते 'पैज होड घालू नये.' मी सरळ दूरध्वनीवरून संपर्क साधला. एका मधुर आवाजाने स्वागत केले. उषा खन्ना राजी झाल्या.

खारच्या चौदाव्या रस्त्याचा मला आता चांगलाच परिचय झाला आहे... उषा किरण यांचे 'चित्रकूट', चित्रगुप्तजी राहत होते ते 'प्रभात', सुमन कल्याणपुरांचे 'आनंद', दुरूनच पाहिलेले हेमंतकुमारांचे 'गीतांजली'. गीताचे हरवून गेलेले घर.. खारचा एवढा गोड रस्ता दुसरा कुठला नसेल.. उषा खन्नांचे 'तुलसी' मी अचूक शोधले.

सुईच्या अग्रावर मावेल तेवढी जागा जिथे स्वकर्तृत्वावर मिळवावी लागते आणि टिकवावी लागते, त्या चित्रपटक्षेत्रातल्या बेभरवशाच्या जगातल्या सुईच्या टोकावरच्या जागेवर आजही संगीतकार उषा खन्ना उभ्या आहेत. संगीतकार हे बिरुद लावणाऱ्या सरस्वती देवी, जद्दनबाई, बाई सुंदराबाई, मीना मंगेशकर या काही महिलांचा अपवाद सोडला, तर चित्रपटाच्या क्षेत्रात आघाडी सांभाळणारे हे एकमेव उदाहरण. खास पुरुषांच्या मक्तेदारीच्या रिंगणात उषा खन्ना हे नाव, महिलांना अभिमान वाटेल असे नाव. मला वाटणारे आकर्षण, कुतूहल आणि कौतुक एकवटून मी 'तुलसी' च्या पायऱ्या चढू लागले.

सुखवस्तू पंजाबी कुटुंबाचे घर. उषाजींच्या वृद्ध आई येतात. देवघर खूप देव-देवतांनी सुशोभित. तानपुरा, (कै.) मनोहर खन्ना यांची तस्वीर, खिडकीच्या लगत असलेल्या गुलमोहरावर वसंतागमनाची खूण. मी चटकन तपशील टिपून घेत असताना उषाजी येतात. साध्या सलवार-कमीज घातलेल्या, छोट्याशा दिसणाऱ्या, बोलण्यात मनमोकळ्या, नम्र, माझ्या एकतर्फी मैत्रीचे टोक जुळून येतेय.

'उगीच कसले तरी फोन येतात. लोक वेळ घेतात. मग आईला काही तरी सांगावं लागतं. मग लोक म्हणतात, उषा खन्ना भेटत नाही. उगाच गैरसमज होतात.. तुझ्यासाठी झाले ना मी तयार... इथं गैरसमजाचं पेव फुटत असतं. अफवांचं पीक बहरावर असतं. चारित्र्यहनन करणं तर फारच सोपं. तुम्ही स्त्री आहात ना, मग सर्वांचे टीकेचं लक्ष्य... गुणी कर्तृत्ववान असल्यावर तीर धारदार.. तुला सांगायला नकोच..'

उषाजी तुम्ही ग्वाल्हेरला जन्मलेल्या. म्हणजे साक्षात तानसेनच्या गावच्या.

'बिलकुल! तानसेनच्या भूमीतून मला संगीत मिळालं. वडील मनोहर खन्ना संगीत विशारद होते, कवी होते. घरात साहित्य, संगीत, कलावंत होते. मी नादलुब्ध होते. वडील नाहीत असं पाहून हार्मोनियमवर बोटं फिरवायची. ग्रँट रोडच्या परिसरात माझं बालपण गेलं. घरासमोरच 'सुपर टॉकिज' होतं. थोडे पैसे हाती मिळत, ते साठवून मी आईची नजर चुकवून सिनेमा पाहायची. आई मला शोधून दमून जायची. तिथल्या डोअरकिपरना ठाऊक असायचं. आई हाक मारायची - 'मिनी बिटिया'. मी दडलेली असायची. याच चित्रपटगृहात पुढे माझं संगीत असलेल्या चित्रपटाचं प्रिमिअर होतं. चित्रपट होता 'शबनम' मग साऱ्या डोअरकीपर-मॅनेजरपुढे माझं किती कौतुक झालं...'

मारवाडी विद्यालयात माझं शिक्षण झालं, हिंदी माध्यमातून. माझं सारं लक्ष संगीतात होतं. मी हार्मोनियम चांगलं वाजवू लागले. 'मन डोले तेरा तन डोले' मधली बीन हुबेहूब वाजवत असे. लताजींचा ऐन बहराचा काळ होता. सुवर्णयुग होतं संगीताचं. मी सारी गाणी कानात साठवून घेत असे.

माझ्यावर फार मोठा प्रभाव होता शंकर-जयकिशन या संगीतकार जोडीचा. त्यांच्या इंटरल्यूड संगीतासह आपण त्यांची गाणी ऐकत असतो. माधुर्य, सातत्य, नावीन्य, काय नव्हतं त्यांच्या संगीतात ! व्यावसायिक स्तरावर डौलदारपणे अधिराज्य करणारे हे संगीतकार माझे दैवत होते. मला आठवतंय 'गेलॉर्ड' रेस्टॉरंटमध्ये जयकिशन येत असत. पांढरा पोशाख केलेले ऐटबाज जयकिशन मी दुरूनच पाहत असे. त्यांच्या ठराविक आवडत्या खुर्चीत येऊन ते बसत. क्वचित धीर करून मी त्यांच्यापुढे जात असे, 'नमस्ते' म्हणत असे. त्यांच्याशी बोलण्याची मात्र हिंमत होत नसे... संगीतकार शंकर-जयकिशन यांच्या संगीताचा माझ्यावर फार प्रभाव आहे.

मी रूढ अर्थानं गाण्याचं शिक्षण घेतलं नाही. मी गाण्यात सदैव बुडलेली असायची. शशिधर मुखर्जींनी मला त्या दिवशी स्पष्ट सुनावलं-'बेटा तुला पार्श्वगायिका व्हायचं आहे. पण लता, आशा असताना तू तुझा प्रभाव पाडू शकशील काय ?' मी खाली मान झुकवली. ते म्हणाले, तू वेगळं काही तरी कर. चाली देता येतात का ? मग मी रोज 'फिल्मालय' मध्ये जात असे. तिथं दिवसभर बसून चाली करणं एवढंच काम करीत असे. त्यांना ऐकवत असे. ते मला पुन्हा प्रयत्न करायला सांगत. मी कधी तरी कंटाळून जात असे. पण पुन्हा चाली करायच्या, कविता शोधायच्या, असं चालत असे. असं एक वर्ष चाललं.

''एके दिवशी मी काही चाली त्यांना ऐकवल्या. शशिधर मुखर्जी प्रसन्न झाले. मला लवकरच 'दिल दे के देखो' मिळाला. तिथं एके दिवशी ओ. पी. नय्यर आले होते. मुखर्जीसाहेब म्हणाले - 'ओ. पी. साहब, देखो मैने दुसरा ओ. पी. लाया हैं।' मी शरमले. ओ. पीं. च्या समोर तर मी केवढीशी ! ओ. पीं. नी आशीर्वाद दिले. फिल्मालयमध्ये एका केबिनवर माझं नाव लागलं. 'म्युझिक डायरेक्टर उषा खन्ना'.

नौशाद, शंकर-जयकिशन, मदन मोहन, ओ. पी. इत्यादी दिग्गजांच्यामधून मी एखाद्या चिटुकल्या उंदरासारखी निसटले. मी अवघी सतरा वर्षांची होते आणि रफी साहेब मला म्हणत होते, 'चल, चाल ऐकव मला'.

या सर्व लोकांना माझं कौतुक होतं लताजी, आशाजी माझ्यावर लोभ करीत. पुढे 'हम हिंदुस्थानी' मिळाला. त्याची गाणी खूप गाजली. 'छोडो कल की बाते' वर लोक खूष होते. नंतर माझ्याकडे चांगल्या चित्रपटांची रांग लागायला हरकत नव्हती ना? पण चित्रपट मिळाले ते स्टंटपट. सुमार-देमार. तरी गाण्यांवर मी भरपूर मेहनत करीत असे. 'शबनम', 'निशान', 'लाल बंगला', फ्लॅट नं.९, 'आओ प्यार करे माझे चित्रपट चालले नाहीत. पण गाणी लोकांच्या ओठांवर होती. 'हाये तबस्सुम तेरा', 'तुम अकेले तो कभी बागमें जाया न करो', हसीन वादियो गा दीवाने झूमके, 'गोरी तेरे चलने पे मेरा दिल कुर्बान', 'चाँद को क्या मालूम चाहता है उसे कोई चकोर...'

लोक माझ्याबद्दल अजूनही साशंक होते. ही मुलगी काय काम करणार हाच भाव ! संगीतकाराला आयुष्यात एका क्षणी त्याच्या मनाजोगता विषय मिळतो. त्यावर तो खूप मेहनत घेतो. त्याच्या प्रतिभेला कल्पनेचे नवनवे पंख फुटतात. जसा नौशादसाहेबांना 'मुगल-ए-आझम' मिळाला होता, सलील चौधरींना 'मधुमती' मिळाला होता. काय बहारदार काम केलंय त्यांनी ! माझ्यासमोर सुयोग्य अशी थीम आलीच नाही, सुंदर असा विषय मला कधी मिळालाच नाही. मी अशा योग्य विषयाच्या प्रतीक्षेत आहे... अजूनही !

मी पुरुषांच्या राज्यात काम केलं; पण मला त्यांचा सहभाग उपकारकच ठरला, त्यांचं सहकार्य मोलाचं ठरलं. रफी-मुकेश किंवा लताजी, आशाजी यांचं प्रेम लाभलं. त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

नियतीची गंमत पाहा. मी जेव्हा पदार्पण केलं, तेव्हा चित्रपट संगीत ऐन बहरात होतं. लोकांनी प्रचंड कामं करून ठेवली होती. माझं संगीत पूर्वसुरींच्या छायेत होतं, पण नंतर हळूहळू चित्रपटसंगीताला उतरती कळा लागत होती. अभिनयसंपन्न, रूपसुंदर हिरो-हिरॉईन अस्तंगत होत होते. अशा अडचणीच्या, संक्रमणाच्या काळात मी आले...

.... संगीतकार होण्यासाठी अष्टावधानी असावं लागतं. मुख्यत: खूप पैसे गुंतवणाऱ्या निर्मात्याच्या व्यावसायिक मागणीनुसार संगीताचा विचार करावा लागतो, गीतलेखकाशी जुळवून घ्यावं लागतं, वाद्यवृंद सांभाळावा लागतो. कथेच्या दृष्टीनं सिच्युएशनप्रमाणे गीताची चाल करावी लागते. मेंदूचा नुसता भुगा होतो. या क्षेत्रात काम करायला येणाऱ्या मुलीला ही अवधानं जपावी लागतील. एखाद्या स्त्रीनं संगीतकार होणं अशक्य नाही; पण जरा अवघड आहे. रात्र रात्र प्रोड्युसर-डायरेक्टरबरोबर गाण्याची चर्चा, रिहर्सल, वाद्यवृंद रचना कराव्या लागतात.

न जाने कहाँ हम थे ....

'आई केवळ ग्रेट'- चारुल अग्री

मम्मी एक सुरेल आवाजाची गायिका आहे. तशीच ती एक उत्कृष्ट गृहिणी आहे. आई म्हणून तर केवळ ग्रेट ! मी तिची फॅन आहे, मैत्रीण आहे.

ती एक सुगरण आहे. आमच्या सारस्वतांत ज्या तीनशे पदार्थांची रेलचेल आहे, त्या सर्व पदार्थांची कृती तिला ठाऊक आहे.

आंबट-घश्शी, सुक्के -सांबारे, साँग सासम, बझ्झी... किती तरी प्रकार ती सुंदर करते.माझ्या वाढदिवसासाठी ती तऱ्हतऱ्हेचे केक्स व त्यावर सजावट करते. तसे प्रकार फक्त जगातल्या उत्तमोत्तम बेकरीतून होत असतील. गुलाबफुलांची बास्केट ही खरी वाटावी अशी असते. ती साखरेची फुलं असतात.

सुमन कल्याणपूर

सुमन कल्याणपूर पुन्हा नव्या उमेदीनं गात आहेत. इतकी वर्षं त्यांच्या चाहत्यांनी खूप वाट पाहिली. त्यांच्यासाठी पुन्हा मराठी गाण्यांची भेट घेऊन त्या येत आहेत. पूर्वीचीच कोवळीक, तसेच लालित्य असलेली गाणी त्यांच्या चाहत्यांना, रसिकांना निश्चित आवडतील. निंबोणीच्या झाडामागे लपलेल्या चंद्राला घातलेली साद रसिकांना पुन्हा ऐकता येईल.

ज्या दिवशी मुंबईत पंखा लावावा लागत नाही, अशा सरत्या पौषातल्या कोवळ्या दुपारी सुमन कल्याणपुरांना भेटायला मी खारदांड्याचा रस्ता चालत होते. मनात एक गोष्ट राहून राहून येत होती. आपण चित्रपटसंगीताच्या मीनाबाजारात पार हरवून गेलो होतो. लता, आशा, ओ. पी., शंकर जयकिशन... झंझावातच होता तो. त्यात काही गोष्टी नक्कीच हरवून गेल्या. आज अनेक वर्षांनंतर गीताचं 'कैसे कोई जिये', शमशादचं 'अब दिन डूब गयो राजा' किंवा अमीरबाईचं 'मैं जानती हूँ कभी तुम न आओगे पिया' ऐकताना मन खंतावतं. आपण नकळत उपेक्षिलेली गीतं आज पुन्हा जवळिकीनं बिलगत आहेत. सुमन कल्याणपूर या नावाची ओळख पुन्हा 'बुझा दिये हैं खुद अपने हाथों' सारख्या गीतातून होतीय का ? हे फूल आपण तेव्हा पायदळी तर तुडवलं नव्हतं ना ? 'शब्द शब्द जुळवुनी वाचिते तुझ्या मना' मधला उत्फुल्ल हर्ष मी न्याहाळलाच नव्हता का कधी ? चित्रपटसंगीताच्या न संपणाऱ्या कुतूहलातून सुमन कल्याणपूर हा स्वर आपल्याला काही वेगळं सांगतोय... मराठी भावगीतांच्या भावविश्वातून कुणी आर्जवी स्वरात काही तरी सांगतंय. 'आकाश पांघरोनी जग शांत झोपले हे....

'जिथे सागरा धरणी मिळते' हे गीत जणू पुन्हा मला भेटायला आलं आहे. सुमनताईंचं खारमधलं घर कलात्मक सजावटीनं 'कशी करू स्वागता' चे सूर घेऊन उभं आहे. दोघं पती-पत्नी अतिशय सामंजस्यानं, एकदिलानं काम करतात. एकमेकांना जपतात. सुमनताईंचा किणकिणणारा स्वर कधीही रागानं चढत नाही. कल्याणपूरसाहेबांची मात्र लगबग गडबड चालू असते. पाहुण्यांची वाट पाहणारं हे घर आहे हे चटकन ओळखता येतं. सुमनताई अबोल, संकोची स्वभावाच्या आहेत. नम्र आहेत. मुलाखतीचा उद्देश फक्त गतकाळाच्या आठवणी जाग्या कराव्यात हाच आहे, असं सांगितल्यानंतर सुमनताई खुलतात. लहानपणीच्या आठवणींनी सुखावतात.

चित्रापूर सारस्वतांच्या घरंदाज, साहित्यप्रेमी, संगीतप्रेमी हेमाडी कुटुंबाचं एक सुंदर चित्र त्या उभ्या करतात.... पहिली आठवण ढाक्याची. वडील बँकेत मोठे अधिकारी. ''रोज दोन घोड्यांची बग्गी पपांना बँकेत घेऊन जाण्यासाठी येत असे. त्या ऐटबाज बग्गीचं लहानपणी मोठं आकर्षण. मी पपांबरोबर शाळेत जात असे. त्यांच्या बँकेत जायचं. फुलांचा गुच्छ घेऊन त्यांना द्यायचा. मग लखन या आमच्या नोकराबरोबर शाळेत जायचं. इथपर्यंत ठीक असायचं. सेंट झेव्हिअर्सच्या दारात तो येशू पाहिला, की माझं अवसान जायचं. त्याची भव्य आणि करुण चेहऱ्याची मूर्ती पाहून मनात भय दाटे. कडक कपडे घातलेल्या नन पाहून तर डोळे पाण्यानं भरायचे. मग त्यापैकी कुणी नन मला जवळ घेई. मला पियानो वाजवण्यासाठी नेई. मग इवलीशी बोटं पियानोवर उमटायची. मला तो नाद फार आवडे. संगीताचा हा पहिला संस्कार असावा... मला पियानो आजही खूप आवडतो. माझी चारुल पियानो सुंदर वाजवते.''

चारुलचा पियानो सध्या शांत आहे. चारुल अमेरिकेत असते.

''ढाक्यात त्यावेळी दंगे होत. अस्थिर वातावरण असायचं. दंग्यांच्या वेळी तांदूळ बाजारातून गायब होई. माझे वडील अशा वेळी घरी साठवलेला तांदूळ गरजूंना वाटून टाकत. त्यांच्यासारखं आतिथ्य आणि अगत्य क्वचित पाहायला मिळतं. मोठमोठ्या तांब्याच्या भांड्यांतला तांदूळ जणू

वाटण्यासाठी साठवला जाई... नंतर आम्ही मुंबईला आलो. बहुतेक बेचाळीस-त्रेचाळीस साल असावं... 'मॉडेल हाऊस' मधला आमचा बालपणाचा काळ सुखाचा होता. आमच्या आयुष्याची उभारणी येथेच झाली. त्यावेळी राजकीय वातावरण अस्थिर असल्यानं घर आणि शाळा एवढ्या दोन गोष्टी ठाऊक होत्या. अपवाद फक्त रविवारचा. पपा मला चौपाटीवर फिरून आणत. मी मोठी होते ना ! त्यावेळी चौपाटी केवढी भव्य वाटत असे.

''घरी आई आम्हाला भरतकाम शिकवीत असे. मुलींना यायलाच पाहिजे अशी ही कला... ती स्वत: भरतकाम करण्यात प्रवीण होती. तिच्या रेशमाच्या लडीत आम्ही हरवून जात असू. तिने केलेल्या भरतकामाचे काही सुंदर नमुने माझ्यापाशी अजून आहेत. तिनं ही विद्या मला दिली. भरतकाम, क्रोशाचं विणकाम, हस्तकलेचे नमुने, पेटिंग्ज यांची प्रेरणा घरातली. शिवाय पपा प्रोत्साहन देत. पेपर ...जत, पेपर हजर. पेन्सिली, रंग सारं ... मुंबईच्या हार्डवेअरच्या बाजारातून ...नी आणलेला पेन्सिल तासायचा चाकू ... अजूनही जपून ठेवला आहे. चारुल ...नं नेहमी म्हणते - 'ममीकडे प्रत्येक ...नू आहे ती पंचवीस तीस वर्षांची जुनी..' ...मला जपून ठेवण्यात रस आहे... राखून ...याची आवड आहे.

''त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे मुलींना सर्व ...पाक आला पाहिजे, या दंडकाप्रमाणे ...म्हा सर्वांना स्वयंपाक शिकावा लागला. ...वडांच्या जन्माच्या वेळी आई घरी ...ताना मी हळूहळू स्वयंपाक करायला ...कले. माझे आजोबा उत्तम भजनं म्हणत. ...की कुणी गाणारे नव्हते...''

सुमनताई आठवणीत रंगून गेल्या. मला ऐकायची उत्सुकता होती. त्यांच्या पहिल्या पदार्पणाबद्दल, गाण्यांच्या पहिल्या संस्कारांबद्दल...

''मॉडेल हाऊसमध्ये खूप सारस्वत कुटुंबं होती, ब्राह्मण कुटुंबं होती. भक्ती बर्वे इथल्याच. शिल्पकार जोग, मो. ग. रांगणेकर, केशवराव भोळे....यांनी गजबजलेलं 'मॉडेल हाऊस' म्हणजे सांस्कृतिक केंद्र होतं.''

सुमनताई सांगत होत्या, ''त्यावेळी जोगमामी, माझी आई आणि ज्योत्स्नामावशी यांच्या गप्पा चालत. ज्योत्सामावशी गाताना वाटे आपल्याला असं गाणं आलं पाहिजे. त्यांचं गाणं, देखणं रूप माझ्या मनावर एक सुबक चित्र कोरून गेलं आहे. गाण्याचं आकर्षण ज्योत्स्नामावशींच्यामुळे मनांत रुजलं... भोळेकाकांच्या कानावर माझं गुणगुणणं पडलं, तेव्हापासून मला गायला शिकवायचे. उच्चार अचूक असावेत. ऱ्हस्व-दीर्घ यांचं भान ठेवावं. खूप सांगायचे. गाण्यात भावना कशा ओतायच्या ते सांगायचे. अबोध वयात ते सर्व समजायचं नाही, पण आज त्या गोष्टी आठवतात, त्यांचं महत्त्व पटतं. त्या संस्कारांचा मला पुढे उपयोग झाला. सेंट कोलंबा या शाळेनंही खूप संस्कार केले. चित्रकला चांगली असल्यानं वर्गातले सर्व तक्ते माझ्या हातचे असत. नकाशे, आकृत्या मीच काढे. सामूहिक प्रार्थनेत गाण्यासाठी मलाच पुढे करत...

आम्हाला सर्व काही शिकायला मुक्त परवानगी होती. काही दिवस मी कथ्थक शिकायला जात असे. पण ते काही काळानं बंद पडलं. गाणं मात्र चालू होतं. यशवंत देव त्यावेळी आम्हा मुलींकडून गाणी बसवून घेत. सोप्या चाली आम्ही पटकन उचलत असू. शब्दप्रधान गायकीचे ते मोठे जाणकार आहेत. त्यांच्या शिकवणुकीचा मोठा फ़ायदा पुढे झाला... रेडिओ तर आमचा सवंगडीच होता. त्यावेळी गोवा रेडिओवर खूप गाणी ऐकत असू. 'किस्मत' मधली गाणी तोंडपाठ. नूरजहाँचं 'इंतजार' मधलं 'सखी री नहीं आये', लताताईंचं 'जिद्दी' मधलं 'चंदारे जारे जारे', 'लाहोर' मधलं 'बहारे फिर भी आयेगी', 'अदा' मधलं 'प्रीतम मेरी दुनिया में' किंवा 'खेल' मधलं 'जाते हो तो जाओ हम भी यहाँ' मी सतत गुणगुणत असे. वाटव्यांची मराठी भावगीतं ऐकत असू. गणित सोडवताना कान मात्र गाण्यांकडे.

''भोळेकाकांनी मला दोन गाणी शिकवली होती. ती मी मुंबई आकाशवाणीवर म्हटली होती. त्यावेळी भोळेकाका म्हणायचे - 'गाणं वरवर गाऊ नकोस, आतून येऊ दे..' शिल्पकार जोग यांच्या कुणी नातेवाइकांनी 'शुक्राची चांदणी' हा चित्रपट काढला होता. तो चित्रपट प्रसिद्ध झाला नाही. पण एक गोष्ट झाली. त्यावेळी संगीतकार महंमद शफी होते. त्यांनी माझं गाणं ऐकलं होतं. पुढे त्यांनी गायला बोलावलं आणि माझं आयुष्यच बदललं.''

''त्याआधीची गोष्ट. मॅट्रिक झाल्यानंतर मी जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये प्रवेश घेतला होता. चित्रकलेची साधना जोरात चालली होती. पुढे दुसऱ्या वर्षी टर्पेटाईनची ॲलर्जी होऊ लागली. रात्र रात्र नाक चोंदल्यानं बसून राहावं लागायचं... मग अखेर पेटिंग्ज करणंच सोडावं लागलं. मी स्केचेस मात्र करायची. खूप भरभर करायची. शिल्पकार जोगांना काम करताना तासन् तास पाहत असे...''

''वडिलांनी माझ्या गाण्यासाठी तावडेबुवांची शिकवणी ठेवली होती. आमच्यासाठी आई-वडील अक्षरश: झटले आहेत. मला वाटतं मुलांना जे आवडेल ते

करू द्यावं... एकदा कॉलेजच्या गॅदरिंगचे प्रमुख पाहुणे होते तलत मेहमूद. त्यांच्यासमोर गाणं म्हटलं. बहुतेक 'एरी मैं तो प्रेम दिवानी' हे 'नौबहार' मधलं गाणं होतं. तलतसाहेब प्रभावित झाले. माझ्या नावाची शिफारस 'एचएमव्ही' मध्ये केली. पण 'एचएमव्ही' नं माझी मुळीच दखल घेतली नाही. पुढे चित्रपटांतून मी गाऊ लागले. त्यानंतर मात्र माझी मराठी गाणी केली...

''महंमद शफींनी 'मंगू'साठी बोलावलं. ते साल होतं १९५४. 'कोई धीरसे पुकारे मुझे' ध्वनिमुद्रणाच्या आधी तिथं खुद्द लता मंगेशकर आल्या होत्या. मी नर्व्हस. शफी म्हणाले, 'चला, रेकॉर्डिंग करून टाकू.' लतातांईनी खूप धीर दिला. म्हणाल्या, 'चांगली गातेस...' त्यावेळी त्या वातावरणात एक आपलेपणा होता, काही चांगलं, हळुवार असं होतं. लतातांईनी बरेच वेळा मला गाडीतून 'लिफ्ट' दिली आहे. फ्रेंच ब्रिजपाशी मी उतरत असे. पुढे चालत घरी...''

''पुढे एकदा रेकॉर्डिंगला आशाताई भेटल्या. त्यांच्या व माझ्या बांगड्या एका डिझाइनच्या. मला म्हणाल्या, 'सुमन, आपण दोघी बहिणी बहिणी...''

''आमच्या तालमी दादरच्या 'बसंती हॉल' मध्ये होत. त्यावेळी बी.एन.बाली, सरदार मलिक इत्यादी संगीतकारांकडे मी गायले. लो बजेट असलेल्या सुमार चित्रपटांसाठी मला कामं मिळाली. पण त्यावेळी फक्त मनापासून मेहनत करायची आणि मनापासून गायचं एवढं मला ठाऊक होतं...''

''हे संगीतकार गुणी होते. त्यांच्याकडून उर्दूचं शिक्षण मिळालं. मा. नवरंग यांनी मला गाण्याचे शिक्षण दिलं. शिक्षण चालू होतं आणि कामही...''

''त्यावेळी मुंबईत ध्वनिमुद्रणाची खूप गर्दी होती. मराठी चित्रपटांची ध्वनिमुद्रणाची कामं पुण्यात होत. मी त्यासाठी अनेकदा पुण्याच्या वाऱ्या केल्या आहेत. ५८ सालापर्यंत मराठी चित्रपटांची गाणी पुण्यात केली. 'झालं गेलं विसरून जा', 'पसंत आहे मुलगी', 'पायदळी पडलेली फुलं', 'देव जागा आहे', 'देवाघरचं लेणं', अशा कित्येक मराठी चित्रपट गीतांसाठी मी पुण्यात असे. त्यावेळी माझ्याबरोबर वडील असत. आम्ही पूना क्लबमध्ये उतरत असू व ध्वनिमुद्रण 'प्रभात' स्टुडिओत होई. त्यावेळचं पुणं खूप सुंदर, मोकळं होतं... मराठी भावगीतं गाण्याची संधी त्यावेळी मिळाली. दशरथ पुजारी, विश्वनाथ मोरे, वसंत प्रभू यांनी दिलेली मराठी गाणी आजही अवीट गोडीची आहेत...''

गाण्यांच्या आठवणी निघाल्या. दत्ताराम वाडकरांनी सुमनताईंकडून गाऊन घेतलेली गाणी आम्ही आठवत होतो. मन्ना डेंबरोबरचे 'न जाने कहाँ हम थे' - 'जिंदगी और ख्वाब' मधलं गाणं, 'फर्स्ट लव्ह' मधलं 'बीते हुए दिन', 'डार्कस्ट्रीट' मधलं 'इतने बडे जहाँ में'.. त्यावर सुमनताई म्हणाल्या, ''आज जेव्हा मी ही गाणी ऐकते, तेव्हा वाटतं यात काही तरी अपुरेपण आहे. काहीतरी कमी पडलंय. माझं नुकतंच लग्न झालेलं, मोठं एकत्र कुटुंब. त्यांची मात्र खूप मदत व्हायची. पण कामच खूप असे. सर्वांचा डबा करून मग रेकॉर्डिंगला जायचं. माझी तारांबळ उडत असे. त्यावेळी माझ्याकडून गाण्यात काहीतरी नक्की राहून गेलं आहे...''

कल्याणपुरांशी प्रेमविवाह, की नियोजित विवाह, असा विषय निघाल्यानंतर दोघांनीही एकमतानं थोडा प्रेमविवाह व थोडं ठरवून, दाखवून असं सांगितलं.

'कर्जतच्या विमलताई दिवाडकरांनी बोलावून घेतलं. मुलगी दाखवली. परस्परपसंतीनं लग्न ठरलं. पाच फेब्रुवारीला दाखवण्याचा समारंभ झाला. पाच मार्चला साखरपुडा आणि २७ एप्रिलला लग्न झालं,' असे बिनचूक तपशील लक्षात ठेवणाऱ्या या पती-पत्नीच्या संसारातलं माधुर्य तसंच टिकून आहे. सुमनताईंच्या गाण्याच्या मागे श्री. कल्याणपूर सतत उभे राहिले. लहानग्या चारुललासुद्धा वडिलांनी शिकवलं- 'ममीचं उद्या गाणं आहे, तिला छान झोप लागली तर उद्या गाणंपण छान होणार...' मग छोटी चारुल झोपून जाई. ममीचं गाणं छान व्हायला हवं ना ! रियाझाच्या वेळी गळ्यात हात टाकून म्हणे - 'मीपण गाणं म्हणणार.' पण गोड गळ्याच्या चारुलनं गाण्याच्या क्षेत्रात पाऊल ठेवलं नाही. आईच्या गाण्याची खूप माहिती तिला आहे. लेक सुमनताईंवर खूष आहे. तिच्या फ्रॉकवर सुंदर सॅटिनची फुलं, भरतकाम करण्यात त्या मग्न आहेत. सारस्वत पद्धतीचे सर्व पारंपरिक खाद्यपदार्थ त्यांना ठाऊक आहेत. त्यांनी ते सर्व लिहून काढलेले आहेत. अनेक पुष्परचनांनी घर सजवतात. फुलझाडांची मुलासारखी निगा ठेवतात. त्या पुष्पप्रेमी-वृक्षप्रेमी आहेत. त्यांना फुलं आवडतात म्हणून वडिलांनी ढाक्याला गुलाबांची बाग लावली होती आणि आताही कल्याणपूर इस्टेटमध्ये गुलाब-मोगरे बहरले आहेत.

सुमनताईंनी १९८१ मध्ये चित्रपटसृष्टीचा निरोप घेतला. त्यानंतर खूप गाणं ऐकलं. देशोदेशीच्या सफरी केल्या. खूप आईस्क्रिम खाल्लं. वयाच्या सोळा-सतराव्या वर्षापासून सतत काम चाललं होतं. आता थोडा विश्राम हवा होता. चित्रपटाच्या क्षेत्रातले बदलही मानवत नव्हते.

देशोदेशीचे गाण्यांचे कार्यक्रम झालेले

होते. खूप पुरस्कार मिळाले. पहिल्यांदा दुय्यम दर्जाच्या चित्रपटांपासून ते पुढे मोठे बॅनर, मोठे संगीतकार अशा चढत्या कमानीची कारकीर्द होती.

हिंदी चित्रपटाच्या बहाराच्या काळातल्या मानकऱ्यांपैकी एक ज्येष्ठ गायिका उडिया, गुजराथी, आसामी, मराठी आदी प्रादेशिक भाषेतील चित्रपटांची गायिका सुमन कल्याणपूर जणू चित्रपटसृष्टी विसरून गेली. कारण काय ? हिंदी चित्रपट संगीताचा विषय निघतो तेव्हा सुमन कल्याणपूर हे नाव वगळलं जातं. गायक, संगीतकारांच्या मुलाखतीत या नावाचा उल्लेखही नसतो, असं का ?

सुमनताई सौम्यपणे बोलतात. कोणताही विखार नाही. कटुता नाही. अभिनिवेश नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसं असा एखादाच शब्द. एखादं वाक्य. नंतर हळूच विषय बदलून दुसरं काही... प्रदीर्घ अज्ञातवासात खूप सहन केलं आहे.. आता मात्र आत्मविश्वासानं स्वत:ची गाणी म्हणत आहेत. संगीतकार प्रभाकर जोगांचा वाद्यवृंद आहे. सूर पुन्हा लागला आहे. सुमनताई भावगीतं, भक्तिगीतं पुन्हा गात आहेत.

'जिथे सागरा धरणी मिळते
तिथे तुझी मी वाट पाहते...'

मराठी रसिकांची प्रतीक्षा लवकरच संपेल.

❀ ❀ ❀

धुंद मधुमती रात रे ...

धुंद मधुमती रात रे
तन मन नाचे यौवन नाचे
उगवला रजनीचा नाथ रे ॥
जललहरी या धीट धावती
हरित तटांचे ओठ चुंबिती
येई प्रियकरा येई मंदिरा
अलि रमले कमलांत रे ॥धृ॥
ये रे ये का मग दूर उभा
ही घटिकाही निसटून जायची
फुलातील लाखो तारा परिही
रात कधी कधी ना यायची
चषक सुधेचा ओठी लावुनी
कटिभवती धरी हात रे ॥२॥

कवी : ग. दि. माडगूळकर
✻ गायिका : लता मंगेशकर
संगीतकार : मा. कृष्णराव
✻ चित्रपट : कीचक वध

मद्याचा ओठी लागलेला प्याला आणि कटिभोवती हात धरून केलेला पदन्यास, हे पाश्चात्त्य विलासाचं दर्शन. याच संकल्पनेला भारतीय पेहरावात ग. दि. माडगूळकरांची प्रतिमा गुंफते तेव्हा धुंद मधुमती रात्रीचं प्रणयाचं आमंत्रण उत्तानतेच्या कुठल्याही रंगाला स्पर्श न करताही किती गहिरं बनतं, ते या गाण्यात दिसतं. गंधर्वयुगाचे एक शिल्पकार मा. कृष्णराव या कवितेचं सोनं करतात. ती किमयाही येथेच पहावी. ग.दि. मा., मा.कृष्णराव आणि लता असा अपूर्व योग म्हणजेच हे गाणं.

‘जनम का बंधन छूटे ना...’

जगजितकौर

...री संभाषणाची सुरेख लय लागते. ...एक आठवणी निघतात. कवितेचे ...त जाऊन एखादं गीत बनावं तसं ...ळ्याचे काटे हरवतात. गतस्मृतीत ... मन कधी उसळी मारून ...च्या चौकटीत येतं, तर कधी ... जातं. अशा मनोहारी खेळात ...होण्याची संधी क्वचितच येते. ... खय्याम आणि त्यांच्या गायिका ...जितकौर यांच्या घरी जमलेल्या ... मैफलीत अशा आनंदाचा लाभ

...च वेळी स्वतंत्रपणे बोलण्याचं ...रनी कबूल केलं होतं. त्याप्रमाणे ...गार होतो. जून अर्धा उलटून गेला ... पावसाचा पत्ता नव्हता. अशा ...री खय्याम आणि जगजितकौर ...याची वाट पाहत होते. कल्पनेनं ... बावरून गेले, की उशिरा ...द्दल क्षमा मागावी हे सुचलं नाही. ...प्रसन्नपणे स्वागत करण्यानं मी ...शरमिंदी झाले. पण हे क्षणभरच. ...चला होता... अंतरे आठवायचे

...बद्दलची एक विलक्षण वाटणारी ...र आहे. माझ्या लहानपणी मी ... असे. तो कुणी मला शिकवला ... पाच-सात वर्षांची असेन. मी ...पणानं आलाप घेतल्यावर ...री असलेले ससे, कबुतरं, घोडे ...ळ येत आणि स्तब्ध कान टवकारून उभे राहत... यात अतिशयोक्ती नाही... मला गाण्याचं उपजत प्रेम आहे. सुदैवानं वडील संगीतप्रेमी असल्यानं माझ्या गाण्याकडे त्यांचं लक्ष होतं. वडील सदाशिवशरणसिंह सिद्धू होशियारपूरमधली बडी आसामी होते. ते नामंकित वकील होते. आमचं घर म्हणजे शहरातली शानदार वास्तू होती. विदेशी पाहुण्यांची बडदास्त ठेवली जावी, अशी व्यवस्था घरात होती. शंभर-एक नोकर होते. तीन भाऊ आणि दोघा बहिणींत मी चौथ्या क्रमांकाची मुलगी होते. वडलांना माझ्या संगीताच्या ओढीची कल्पना होती. त्यांच्याबरोबर मी खूप नामवंत गायकांच्या मैफलींना जात असे.''

''विनायकबुवा पटवर्धन, मा. कृष्णराव, पंडित ओंकारनाथ ठाकूर, बडे गुलाम अली खाँ, बरकत अली खाँ, बेगम अख्तर यांच्या मैफली मी खूप ऐकल्या आहेत. त्यात मला ओंकारनाथजींचं गाणं खूप आवडायचं. मला त्या वेळी वडिलांनी एक चीज शिकवली होती.

‘मुरली की धून सुनी सखी री आज
जात रही थी जमुना जल भरने
भरने लगी... गिर गयी रे गागर मोरी..’

बहुधा ‘जयजयवंती’ मधली असावी. मी अगदी तन्मयतेनं गात असे. मला आठवतंय खुद्द ओंकारनाथजींनी माझं गाणं ऐकून खूप कौतुक केलं होतं...''

''घरात शिक्षणाचं फार महत्त्व होतं. शिवाय आमच्या घरात सैन्यात जाण्याची परंपरा होती. माझे बंधू, त्यांची मुलं सैन्यात

अधिकारी आहेत. माझ्या आईचं माहेर म्हणजे संतांचं घराणं. होशियारपूरपासून अकरा मैलांवर त्यांचा गुरुद्वारा आहे. बाबा मँझच्या संप्रदायातलं हे घराणं कंगमाई गावात प्रसिद्ध आहे. तिथे खूप लांबवरून लोक येतात. शबद कीर्तनाचा संगीतमय सखोल संस्कार माझ्यावर आहे. गुरुबाणी तर संतसाहित्य आणि रागरागिण्यांची खाण आहे...''

''घरात वातावरण मोकळं होतं. जातपात, गरीब-श्रीमंत असा भेदभाव मुळीच नव्हता. आई-वडील न बोलता, गाजावाजा न करता सर्वांना मदत करीत असत. हे मी पाहत होते. चारी बाजूला बॅडमिंटनचे कोर्ट, भोवती घनदाट झाडी आणि आमचं भलं थोरलं घर मोठं सुंदर होतं.''

''आमच्या घरात दोघं नोकर होते. पिशौरी आणि फज्जू. दोघं मुसलमान. तबला-हार्मोनिअम वाजवण्यात पटाईत. मग कधीतरी चांदण्या रात्री सारे जण जमत. मी गात असे आणि हे दोघं साथसंगत करीत.

''दिवाळी आमच्याकडे खूप मोठ्या प्रमाणावर व्हायची. सारे नातेवाईक जमत. माझ्या आठवणीत बसंत पंचमीचा सण मोठा असे. आम्हाला पिवळ्या रंगाचे कपडे शिवले जायचे. मग दुपट्ट्याला रेशमी अगर जरीचा गोठ शिवायचा. त्यावेळी गाणं वाजवणं व्हायचं. घरात ग्रामोफोन आणि रेकॉर्ड खूप होत्या. बडे गुलाम अली खाँ, बेगम अख्तर, के. एल. सैगल यांच्या रेकॉर्ड खूप ऐकल्या जायच्या.

''मी मुक्त सुंदर निसर्गात, संगीतात मनसोक्त राहिले. शालेय शिक्षण पुरं केलं. माझा कल संगीताकडे. पण मी शास्त्रशुद्ध संगीताचं शिक्षण घेतलं नाही. ऐकण्यावरच भर. मी लवकरच लाहोर रेडिओवर गाऊ लागले. शेवरोलेट गाडीतून जाणारी मी बहुधा एकमेव गायिका असेन. लाहोरचं रेडिओ केंद्र फार सुंदर परिसरात होतं. माझ्या वडिलांचे मित्र डॉ. भजनसिंह यांच्या मॅकलोड रोडवरील भव्य बंगल्यात मी उतरत असे. तीन दिवस गाणं शिकण्यात जात. मग ते रेडिओवर प्रसारित होई. इतरांना दोन-तीन गाण्यांचं कॉन्ट्रॅक्ट मिळे. मला मात्र तेरा-चौदा गाणी गायला मिळत.''

''मी त्यावेळी लाहोर रेडिओवर हिचा आवाज ऐकत होतो. अहो, मायक्रोफोनपासून चार फुटांवर उभी राहून गायची. मोठा जबरदस्त आवाज होता...'' इति खय्याम साहेब...

''चांगल्या घराण्यातल्या मुली गाण्यासाठी पाठवत नसत. पण वडील पुरोगामी विचारांचे होते. मला म्हणून तर गायला मिळालं. पण जाताना डोक्यावर ओढणी घ्यावी लागे. आजही गावात गेले तर चटकन डोक्यावर ओढणी घेतली जाते..''

''त्यावेळी मला जे पैसे मिळायचे त्याच्या तिप्पट खर्च लाहोरच्या जाण्या-येण्यात होत असे. क्वचित मोठा भाऊसुद्धा बरोबर येत असे. तोदेखील गाण्यांना चाली देत असे. मोठे सुंदर दिवस होते. लाहोर स्टेशनवर संगीतकार ओ. पी. नय्यरही दिसत असत. निसर्गसंपन्न परिसर, सुबत्ता, संगीत, सुसंस्कृत घर, आई-वडील, भावंडं यांचं एक सुंदर विश्व माझ्याभोवती होतं.''

''पुढे स्वातंत्र्य मिळालं आणि फाळणीही झाली. लाहोरचं स्वप्न संपलं. आता मी जालंधर रेडिओ केंद्रावर गात होते. त्यांनी ते फार चांगलं चालवलं होतं. पुढे मी दिल्ली केंद्रावरूनही गात असे. ४८-४९ मध्ये मुंबईत बोलावणं आलं. वडिलांचे मित्र 'मसजिद' मध्ये राहत असत. त्यांच्याकडे माझी व्यवस्था केली होती. रणजित स्टुडिओमध्ये जायला निघाले. दादर पुलावर एक तरुण मला निरखून पाहत होता. मी झटकन नजर वळवून चालू लागले..''

''तो तरुण मीच होतो. एवढ्या गर्दीत ही मुलगी मला दिसली आणि मी मनोमन ठरवलं, आपल्याला हवी असलेली सहधर्मचारिणी ती हीच. बस ! गर्दीत ती नाहीशी झाली. मी बेचैन झालो. आता ही पुन्हा कशी भेटेल ? 'रणजित'मध्ये माझ्याकडे कुणी एक जण चांगल्या आवाजाच्या मुलीला घेऊन येणार होता. दुपारी तो त्या मुलीला घेऊन आला, तो हिलाच. दादर पुलापाशी पाहिलेली ती हीच मुलगी समोर होती. सुरेख दिसत होती. आणि खड्या आवाजात गात होती.'' खय्याम उत्साहात सांगत होते.

''काही काळ मी पुन्हा दिल्लीला गेले. मध्ये बराच काळ गेला. पण पुन्हा एका कार्यक्रमासाठी मुंबईत आले. बरोबर आसासिंग मस्ताना होते. रंगभवनमध्ये गाण्याचा मोठा कार्यक्रम व्हायचा होता. मी गात होते. खय्यामसाहेब आणि रमेश सहगल मला ऐकत होते. या मुलीला गायची संधी द्यावी असं ठरवत होते. पुढे 'शोला और शबनम' मध्ये तशी ती चालून आली.''

''तत्पूर्वी एका पंजाबी फिल्ममध्ये गाऊन मी या क्षेत्रात पदार्पण केले. संगीतकार सर्दुलसिंग क्वात्रांनी 'पोस्ती' मध्ये माझ्याकडून आणि आशा भोसलेंकडून युगलगीत गाऊन घेतलं. 'सुनवे दुपट्टीया - सातरंगिया...' गाणं खूप गाजलं. चित्रपटही जोरदार चालला. पन्नास साल होतं ते.

''आजही आशाजी भेटतात तेव्हा त्या पहिल्या गाण्याची आठवण निघते. त्या पुन्हा ठसक्यात 'सुनवे दुपट्टीया' म्हणतात. म्हणतात, 'जगजित, तुम्हारी कानकी बालियाँ क्या हिलती थी ! और तुम्हारा दुपट्टा भी क्या झटकाती थी तुम !''

''आशाजी फार मनमोकळ्या आहेत. जुन्या आठवणींत रंगून जातात. लतादीदी मात्र गंभीर, शांत. त्यांचं सर्व घर आमचं दोस्त आहे. मी स्वत: हृदयनाथच्या रचनांची चाहती आहे.''

''पुढे खय्याम साहेबांच्या भेटीगाठीतून आमची मनं जुळली. माझ्या आईनं त्यांना पाहिलं होतं. ते मुस्लिम व मी सरदार हा भाग गौण होता. संगीत आमच्यामधला प्रमुख दुवा होता. शिवाय आम्ही दोघंही 'सर्वधर्मसमभाव' परंपरेत वाढलेले होतो. माझ्या वडिलांनी प्रत्यक्ष पाहून परवानगी दिली.''

''आम्ही लग्न करून पहिल्यांदा चर्चगेटजवळच्या 'ए' रोडवरील 'इन्झस कोर्ट' मध्ये राहायला आलो. खय्याम साहेब स्वत: तत्त्वनिष्ठ असल्यानं विशिष्ट ध्येयानं चालणारे आहेत हे जाणून मीही त्यांच्या जीवनशैलीशी जुळवून घेतलं. नंतर आम्ही कुलाब्याला राहायला गेलो. कुलाबा पोस्ट

ऑफिससमोर 'पुष्पविहार' मध्ये राहत होतो. जीवनसंघर्ष जारी होता. मी अल्पसमाधानी आहे. त्यात संसार करीत होते. पहिले दिवस थोडे कठीण गेले. अपुऱ्या पैशात घर चालवणं मुश्कील होतं. त्यांच्या घराच्या सांसारिक खस्ता मी काढायच्या असं जणू ठरून गेलं. खूप पुढे 'शगुन' मध्ये मी खय्याम साहेबांचं एक गाणं गायले, 'तुम अपना रंजो गम - अपनी परेशानी मुझे दे दो..' पण त्याआधीच मी संसाराचं ओझं माझ्या शिरावर घेतलं. साऱ्या अडचणी, संकटं स्वत: झेलली. खय्याम साहेबांना गाण्याच्या विश्वात रमू दिलं...''

''एचएमव्हीचे विजयकिशोर दुबे यांनी मला काही पंजाबी गाणी गायला सांगितली. पंजाबी 'बोलियाँ' आणि 'टप्पे' गायचे होते. गझलही गायच्या होत्या. जुन्या पारंपरिक लोकगीतांना आम्ही दोघांनी मिळून फार वेगळ्याच रूपात सजवलं.

'सोने दा छजमाइयाँ
दीदन सजणादी
सानू काबेदा हजमाइयाँ

'सजणाशी नजरभेट झाली आणि काबा-हजला गेल्यासारखं आयुष्य सफल झालं.' असे टप्पे फार लोकप्रिय झाले. चित्रपट क्षेत्रातली नामवंत मंडळी ही गाणी मागवून ऐकत असत. त्यावेळी मी एक गझल गात असे,

'जिंदगी तू हमे कहाँ लायी
एक मुहब्बत हजार रुसवाई'

ती मोठी लोकप्रिय झाली. पंजाबी लोकगीत आणि संगीत यांचा मेळ-मिलाफ असलेल्या माझ्या गाण्यांना मोठी लोंकप्रियता लाभली.

''चित्रपटात मी सहसा गात नसे, मात्र स्वत: अगर खय्याम साहेब यांनी मीच गावं असा हट्ट धरला नाही. 'शोला और शबनम' मध्ये मी कितीतरी नंतर गायले... 'फिर वही सावन आया, साजन आयेना', 'लडी रे लडी तुझसे आँख जो लडी', 'पहले तो आँख मिलाना..' पुढे यश चोप्रा, कमाल अमरोही किंवा मुजफ्फर अली यांच्याकडे जशी संधी मिळाली तशी गायले.''

जुन्या पंजाबी टप्पे-बोलियाँच्या आठवणींनी खय्याम साहेब खुलले. ''अशी अर्थपूर्ण गाणी-त्याला अनुरूप असं संगीत देण्यात फार मजा वाटली... जगजितजी 'उमराव जान' मधलं अमीर खुस्रोचं बिदाईगीत किती मधुर गायल्या आहेत.''

''अहो, खय्याम साहेबांनी त्यात तीन सप्तकांतली अवघड तान ठेवली होती...''

टीव्ही चॅनेलवरून वाहणारं संगीत खय्याम साहेब बिलकूल ऐकत नाहीत. जगजितकौर क्वचित ऐकतात. अस्वस्थ होतात. म्हणतात-''मला वाटतं लोकांना हल्ली दु:ख, विरह अशा भावनांचा स्पर्शच होत नाही की काय?'' खय्यामसाहेबांच्या संगीतमय वाटचालीत जगजितकौर बरोबरीनं चालत आहेत.

''मी सहसा त्यांच्या कामात ढवळाढवळ करीत नाही. मग तेच विचारतात, 'बघ गं जरा ही चाल!' त्यावर मी माझं मत देते. काही सुचवते. कधी आमचे जोरदार मतभेद होतात. पण नंतर त्या गाण्यावर विचार करेपर्यंत दिवस मावळून जातो..''

सध्या त्यांचा मुलगा प्रदीप एका दूरचित्रवाणी मालिकेची निर्मिती करीत आहे. त्याचं लेखन जगजितकौर करीत आहेत. संगीत खय्याम स्वत: करीत आहेत. 'आरजू का सफर' एक वेगळी दिशा घेऊन येईल, असं त्यांना वाटत आहे. त्यात संगीत-काव्य असेल, भारतीय संस्कृतीची झलक असेल..

धनत्तर घराण्यातल्या निगर्वी मुलीनं खय्याम साहेबांचा संसार सजवला आहे. त्यांच्या संगीतालाही नटवलं आहे. जीवन सुरेल केलं आहे. साहित्य, संगीत आणि संस्कृतप्रेमी पतिपत्नीची आयुष्याची लय मोठी सुरेख लागली आहे.

एखाद्या रसिल्या गझलचा सुरेख चरण यावा अशा टप्प्यावर दोघं उभी आहेत. असं सामंजस्य, अशी एकरूपता पाहून कुणीही हर्षभरित व्हावं...

खय्याम सांगतात - ''ही गुरूबाणीतलं एक वचन म्हणते - फार छान आहे.

'अव्वल अल्ला नूर उपायो
कुदरतके सब बंदे
एक नूर ते सब जग उपज्या
कौन भले को मंदे...''

उरलेल्या गप्पांसाठी आणखी एक भेट ठरते.. मी अशी संधी थोडीच सोडणार ?

चंदेरी आठवणी

'एक आहे राजकुमारी'...

राजकुमारी

'बनारसहून येताना आणलेले देवच माझ्याजवळ आहेत, बाकी काही नाही. त्यांचीच काय ती मला सोबत आहे. माझी मुले-सुना फार चांगली आहेत. माझ्यामुळे त्यांना फार त्रास होत आहे. परमेश्वरानं आता हाक ऐकावी.. वेदना सहन होत नाहीत...' असेच काही तरी त्या बोलत होत्या. रुग्णशय्येवरही त्यांचा आवाज मात्र स्पष्ट, कणखर, मधुर होता. अगदी 'महल' मधल्या 'घबरा के जो हम सर को टकराएं तो अच्छा हो,' या गाण्यासारखा...

'साहब' अभी शूटिंगपर चले गये हैं । रात को दस बजे लौटेंगे, तब आप फोन करना..' 'मेमसाब नही रही है । आप ठीक, साढे बारा को फोन करना..' 'मॅडम आऊट ऑफ स्टेशन हैं ।' 'साब मिटिंग में बीझी हैं... 'देखिए फिल्म इंडस्ट्री को छोड दिया है मैंने।' 'मैं इंटरव्ह्यू में इंटरेस्टेड नही हूँ..'

अशा प्रकारच्या संभाषणांची मला सवय झाली आहे. राजकुमारीजींशी संपर्क करण्याचे साधनच नव्हते. नलीन शाह म्हणाले, की राजकुमारीजींची तब्येत ठीक नाही, तेव्हा सरळ उठून त्यांना भेटून यायचे मी ठरवले. फोनचा प्रश्न नव्हता. पूर्वनियोजित वेळ घेण्याचा शिष्टाचार नव्हता. काझमिल अपार्टमेंट, सात नंबर बंगला, एवढा पत्ता ठाऊक होता. खरे तर मी त्यांच्या घरी जाऊन आले होते; पण त्यालाही बारा वर्षे होऊन गेलेली. रोज नवे शृंगार करणाऱ्या युवतीसारखी मुंबईनगरीदेखील रोज नवी दिसते. बारा वर्षे म्हणजे फारच मोठा काळ गेला होता. मी त्यांच्या दारात पोचले. अनाहूत-अयाचित ! सात बंगला भाग फार सुंदर आहे. मी मागे आले होते तेव्हा खूप मोकळे होते. आता भोवती गगनचुंबी इमारतींची गर्दी उठली होती. उरल्यासुरल्या नारळाच्या झावळ्या मात्र डोलत होत्या.

मला ठाऊक होते. बेल वाजवायची नव्हती. बुलडॉग भुंकणार नव्हता. बाईसाहेबांना वर्दी देणारा सेवक येणार नव्हता. गालिचे, झुंबरे

काहीच असणार नव्हते. मी सरळ आत गेले. राजकुमारीजींची नातवंडे रविवारच्या आरामात पहुडलेली. पूर्वी आले होते तेव्हा छोटी बाळे होती ती. लांब लांब केसाच्या पूनमने हाक दिली. 'दादी देखो कौन आया है ?' आवाज थेट दादीसारखाच गोड.

खुर्चीवर पाठमोऱ्या दिसल्या, लहान मुलीसारखी पिटुकली वेणी. गाऊन घातलेला. मीच पुढे झाले. चेहऱ्यावरच्या सुरकुत्या मोजून घ्याव्यात. मला कसे तरी झाले. गौरवर्ण, कपाळावर पैशाएवढी पिंजर (टिकली नाही) गळ्यात काळी पोत, साधी सुती साडी, हातात नातवंड, असे त्यांचे रूप मला आठवले. कॅन्सरग्रस्त पतीच्या सेवेत गुंतलेल्या होत्या. पिंगट बदामी डोळ्यांतील नजर आणि त्यांचे स्वर मात्र तुमचे लक्ष वेधून घेणारे होते. त्यांनी मला ओळखले. 'आओ बैठो..' आवाजाने मी पुन्हा चमकले. छोट्या घंटा निनादाव्यात तसा आवाज. ज्येष्ठ गायिका राजकुमारी माझ्यासमोर होत्या. त्यांना खुर्चीत थोडा वेळ बसवण्याच्या प्रयत्नात घरची माणसे होती. वार्धक्याला, वेदनेला छेद देऊन उमटणारा स्वर मात्र मी पुन: पुन्हा ऐकत होते.

''मला फार वेदना होतात. दोन महिन्यांपूर्वी मी अगदी ठीक होते. 'सारेगामा' च्या कार्यक्रमाला गेले होते. आताच काय उद्‌भवले हे दुखणे ! मला उभंही राहता येत नाही बघ ! नाही तर मी किती फिरणारी होते म्हणून सांगू ? मला स्वस्थ बसणं कधी जमलं नाही. आता मात्र उठताच येत नाही..''

बोलपटाच्या आरंभीच्या काळापासून साक्षी असलेल्या राजकुमारींनी छान, ठीक होऊन चंदेरी-रूपेरी आठवणींची रास माझ्यासमोर घालावी, बनारसच्या माहेरच्या आठवणी सांगाव्यात, गायकांच्या, संगीतकारांच्या तीन पिढ्या पाहिल्याचे सांगावे, क्वचित एखादे गाणे गुणगुणून दाखवावे, असे खूप वाटत राहिले. मंजुळ स्वरात गाणारी पक्षिणी इथे विद्ध झालेली, थकलेली. वार्धक्याच्या जाळ्यात अवचित पकडली गेलेली मासोळी वेदनेने तळमळत होती.

थरथरत्या हातातून चहाचा कप हिंदगळला, चहा अंगभर सांडला. 'बघ, हे असं होतं,

माझ्यामुळे सर्वांनाच त्रास.' दहा मिनिटांतच ट्रान्स्फर सीन होतो. छान कपडे घालून बाहुलीसारख्या राजकुमारीजी येतात. थोडी कळी खुललेली असते. त्या जेवढे सांगतील - जसे सांगतील, ते मी टिपते. त्यातून राजकुमारीची गोष्ट रचते.

जन्मसाल-स्मरत नाही. वय बहुधा शहात्तर-सत्याहत्तर किंवा जन्म श्रावणी सोमवारी झाला एवढेच ठाऊक. मिठाईचा व्यवसाय करणाऱ्या बनारसमधल्या कुटुंबातली ही एकटीच गाणारी मुलगी. आई-वडिलांची लाडकी. मुलींनी गाणे गायचे हे अप्रतिष्ठित समजले जावे, असे मानणारा काळ, तरीही मुलीच्या हट्टामुळे आई-वडील मुंबईला पाठवायचे ठरवतात. ओळखीचे एक सद्गृहस्थ मुंबईत तिची व्यवस्था पाहतात. हा काळ बहुतेक एकोणीसशे तीसचा. गोऱ्या, निळ्या डोळ्यांच्या राजकुमारीला नाटकांतून छोट्या छोट्या भूमिका मिळतात. हिंदी, उर्दूची शिकवणी सुरू होते. नाटकात गाणे म्हणताना कुणा बड्या व्यक्तीचे लक्ष वेधून घेते. एका मूक चित्रपटात काम मिळते. चित्रपट 'रोशन आरा'.

१९३१ साली 'आलम आरा' झळकतो आणि टॉकीचा जमाना सुरू होतो. मोठी समजूतदार झालेली राजकुमारी आता गोड गळ्याची गायिका होते. गायिका व्हायचे ठरवते.

'सागर मूव्हीटोन' मधून आलेले संगीतकार अनिल विश्वास, किंवा रणजित मूव्हीटोनमधून आलेले नौशाद ही त्यावेळची तरुण संगीतकारांची पिढी उदयाला येत असते. ज्ञानदत्त, खेमचंद्र, प्रकाश यांच्यासारखे बुजुर्ग संगीतकार या क्षेत्रात असतात. राजकुमारीजींना हे नवे-जुने संगीतकार गाण्यासाठी बोलावतात. पार्श्वगायनाचे तंत्र विकसित होत असते. काम करणाऱ्यांना स्वत:च गावे लागत असे. आता उसन्या आवाजाने क्रांती घडवलेली असते. कलकत्त्यात रायचंद बोराल पंकज मलिक, उमा शशी, सुप्रभा सरकार, पारूल घोष यांच्यासह पार्श्वगायनाच्या तंत्राच्या मागे लागून 'धूप छाँव' मध्ये एक ऐतिहासिक घटना नोंदवीत असतात, तर मुंबईत नौशाद, मुश्ताक हुसैनसारखे तरुण अशाच प्रयत्नात असतात.

सहजसुंदर आवाजाच्या राजकुमारींकडे कामाची रीघ लागते. देविकाराणी, दुर्गाबाई, शोभना समर्थसारख्या अभिनेत्रींना आता स्वत: गावे लागणार नसते. खुर्शीद, शांता आपटे, काननदेवी यांच्या गायिका नायिकांचे सितारे बुलंद होते आणि राजकुमारी, उमराजिया बेगम यांसारखे सुस्वर पुढे येत होते. शोभना समर्थ तर आग्रहाने सांगायच्या मला राजकुमारींचाच प्लेबॅक हवा.

'वो दिन गये हमारे, मैं थी छैलछबिली राधा, वो थे मोहन प्यारे...' म्हणणाऱ्या राजकुमारी आता राजकुमारी बनारसवाली म्हणून ओळखल्या जाऊ लागतात. कल्याणी, जोहराबाई अंबालावाली या गायिका मैत्रिणी मिळतात. कामाची रीघ लागते.

१९४१ मध्ये आलेल्या शमशाद बेगमने 'खजांची' द्वारे लोकप्रियतेचा कहर केला. पार्श्वगायनाला लोकप्रियतेचे परिमाण लाभले. भक्तिरसप्रधान गाण्यांनी 'भक्त सूरदास' गाजला. कुंदनलाल सैगल यांच्याबरोबर गायलेल्या 'सरपे कदम की छैंया मुरलिया बाजेरी, या राजकुमारीजींच्या युगलगीतानं लोकप्रियता मिळविली. 'चूडियाँ', 'सुखदु:ख', 'फरियाद', 'एक रात', 'इकरार', 'झंकार', 'कीर्ती' 'मेहमान' अशा कितीतरी चित्रपटांची कामं मिळाली. सौंदर्यवती नूरजहाँ गात होती, तसेच ललिता पारुलकर, मोहनतारा तळपदे या मराठी मुलींनी हजेरी लावली होती.

'नई दुनिया' या चित्रपटाच्या संगीताची प्रमुख गायिका राजकुमारी होत्या. स्टुलावर उभे राहून एका मुलीला गाणे शिकवत होते नौशाद. या मुलीचे नाव होते बेबी सुरय्या.

केदार शर्मा राजकुमारीजींच्या आवाजाचे चाहते. राज कपूर, मधुबाला, बेगमपारा यांना घेऊन एक फिल्म करीत होते, 'नीलकमल'. सत्तेचाळीसमध्ये स्नेहल भाटकरांच्या गोड चालींनी लोकप्रियता मिळविली. 'भूल जाते हैं भूल जाया करे' हे राजकुमारीचे एक गीत भाटकरांबरोबर गायलेले. 'जइयो न बिदेस' गीता रॉय बरोबरचे जवानी अगर हक दिल की दबाये लोकप्रिय झाली. केदार शर्मा गीताबालीला घेऊन 'सुहाग रात' नावाची फिल्म करत होते. संगीत स्नेहल भाटकरांचे, गीते राजकुमारी गात होत्या. 'छोड चले मुँह मोडके चले...' 'जाओ जाओ न सताओ..' गीतांबरोबरच 'रुमझूम मतवाले बादल छा गये..'' 'बाजे मोरी पायल ठुन्नक ठुन्नक..' लोकप्रिय झाली...

एव्हाना नियतीने राजकुमारीजींच्या पदरात भरभरून दान टाकले होते. 'राजलक्ष्मी' नावाचा आलिशान बंगला नाव सार्थ करीत होता. चार गाड्या दारी झुलत होत्या. त्यांच्यासाठी निर्माते पुढे होऊन गाडीचे दार उघडत होते. शब्द झेलला जात होता.

श्याम सुंदर 'बाजार' चे संगीत देत होते. एका गाण्यासाठी हुस्नलाल भगतराम पुढे आले. राजकुमारीजी ज्येष्ठ गायिका होत्या. त्यांच्याबरोबर एक लता मंगेशकर नावाची पोरसवदा मुलगी गायला आली. दोघींनी मिळून गाणे गायले. 'जरा सुनलो हम प्यार का अफसाना कहते है...'

खेमचंदजींनी 'महल' साठी फार सुंदर गाणी राजकुमारजींना दिली. जोहराबाईबरोबर 'ये रात फिर ना आएगी', 'घबरा के जो हम सर को टकराते तो अच्छा', 'मै वो हँसी हूँ जो लबपे जो आनेसे रह गयी..', 'एक तीर चला दिल पे लगा...' ही एकलगीते गाजली. लता नावाची एक अद्‌भुत स्वरशक्ती हवेत भरून राहिली होती.

अनेक घडामोडी होत होत्या. स्वातंत्र्यानंतर नवचैतन्याचे वारे वाहू लागले होते. फाळणीनंतर तर चित्रपटक्षेत्रात मोठी उलथापालथ होत होती. रोशन 'बावरे नैन' साठी राजकुमारींना गाणे शिकवीत होते. 'सुन बैरी बलम सच बोल रे इब क्या होगा...' त्या 'इब' मध्ये शृंगार आहे, लटका रुसवा आहे. ते सारे रसायन घेऊन आलेला 'इब' राजकुमारींसाठी आला होता. अनोखा विभ्रम घेऊन आलेला हा शब्द आणि राजकुमारींची अदा हा इतिहास लिहिताना निशिगंधाने लिहावा लागेल....

क फिरतच होते. आईने लेकीसाठी होता. बनारसमधला एक साधा ता. बनारससारख्या ठिकाणी क्षेत्रात काम करणाऱ्या मुलीला मिळणे कठीण होते. त्यांनी तडजोड कुमारी दुबे गृहिणी झाल्या. दबत्या काळ जात होता. जुने संगीतकार ते, नवे येत होते. 'आसमान' या हिल्या चित्रपटासाठी ओ. पीं. नी ना गायला बोलावले होते. नंतर काळ चालला होता.

हळूहळू कमी होत गेली. राजकुमारी अस्तंगत होत राहिले. लक्ष्मीने पाठ . राजकुमारी हे नाव हरवून गेले, त्या फार दिवस लोटले.

मानव अमर संगीत' या कार्यक्रमाच्या साठी राजकुमारींना बोलवायचे ठरले. ध झाली. नूरजहाँ त्या कार्यक्रमाची ती. सुरेंद्र, जी. एम. दुराणी गाऊन गेले. हातात गाण्याचा कागद घेऊन री रंगमंचावर आल्या. 'घबरा के जो ल्या. स्वरात दारिद्र्याने, दुःखाने, काहीही उणावलेले नव्हते. राजकुमारींनी बाजी मारली.

त्यानंतर त्यांच्या अस्तित्वाच्या वार्तेने रसिक सुखावले.

निर्वाह करण्यासाठी कोरसमध्ये उभे राहून गाणाऱ्या राजकुमारींची कुणी दखल घ्यायचे कारण नव्हते. आर. डीं. नी 'किताब' मध्ये त्यांना गाण्यासाठी बोलावले; तसेच के. विश्वनाथ यांनी त्यांच्याकडून एक लोरी गाऊन घेतली. बस्स ! नव्या संगीतात राजकुमारींना जागा नव्हती. चित्रपटक्षेत्रातली वर्दळ केव्हाच ओसरली होती. नारायण मुलाणींसारखे त्यांचे चाहते, किंवा शांती साहनी येत राहिले. हिंदी गीतकोशकार हरमंदिरसिंग 'हमराज' त्यांच्या गाण्यांची यादी घेऊन आले.

'सारेगामा' साठी सोनू निगम व झी टीव्हीच्या कार्यक्रमाचे संयोजक त्यांना कार्यक्रमाला घेऊन गेले. एवढे अपवाद सोडले, तर राजकुमारींची गोष्ट जवळजवळ हिंदी चित्रपटातून संपली.

डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी आशा पारेख यांनी व्यवस्था केली होती. बाकी संपन्न-समृद्ध हिंदी चित्रपटाच्या विश्वात राजकुमारी हे नावसुद्धा पुसले गेले.

''ही पूनम सारखी टी.व्ही बघते ना, मग मलाही कंपल्सरी पाहावाच लागतो; पण 'सारेगामा' मात्र मला फार आवडतो. सध्या मला बसता येत नाही, वेदना होतात; नाहीतर तुला आज मी गाणंसुद्धा म्हणून दाखवलं असतं. मी पुण्याला बऱ्याचदा येत असे. सरस्वती मूव्हीटोनसाठी 'संत गोरा कुंभार' मध्ये मी मराठी गाणी म्हटली आहेत...''

राजकुमारीजी मराठीत छान बोलतात. त्यांच्या सूनबाई एखादा फोटो मिळतो का पाहत असतात. जुन्या वृत्तपत्रांची कात्रणं हाती लागतात.

राजकुमारीजी म्हणतात, ''काय गंमत आहे नाही ? इन्सान चला जाता है । पेपर की कटिंग्ज रह जाती है...''

माझ्या अंगावर काटा येतो. निरोप घेण्याची वेळ आलेली असते. सम्राज्ञीला कुर्निसात करण्याची रीत मला ठाऊक नसते. मी नुसते त्यांचे हात हाती घेते... मऊ... सुरकुतलेले हात...

'मैं वो हँसी हूँ लब पे जो आनेसे रह गयी..'

एवढी अर्धी ओळ घेऊन मी मागे फिरते.

ननीळा लडिवाळा

नीळा लडिवाळा
वु नको हिंदोळा ।
ली वेणी केस मोकळे
उडाली, भरले डोळे
जळ गाली सहज ओघळे
साऱ्यांचा उद्या गोकुळी
ईल अर्थ निराळा ॥१॥
सांजवेळ ही आपण दोघे
अवघे संशय घेण्याजोगे
चंद्र निघे बघ झाडामागे
कालिंदीच्या तटी खेळतो
गोप-सुतांचा मेळा ॥२॥

कवी : ग.दि.माडगूळकर ✻ गायिका : माणिक वर्मा
संगीतकार : सुधीर फडके ✻ चित्रपट : उमज पडेल तर

मोरपिसांचे डौलदार लावण्य आणि तुळसमंजिऱ्यांची सोज्वळता यांचा अनोखा संगम असलेली माणिक वर्मांची घरंदाज गायकी मराठी रसिकांचा आवडता विषय आहे. गंधर्वयुगाची साक्ष देणारं 'रूपबली तो नरशार्दूल' किंवा 'त्या चित्त चोरट्याला का आपले म्हणू मी 'सारखं भावगीत किंवा जोगकंस रागातली चीज असो, माणिकबाईंचा आवाज सर्व ठिकाणी मुक्तपणे खुलतो. ग. दि. माडगूळकरांचे हे गीत अनुप्रासात नटलेलं आहे. सुधीर फडक्यांनी बैठकीच्या लावणीच्या शैलीचा बाज त्यावर अचूक सजवला आहे. नर्म शृंगार, आर्जव आणि प्रणयाचं लडिवाळ असं दर्शन अगदी शालीनपणे माणिकबाई आपल्याला घडवतात. माणिक वर्मांनी मराठी चित्रपटसंगीताला दिलेली ही अनमोल देणगी आहे.

सूरयात्रेतल्या दशकन्या

शशिकांत किणीकर

मूकपटांच्या काळात आणि त्यानंतर बोलपटांचे युग सुरू झाले तेव्हा सारी फिल्म इंडस्ट्री चित्रसंस्थांच्या हातांत होती. सारे कलाकार व तंत्रज्ञ या चित्रसंस्थांकडे कामगार म्हणूनच काम करीत असत. त्यांना मासिक पगार असायचा. त्यामुळे कोणताही कलाकार अथवा तंत्रज्ञ कितीही लोकप्रिय असला तरी त्याचे नाव चित्रसंस्थांच्या आधी येत नसे. नामवंत चित्रसंस्थांमध्ये राहूनच खूप यश मिळवून कीर्तिमान झालेल्या गायक/अभिनेत्रींचा थोडक्यात परिचय करून घेणे अपरिहार्य ठरते.

संपादकीय

कोकीळकंठी काननबाला

कोलकाता येथे न्यू थिएटर्सने १९३१ सालापासून हिंदी व बंगाली चित्रपटांची निर्मिती सुरू केली. अगदी सुरुवातीच्या काळात न्यू थिएटर्समध्ये रतनबाई, उमाशशी, मोलिनादेवी वगैरे गायक अभिनेत्री होत्या. पण १९३७ साली 'मुक्ती' या चित्रपटाने सर्वप्रथम न्यू थिएटर्सला उत्तम गायिका मिळवून दिली. आधीच्या गायिकांचे गाणे बोजड वाटायचे; पण त्याउलट काननचे गाणे सहजसुंदर असायचे. म्हणूनच तिला 'कोकीळकंठी' हे ब्रिद प्राप्त झालेले होते.

काननने आपल्या चित्रजीवनाची सुरुवात १९३३ साली 'श्री गौरंगा' या बंगाली चित्रपटापासून केली. न्यू थिएटर्समध्ये येण्याआधी तिने कोलकातामधील राधा फिल्म कंपनी, प्रफुल्ल पिक्चर्स या संस्थांत नायिकेच्या भूमिका केल्या होत्या. पण तिच्या कलागुणांचे चीज झाले न्यू थिएटर्समध्येच.

'मुक्ती'च्या पाठोपाठ काननबाला 'विद्यापती', 'स्ट्रीट सिंगर', 'जवानी की रीत', 'सपेरा', 'लगन' अशा अनेक चित्रपटांत चमकली. त्या साऱ्या चित्रपटांत तिने गाणीही म्हटली. तिच्या आवाजात मृदुता तर होतीच; पण प्रेक्षकांचे मन खेचून घेण्याची किमयाही होती. 'मोरे अंगनामें आली चाल चलू मतवाली' (विद्यापती/१९३७), 'लछमी मूरत दरस दिखा' (स्ट्रीट सिंगर/१९३८), 'चली पवन हरसू' (जवानी की रीत/१९३९), 'हमरी लाज निभाओ स्वामी' (लगन/१९४१) ही तिने न्यू थिएटर्सच्या चित्रपटांत गायलेली सदाबहार गाणी कशी विसरली जातील?

'लगन' या चित्रपटानंतर ती न्यू थिएटर्समधून बाहेर पडली व 'जबाब', 'हॉस्पिटल' व 'चंद्रशेखर' वगैरे चित्रपटांत तिने भूमिका केल्या. 'जबाब' मधील 'तुफान मेल ये दुनिया तुफानमेल' हे गाणे ऐकताना तर श्रोत्यास आगगाडीतच बसलेले असल्यासारखा भास होतो. संगीत दिग्दर्शक कमलदास गुप्ता यांच्या निर्देशनाखाली तिने कळवळून म्हटलेले 'प्रभुजी राखो लाज हमारी' हे 'हॉस्पिटल' मधील गाणे ऐकताना मन कासावीस होते.

काननबालाने अगदी मोजक्याच चित्रपटांत काम केले व गाणी म्हटली. पण तेवढ्यानेही तिने प्रेक्षकांच्या हृदयात अढळ स्थान मिळविले.

बॉंबे टॉकीजची देविकाराणी -

देविकाराणी भारतीय संस्कृतीचा थोर वारसा घेऊनच जन्माला आली. तिचे आजोबा भारताची सांस्कृतिक शान जगभर पसरवणारे होते, त्यांचे नाव रवींद्रनाथ टागोर. त्यांची

मुलगी लीला हिचा कर्नल एम.एन. चौधरी बरोबर विवाह झाला होता. चौधरी हे कर्नल असले तरी पेशाने डॉक्टर होते. मद्रास स्टेटचे ते पहिले भारतीय सर्जन जनरल.

वयाच्या आठव्या वर्षी देविकाराणीला त्यांनी इंग्लंडला शिकायला पाठवले आणि त्यानंतर तिला रॉयल अकादमी ऑफ ड्रामाटिक आणि रॉयल अकादमी ऑफ म्यूझिक या दोन संस्थांतर्फे शिष्यवृत्ती मिळाल्या. नाटक व संगीत यांचा अभ्यास सुरू असतानाच तिने टेक्स्टाईल डिझायनिंग आणि स्थापत्यशास्त्र याही दोन शाखांमध्ये लंडन येथे शिक्षण घेतले.

लंडनमध्येच तिचा परिचय हिमांशू रॉय यांच्याबरोबर झाला व १९२९ साली तिने त्यांच्याबरोबर विवाह केला. त्यांच्यासमवेत जर्मनी येथे जाऊन तिने उफा स्टुडिओमध्ये चित्रपटांचे शिक्षण घेतले व 'कर्म' या भारतात तयार झालेल्या पहिल्या इंग्रजी चित्रपटात प्रमुख भूमिका केली.

त्यानंतर १९३५ साली बॉंबे टॉकीजची स्थापना झाल्यावर तिने 'जवानी की हवा'

या संस्थेच्या पहिल्या चित्रपटापासून अनेक चित्रपटांत नायिकेच्या भूमिका केल्या. त्यामध्ये 'जीवन नैया', 'अछूत कन्या', 'सावित्री', 'दुर्गा', 'जीवन प्रभात', 'वचन' आणि 'इज्ज़त' वगैरे चित्रपटांचा समावेश होता. त्या चित्रपटांत तिने गाणीही म्हटली.-

देविकाराणीला गायनाचे अंग अजिबात नव्हते. पण त्या काळात पार्श्वगायनाचा शोध लागला नसल्याने आणि पुढे तो लागल्यावरही मुंबईत पार्श्वगायन रुढ झालेले नसल्याने तिने अभिनित केलेल्या सर्व चित्रपटांत तिनेच गाणी म्हटली. त्यामध्ये 'अछूत कन्या' या चित्रपटात तिने अशोककुमारबरोबर गायलेले युगलगीत खूपच गाजले. त्या गीताचे बोल होते, 'मैं बनकी चिडीयाँ, बनमें बनबन बोलू रे' या खेरीज तिची फारशी गाणी ऐकिवात नाहीत.

१९४० साली हिमांशू रॉय यांचे निधन झाल्यावर तिने 'हमारी बात' या एकाच चित्रपटात काम करून बाँबे टॉकीजची निर्मिती सूत्रे हाताळली व आपल्या काळात तिने दिलीपकुमार, मधुबाला, मुमताज शांती वगैरेंना प्रथम रजतपट दाखवला. १९४५ साली ती चित्रपटसृष्टीतून पूर्णपणे निवृत्त झाली. 'रोशीच' या रशियन चित्रकाराबरोबर विवाह करून ती बंगलोर येथे स्थायिक झाली.

'फर्स्ट लेडी ऑफ इंडियन स्क्रीन' म्हणून तिचा गौरव होत असे. १९५८ साली तिला 'पद्मश्री' पारितोषिक दिले. हा सन्मान मिळवणारी ती फिल्म इंडस्ट्रितील पहिली व्यक्ती. १९७० साली तिला 'दादासाहेब फाळके ॲवॉर्ड देऊन विभूषित केलेले होते. हे पारितोषिक मिळवणारीही ती पहिलीच व्यक्ती.

बंगलोर येथे ती अनेक संस्थांशी सल्लामसलत करत असे. तिला मूलबाळ नव्हते. कोट्यवधी रुपयांची संपत्ती बेवारस सोडून तिचे १९९४ साली बंगलोर येथे निधन झाले.

रणजितची खुर्शिद



खुर्शिद मूळ पंजाबची. १९३५ साली ती कोलकाता येथे तयार झालेल्या 'मिर्झा साहिबाँ' या चित्रपटात सर्वप्रथम दिसली. त्यानंतर ती मुंबईत आली व नॅशनल मूव्हीटोन पिक्चर्स, महालक्ष्मी, सरोज मूव्हीटोन वगैरे चित्रसंस्थांत काम केल्यावर ती रणजित फिल्म कंपनीत येऊन दाखल झाली.

रणजितमध्ये मात्र तिच्या कलागुणांना चांगलाच वाव मिळाला. संगीतकार खेमचंद प्रकाश यांच्या संगीत नियोजनामध्ये तिने म्हटलेली अनेक गाणी गाजली. 'पहले जो मुहब्बतसे इन्कार किया होता' (परदेसी/१९४१), 'मुहब्बतमें सारा जहाँ' (शहेनशाह बाबर/१९४४), 'भिगोथी मेरी साडी रे' (शादी/१९४१) या गाण्यांमुळे तिला साऱ्या भारतभर प्रसिद्धी मिळाली व तिचे नाव अव्वल तारांकित समूहात घेतले जाऊ लागले. खेमचंद प्रकाश यांच्याखेरीज सुधीर फडके यांच्या संगीत निर्देशनाखाली प्रभात फिल्म कंपनीच्या 'आगे बढो' (१९४७) ग्यानदत्त यांच्याकडे 'बेटी' व 'भक्त सूरदास' या चित्रपटांत खुर्शिदने गाणी म्हटली. 'सूरदास' मधील 'मधुर मधुर गारे मनवा मधुर मधुर गा' व 'पंछी बावरा' ही गाणी खूपच गाजली.

खुर्शिदच्या लोकप्रियतेचा उच्चांक खेमचंद प्रकाश यांच्या संगीतात तयार झालेल्या 'तानसेन' या चित्रपटाच्यावेळी झाला. कुंदनलाल सैगलच्या बरोबरीने तिने गाणी म्हटली आणि ती सैगलच्या गाण्यांइतकीच गाजली. 'आओ गोरी आओ शामा' 'अब राजा भये मोरे बालम', 'धरा घन घोर घोर' ही तिची सोलो गाणी गाजलीच, पण सैगल बरोबर गायलेली 'मोरे बालपनके साथी छैला' हे गाणेही खूपच पॉप्युलर झाले.

खुर्शिदच्या गाण्यात सहजता होती. ती दिसायलाही सुंदर व अभिनयामध्येही वाकबगार, असल्याने तिला प्रसिद्धी आपोआपच मिळत गेली. 'आगे बढो' मध्ये काम केल्यावर ती पाकिस्तानात निघून गेली व तिथे तिने 'मंडी', 'फनकार' वगैरे मोजक्याच चित्रपटांत कामे केली. पण त्यांना फारशी प्रसिद्धी मिळाली नाही. १९५८ साली तिने आपले बालपणचे शेजारी डॉ. अलम इक्बाल यांच्याशी निकाह लावला व इर्शाद बेगम या नावाने कौटुंबिक जीवन अगदी साधेपणाने जगू लागली. १८ एप्रिल २००१ रोजी या सुंदर आणि उत्तम गायिकेचे पाकिस्तानात निधन झाले.

अलौकिक अमीरबाई

कमावलेला कसदार आवाज आणि श्रोत्यांना बेभान करण्याची किमया यामुळे अमीरबाई कर्नाटकीची गाणी एकदम खुलली आणि तिने संगीतरसिकांच्या मनात कायमचे स्थान मिळविले.

अमीरबाईंचा जन्म १९१२ साली कर्नाटकातील विजापूर येथे असलेल्या बेळगी या खेडेगावात झाला. नाकीडोळी नीटस व उफाड्याचा बांधा आणि मोहवून टाकणारी गायनशैली यामुळे ती १९३४-३५ च्या सुमारास चित्रपटात काम करण्यासाठी मुंबईत आली व १९३५ साली 'बेवफा आशिक' ऊर्फ 'यास्मिन' या चित्रपटात नायिकेची भूमिका मिळाली. त्या चित्रपटात मा. चंडिराम

यांच्या संगीत नियोजनाखाली तब्बल पाच गाणी म्हटली. त्यानंतर तिचा परिचय संगीतकार अनिल विश्वास यांच्याबरोबर झाला व त्यांच्या संगीतात अमीरबाईने 'फिदा-ए-वतन', 'प्रतिमा', 'दुखियारी', 'जंटलमन डाकू', 'इन्साफ' वगैरे चित्रपटांत १९३६ ते ३७ साली अनेक गाणी म्हटली. या सर्व चित्रपटांत तिने भूमिकाही केल्या होत्या.

अमीरबाईंचा अभिनय आणि गायनकौशल्य पाहून प्रकाश पिक्चर्सने तिला १९४० साली आपल्या कंपनीत नोकरी दिली व तिथे अमीरबाईने 'एकही भूल', 'नरसी भगत', 'सरदार', 'रामराज्य', 'भरतभेट' वगैरे चित्रपटांत कामे करून शंकरराव व्यास यांच्या संगीतात गाणी म्हटली. 'भरतभेट' मधील 'नेऊ पैलतिरी रघुराया' हे तिचे मराठी गाणे खूपच गाजले.

त्यानंतर नौशाद अलींनी तिला प्रकाश पिक्चर्सच्याच 'दर्शन', 'माला' व 'स्टेशनमास्तर' या चित्रपटांत गाणी दिली.. पण अमीरबाईचे नाव सर्वतोमुखी झाले. संगीतकार अनिल विश्वास यांच्या 'किस्मत' पासून. 'दूरहटो ए दुनियावालो', 'घर घरमें दिवाली है, मेरे घरमें अंधेरा', 'अब तेरे सिवा कौन मेरा' ही गाणी घरोघरी गायली जाऊ लागली. त्यातच भर म्हणून नौशाद यांच्या 'रतन' चित्रपटातील 'मिलके बिछड गयी' व 'ओ जानेवाले बालमवा' ही गाणी. या गाण्यांमुळे अमीरबाई श्रेष्ठ गायिकांच्या पंक्तीत जाऊन बसली. खेमचंद प्रकाश यांचा 'सिंदूर', सी. रामचंद्र यांचा 'शहनाई', खेमचंदचाच 'भर्तृहरी' वगैरे चित्रपटांतील गाण्यांनी अमीरबाई कर्नाटकीला आणखीच वेगळ्या उंचीवर नेऊन पोचवले. 'ओ रुठे हुए भगवान', 'मार कटार मर जाना', 'चंदा देश पियाके जा' ही त्या चित्रपटांतील गाणी अजरामर झाली. लता मंगेशकर यांच्याबरोबर 'समाधी' मध्ये गायलेले 'गोरे गोरे ओ बाँके छोरे' हे तिचे अखेरचे अत्यंत गाजलेले गीत.

अमीरबाईने अनेक चित्रपटांत कामे केली. पण तिच्या वैवाहिक जीवनामध्ये तिला खूपच त्रास झाला व तिचे चित्रपटसृष्टीकडे दुर्लक्ष झाले. ३ मार्च १९६५ रोजी तिचे मुंबईत निधन झाले, त्यावेळी ती प्रकाशझोताच्या मागे जाऊन पूर्णपणे अंधारातच बुडून गेलेली होती.

अंबाल्याची जोहराबाई

ज्येष्ठ संगीतकार नौशाद यांच्याबरोबर घरगुती गप्पा चालल्या होत्या आणि तेवढ्यातच त्यांच्या फोनची घंटी वाजली. तो फोन होता जोहराबाई अंबालावालीचा. फोनवरचे बोलणे संपल्यावर आमच्या गप्पांना वेगळे वळण लागले व जोहराबाईंचाच विषय सुरू झाला. मी त्यांच्या 'रत' (१९४४) या चित्रपटाची आठवण देत जोहराबाईंच्या 'रुमझुम बरसे बादरवाँ, 'सावन के बादलों', 'अखियाँ मिलाके' वगैरे चित्रपटांची आठवण देत असताना त्यांनी सांगितले की, 'जीवन' 'पहले आप' व 'संन्यासी' या चित्रपटांतही त्या नौशादमियाँकडे गायल्या होत्या. ''अत्यंत धारदार व पातळ आवाज होता त्यांचा. त्यामुळे त्यांच्याबरोबर गाणी गाण्यात खूपच मजा यायची.'' नौशाद मियाँ सांगत होते. 'मेला' या चित्रपटातलं त्यांनी कव्वालीच्या ढंगात म्हटलेलं 'टकरा लहू जिगरसे' हे त्यांनी माझ्याकडे गायलेलं माझं सर्वात आवडतं गाणं''. नौशादनी अगदी सहजपणे सांगितलं.

जोहरा अंबालावाली ही मूळ कोठेवाली. त्यामुळे नाच व गाणं पहिल्यापासूनच होतं. लाहोर आणि दिल्ली इथल्या रेडिओवर ती नेहमी गाणी म्हणायची. ती गाणी ऐकून संगीतकार अनिल विश्वास यांनी तिला 'ग्रामोफोन सिंगर' या चित्रपटासाठी सर्वप्रथम गाणी म्हणायला बोलावलं व त्यानंतर अनेक चित्रपटांत तिला गाणी दिली.

संगीतदिग्दर्शक वसंत देसाई यांनी राजकमल कलामंदिरच्या 'शकुंतला' या पहिल्याच चित्रपटात गाणे दिले. त्यानंतर सी. रामचंद्र यांनी 'ललकार', पं. गोविंदराय यांनी 'चाळीस करोड', 'खेमचंद प्रकाश यांनी 'महल' अशा मातब्बर संगीतकारांनी तिला गाणी देऊन ती लोकप्रिय केली. पण तिला स्वत:ला नौशाद यांनीच संगीत दिलेल्या अनेक चित्रपटांची गाणी आवडायची. १९५० च्या दशकात पार्श्वगायकांचा जमाना सुरू झाल्यानंतर जोहराचे गाणे मागे पडले व ती अज्ञातवासात गेली आणि जानेवारी १९९० मध्ये तिने अखेरचा श्वास घेतला.-

गझलसम्राज्ञी अख्तरी फैजाबादी

गझल आणि ठुमरी या संगीत प्रकाराला अनन्यसाधारण योग्यता प्राप्त करून देणारी गायिका म्हणजे बेगम अख्तर ऊर्फ अख्तरी फैजाबादी. तिच्या या असामान्य कामगिरीबद्दल तिला संगीत नाटक अकादमीची फेलोशिप आणि 'पद्मभूषण' या सन्मानाने गौरवलेले होते. पण या बेगम अख्तरने कधी काळी चित्रपटात भूमिका केल्या होत्या व गाणी म्हटली होती, ही गोष्ट आज भूतकाळातच गडप झाली आहे. हजारो मैफिली गाजवणारी मरहूम बेगम अख्तर हिच्या चित्रजीवनाचा थोडक्यात आढावा क्रमप्राप्तच आहे.

अख्तरी फैजाबादीचा जन्म ७ ऑक्टोबर १९१४ रोजी उत्तर प्रदेशातील फैजाबादमध्ये झाला. गाण्याचा रियाझ तिने पतियाळा घराण्याच्या अना महंमद खान यांच्याकडे केला व वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी तिने आपला पहिला संगीताचा जलसा केला. त्यावेळी श्रेष्ठ कवयित्री व समाजसेविका सरोजिनी नायडू उपस्थित होत्या. त्यांनी अख्तरीबाईला भरभरुन आशीर्वाद दिले व

सुयश चिंतिले.

गाण्याच्या मैफिली सुरूच होत्या, लोकप्रियताही चांगलीच मिळाली होती. त्याचा फायदा कोलकात्याच्या ईस्ट इंडिया कंपनी या चित्रसंस्थेने घेतला व १९३३ साली अख्तरीच्या प्रमुख भूमिका असलेले 'एक दिनका बादशाहा' व 'नल दमयंती' हे चित्रपट पडद्यावर आणले. त्यानंतर 'अमीना', 'मुमताज बेगम' हे १९३४ साली व 'जवानी का नशा' आणि 'नसीब का चक्कर' हे एका पाठोपाठ एक १९३५ मध्ये प्रकाशित झाले. या साऱ्या चित्रपटांत तिने गाणी म्हटली होती. बोलपटांच्या पहिल्या दशकातली चित्रपटसृष्टीत आपली कारकीर्द सुरू करून अख्तरीने अर्धविराम केला व स्वत:ला पुन्हा शास्त्रीय संगीतात अडकवून ठेवले.

पुढील पाच-सात वर्षांच्या काळात बेगम अख्तर चित्रपटसृष्टीकडे फिरकलीच नाही. मग १९४२ साली मेहबूब यांनी तिचे मन वळवून तिला 'रोटी' या चित्रपटात महत्त्वाची भूमिका दिली. त्या चित्रपटाचे संगीतकार होते अनिल विश्वास. त्यांनी तिच्या आवाजात दोन गाणी रेकॉर्ड केली. पण अख्तरीबाईने करारावर बोट ठेवून ती गाणी चित्रपटात ठेवू नयेत, असा कोर्टाकडून हुकूम मिळवला. अखेरीस त्या गाण्यांच्या रेकॉर्डस प्रसृत झाल्या; पण ती गाणी चित्रपटात मात्र दिसली नाहीत.

१९४५ साली तिचा इश्तियाक अहमद अब्बासी बरोबर निकाह झाला आणि त्याच्या दांडगाईच्या वर्तनामुळे बेगम अख्तरला चित्रपटात काम करणे अथवा गाणे राहोच; पण संगीताच्या मैफिलीही करता येईनात. काही वर्षांनी त्याच्या कचाट्यातून सुटल्यावर संगीत दिग्दर्शक मदन मोहन यांनी तिच्याकडून 'दानापानी' (१९५३) या चित्रपटासाठी 'ऐ इश्क मुझे और तो कुछ याद नही है' व 'एहसान' (१९५४) या चित्रपटासाठी 'हमें दिलमें बसा भी लो' अशा दोन गजला घेतल्या. गमतीची गोष्ट म्हणजे संगीतकार मदन मोहन यांनी संगीतशिक्षणाचे धडे बेगम अख्तर यांच्याकडे गिरवले होते.

बेगम अख्तर १९५८ साली बंगाली भाषेत आलेल्या 'जलसाधा' या चित्रपटात पुन्हा एकदा दिसल्या. सत्यजित रे त्या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. त्या चित्रपटात फक्त एका गाण्याच्या बैठकीत ठुमरी गाताना त्या दिसल्या. तेच त्यांचे चित्रपटातले अखेरचे दर्शन.

बेगम अख्तर साऱ्या भारतभर संगीताच्या मैफिली करतच होत्या. ३० ऑक्टोबर १९७४ रोजी अहमदाबाद येथे संगीताच्या कार्यक्रमाला गेल्या असता त्यांचे हृदयविकाराने निधन झाले. मृत्यूच्या आधी आठच दिवस त्यांनी गीतकार कैफी आझमी यांची गजल ध्वनिमुद्रित केली होती. तिचे बोले होते.

'सुना करो मेरी जान उनके अफसाने
सब अजनबी है हा कौन किसको पहचाने'

मधाळ सुरैया

आपल्या मस्त अदाकारीने आणि मधाळ आवाजाने सिनेरसिकांमध्ये कायम हलचल माजवणारी अभिनेत्री आणि गायिका सुरैया.

सुरैया जमाल शेखचा जन्म मुंबईत १५ जून १९२९ रोजी झाला. लहानपणापासूनच ती अगदी बिनधास्त होती. काननबाला, नूरजहाँ, शांता आपटे यांची गाणी गायची व लोकांना रिझवायची. नर्गिस, राज कपूर, संगीतकार मदन मोहन यांच्याबरोबर रेडिओसाठी अगदी बालवयात असताना ती कार्यक्रम करीत असे.

हिंदी चित्रपटांत खलनायकाचे काम करणारे जहूरराजा हे सुरैयाचे काका. त्यांच्याबरोबर ती निरनिराळ्या फिल्म स्टुडिओत फिरत असे. एकदा ज्योती स्टुडिओत गेली असताना तिथे 'उसने क्या सोचा' (१९३७) या चित्रपटाचे शूटिंग सुरू होते. त्या चित्रपटाचे दिग्दर्शक अफीसजी यांनी सुरैयाला ताबडतोब छोट्या भूमिकेसाठी निवडले. तोच सुरैयाचा पहिला चित्रपट.

त्यानंतर तिने 'ताजमहल' (१९४१) याही चित्रपटात बालकलाकाराची भूमिका निभावली व एक गाणेही म्हटले. पण हा चित्रपट रेंगाळला व उशिरा प्रदर्शित झाला. त्या दरम्यान नौशादनी तिच्याकडून 'बूट करु या पॉलिश बाबू' हे 'नई दुनिया' (१९४२) साठी गाणे घेतले व तो चित्रपट 'ताजमहाल' च्या आधी प्रदर्शित झाला. त्यानंतर सुरैयाने 'स्टेशनमास्तर' (१९४२) या चित्रपटातही बालकलाकाराची भूमिका केली. तिचा आवाज मेहताबला शोभून दिसत होता. त्यामुळे नौशादनी 'संजोग', 'कानून' वगैरे चित्रपटांसाठी सुरैयाकडून गाणी घेतली व ती पडद्यावर मेहताबने साकार केली.

तारुण्यात पदार्पण केल्यानंतर सुरैया १९५० च्या दशकात चांगलीच प्रसिद्धीच्या झोतात राहिली. नायिका म्हणून तिने बहुतेक सर्व आघाडीच्या कलाकारांबरोबर काम केले. तिच्या चित्रपटांना तिने गायलेल्या मधाळ गाण्यांची जोड मिळाल्याने ती अधिकच लोकप्रिय झाली.

'मैं दिलमें दर्द बसा लायी', 'मन लेता है अंगडाई' व 'सोचा था क्या, क्या हो गया' 'अनमोल घडी (१९४६) मधली गाणी सुरैयाचे वेगळेपण दाखवून गेली. त्याच्याच पाठोपाठ आलेला चित्रपट 'दर्द' (१९४७) 'चले दिलकी दुनियामें' व 'हम थे तुम्हारे हमारे' आणि 'मुरलीवाले मुरली बजा', 'दुनिया क्या जाने मेरा अफसाना' व 'चार दिनकी चाँदनी' या 'दिल्लगी' (१९४९) तील गाण्यांनीही कहर करून सोडला. 'दास्तान' (१९५०) या चित्रपटातल्या 'तारारी तारारी' व 'धडक धडक दिल धडके' या द्वंद्वगीतांनी सुरैयाच्या गायनाचा वेगळाच पैलू दाखवला. या साऱ्या चित्रपटांचे संगीत नौशाद यांनी दिलेले होते. ''मी मुळात गायिका नव्हते.

मला गाण्याची फारशी आवडही नव्हती, पण नौशाद मियाँनी मला गायला लावलं; म्हणूनच मी चित्रपटांसाठी गायले'', असे सुरैया नेहमी म्हणायची.

नौशादमियाँ खेरीज सुरैया एस.डी. बर्मन कडे 'अफसर' व 'विद्या' मध्ये गायली, हुस्नलाल-भगतराम यांच्याकडे 'हारकी जीत' व 'बडी बहेन' मध्ये गायली. अनिल विश्वास यांच्याकडे 'गजरे' साठी तिने गाणी म्हटली. गुलाम महंमद यांच्याकडे 'शायर' व 'मिर्झा गलिब' मध्ये तिने आपले गायन पेश केले आणि सज्जाद हुसेन यांच्याकडे '१८५७' व 'रुस्तमे सोहराब' मध्येही ती गायली. साऱ्या आघाडीच्या गायकांबरोबर गायलेली तिची अनेक द्वंद्वगीतेही गाजली. अभिनय व गाणे यांच्या जोरावर आपली लोकप्रियता अस्मानाला भिडवणारी सुरैया ही १९५० च्या दशकातली एकमेव कलाकार. 'शमा' (१९६१) हा तिचा अखेरचा चित्रपट. त्यानंतर तिने चित्रसंन्यास घेतला. ३१ जानेवारी २००४ रोजी ती अल्लामियाँला प्यारी झाली.

टुणटुणीत टुणटूण

दिसायला काळीसावळी, चपटे नाक, वेडावाकडा बांधा, गोलमटोल गाल हे ध्यान म्हणजे विनोदी भूमिका गाणाऱ्या टुणटूणचे, हे सांगायला नकोच. या टुणटूणने उमादेवी नावाने एकेकाळी गाणी म्हणून लोकप्रियता मिळवली होती.

श्रीकृष्ण भगवानचे ज्या ठिकाणी बालपण गेले, त्या मथुरा गावात खत्री कुटुंबात १९२३ साली उमादेवीचा जन्म झाला. लहानपणापासून गाण्याची आवड. पण आई-वडील लहानपणीच निवर्तल्यामुळे तिचे काका, जे तिचे पालनपोषण करत होते, तिच्या गाण्याकडे व गाण्याच्या हट्टाकडे लक्ष देईनात. मग त्यावेळची लोकप्रिय गाणी निवडून त्याबरहुकूम गाणी म्हणण्याचा सपाटा उमादेवीने सुरू केला. एके दिवशी तिच्या मनात काय आले कुणास ठावूक ! तिने सरळ मुंबईचा रस्ता पकडला. मनात ध्यास एकच सिनेमात जायचंय.

मुंबईत तिला कोणी विचारेना तेव्हा ती रडवेली झाली. ठिकठिकाणी गाण्याची टेस्ट दिली; पण तिला कुणी जवळ करेना. अखेरीस अल्लारखाँ यांनी तिला 'वामक अजरा' (१९४६) या चित्रपटात सर्वप्रथम गाण्याची संधी दिली. ते गाणे होते 'हाय दो दिल मिलते मिलते रह गये'.

यंग इंडिया या कंपनीने काढलेली 'वामिक अजरा' ची ध्वनिमुद्रिका घेऊन ती स्टुडिओंच्या चकरा मारू लागली. कुणीही तिला गायला सांगितले तर ती 'हाय दो दिल' हेच गाणे म्हणून दाखवायची. एके दिवशी तिने नौशादमियाँना गाठले; पण आवाजाची टेस्ट देताना तिने 'वामक अजरा' मधले गाणे म्हणून दाखवायच्या ऐवजी चक्क 'रतन' मधले 'मिलके बिछड गयी अखियाँ' हे गीत अगदी आविर्भाव करून म्हणून दाखवले. नौशाद खुष झाले आणि म्हणाले, ''तू गाण्यापेक्षा ॲक्टिंग चांगले करतेस सरदारसाहेबांना भेट.'' ती रडवेली झाली आणि मला तुमच्याचकडे गायचं आहे, असा हट्ट धरून बसली. त्या काळात नौशाद यांचा रुबाब काही औरच होता. पण उमादेवीला नशिबाने साथ दिली व नौशाद तिच्याकडून गाणे घ्यायला तयार झाले. तालमी सुरू झाल्या व गाण्याचे बिलकूल शिक्षण नसणाऱ्या उमादेवीकडून त्यांनी 'दर्द' (१९४७) या सिनेमासाठी गीत घेतले. ते होते 'अफसाना लिख रही हूँ.'

'दर्द' मधले हे गाणे एकदम फेमस झाले व त्यानंतर तिने नौशाद यांच्याकडेच 'दिलवाले जलजलकर मर जाना' (चित्रपट-तारका), काहे जिया ड़ोले' (चित्रपट-अनोखी अदा), 'मेरी प्यारी पतंग' (चित्रपट-दिल्लगी) व 'चाँदनी रात है' (चित्रपट-चाँदनी रात) वगैरे चित्रपटांत गाणी म्हटली. याखेरीज तिने 'विधाता', 'चंद्रलेखा', 'आखरी पैगाम' वगैरे चित्रपटांत गाणी म्हटली. पण ती यशस्वी झाली नाहीत.

मग उमादेवीने गाण्याचा अट्टाहास सोडून सिनेमात काम मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला. यावेळी नौशाद 'बाबुल' हा चित्रपट निर्माण करत होते. त्याचे हीरो होते दिलीपकुमार. त्यांच्याबरोबर गुजगोष्टी करून तिने आपले उमादेवी हे नाव बदलले व टुणटूण हे विचित्र नाव घेऊन 'बाबुल' चित्रपटापासून अभिनय सुरू केला. ती नेहमी विनोदी भूमिकाच करत असे. 'आरपार', 'दीदार', 'बाझ', 'उडन खटोला', 'गुनाह', 'चोरी चोरी' अशा अनेक चित्रपटांत तिने छोटी छोटी कामे केली. मुंबईतल्या आशा पारेख हॉस्पिटलमध्ये २४/११/२००३ रोजी तिचा मृत्यू झाला.

राजस राजकुमारी

नम्र स्वभावाची, अत्यंत मोजके आणि गोड बोलणारी गायिका म्हणजे राजकुमारी. ती बनारसची. त्यामुळे आपल्या नावापुढे ती बनारसवाली असे लावत असे. राजकुमारी दुबे हे तिचे मूळ नाव.

टपोऱ्या डोळ्यांची, गोरीपान, दिसायला सुंदर व नाजूक आवाज यामुळे राजकुमारीला अगदी बालपणीच नाटकात भूमिका मिळाल्या. त्यामध्ये ती गाणीही म्हणत असे. प्रकाश पिक्चर्सचे मालक विजय भट्ट यांनी तिचे नाटक

पाहिले व तिला मुंबईत येऊन सिनेमात काम करण्याचा प्रस्ताव दिला. १९३४ साली 'नई दुनिया' या चित्रपटांत राजकुमारी सर्वप्रथम रजतपटावर दिसली. त्यानंतर ती पुढील काळात काही चित्रपटात विविध भूमिका करताना व गाणी म्हणताना दिसली.

नटश्रेष्ठ मोतिलाल तिचा मानलेला भाऊ. 'चित्रपटात काम करण्यापेक्षा गायनाकडे जास्त लक्ष दे' असा सल्ला त्याने दिला व तिने तो मानून गाण्यावर अधिक मेहनत करायला सुरुवात केली. ग्यानदत्त अनिल विश्वास, जमालसेन, अमीर अली, रफीक गझनवी, नौशाद, रोशन, बुलो. सी. राणी वगैरे अनेक संगीत दिग्दर्शकांकडे तिने गाणी म्हटली. श्रेष्ठ गायक के. एन. सैगल यांच्याबरोबर 'भक्त सूरदास' (संगीतकार-ग्यानदत्त/१९४२) मध्ये तिने 'सरपे करम की' हे गीत गायले तेव्हा तिला अस्मान ठेंगणे झाल्यासारखे वाटले. खेमचंदकडे 'घबराके जी तरसे' हे 'महल' चे तिचे खूप गाजलेले गाणे. याशिवाय 'नौबहार' मधले 'कजरारी मतवारी' (संगीतकार-रोशन), 'सुन बैरी बलम' (चित्रपट-बावरे नयन, संगीतकार-रोशन), 'हर चीज यहाँ की' (चित्रपट-पन्ना, संगीतकार-अमीर अली) ही तिची आणखी गाजलेली काही गाणी. १९५० च्या दशकात तिचा भाव एवढा होता की, ती स्वत:च्या ब्यूक गाडीतून रेकॉर्डिंगसाठी येत असे.

पुढे काळ बदलला लता, आशा, गीता आणि इतर पार्श्वगायिका हिंदी चित्रपटसृष्टीत आल्यानंतर तिचा भाव इतका उतरला की पूर्वीचे सारे वैभव इतिहासजमा झाले व एकेकाळी राजेशाही थाटात फिरणाऱ्या राजकुमारीला कोरसमध्ये गाणी गायची पाळी आली.

'पाकीजा' या चित्रपटाच्यावेळी नौशादमियाँ त्याचे पार्श्वसंगीत देत असताना त्यांना कोरस गाण्यासाठी उभी असलेली राजकुमारी दिसली. ते तिला म्हणाले, ''तुम्ही थोर गायिका, माझ्या चित्रजीवनाच्या सुरुवातीच्या काळात तुम्ही मला खूप सहकार्य दिले. मी तुमची इज्जत करतो. तुम्ही नका कोरस मध्ये गाऊं !'' त्यावर ती उत्तरली, ''नौशादसाहब, तकदीर के फेरे अब बदल गये हैं, कमसे कम कोरस में गाके मुझे आमदनी करने दो, वरना मैं पैसे बिनाही मर जाऊँगी''. नौशादनी तिचा मान राखला व पार्श्वसंगीत ध्वनिमुद्रित केले.

हिंदी चित्रपटसृष्टीचा काळ एकेकाळी गाजवणारी राजकुमारी बनारसवाली २० मार्च २००० रोजी मुंबईत निधन पावली तेव्हा तिच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी तिच्या घराकडे फिल्म इंडस्ट्रीतले चिटपाखरूही फिरकले नाही.

नशिली नूरजहाँ

१९३८-३९ सालची गोष्ट. लाहोरमधील पांचोली स्टुडिओच्या दरवाजात एक गोरीगोमटी व उफाड्याची मुलगी आपला दुपट्टा सावरत सावरत आपल्या वडिलांसमवेत उभी होती. तिच्या वडिलांनी समोरून सायकलवर बसून येत असलेल्या संगीतकार गुलाम हैदरला पाहिले व मुलीला पुढे होऊन तिला तसलिम करोयला सांगितले. पण आपल्याच नादात असलेल्या हैदरसाहेबांनी त्या मुलीकडे अजिबात लक्ष न देता ते तसेच पुढे गेले. मग तिच्या वडिलांनी सांगितलं, ''बेटी, गाओ''. वडिलांची आज्ञा होताच तिने दमदार श्वास घेऊन अशी काही तान घेतली की गुलाम हैदर यांच्या सायकलीचे ब्रेक अकस्मात लागले आणि खाली उतरून त्यांनी त्या आवाजाचा मागोवा घेतला. चालत चालत ते तिच्यापर्यंत आले, तिच्याशी बोलले व तिला आणि तिच्या वडिलांना बरोबर घेऊनच स्टुडिओत गेले.

या मुलीचे नाव नूरजहाँ. तिचा जन्म पाकिस्तानमध्ये २१ सप्टेंबर १९२६ रोजी झाला. अत्यंत धारदार; पण सुरेल आवाज असल्याने तिच्या गाण्याचे लहानपणापासूनच कौतुक व्हायचे. मग अचानक कानांवर पडलेल्या आवाजामुळे संगीतकार गुलाम हैदर त्या आवाजावर फिदा झाले नसते तरच नवल! त्यांनी तिला ताबडतोब 'गुल-ए-बकावली' या पंजाबी चित्रपटात गाणी दिली व पांचोलींनी तिला भूमिकाही दिली. यावेळी ती बेबी नूरजहाँ म्हणूनच पडद्यावर चमकली. त्यावेळी तिचे वय होते अवघे तेरा वर्षांचे.

पण उफाड्याची असल्याने पांचोलींनी तिला 'खानदान' (१९४२) या चित्रपटात नायिकेची भूमिका दिली. त्यावेळी तिचा नायक होता हिंदी चित्रपटातला अस्सल खलनायक प्राण. 'खानदान' मधली तिने गायलेली आणि 'मेरे लिये जहाँ में' ही गाणी खूपच गाजली. त्यानंतर गुलाम हैदर यांच्या पाठोपाठच नूरजहाँ मुंबईला आली व तिने 'नादान', 'नौकर', 'दोस्त', 'लाल हवेली', 'गाँव की गोरी', 'भाईजान', 'बडी माँ', 'हमजोली', 'दिल', 'झीनत', 'दुहाई' अशा अनेक हिंदी चित्रपटांत नायिकेच्या भूमिका केल्या व गाणी म्हटली. त्यापैकी अनेक गाणी लोकप्रिय झाली. 'दिया जलाकर आप बुझाया' व 'आ इंतजार है तेरा' (चित्रपट-बडी माँ, संगीतकार के. दत्ता), 'किस तरह भूलेगा दिल' व 'बैठी हूँ तेरे यादका' (चित्रपट-गाँव की गोरी, संगीतकार श्यामसुंदर), 'कोई प्रेम का दे संदेसा' व 'बदनाम मुहब्बत कौन करे' (चित्रपट-दोस्त, संगीतकार-सज्जाद हुसेन), 'बुलबुले मन यहाँ' व 'आजा री निंदियाँ' (चित्रपट-झीनत, संगीतकार हफी झरवाँ, रफीक गझनवी व मीरसाहेब), 'आजा तुझे अफसाना' (चित्रपट-मिर्झा साहेबाँ, संगीत पं. अमरनाथ व हुस्नालाल/भगतराम) अशी

नूरजहाँने गायलेली गाणी आजही ताजी टवटवीत वाटतात. 'अनमोल घडी' (१९४६) मधली 'जवाँ है मुहब्बत', 'आजा मेरी बराबद, 'क्या मिल गया भगवान' आणि सुरेंद्र बरोबर गायलेले 'आवाज दे कहाँ है' या गाण्यांनी तिची लोकप्रियता परमोच्च बिंदूवर नेली. 'जुगनू' मध्ये काम केल्यानंतर ती १९४७ साली पाकिस्तानमध्ये गेली व एका अद्वितीय गायक-नायिकेची कला भारताला पारखी झाली. तिने भारत सोडला तेव्हा ती प्रसिद्धीच्या ऐन शिखरावर होती.

पाकिस्तानमध्ये गेल्यावरही तिने 'गुलजार', 'दुपट्टा' वगैरे चित्रपटांत भूमिका करून गाणी म्हटली. पण तिला जेवढ्या प्रमाणात लोकप्रियता भारतात मिळाली त्यापेक्षा कितीतरी कमी प्रमाणात ती पाकिस्तानमधल्या चित्रपटांत मिळाली. पुढे तर तिने वय झाल्यावर पार्श्वगायनही सुरू केले. पण तिथेही जम बसेना. अखेरीस ती पाकिस्तानचे तत्कालीन प्रशासक सदर-ए-आयूब खाँन यांची रखेल म्हणून राहिली. भारतातच असताना तिचा निकाह दिग्दर्शक शौकत हुसेन यांच्याबरोबर झाला होता व तिला पाकिस्तानमध्ये गेल्यावर कन्यारत्न प्राप्त झाले. पण नूरजहाँचे वैवाहिक आयुष्य फारसे सफल झाले नाही. ती आर्थिक अडचणीत आल्यामुळेच तिला अयूब खान यांच्याकडे धाव घ्यावी लागली.

अयूब खान निवर्तल्यानंतर पुन्हा एकदा ती पाकिस्तान रेडिओ/दूरदर्शनसाठी गाणी म्हणू लागली. पण त्यातूनही फारसा आर्थिक लाभ होईना. २३ डिसेंबर २००३ रोजी तिचे पाकिस्तानमध्ये निधन झाले व संगीताचा एक मोठा वारसा लयाला गेला.

अनेक गायिका

बोलपटांच्या सुरुवातीच्या काळात आपल्या आवाजाने संगीत फुलवणाऱ्या दशकन्यांचा थोडक्यात आढावा घेताना एक गोष्ट खटकते, ती ही की, त्या काळात एवढ्याच मोजक्या गायिका होत्या का?

याचे उत्तर अर्थातच नाही. पारुल घोष, पेशन्स कूपर, बिब्बो, सबिनादेवी, निर्मला देवी, जहाँ आरा, लीला चिटणीस, सितारादेवी, हमीदाबानो, वत्सला कुमठेकर, रतनबाई, नसीम, नसीम अख्तर अशा अनेक गायिकांनी आपल्या गानशैलीने हिंदी रजतपट गाजवला. तसेच या दशकन्यांच्या वैभवाच्या काळानंतर लता मंगेशकर, मीना कपूर, गीता दत्त, मुकर्जी वगैरे गायिकांनीही आपला जमाना गाजवला. पण या सर्वांची कारकीर्द थोडक्यात विशद करणे स्थलाअभावी शक्य नाही. त्यामुळेच आज अज्ञातवासामध्ये गेलेल्या सूरयात्रेतल्या दशकन्या मुद्दामच प्रकाशाच्या झोतात आणण्याचा हा प्रयत्न !

❀ ❀ ❀

गाजलेली मराठी चित्रपटगीते
नाचनाचुनी

नाचनाचुनी आती मी दमले
थकले रे नंदलाला ।।
निलाजरेपण कटीस नेसले निसुगपणाचा शेला
आत्मस्तुतीचे कुंडल कानी गर्व जडविला भाळा
उपभोगाच्या शतकमलांची कंठी घातली माला ।।धृ।।
विषयवासना वाजे वीणा अतृप्ती दे ताला
अनय अनीती नुपूर पायी कुसंगती करताला
लोभ प्रलोभन नाणी फेकी मजवर आला गेला।।
स्वत:भोवती घेता गिरक्या अंधपणा की आला
तालाचा मज तोल कळेना साद ही गोटून गेला
अंधारी मी उभी आंधळी जीव जीव ना भ्याला ।।

गीत : ग. दि. माडगूळकर, ✻ गायिका : आशा भोसले
संगीतकार : सुधीर फडके ✻ चित्रपट : जगाच्या पाठीवर

ग. दि. माडगूळकर, सुधीर फडके आणि आशा भोसले या सुवर्णयुगीन शिल्पकारांचं हे अद्वितीय गीत ग.दि.मा. सूरदासाच्या 'अब मैं नाचो बहुत गोपाल' या संकल्पनेवर आपल्या प्रतिभेचं लेणं चढवतात. सुधीर फडके नृत्याच्या मनोहर शैलीत गीत रचतात आणि सदाबहार आवाजात आशा भोसले गातात. 'लोभ प्रलोभन नाणी फेकी मजवर आला गेला' असं म्हणणारी नायिका केवळ रस्त्यावर नाच करून पोट भरणारी खचितच नाही. एक सुंदर रूपक गुंफलेलं मराठी चित्रपट संगीतातलं हे अजरामर गीत आजही हवंहवंसं वाटतं.